म. ग्रं. सं. ठाणे
विषय चारित्र
सं. क्र. १२८९
REFBK-0001915

१२२१
म. ग्रं. मं. टाणे
विषय — चरित्र —
ग्रं. नं. १२६८

भारत-गौरव ग्रंथमाला

# चक्रवर्ति नेपोलियन.

( प्रथम खंड )

४२

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प बेचाळीसावें.

# चक्रवर्ति नेपोलियन.

(प्रथम खंड.)

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १०७५



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

भगवान् श्रीकृष्ण.

REFBK-0001915

विनायक लक्ष्मण भावे.

सन १९२१

साधी प्रत एक रुपया.] [कापडी प्रत दीड रुपया.

तुमच्या देशाची पद्धत ही अशीच काय ? आणि असें विचारलें म्हणजे विलायतचा बादशहा त्याची चौकशी करून सर्व तरतूद नीट करी.

या दोन्ही आख्यायिका साफ खोटया आहेत. त्या कशा उद्भवल्या, याचा बिलकुल पत्ता नाहीं; पण या आख्यायिकामुळें नेपोलियन बोनापार्टाकडे माझें लक्ष प्रथम वेधलें व तेव्हांपासून पुढें हळू हळू या विभूतीची माहिती ऐकण्याची व जाणण्याची जिज्ञासा मला जास्त जास्त होत गेली. मी लहानपणीं ऐकलेल्या आख्यायिका साफ खोटया आहेत, असें ज्या प्रमाणें मला मागाहून दिसून आलें, त्या प्रमाणें मीं लिहीलेल्या गोष्टी अगदीं बाता आहेत, असें पुढील पिढीच्या अनुभवास येऊं नये, या करितां हें चरित्र लिहीतांनां मला घेतां आली तितकी सर्व काळजी मीं घेतली व ग्रंथांतरीं आढळलेल्या गोष्टींचा मनाशीं नीट विचार करून, त्यांतल्या खऱ्या वाटल्या त्याच गोष्टी मीं आपल्या पुस्तकांत घेतल्या आणि शिवाय पुढील हकीगत सांगतांनां मी पुराणांतली कथा सांगत नसून, एक चरित्र सांगत आहे व तें नेपोलियनचे चरित्र आहे, ही जागृती मनांत सदैव बाळगून, सर्व गोष्टी चौकसपणानें पाहून व त्यांची मनांशीं नीट छाननी करून मग त्या सांगाव्या हेंच मला योग्य वाटलें आणि माझ्या शक्तीप्रमाणें मीं तें तसें केलें.

आजपर्यंत मनुष्याच्या कायेमध्यें परमेश्वरानें जेवढे अवतार घेतले, त्या सर्वांत नेपोलियनचा अवतार हा एक तऱ्हेनें विशेष आहे. नाहींपेक्षां देव नेहमींच अवतार घेतो. तुम्ही आम्हीहि अवतारच आहों. कोणी कामाचे अवतार तर कोणी क्रोधाचे अवतार, कोणी मोहाचे तर कोणी मत्सराचे अवतार! कोणीं हेव्याचे व मदाचे तर कोणी शुद्ध गुलामगिरीचेच मूर्तिमंत अवतार! अशांतले प्रकार सर्वभर आढळतात; पण या जगांतल्या आपल्या एकटयाच्याच हितावर पूर्ण नजर ठेवून, बाकी दिनदुनिया विसरून जाऊन, दुसऱ्या जगाची कल्पनाहि मनाला शिवूं न देतां, सर्व बरेवाईटाचे विचार बाजूला सारून, सतत एका हेतूनें अत्यंत परिश्रम करणारे अवतार फारच विरळा दृष्टीस पडतात. सभ्यतेला पार रजा देऊन, नग्न होऊन दिगंबर वृत्तीनें वावरणारे लोक आढळतात. नीट मेहनतीनें संसार करून, आपणास जन्मास घालणाऱ्या आपल्या जन्मदात्या मातापितरांचें, व आपण जन्मास घातलेल्या व पुत्रांचे पालनपोषण करण्याचें सोडून देऊन, त्यांच्या पालनं

सर्व भार दुसऱ्यावर टाकून आपण निःशंकपणें भिक्षा वृत्तीनें चरणारेहि लोक आढळतात. आपणांस सुख मिळावें या करतां गरीब आणि मुक्या प्राण्यांस बुकलून मारणारें, किंवा अग्नींत जाळणारेहि लोक आढळतात. अनेक वर्षें सारखी तपश्चर्या करणारे, त्रिस्थळी यात्रा करणारे, योगाभ्यासी व तापसी पुरुषहि दृष्टीस पडतात, हे सर्व देवाचेच अवतार होत व हे आपापलीं नियमित कर्में एका हेतूनेंच करतात; पण यांचा हेतु या जगांतला कोणताहि लाभ मिळवण्याकरतां नसून, दुसऱ्या जगांत किंवा पुढल्या जन्मांत आपणा स्वतःला अप्रतीम व केवळ ज्ञानाला गम्य अशा सौख्य लाभाची जोड करून घ्यावी, असा असतो. ते या दुनियेसंबंधीं केवळ अंध व बेफिकीर असतात. असे पुष्कळ अवतार आपणा हिंदु लोकांच्या परिचयाचे आहेत. परंतु ज्यानें पुढच्या जगाची कल्पनाहि मनास शिवूं न देतां, कोणत्याहि विचारानें मनाला बाजूस वळवूं न देतां, केवळ या जगांत आपलें उत्तम-बरें कसें होईल, येवढीच चिंता बाळगून सर्व आयुष्यभर एकंदर कृत्यें केली, असा अवतार एक नेपोलियन बोनापार्ट होय. सत्य, माया, ममता, स्वदेश-प्रीति, मनुष्यहिंसा वगैरे विचार सर्व वेळीं बाजूला सारून आपलें कल्याण कसें होईल, आपलें सामर्थ्य व आपली सत्ता कशी वाढेल, आजच्या व पुढल्या पिढ्यांत आपणास असामान्य मान कसा मिळेल, इहलोकचें सर्व ऐश्वर्य आपल्या मुठींत कसें येईल, हा एक आणि हा एकच विचार सर्व काळ मनांत बाळगून ज्यानें अवाढव्य उद्योग केला, ज्यानें अचाट कृत्यें केलीं व करविलीं, असा पुरुष एकटा नेपोलियन हाच होय. ज्याप्रमाणें ओंगळ चिखलांत जन्मपावून आणि रेंदाळ तलावाच्या पाण्यांत विकास पावून अखेर श्रीविष्णूच्या शीर्षावर बसविण्यास कमळाचे फूल योग्य होतें, त्याचप्रमाणें दारिद्र्य पंकांत जन्म घेऊन, राजक्रांतीच्या गढूळ पाण्यांत विकास पाऊन सर्व पृथ्वीपतींच्याहि डोक्यावर बसण्याच्या पदास नेपोलियन चढत गेला. आणि मग दुसरेंच दिवशीं तें श्रीविष्णूच्या शीर्षावरील कमल जसें निर्माल्य होऊन गुरुवांच्या पोरांचा खेळ होतें, त्याचप्रमाणें नेपोलियन हाहि थोडेच अवकाशांत नष्टतेज होऊन कुटिलांच्या कारस्थानांचा व वाचाटांच्या वाणीचा विषय होऊन राहिला. भावानें आणि भावजयीनें मनोभावानें मारलेली लग्नगांठ यानें स्वतः निष्ठूर मनानें स्वतःच्या फायद्यासाठीं कापन विस्खलित

पण कोणत्याहि तऱ्हेचे व्यवस्थित स्वरूप आणि त्याच्या प्राप्तीचा आंखीव मार्ग त्यांना मुळींच न्याहाळत नसल्यामुळें ते बावरून गेले होते आणि मनाच्या या स्थितींत ते सैरटाप्रमाणें वारेमाप वर्तन करित सुटले होते. सर्व देश असा पिसाळून गेला असल्यामुळें व वैतागाच्या वाऱ्यानें त्यांचें भान नाहींसें झाल्यामुळें त्यांना नीट वळण लावणें हें काम अत्यंत कठीण होतें. या आंतील वृत्तीप्रमाणेंच भोंवतालचे सर्व अभिषिक्त राजे हे त्वेषानें सूड घेण्यासाठीं जळत असल्यामुळें तर आणखीच घोटाळा उडाला होता. तेव्हां या प्रखर ज्वालांत फ्रान्स देशाची रक्षा होऊं न देतां, त्या आगींतून त्याचें रक्षण करून त्याला संपन्नतेच्या पायरीवर पोंचवणें हें केवळ असाध्य-कृत्य होतें व तें नेपोलियननें साध्य केलें व आपली कीर्ती दिगंत करून ठेवली; तेव्हां अशा या अलौकिक पुरुषाची माहिती आपल्या लोकांस असावी व त्याचें चरित्र त्यांचे पुढें सांगावें, हें साहजिक पणें माझे मनांत आलें व इतरांनींहि या माझ्या उद्देशाला आग्रहपूर्वक मान्यता दिल्यामुळें कांहीं वर्षांपूर्वीं मीं हें चरित्र लिहिलें. आणि त्यांतच आतां या शतसांवत्सरिक उत्सवाच्या वेळीं या चरित्रांत नवीन घालतां आली, तेवढी भर घालून हें चरित्र मीं पुन्हां लिहिलें.

नेपोलियन बोनापार्ट हा शके १७४३ च्या वैशाखांत म्हणजे इ. स. १८२१ च्या मे मध्यें सेंट हेलिना येथें मरण पावला. म्हणजे तो मेल्याला यंदा बरोबर शंभर वर्षें झालीं. शंभर वर्षांपूर्वीं हा फ्रेंचांचा सर्वश्रेष्ठ व सर्व अधिकार संपन्न पुरुष काय स्थितींत होता व पुढें त्याची काय दशा झाली, हे मनांत आलें म्हणजे आपल्या या महाराष्ट्रांत शंभर वर्षांपूर्वीं काय स्थिति होती व पुढें ती स्थिति कशी आणि किती पालटली, याचे विचार कोणाहि महाराष्ट्रीयाच्या मनांत सहजासहजीं येतात. शंभर वर्षांपूर्वीं फ्रान्सांत नेपोलियनची आणि महाराष्ट्रांत श्रीमंत बाजीराव रघुनाथाची सत्ता सर्वभर पसरलेली होती. या दोघांनाहि इंग्रजी अधिकाऱ्यांनीं एक वेळीं दोस्त म्हणून बरोबरीचे असे लेखले होते; पण पुढें या दोघांनाहि त्यांच्या अधिकारावरून दूर करावें, हें इंग्रजाच्या मनांत आलें. हे दोघेहि इंग्रजसरकारचे कैदेंत बंदीवान होते. दोघांनाहि राहण्यास ईस्ट इंडिया कंपनीच्या हद्दींत जागा दिली होती. दोघांवरहि नजर ठेवणाऱ्या इंग्रजी अधि-

काऱ्याचें नांव 'लो' असें होतें. दोघांनाहि इंग्रज सरकारानें तनखा ठरवून दिला होता.

दोघांच्यावर प्रत्यक्ष चौकशी करून कोणत्याहि न्यायासनापुढें कसलाहि आरोप शाबीत केला गेला नव्हता; परंतु दोघांसहि जन्मठेपेची शिक्षा फरमावण्यांत आली होती.

या व अशाच आणखी कांहीं बाबींत या दोघां कैद्यांमध्यें साम्य होतें; पण साम्यापेक्षां असाम्याच्या बाबी विशेष महत्वाच्या होत्या. या दोघांपैकीं एक म्हणजे नेपोलियन हा अलौकिक बुद्धीमत्तेचा व असाधारण धैर्याचा पुरुष होता, तर दुसरा म्हणजे बाजीराव हा बुद्धीनें आणि धैर्यानें अगदींच कोता होता. दांडीच्या एका टोंकाला एक आणि दुसऱ्या टोंकाला दुसरा बसवावा अशी स्थिति होती. पहिल्याला धर्म आणि पापपुण्याची फिकीर मुळींच नव्हती, तर दुसऱ्याला धर्माचरण आणि पुण्यकर्मे करण्याची अतोनात हौस होती. पहिल्यानें जितकीं मनुष्यें मारलीं असतील, तितके दुसऱ्यानें ढेंकूणहि मारले नसतील. पहिल्याची कटिशूलाची व्यथा इतक्या थराला जाऊन पोंचली होती कीं, प्रत्यक्ष नातेवाईक, बहिण किंवा मुलगी यांचाहि विधिनिषेध त्याला राहिला नाहीं व तो त्याबद्दल कधीं शरमिंधाहि होत नसे. ठेवलेल्या राखेच्या मुलांना त्यानें इनामें दिलीं व प्रतिष्ठीतपणानें ती संतती तो कबूलहि करी. दुसऱ्यालाहि कटिशूलाची बाधा नव्हती असें नाहीं. पण त्याला कांहींतरी आड पडदा होता. त्याचे शत्रू अनेक तऱ्हेच्या गप्पा झोंकतात; पण अद्यापपर्यंत त्याचा लेखी दाखला कोठेंहि प्रसिद्ध नाहीं त्यानें अनेक लग्नें केलीं हें खरें आहे; पण त्यांत शारीरिक उपभोगापेक्षां धार्मिक हेतू प्रधान होते. आपणास पुत्र प्राप्ती व्हावी व आपल्यास आणि आपल्या पितरांस पाणी देणारा कोणी तरी असावा, ही तळमळ त्याला विशेष असे. या दोघांची वैयक्तिक गोष्ट क्षणभर दूर ठेवून त्यांच्या कुटूंबांतील स्त्रियांचा विचार केला असतां फारच फरक नजरेस पडतो. नेपोलियनची आई किंवा दोहोपैकीं कोणतीहि बायको यांचा व्यभिचार जगजाहिर आहे; पण बाजीरावाच्या एकट्याच्याच काय, तर त्याच्या पूर्वीच्या आई, आजी, पणजी वगैरे अनेक पिढ्यांतील कोणाहि बाईचे कधींहि वांकडे पाऊल पडल्याची शंकाहि कोणाला आली नाहीं. प्रत्यक्ष शत्रूंनींहि कधीं तशी नुसती कुजबुज

आहेत आणि या पैकीं प्रत्येक अंग आपआपल्या परीनें त्या त्या जबाब-दार इसमांनीं सुधारल्या शिवाय व आपली स्वतंत्रता स्थापित केल्या शिवाय स्वराज्याच्या नुसत्या बोंबा फुकट आहेत. क्रिया तर नाहींच; पण नुसत्या तोंडानें ओरड करण्याचें व मेंदूला कर्तृत्वाची जागृति आणण्याचेंहि भान या मंडळीला राहिलें नाहीं. कारागिरी आणि हस्त कौशल्यापलिकडे पाहिलें तरीहि हीच रड ऐकूं येते. जे जे लोक आम्ही लेखणीचे धनी व बांके लेखक म्हणून मिरवतात त्यांनींहि आज गेल्या शंभरवर्षांत असा एकहि ग्रंथ निर्माण केला नाहीं, कीं जो वाचून जगानें तोंडात बोट घालावें किंवा जग राहिले पण इंग्रजी ग्रंथकारांनीं तरी ज्यापुढें नम्रतेनें मान वाकवावी. गेल्या शंभर वर्षांत कोणाहि महाराष्ट्रीयानें असें काव्य निर्माण केलें नाहीं, कीं ज्याचा अम्मल दुनियेवर बसावा. वेद आणि धर्मग्रंथ एकीकडे ठेवले तरी न्याय, मीमांसा, व्याकरण वगैरे अनेक शास्त्रांपैकीं एकाहि शास्त्रांत नांव गाजण्यासारखी मराठींत किंवा संस्कृतांत कोणीहि लेखणी चालविली नाहीं. आतां सर्व सोयी मोकळ्या आहेत व सर्वांनां सर्वप्रकारें मुक्तद्वार आहे, तरी याहि बाबींत आपलें तेज किंवा स्वातंत्र्य प्रस्थापित करण्या-सारखा नुसता यत्न देखील झालेला दिसत नाहीं.दुनियेंत काय निर्माण झालें आहे, तें पचवून आपलेसें करून घेण्याचें व त्यापासून पुढें निष्पत्ती कर-ण्याचें तर कोणी केलेंच नाहीं; पण आपलें होतें तें मात्र गमावून बसले. सबंध धोतरजोडा काढून तो आंब्याच्या कोयींत घालून श्रीमंतांनां नजर करण्याइतकें तलम सूत काढणारे कारागिर इकडे होते, ते जाऊन आतां निर्भेळ स्वदेशीचें व्रत करावयाचें तर आमच्या नवकोट नारायणनांहि जाडया खादीची आराधना करावी लागते. आपल्या सौभाग्यालंकारांसाठीं देखील स्त्रियांनां परक्यांच्या तोंडाकडे पाहण्याचें आमच्या कारागिरांच्या कर्तृत्व शून्यतेमुळें कपाळीं आलें आहे. बारीक सारीक जिनसा देखील येथें तयार करण्याची ताकद त्यांनीं बाळगली नाहीं. हें गरीब अजाण उद्यो-गवाल्यां बद्दल झालें; पण ज्यांनां आपण फार मोठे गणतों व ज्यांचे हातीं अवाढव्य कारखानें आहेत, त्यांची कहाणी तर याहूनहि दुःखद आहे. मुंबईतले आजन्म मुरलेले गिरण्याचे व इतर कारखान्यांचे मालक आपल्या पैशावी पलिकडे फारसे पाहात नाहींत; हें गेल्या कांहीं वर्षांतल्या त्यांच्या

कृत्यांवरून उघड दिसतें आहे. देशाचीं पावलें गुलामगिरींतून वर उचल-ण्यासाठीं त्यांनीं केलेल्या यत्नांची बेरीज जवळ जवळ शून्य आहे. शस्त्रांचे लढाई नंतर इतर असंख्य बाबींतल्या लढाया हे कसे खेळले व यांत काय कर्तबगारी केली व करीत आहेत, याची हकीगत आपल्या देशांत ही अशी आहे. या बाबीचा असा प्रकार या देशांत नजरेस पडतो. तेंच फ्रान्सकडे पाहावें तों सर्वच निराळें. नेपोलियनच्या मागें त्या देशांतील सर्व लोकांनीं मिळून काय काय केलें ? व हल्लीं त्यांची स्थिति काय आहे ? त्यांचे नवीन नवीन शोध कसे होत आहेत ? त्यांचे कारखानदार काय करीत आहेत ? हें सर्वांना दिसतच आहे. तेव्हां या फरकाला जबाबदार कोण ? व नेपो-लियन किंवा बाजीराव यांचेवर देश बुडवण्याचें खापर कितपत फोडतां येईल याचा उलगडा सहजच होतो. आणि शेवटीं असे स्वच्छ दिसून येतें कीं, कोणताहि देश बुडविणें हें एका व्यक्तीच्या स्वाधीन नसून त्या पापाचे धनी सर्व लोक असतात. लोकांनीं जोम धरून मेहनत केल्याशिवाय फार तर एखादा मनुष्य आपल्या अलौकिक बुद्धीमत्तेनें व मेहनतीनें आणि चातुर्यानें आपल्या देशास उर्जित अवस्था आणून व त्यास तेजास चढवून कांहीं काल उच्च पदावर नेऊन ठेवूं शकेल; पण तें मकाण कायम धरून ठेवणें आणि पुढें चाल करणें हें सर्वथैव त्या त्या देशाच्या लोकांच्या हातचें आहे. त्याबद्दल नुसते खडे फोडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. नेपोलियननें आपल्या आंगच्या गुणानें किंवा अवगुणांनें, तसींच कांहीं कृत्यें केल्यामुळें किंवा कांहीं करण्याची वगळल्यामुळें जी आपत्ति ओढवली, त्याबद्दल त्याचें त्याला प्रायश्चित्त मिळालें; पण त्याच्या कर्तृत्वामुळें फ्रान्सला जो कांहीं लाभ घडला, त्याचा फायदा त्या देशाला मिळालाच. हें केव्हांहि विसरतां येणार नाहीं.

पेशव्यांच्या संबंधेंहि थोडया फार फरकानें असेंच कांहीं म्हणतां येईल. पण व्यक्तिविषयक कल्पना दूर करून राष्ट्राच्या संबंधानें विचार करूं लागलें असतां जमीन अस्मानाचा फरक नजरेस येतो. आणि गेल्या शंभर वर्षांत जी क्रांति घडून आली आहे, त्यामुळें व्यक्तीचे प्राधान्य लयाला जाऊन ती जागा समुदायानें व राष्ट्रानें घेतली आहे. तेव्हां आतां या पुढें व्यक्ति हा राष्ट्राचा एक घटक इतक्या पुरताच त्याचा विचार करून बाकी सर्व गोष्टी

राष्ट्रीय दृष्टीनेंच पाहिल्या पाहिजेत. आणि अशा व्यापक दृष्टीनें पाहूं लागलें असतां महाराष्ट्र आणि फ्रान्स या दोन्ही देशांतील लोकांनीं शंभर वर्षांपूर्वी आपली जबाबदारी व कर्तव्य न ओळखल्यामुळें या दोन्ही देशांनां स्वातंत्र्याला मुकावें लागलें, असें म्हणावें लागतें. नेपोलियनच्या सर्व सरदारांनीं त्याला सोडले व स्वतः देशासाठीं कांहींच केलें नाहीं. त्याला दूर करून स्वतः सर्व जण एकवटून परकीयांनां तोंड दिलें असतें व मग स्वतःच्या मनगटाच्या जोरावर देशांतली व्यवस्था लावून टाकली असती, तर पुढें भोगावी लागणारी आपत्ति देशाला भोगावी लागली नसती; पण सरदार आणि मुत्सद्दी देशाला विसरून जाऊन स्वतःच्या फायद्यासाठीं परकी सत्तेला मान वाकवूं लागले, किंबहुना तिला जाऊन मिळाले आणि आपल्याच देशाविरुद्ध कारस्थानें करूं लागले. हेंच नेपोलियनच्या अधःपाताचें एक मुख्य कारण आहे. देशाचें त्याला पाठबळ होतें, तोंपर्यंत तो चढत गेला व तें पाठबळ नाहींसें झालें, तेव्हां त्याच्या पडत्या काळास सुरवात झाली. आणि तेंच बळ त्याच्या विरुद्ध बाजूला जाऊन मिळालें, तेव्हां तो साफ पडला आणि कारागृहवास भोगूं लागला. परकी लोक नुसते एकटेच यत्न करीत होते, तोंपर्यंत त्यांच्याच्यानें कांहीं झालें नाहीं; पण त्यांनां फ्रान्सचें साह्य जों जों मिळूं लागलें, तों तों ते लोक बळावले व त्यांनीं फ्रान्स देश जिंकून टाकला. नेपोलियनचे सर्व शहाणपण, सर्व शौर्य, सर्व अक्कल, सर्व शिपाईगिरी फुकट जाऊन देशावर संकट ओढवलें. हीं अद्दल घडल्यामुळें जें अपरिमित नुकसान होऊं लागलें, त्यामुळें देशाचे डोळे उघडले व सर्व देश खडबडून जागृत होऊन कर्तव्य दक्ष झाला आणि थोडेच दिवसांत सर्व बाजूनीं आपली श्रेष्ठता स्थापित करून फ्रान्सनें अखेर स्वातंत्र्यहि मिळविलें.

ठाणें, विजयादशमी<br>शके १८४३.

विनायक लक्ष्मण भावे.

नं.
ता.



नेपोलियन.

१०९५

# चक्रवर्ति नेपोलियन.

## ( प्रथम खंड )

### प्रकरण पहिलें.

### जन्म.

जगांत अत्यंत प्रतिभासंपन्न असे जे कांहीं पुरुष होऊन गेले, त्यांत नेपोलियन बादशहाला त्याच्या असामान्य कर्तृत्वशक्तीबद्दल पहिलें स्थान द्यावें लागेल. चलित चित्रपटांतले अपूर्व व मनाला थक्क करून सोडणारे अद्भुत देखावे आपल्या डोळ्यांसमोरून क्षणोक्षणीं बदलत जातांना पाहून मनावर जो परिणाम होतो, तोच परिणाम नेपोलियन बादशहाचें चरित्र वाचित असतां वाचकांच्या मनावर होतो.त्याचें चरित्र वाचून झालें म्हणजे कुशल कादंबरीकाराच्या किंवा पटाईत नाटककाराच्या कृतीची आठवण आपणाला होते.अशा नाटकांत निरनिराळ्या अंकांतील कथानक आणि पात्रांची स्थिति बदललेली पाहून जी चमत्कृति व जो आनंद होतो आणि मनाची जी तारांबळ उडते, तीच तारांबळ नेपोलियनच्या चरित्रवाचनानें होते. आणि क्षणभर असें वाटतें कीं, जणों सर्व विश्वदेवतांनां रमविण्यासाठीं हा कालपुरुष सूत्रधार बनून व नेपोलियनची भूमिका स्वतः धारण करून जगाच्या रंगभूमीवर एक नाटकच करीत आहे.

प्रारंभापासून शेवटपर्यंत हें चरित्र म्हणजे अति सुंदर व प्रतिभासंपन्न नाटकच आहे. किंबहुना आजपर्यंत एकाहि नाटककाराला सुचले नाहींत असे प्रयोग व एकालाहि दाखवितां आलीं नाहींत अशीं स्थित्यंतरें या संविधानकांत योजलेलीं आढळतात. अगदीं साधारण अशा खालावलेल्या मोडक्या जहागिरदाराचा 'मुलगा रंगभूमीवर प्रवेश करितो. घरची स्थिति साधारण व विद्यार्जनाची फार गैरसोय याकरितां केवळ नऊ वर्षांचा

होतांच तो घर सोडून देशांतरीं जातो. प्रथमतः तो मोठ्या विवंचनत काळ काढतांनां आपल्या दृष्टीस पडतो, व पुढें मोठ्या शिकस्तीनें सैन्यांत आपला शिरकाव करून घेतो. येथूनच या नाटकाला रंग भरण्यास सुरवात होते.

क्षणांत तो लोकांचा सेनानी होतो, पुढारी बनतो व आपल्या अकलेच्या जोरावर जुने राजे धुळीस मिळवून तो नवे राजे निर्माण करतो. पुनः पातें लवतें न लवतें तों हा स्वतः राजा आणि मग राजाधिराज बनतो. याचे भाऊ आणि बहिणी, ज्यांनीं राजांची पायधूळ आनंदानें आपल्या डोक्यावर घ्यावी, ते देशोदेशींचे राजे आणि मोठमोठ्या रंगमहालांतल्या राण्या बनतात; आणि ज्यांनीं कैक पिढ्यांत उन्हाचा कवडसा कधीं सोसला नाहीं, ज्यांच्या पायाचा तळवा मातीनें कधीं मळला नाहीं, ते भणंग होऊन धुळींत लोळतांनां दृष्टीस पडतात.पूर्वी घिसाडी आणि तांबट होते, ते अमीर उमराव होऊन भाग्याला चढतात. कलालांच्या दुकानांत आणि सुताराच्या हाताखालीं कामाला राहिलेलीं पोरें जगत्प्रसिद्ध सरदार आणि इटाली-सारख्या देशांचे सुभेदार बनतात. जे आपल्या हातांनीं कपडे रंगवीत होते ते त्याच हातांनीं इजिप्तसारख्या देशाच्या राजधानीच्या शहरावर तोफा डागूं लागतात, आणि मोठमोठे प्रांत काबीज करूं लागतात. अगदीं शागीर्दपेशांत ज्यांची हयात सुरू झाली, ते नामांकित योद्धे होऊन पराक्रमांच्या कोटी करतात. स्वतः नेपोलियन सम्राट् बनतो व आपल्या चिखलांनीं माखलेल्या पायशोसानिशींच मोठमोठ्या मजलसींत आणि दरबा-रांत दिमाखानें मिरवत जातो. थोडे वर्षांपूर्वी स्वतः होऊन मागणी घातली असतां ज्याची मागणी पुष्कळांनीं झिडकारून टाकली, त्याच्या पायापाशीं राजांच्या राजकन्या स्वीकारण्याविषयीं आतां भिडा येऊन पडतात व सामान्य जनतेचा अंगस्पर्श झाला असतां ज्या राजघराण्याला मोठा विटाळ झाला असें वाटावें, अशा आस्ट्रीयाच्या फार प्राचीन व मानी घराण्यांतल्या एका राजकन्येबरोबर तो लग्न करतो, हेंहि आपण पाहतों. ह्या ऐश्वर्याच्या चढत्या कमानीच्या देखाव्यांत मन गढतें न गढतें तोंच संविधानक पालटण्यास सुरवात होते. ते नवे राजे आणि त्या नव्या राण्या जागच्या जागींच विरघळूं लागतात, त्यांच्या ऐश्वर्याचें तेज फिकें पडतें, व माध्यान्ह उलटून सावल्या फिरल्याचा रंग दिसूं लागतो. नेपोलियनच्या


सावलीखालीं थोर झालेले सरदार व इतके दिवस नेपोलियनच्या शब्दाबरोबर आपला जीव टाकणारे ते मित्र निमकहराम बनतात. इतकेंच नव्हे, तर त्याच्या डोळ्यादेखत शत्रूला जाऊन मिळतात. सगळ्या उमरींत ज्यांनीं शत्रूला पाठ दाखविली नाहीं, ते निधड्या छातीचे त्याचे महायोद्धे हिंमत सोडतात व भ्याडासारखे चाळे करून चारी दिशांला सैरावैरा पळूं लागतात. खुद्द नेपोलियन बादशहा फर्जीचा पुन्हा प्यादा बनतो. आपल्या हातानें राज्याला आणि राजलक्ष्मीला तिलांजली देऊन व गुलामगिरीचें पैंजण स्वतः आपल्या पायांत चढवून एल्बाला जाऊन राहतो. मध्येंच एखादा प्रवेश थोडा थारेपालट वाटून विझणाऱ्या दिव्याची ज्योत जशी जरा फुलावी तसें होतें व मग एकदम शेवटचा पडदा पडतो. टुलरीजच्या भव्य राजमंदिरांत नंदनवनाचीं सुखें भोगणारा हा मानवेंद्र हेलिनाच्या कैदखान्यांत आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस कंठतांनां आपल्या दृष्टीस पडतो. व जें मन त्याचें ऐश्वर्य पाहून आनंदानें डुलूं लागलें होतें, तें त्याची दीनस्थिति पाहून इतकें उद्विग्न होतें कीं, आपल्या मनाला एक प्रकारचें स्मशानवैराग्य प्राप्त होतें. अखेर एके दिवशीं भयंकर विजांच्या कडकडाटांत व मेघांच्या गर्जनेंत सूत्रधार नेपोलियनची भूमिका सोडून निघून जातो आणि खेळ पुरा होतो. वाचकांच्या सर्व वृत्ती स्तब्ध होतात व अखेर "कालाय तस्मै नमः" असें म्हणून तो पुस्तक बंद करितो.

असें हें नेपोलियनचें चरित्र मोठें चमत्कृतिजनक आहे. यानें आज शंभर वर्षें सर्व जगाला–नेपोलियनच्या प्रत्यक्ष शत्रूंनां देखील–एक तऱ्हेचें वेड लावून टाकलें आहे. सर्वांना त्यानें आपल्या जादूनें भारून ठेवलें आहे. स्वतःच्या हिमतीवर व स्वतःच्या कर्तबगारीवर ज्यानें इतका चमत्कार उडवून दिला, ज्यानें यूरोपच्या सर्व राजांनां केवळ बुद्धिबळांतल्या राजांप्रमाणें यूरोपच्या पटावर वाटेल तसें नाचविलें व मी मी म्हणणाऱ्या खेळाडूंनां गुंगवण्यासारखे अनेक तऱ्हेचे डाव टाकले, ज्यानें हातांतल्या कुंचल्यानें यूरोपच्या नकाशावर मन मानेल तसे रंग फांसले, त्याच्याविषयीं अनेक जिज्ञासा कोणाच्याहि मनांत सहजच उद्भवतात. हा राजा होता कसा? याची राहणी होती कशी? हा खायी काय? पियी काय? हा बसे कसा? फिरे कसा? याची आवड कशी होती? याची मनोरचना कशी असे?

याचे विचार आणि विकार कसे असत? इत्यादि सर्व बारिक सारिक व किरकोळ बाबींबद्दलहि प्रत्येकाचें मन सहज चौकशी करूं लागतें व या मोठ्या थोरल्या भव्य कारखान्याचें प्रत्येक चक्रन्चक्र आपण जवळून पाहावें असें प्रत्येकाला वाटूं लागतें. मग गिरणी किंवा आगबोट पाहणाऱ्या खेडवळाप्रमाणें त्याला त्याचें आकलन होवो किंवा न होवो; परंतु त्यापासून त्याला आनंद मात्र खास होतो यांत संशय नाहीं. या अलौकिक पुरुषाच्या काल्पनिक सहवासामुळें देखील आपण उंच वातावरणांत भराऱ्या मारीत असल्याचा थोर आनंद सर्वांस प्राप्त होतो.

असा हा भाग्यशाली नेपोलियन बादशहा कार्सिका देशांत आजेसियो शहरीं शालिवाहन शके १६९१ मध्यें विरोधी नाम संवत्सरीं श्रावण शुद्ध १३ स मंगळवारीं म्हणजे इसवी सन तारीख १५ आगष्ट १७६९ रोजीं दिवसा अकरा वाजून तीस मिनिटांनीं जन्मला.[1] सुमारें सहाच महिन्यांपूर्वीं हा कार्सिका प्रांत फ्रान्स देशाच्या हद्दींत सामील केला गेला होता. म्हणजे सहाच महिन्यांनीं चुकलें. सहा महिने हा आधीं जन्मास येता तर 'मी फ्रेंच सिटिझन' म्हणून जगभर डौलानें सांगणाऱ्या व 'मी तुमच्याच देशचा आणि तुमचा खास राजा आहें' असें म्हणणाऱ्या या बादशहाला फ्रेंच लोकांनां असें कधींहि सांगतां आलें नसतें. तसेंच ज्या एका शब्दावर त्यानें फ्रान्स देश झुलवित ठेवला, तो "फ्रेंच" हा शब्द त्याला पारखा झाला असता; पण काळाची करणी किती विचित्र आहे! जो खेळ त्याला पुढें खेळावयाचा असतो, त्याची जुळवाजुळव तो आधींच करून ठेवतो, हें म्हणणें कांहीं खोटें नव्हे.

---




१ नेपोलियनची जन्मकुंडली निश्चित अशी आतां मिळाली असून ती येथें दिली आहे. ज्योतिषशास्त्रांत "यानेशकर्मोपगतो बलिष्ठो । धर्मेशदृष्टो यदि तद्युतो वा । परस्परक्षेत्रसमागतो वा । सिंहासनप्राप्तिमुदाहरंति ॥ हा श्लोक प्रसिद्ध आहे.

लहानपणीं नेपोलियन हा शरीरानें सडपातळ पण अगदीं बांधेसूद होता. पुढें पादशाहींत त्याचें शरीर थोडें स्थूल व जरा अवजड असें झालें; पण त्याचा अव्वलपासून अखेरपर्यंत व्यासंग आणि उद्योग सारखा चालू असे. आळस हा त्याच्या गांवींहि नव्हता. त्याचा उद्योगीपणा व करारी स्वभाव त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असे. नेपोलियनाचा चेहरा थोडा लांबट असून कपाळाच्या दोन्ही बाजू जरा चापट अशा होत्या. आंगाच्या मानानें त्याचें डोकें कांहींसें थोराड दिसे; आणि डोक्याच्या मानानें कान अमळ लहान दिसत. नाक अणीदार असून सरळ व लांबट होतें. कपाळ भव्य आणि मोठें असून डोळे फार पाणीदार असत. ओंठ सरळ असून जिव्हणी जरा लांब होती व ओंठ घट्ट आवळून धरण्याची त्याला लकब असल्यामुळें पाहणाराला त्याची मुद्रा थोडी उग्र दिसे; पण एकंदरीनें त्याचा चेहरा सुंदर होता. शरीराची काठी बळकट असून हात, मांड्या, पाय वगैरे सर्व अवयव रेखल्यासारखे होते. दंड पिळदार व नितळ असून छाती रुंद होती. आंगावर केंस एकंदरीनें कमीच असून छातीवर तर ते मुळींच नव्हते. याच्यांत एक विशेष गोष्ट अशी होती कीं, याच्या काळजावर हात ठेविला असतां तें उडत आहे असें, केव्हांहि हाताला वाटत नसे, इतकी त्याची गति मंद होती. याच्या नाडीचे ठोके मिनिटाला अवघे चाळीसपर्यंत पडत. याची उंची बरोबर पांच फूट पांच इंच होती व याला सारा वेळ उजवा खांदा उडविण्याची लकब असे. सकाळीं हा लवकर निजून उठे व उठल्याबरोबर लिंबाचें सरबत किंवा चहा घेऊन वाटल्यास लगेच अंघोळहि करी. याला अंघोळीला अधणासारखें कढत पाणी आवडे. पहांटे उठल्यापासून तो कामाला लागे तों सारा दिवस काम करी. अंघोळीचा वेळहि तो फुकट दवडीत नसे. हा अंघोळ करीत असतांनां बाहेरचे आलेले खलिते व टपाल वाचवून ऐकत असे. खाण्यापिण्यांत त्याला फारशी खोडी नव्हती. वाढलेलें जेवण तो मनापासून व झपाझप जेवून टाकी. चमचे काटे घेतल्यावांचून नुसत्या हातानें जेवण्याची त्याला वारंवार लहर येई. जेवणाला त्याला दहापासून बारापर्यंत मिनिटें पुरत. यामुळें पंक्तीच्या इतर मंडळीला नेहमीं घाई होई व केव्हां केव्हां अर्धपोटींच उठावें लागे. जेवल्यावर बहुतकरून नियमानें तो एक किंवा दीड कप कॉफी घेई.

जेवणाप्रमाणेंच कॉफी पिण्यांतहि त्याचें चित्त स्थिर नसे. केव्हां पेल्यांत साखर मुळींच घालावयाची राहून जावी तर केव्हां दुप्पट साखर पडावी, असें होई; तथापि तो ती तशीच पिऊन टाकी. तेव्हां राणी जोसेफाईननें असा नियम ठेवला होता कीं, बादशहाचें जेवण होऊन तो उठला म्हणजे त्याच्या पाठोपाठ पलीकडल्या दालनांत जावयाचें व स्वतःच्या हातानें साखर घालून कॉफीचा पेला भरून तो चाखून पाहून मग राजाच्या पुढें ठेवावयाचा व पिऊन झाल्याशिवाय तेथून हलावयाचें नाहीं. खाण्यापिण्या-प्रमाणेंच स्वतःसंबंधाच्या इतर कांहीं बाबतींतहि तो थोडा अव्यवस्थित होता. जग जिंकणाऱ्या या शिपाईबहाद्दराला घोड्यावर बसण्याची मांड कधींच नीट साधली नव्हती आणि बंदुकीच्या गोळीचा नेमहि त्याला अचुक मारतां येत नसे. शिकारीचाहि त्याला फारसा शौक नव्हता, असें त्याचे चरित्रकार सांगतात. हा एकदां घोड्यावर बसला कीं सारखी दौड करी, मग घोड्याची त्याला बिलकूल कींव येत नसे. आजन्म त्याला तपकिरीचा फार नाद होता. ती तो इतक्या ऐदीपणानें नाकांत कोंबी कीं, त्याचे कपडे आणि हातांतला रुमाल अगदीं भरून जाईत. कपड्यालत्त्याच्या स्वच्छतेची बोज त्याला फारशी नसे. तरी नेसावयास पांढरी स्वच्छ विजार व बसावयास अगदीं शुभ्र असा उमदा घोडा हीं त्याला मनापासून आवडत.

---

प्रकरण दुसरें.

## बालपण व शिक्षण.

नेपोलियनच्या जन्मापूर्वीं अगदीं थोडे दिवस कार्सिका हें बेट इटाली देशांतील जिनोव्हा या संस्थानाच्या सत्तेखालीं होतें. तें त्यांनीं फ्रान्सच्या राजाला विकलें, तेव्हां तें बेट आणि त्यांतले लोक कायद्यानें "फ्रेंच" झाले. पण कार्सिकन लोकांचें म्हणणें असें पडलें कीं, आह्मी कांहीं काष्ठपाषाण किंवा गुरेंढोरें नाहीं कीं, जिनोव्हांनीं आणि फ्रेंचांनीं आमचा क्रयविक्र किंवा देवघेव करावी. आम्ही माणसें आहों. ही देवघेव आम्हांस कधी मंजूर नाहीं. असें म्हणून त्यांनीं मोठें बंड केलें. त्यांच्यांत पेआली

नामांकित पुढारी होता. त्यांचा सरदार, त्यांचा मुत्सद्दी, त्यांचा सल्लामसलतगार, सगळा तोच होता आणि इतक्या योग्यतेचा पेआली हा होता हेंहि खरें आहे. नेपोलियन नेहमीं त्याची स्तुति करी. किंबहुना नेपोलियनचा आदिगुरु पेआली होता असेंहि म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. 'इंग्रजी राष्ट्र हें केवळ वणिग्वृत्तीचें राष्ट्र आहे' हें सूत्र मूळ पेआलीचें. त्याच्यापासून तें नेपोलियननें उचललें; परंतु हल्लीं तें नेपोलियनच्याच नांवावर विकतें.

या पेआलीच्या भांडणाचे वेळीं म्हणजे नेपोलियनचे जन्माचे सुमारास कार्सिकाचे लोक फार गरीब स्थितींत होते. घरांत बायका लोकरीचें सूत काढीत आणि बाहेर पुरुष त्याचे कपडे करून अंगांत घालीत. चांगल्या सुखी घराण्यांतल्या बायका देखील घरचीं कामें घरींच करीत आणि भांडीं डोक्यावर घेऊन घरांतलें पाणीहि भरीत. मुलें रस्त्यांनीं अनवाणींच चालत. जात्याच हे लोक मोठे कांटक असून श्रीमंतीचे चोचले त्या लोकांना मुळीच माहीत नव्हते. पुरुषांची आणि बायकांची पंगत निराळी बसे. पुरुषांचीं जेवणें झालीं म्हणजे मग बायका जेवीत. ज्यांना मुलगे अधिक ते बाप दैववान व सधन समजले जात. अर्थात् मुलींपेक्षां मुलांवर तेथें प्रीति जास्त असे. घरांत बापाचा दरारा विशेष असे. या बेटांतल्या सर्व लोकांची साधारणतः शरीराची काठी मजबूत असून ते खरे शूर आणि निश्चयी असत. त्यांची मित्रांवर प्रीति व शत्रूंवर क्रोध हीं दोन्हीं फार जाज्वल्य होतीं. ते सर्वच मनाचे थोर, पण दीर्घद्वेषी असत. ते सुडाचा डोंक मनांत फार वेळ ठेवीत. शरीरानें येथील बहुतेक लोक ठेंगणे होते. तेथील जमिनीचा वसूल व कर ऐनजिनसी होता. पुढें हें बेट फ्रेंच लोकांच्या ताब्यांत आल्यापासून त्यांत बराच बदल होऊं लागला. फ्रेंच लोकांनीं या लोकांची राहणी सुधारण्याचे यत्न केले. त्यांना विद्यादान दिल्यामुळें त्यांचे जुने पेहराव जाऊन नवीन फ्रेंच तऱ्हेचे पेहराव येऊं लागले व रांगड्या चालीहि हळूहळू बदलूं लागल्या. कांहीं लोक अगदीं आपल्या बाजूचे असावे म्हणून त्यांतल्यात्यांत संभावित व शिष्ट होते, त्यांना त्यांचें कुळगोत पाहून फ्रेंचांनीं थोर पदवीस चढविलें. त्यांना सरकारी नोकऱ्या व मोठ्या मानाच्या जागा मिळण्याची तजवीज केली व त्यांचीं मुलें फ्रान्समध्यें आल्यास सरकारी खर्चानें त्यांना शिक्षण मिळावें, अशी व्यवस्था

लावून दिली. या उलटापालटींत नेपोलियनच्या बापानें म्हणजे चार्लेस बोनापार्ट यानें पेआलीची बाजू साफ सोडून आपलें घराणें फार जुनें व संभावित आहे, अशी शाबिती करून आपल्याला काउंटच्या योग्यतेची पदवी संपादन करून घेतली व शिक्कापटकाहि मिळविला. एकंदरींत या वेळीं कार्सिकाकरितां फ्रान्स सरकारला खर्चहि बराच येऊं लागला. फ्रेंच सरकार मामलती मक्त्यानें देई; पण तेवढ्यानेंहि भागत नसे. तरी त्यांनीं कार्सिकावरील कर फारसे वाढविले नाहींत. पण इतकेंहि असून या फ्रेंच राज्याला हे कार्सिकन लोक अगदीं नाखूष असत. त्यांनां आपली पहिलीच स्थिति बरी वाटे. एकदां एका फ्रेंच सरदारानें एका कार्सिकन शेतकऱ्यास म्हटलें, " पूर्वी तुमच्या पेआलीच्या अमदानींत तुम्हांला दुप्पट कर द्यावे लागत. हल्लीं तर तेव्हांच्या निम्मेहि पडत नाहींत." यावर त्या गांवढळानें उत्तर दिलें, " होय हें खरें; पण तेव्हां आह्मी देत असों आणि आतां तुम्ही घेतां."

मान्यता वाढल्यावर चार्लेस बोनापार्टची राहणीहि बदलली. घरांत चार पाहुणे जास्त येऊं लागले. नवीन तऱ्हेचीं व्यसनेंहि शिरलीं. दिवसें-दिवस खर्चाचें ओझें वाढूं लागलें; पण आपलें घराणें थोर, सरकारदरबारांत नांवहि चांगलें, याकरितां चार्लेसबाबा हें ओझें आनंदानें सोशीत. यांचें लग्न झालें, तेव्हां यांनां बायकोहि चांगली रूपवान मिळाली. तिच्या बापाचें घराणेंहि चांगलें संभावित व संपन्न असल्यानें हुंडाहि पुष्कळ मिळाला व लग्न झाल्या दिवसापासून कारलो ऊर्फ चार्लेस बोनापार्ट आणि त्याची आवडती बायको मेरिया लेटिशिया रामोलिनो हीं दोघेंहि जोडीनें व गोडीनें संसार करून आनंदानें असत. पुढें नवीन दरबारांत चार्लेसबावास अनेक हुद्यांच्या आणि मानाच्या जागा मिळाल्या, तेव्हां तर यांचा संसार फारच मौजेचा थाटला गेला. या दोघांच्या लग्नाचे वेळीं यांचीं वयें अनुक्रमें अठरा व तेरा वर्षांचीं होतीं. लग्न झाल्यावर दुसरेच वर्षी लेटिशियाला दिवस गेले व योग्य वेळीं मुलगाहि झाला. त्याचें नांव जोसेफ ठेविलें होतें पण पुढें हा अल्पायुषी झाला, तेव्हां हेंच नांव पुन्हा दुसऱ्या मुलाचें ठेविलें. लेटिशियाला तिसरें मूल इ. सन १७६९ त झालें. त्याचें नांव नेपोलियन ठेविलें. हा लहानपणीं अगदीं अशक्त होता. यानंतर

आणखी लुसीन, लुई आणि जिरोम असे तीन मुलगे झाले. या पांच मुलां-शिवाय तिला एलिझा, कारोलाईन व पालीन या नांवाच्या तीन मुली होत्या. यांच्याशिवाय आणखीहि कांहीं मुलें झालीं; पण तीं अल्पायुषी होतीं. लेटिशियाला एकंदर तेरा मुलें झालीं, तरी शेवटपर्यंत तिची प्रकृति फार चांगली व धडधाकट होती. ही—हिलाच पुढें मॅडम मीर असें सर्वत्र म्हणत घरांतलीं कामें स्वतःच करी व आपला संसार फार टापटिपीनें चालवी. हिचा नवरा म्हणजे नेपोलियनचा बाप चार्लसबाबा हा थोडा चैनी आणि खर्चिक निघाला. दारूचें व्यसनहि त्याला जरा जास्त जडत चाललें व त्या मानानें जवळचा पैसा कमी होऊं लागला. अखेर कर्जहि झालें व हें बोनापार्टीचें घर अगदींच खालावलें. पुढें सावकारहि आणखी पैसे देईनात. तेव्हां काळ कठीण आला व कुटुंबवत्सल चार्लसबाबा अगदीं नाडला; पण मॅडम मीर ही फार धीराची बायको होती. अशाहि काळांत मुलांची काळजी तिनें चांगली घेतली व त्यांनां शिक्षाहि कडक लावली. नेपोलियन लहानपणीं मोठा व्रात्य होता. बाहेर खोडया कराव्या, घरांत कोणाचेंहि नीट ऐकूं नये, असे चाळे करी. हें घराणें अगदीं जुन्या चालीचें, धार्मिक व रोमन क्यथोलिक पंथाचें होतें. आपल्या धर्माप्रमाणें मॅडम मीर सर्व व्रतेंवैकल्यें व पूजाअर्चा नियमानें व भावानें करून मुलांच्या कल्याणासाठीं त्यांच्याकडूनहि करवी. पण नेपोलियनला हें आवडत नसे. त्याचा देवाधर्माकडे एवढा ओढा नव्हता. रविवारीं देव-ळांत प्रार्थनेला जाण्याची देखील तो अळंटळं करी. आईनें पुष्कळ समजूत घातली; पण त्याची नीट समजूत होईना. शेवटीं एकदां कानशिलांत चार दोन ठोसे बसले, तेव्हां कांहींशी समजूत पटून मुलगा रविवारच्या प्रार्थ-नेला देवळांत जाऊं लागला. पुढें हेलिनाला असतांनां नेपोलियन आपल्या आईच्या कडक शिस्तीचें फार वर्णन करी व तिच्यामुळें मी नीट मार्गाला लागलों, असें नेहमीं म्हणे. या काळच्या पुष्कळ गोष्टी हल्लीं प्रसिद्ध झाल्या आहेत. नेपोलियनला पाजावयास एक दाई ठेविली होती, तिचें नांव कामिला लारी. हिच्यावरहि नेपोलियनची ममता शेवटपर्यंत होती. आपल्या राज्याभिषेकाचे वेळीं हिला त्यानें पारीसमध्यें नेऊन सर्वांस भेटविली आणि

राणी जोसेफाईनच्या करवीं रत्नांचा हार तिच्या गळ्यांत घालवून तिचा मोठा गौरव केला. तसेंच शेवटीं आपल्या मृत्युपत्राचे वेळींहि तो तिला विसरला नाहीं.

नेपोलियनचें थोडेसें शिक्षण कार्सिका येथें झालें होतें; पण तो नऊ वर्षांचा झाला, तेव्हां आपल्या मुलांनां नीट शिक्षण मिळावें म्हणून त्यांनां फ्रान्समध्यें नेऊन ठेवावें असा विचार त्यांच्या आईबापांनीं केला. चार्लस-बाबांनीं असें योजलें कीं, वडिलाला भिक्षुकी पढवावी व धाकट्याला शिपाईगिरी शिकवावी, म्हणजे दोन्ही धंदे घरांत येतील. दुसरीं मुलें मोठीं होतील तेव्हां त्यांचें पुढें पाहूं. तूर्त हा विचार कायम करून इ.सन १७७८ चे नाताळांत तो फ्रान्समध्यें गेला, व जोसेफ आणि नेपोलियन या अनुक्रमें दहा व नऊ वर्षांच्या आपल्या दोन्ही मुलांस त्यानें नव्या वर्षाच्या पाडव्याचे दिवशीं—तारिख १ जानेवारी इसवी सन १७७९ रोजीं अतून येथें शाळेंत घातलें. नेपोलियनला एखाद्या लष्करी शाळेंत घालावयाचें होतें; पण त्याला फ्रेंचभाषा मुळींच येत नसल्यामुळें आणि अजून कोठें वशिला नीट लागला नसल्यामुळें तूर्त त्यालाहि तेथेंच ठेवला. पुढें थोडेच महिन्यांत स्नेह्यांच्या वशिल्यानें नेपोलियनच्या शिक्षणाची सोय लागली व त्याला अतून येथून काढून ब्रीन येथील लष्करी शाळेंत घातलें. चार्लसबाबाची स्थिति टंचाईची असल्यामुळें नेपालियनच्या शिक्षणाची जशीतशी सोय सरकारी मदत मिळवून त्यांना लावावी लागली.

ब्रीनची शाळा सेंट जरमेन या जुन्या लष्करी प्रधानाच्या सल्ल्यावरून फ्रेंच सरकारानें काढिली होती व तेथें थोर, संभावित, पण खालावलेल्या अशा कुटुंबांतील मुलांच्या जेवणाची व शिक्षणाची सोय सरकार आपल्या खर्चानें करी. या शाळेवर देखरेख आणि शिस्त धर्मगुरूंची असे व हे भिक्षुक तेथील सर्व व्यवस्था पाहात असत. शाळेंत फ्रेंच, लाटिन, जर्मन वगैरे भाषा आणि इतिहास, भूगोल, गणित वगैरे विषय शिकवून नर्तन, गायन, वादन, चित्रकला वगैरे ललितकलांचेंहि शिक्षण देत. एकंदर अभ्यासक्रम सहा वर्षांचा होता व येथल्या शेवटल्या वर्षाच्या परिक्षेंत उतरतील त्यांना लागलीच सैन्यांत नोकरी मिळे.

सेंट जरमेनचे शाळेच्या शिस्तीचे नियम चांगले ठरविले होते. मुलांनीं खासगी नोकर ठेवतां कामा नये, त्यांनीं आपले कपडे स्वतःच नीट ठेवावे व स्वतःच घालावे. बाराव्या वर्षापर्यंत केंस अगदीं बैठे कातरावे, फार वाढवूं नयेत. पुढेंहि थोडे वाढवावे; पण रविवार किंवा सणाचे दिवस यांखेरीज इतर दिवशीं उटणें मसाला लावूं नये. प्रत्येक मुलाला एक साधें आंथरूण असावें व दरएकाला एकच पांघरूण मिळावें. मुलगा विशेषच अशक्त असला, तर या बाबतींत थोडी ढिलाई करावी. मुलांनां शाळेंत फार वेळ सारखें कोंडून बसवूं नये. उघड्या हवेंत खेळ खेळण्याची त्यांना पूर्ण मुभा असावी. भाराभर लाटिन कविता उगीच घोकून पाठ करवूं नयेत, फलुटार्केनें लिहिलेलीं प्राचीन लोकांचीं चरित्रें व फ्रान्सच्या इतिहासांतील सरस भाग यांचा त्यांनां चांगला परिचय करून द्यावा. शारीरिक शिक्षेनें प्रकृति बिघडते, मन दूषित होतें व स्वभाव ओंगळ होतो, याकरितां देहदंडाची सक्त मनाई होती, पण हे सगळे नियम नीट अमलांत येत नसत व एकंदर या शाळेची कीर्तिहि फार चांगली नव्हती. नेपोलियनला तरी ती फारशी आवडली नाहीं. कारण तेथलें शिक्षण सर्वस्वीं भिक्षुकांच्या हातीं असल्यामुळें विद्यार्थी तेजस्वी न होतां याचक व भिक्षावृत्तीचे होतील, असें तो म्हणे. पुढें इटाली जिंकल्यावर तेथल्या मुलांचें शिक्षण तेथील भिक्षुकांच्या हातांत न देण्याविषयीं त्याचा फार कटाक्ष होता.

शाळेंत असतां नेपालियन एकलकोंड्यासारखा वागे व इतरांशीं फारसा मिसळत नसे. आधीं त्याला फ्रेंच चांगलें बोलतां येत नव्हतें. शिवाय त्याचें नांव ( नेपो-लियन=रानचा सिंह) हें इटालीकडलें असल्यामुळें फ्रेंच मुलांनां अगदीं नवलाचें वाटे, व तो एक थट्टेचा विषय होई. आपल्या देशावर फ्रेंचांची सत्ता आहे, याचें या वयांतहि त्याला वैषम्य वाटे. एके वेळीं हें नांव बदलावें असाहि त्यानें विचार केला होता; पण तो तितकाच राहिला. त्याच्या गरीब स्थितीबद्दलहि मुलें फार थट्टा करीत. पण त्याचे अभ्यास बरे असल्यामुळें ते थट्टा विकोपास जाऊं देत नसत. या वेळच्या त्याच्या चोपड्या अजून आहेत, त्यांवरून हा फार वाची व वाची त्याचा गोषवारा लिहून काढी आणि तें पक्कें करी, असें दिसतें. इतकेंच नव्हे तर ग्रंथ केवळ दुसऱ्याच्या डोळ्यानेंच न पाहतां ते तो आपल्या मनानें वाचून त्यांतला

मतलब ध्यानांत आणी. गणितांत तर त्याची मति विशेषच चाले व तो विषय त्याला मनापासून आवडे. येथें त्याचें इतिहासाचें व इतर विषयांचें वाचन फार असे. इतिहासांतहि लिआनिडस आणि डायन, करीअस आणि डीसिअस, केटो आणि ब्रुटस, यांची चरित्रें त्याला फार आवडत. त्याची मेहनत व बुद्धि पाहून त्याच्या गुरूंनां संतोष वाटे; पण तेथली धर्म-विधींची आणि रोजच्या प्रार्थनांची सक्ती व क्षुल्लक अपराधाबद्दल कडक शिक्षा हीं पाहून नेपोलियनला फार वाईट वाटे.

या शाळेंत असतांनाच नेपोलियनची व प्रसिद्ध सरदार पिशेग्रूची प्रथम भेट झाली. पिशेग्रू हा तेथें शिक्षक होता. या शाळेंतल्या या वेळच्या बहुतेक मंडळीला नेपोलियननें जुनी आठवण ठेवून पुढें आपल्या आमदानीच्या दिवसांत नांवालौकिकास चढविलें. 'मी तुमचे वेळीं ब्रीन येथें होतों.' इतक्या दाखल्याचा असल्या लोकांना चांगला उपयोग होई. तेथल्या शिक्षकांना चांगल्या देणग्या मिळाल्या. एकाला मालमेझानच्या वाड्यांत ग्रंथरक्षकाची जागा मिळाली. तेथें ग्रंथांचा भरणा विशेष होता असें नाहीं; पण कोणत्या तरी निमित्तानें याला मदत पोंचावी म्हणून त्याला शोभेल अशी ही जागा त्याच्यासाठीं नवी निर्माण करण्यांत आली. बरोबरीच्या विद्यार्थ्यांनाहि मोठाल्या इभ्रतीच्या जागा त्यानें दिल्या. नानसाउटी आणि बुरिआं हे दोघेहि या वेळीं याच शाळेंत होते. नानसाउटीला सैन्यांत प्रथम सुभेदारी, नंतर सरदारी व पुढें खुद्द राजवाड्यांत मोठी इतमामाची नोकरी नेपोलियननें सांगितली. तसेंच बुरिआंला आपली खाजगी चिटणिशी त्यानें दिली; पण पुढें पैशाच्या अफरातफरीच्या आरोपामुळें याला काढून टाकलें. नेपोलियन एल्बाला गेला, तेव्हां त्यानें आपला मुलगा व राणी विश्वासानें ज्यांचे स्वाधीन केलीं, त्यांतहि बुरिआं होता. पण अखेर नानसाउटी व बुरिआं दोघांनीहि नेपोलियनच्या विरुद्ध कटांत सामील होऊन त्याचा नाश केला. ब्रीनच्या शाळेंतल्या शिपायाला मालमेझानच्या राजवाड्याच्या राजद्वारांत द्वारपालाची जागा मिळाली. तो तेथें दुष्यंताच्या कंचुकीप्रमाणें हातांत ऐटीनें धरण्याची काठी वृद्धापकाळीं टेंकण्याला आधार घेईपर्यंत जगला होता.

येथील अभ्यासक्रम आटोपल्यावर नेपोलियन हा पारिस येथील 'ईकोल मिलिटेयर' नांवाच्या लष्करी शाळेंत गेला. तेथें दहा महिने राहिल्यावर तेथला अभ्यासक्रम पुरा करून तो परीक्षेस बसला व पास झाला. या परिक्षेंत एकंदर अठ्ठावन मुलें उतरलीं, त्यांत हा बेचाळिसावा होता. याच्या शाळेंतील चार मुलांची परीक्षा उतरली व त्या चौघांत याचा नंबर तिसरा आला. याचें अक्षर फार वाईट होतें व लिहिण्यांत व्याकरणाच्या आणि शुद्धलेखनाच्या चुका अतोनात असत. बरीवाईट कविता करण्याचा नाद त्याला एव्हांपासून होता. परीक्षेंत या वेळीं प्रसिद्ध गणिती लाप्लेस हा त्याचा परीक्षक होता. या शाळेंतलें शिक्षण आणि शिस्त हीं नेपोलियनला फार पसंत पडलीं व त्यांचा त्याला उपयोगहि फार झाला. येथें असतांनां नेपोलियन पेआलीची बाजू घेऊन उघड उघड बोले व त्याची स्तुती करी परंतु यामुळें त्याला थोडासा त्रास सोसावा लागे. नेपोलियनब्रीनच्या शाळेंत असतां आळीपाळीनें तेथील शिक्षक रोज आपणाबरोबर एकेका विद्यार्थ्याला जेवण्यासाठीं बोलावीत. त्याप्रमाणें नेपोलियन एकदां आपल्या गुरूबरोबर जेवण्यास बसला असतां पेआलीची गोष्ट निघाली. तेव्हां नेपोलियन म्हणाला " पेआली हा थोर पुरुष होता. आपल्या देशावर त्याची अलोट प्रीति होती. माझे वडिलांनीं त्याची बाजू सोडली व कार्सिका बेट फ्रान्सच्या ताब्यांत देण्यास रुकार दिला हें त्यांनीं फार गैर केलें. पेआलीच्या पक्षाला राहून कसलींहि संकटें त्यांनीं वास्तविक सोसावयाला पाहिजे होतीं. " या असल्या विचाराबद्दल पोरवयाच्या नेपोलियनला विशेष दोष देतां येणार नाहीं. मुलांचे चाळे मुलें नेहमीं करणारच. दुढ्ढाचार्यांसारखें अंत एक आणि बाहेर एक हें शिकण्याला त्यांनां पुष्कळ कानमंत्र शिकावे लागतात, तेव्हां ती स्वार्थाची विद्या साध्य होते.

ही शाळा नेपोलियननें इसवी सन १७८५ त वयाच्या सोळाव्या वर्षीं सोडली व तो फ्रान्स देशाचा त्या वेळचा राजा लुई याच्या नोकरींत दाखल झाला. याच सुमारास लिऑन्स येथील कांहीं लोकांनीं संप करून बंड केलें होतें. तें मोडण्याची कामगिरी याच्या पलटणवर आली व त्याप्र-

माणें तिकडे जाऊन नेपोलियनें ते बंड मोडलें. यानंतर रजा घेऊन तो कार्सिका येथें आपल्या मातोश्रीस भेटण्यासाठीं व कुटुंबाची व्यवस्था पाहण्यासाठीं कांहीं दिवस परत गेला होता. यापूर्वीं थोडेच दिवस त्याचा बाप चार्लसबाबा हा मरण पावला होता. मरतेसमयीं चार्लसबाबानें नेपोलियनच्या फार आठवणी काढल्या; पण मुलगा दूर असल्यामुळें पितापुत्रांची भेट झाली नाहीं. चार्लस बोनापार्ट निवर्तला, तेव्हां त्याच्या बायकोचें म्हणजे नेपोलियनच्या आईचें वय तीस वर्षांचें होतें. म्हणजे कांहींसें तारुण्यंतच तिला वैधव्य आलें होतें. लग्नाला सारीं सत्रा वर्षें झालीं होतीं; पण तितक्यांत तिचीं तेरा बाळंतपणें झालीं. तरी तिची प्रकृति फार सुदृढ होती व तोंडावरचा तरुणपणाचा भर बिलकुल मावळला नव्हता. या गोष्टीची साक्ष तिला प्रत्यक्ष पाहिलेल्या अनेक लोकांनीं लिहून ठेविलें आहे त्यावरून पटते.

---

प्रकरण तिसरें.

## टूलोनपर्यंत.

नेपोलियन परत घरीं गेला; तेव्हां त्याच्या कुटुंबाची स्थिति फारच ओढगस्त झाली होती. मॅाडमर्मारला आजपर्यंत एकंदर तेरा मुलें झालीं. त्यांतलीं आठ हयात होतीं. यांपैकीं जोसेफ व नेपोलियन या दोघांखेरीज-करून बाकी सहाजण घरीं तिच्याचपाशीं असत. उत्पन्न म्हटलें तर विशेष कांहीं नाहीं. तेव्हां असल्या स्थितींत तिला संसाराचा गाडा मोठ्या कष्टानें रेटावा लागे. एवढ्या सहा मुलांचे नुसते कपडे शिवतांनां व तुरपतांनांच तिच्या बोटाला फोड येत. शिवाय जोसेफचे आणि नेपोलियनचेहि कपडे ती तेवढेच दोन पैसे वाचावे म्हणून घरूनच शिवून धाडी. अशी ही बाई संसारांत मोठी दक्ष होती; आणि पुढें अखेरपर्यंतहि तशीच होती. मुलगा बादशाहा झाला, तेव्हां देखील राजवाड्यांत मेणबत्त्या आणि लेणी फार लागतें म्हणून हिची कुरकुर चाललेली असे. विनाकारण नासधूस हिला कधीं खपली नाहीं. आईचें हें काटकसरीचें वळण मुलाला पुढें राज्यकार-

आरांत फारच उपयोगीं पडलें व राज्याला कर्ज केल्याशिवाय किंवा कागदाचें नाणें पाडल्याशिवाय आपल्या सर्व लढायांचे खर्च त्यानें भागविले.

चार्लसबाबाचे वेळेपासूनच यांचा एक जुना वतनाचा वाद चालू होता. तो आपण जिंकूं, म्हणजे संसाराची ददात जाईल, असा सर्वांना मोठा भरंवसा वाटत असे. त्यांचेजवळ होतें नव्हतें तें सर्व वादाचे भरीस पडलें. नेपोलियननेंहि या वतनासाठीं यत्न करून पाहिले; पण अखेर तंटा हरला; तेव्हां स्थिति आणखी वाईट आली. शिवाय पूर्वींपासून फ्रेंचांचा सरदार मारबाफ याचाहि या कुटुंबाला मोठा आधार होता तोहि सुटला. यामुळें इतर भावंडांच्या विद्येचा व एकंदर कुटुंबपोषणाचा बोजा फार कठीण व बिकट झाला. भावंडांत जोसेफ आणि नेपोलियन हे दोघे सुरेख होते. धाकटी बहीण पालीन हीहि सुरेख होती; पण बाकी बहिणी साधारण होत्या. लुसीन याचे हातपाय शरीराचे मानानें जरा लांब होते. तो आजानुबाहु होता; पण त्याला लांबचें अगदींच दिसत नसे. स्वभावानेंहि तो तापट होता. नेपोलियनचें व त्याचें कधींहि फारसें पटलें नाहीं.

शाळा सोडून सैन्यांत नोकरी धरल्यानंतर नेपोलियन खऱ्याखोट्या अनेक सबबी सांगून वारंवार कार्सिकांत येई व आला म्हणजे महिनेच्या महिने तेथेंच काढी. कार्सिका देश फ्रेंचांचे ताब्यांत आला, तेव्हां तेथील लोकांनीं बंडाळी आरंभिली होती. ती मोडण्यासाठीं फ्रेंचांनीं कार्सिकन लोकांचा पुढारी जो पेआली त्याला हद्दपार केलें होतें व तो इंग्लंडांत जाऊन राहिला होता. तो देशांतून दूर गेला होता; पण लोकांच्या मनांतून दूर गेला नव्हता. यामुळें कार्सिकांतील अनेक सूत्रें तो तेथूनच हालवी. कार्सिका देश स्वतंत्र झालेला डोळ्यांनीं पहावा, निदान कानांनीं तसें ऐकावें आणि मग हा देह ठेवावा, अशी त्याची फार लालसा होती.

यानंतरचीं नेपोलियनचीं अनेक वर्षें कार्सिकांतील स्थानिक भांडणें भांडण्यांत व संसारांतल्या अनेक विपत्तींशीं झगडण्यांत गेलीं. तथापि या वेळींहि त्याचें वाचन व अभ्यास हीं चालू होतीं. तो चौदा चौदा पंधरा पंधरा तास काम करी. कुटुंबपोषणासाठीं द्रव्यार्जनाच्या इच्छेनें त्यानें अनेक यत्न केले, निबंध लिहिले, इतिहास लिहिले, कादंबऱ्या लिहिल्या,

बारीकसारीक धंदे काढण्याचाहि यत्न केला. कारण त्याचा पगार त्याला जेमतेम पुरे. पण घरीं धाडण्यास कांहीं शिल्लक राहात नसे. आठां दिवशीं एकदां कपडे बदलावे, जेवण अगदीं साधें जेवावें व सर्व तऱ्हेची काटकसर करावी, तेव्हां कोठें तोंडमिळवणी होई. पुस्तकें विकत घेण्यांत मात्र त्याचा थोडा जास्त खर्च होई. कारण त्याला वाचनाचें व्यसन फार दांडगें होतें. शाळेंतल्या प्रमाणें या वेळचींहि त्याचीं टिपणें व चोपडया अजून आहेत. त्यांवरून पाहतां असें दिसतें कीं, ग्रीस, रोम, कार्थेज, आदिकरून प्राचीन काळच्या वैभवसंपन्न राष्ट्रांचा साचत इंग्लंड, फ्रान्स, पर्शिया वगैरे अर्वाचीन राष्ट्रांचाहि इतिहास त्यानें लक्षपूर्वक वाचला होता. चीन, अरेबिया वगैरे देशांची माहिती व तेथील लोकांचे वृत्तांतहि त्यानें वाचले होते. तसेंच राजकारण, समाजव्यवस्था, न्याय वगैरेवरील अनेक ग्रंथ त्यानें वाचले होते. काव्यांचा आणि नाटकांचाहि त्याला नाद असे. सर्वांत रुसोचे व रेनलचे ग्रंथ त्याला मनापासून आवडत समाजव्यवस्थेमध्यें राजसत्ता ही लोकांची देणगी आहे; व जशी ती त्यांनां देतां येते तशीच ती त्यांनां काढूनहि घेतां येते, असें एक विलक्षण तत्व रुसोनें आपल्या ग्रंथद्वारें फ्रेंच लोकांस पढविलें. नेणत्या मनावर व उच्छृंखल लोकांच्या वृत्तीवर या शिकवणीचा भलताच परिणाम होऊन त्या देशाला व देशांतल्या लोकांनां अनेक कष्ट व संकटें सोसावीं लागलीं, राज्यक्रांतीसारखे अनर्थ घडून आले व या सुमारास सगळीकडे बेवंदशाही माजून राहिली.

कार्सिका देशाच्या स्वातंत्र्यासाठीं नेपोलियन मनांतल्या मनांत सारखा जळफळत असे. त्याचा उद्योग आणि त्याचें वाचन हीं दांडगीं होतीं; पण पुढें काय करावें याविषयीं त्याचा निश्चय अजून नीट कायम झाला नव्हता. तो हल्लीं फ्रेंच राजा लुई याचा नोकर होता हें खरें; परंतु कार्सिका देशावर फ्रेंचांची सत्ता आहे, ही गोष्ट त्याचे मनांत फार डांचत होती. शिवाय प्राचीन योद्धयांचे पराक्रम वाचून आपणहि कांहीं पराक्रम गाजवावा असें त्याच्या मनांत येई. ही नोकरी सोडून तुर्कस्थानांत जावें असेंहि त्यानें एके वेळीं योजिलें होतें. जमल्यास हिंदुस्थानांत जाऊन कुंपिणी (कंपनी) सरकारची नोकरी करावी किंवा एखादा एतद्देशीय राजेरजवाडयाची चाकरी पत्करावी व आपल्या वडील भावानें हिंदुस्थानांत मिशनरीची

नोकरी पत्करून त्यास आपण तत्त्वज्ञान वगैरेसारख्या विषयांवर व्याख्यानें देण्यास मदत करावी, असेंहि त्याच्या मनांत आलें होतें; पण यावेळीं कार्सिकाच्या राजकारणांत तो अगदीं गढून गेला होता. यामुळें इतर सर्व विचार तूर्त तरी बाजूस ठेवणें त्यास भाग झालें. एकीकडे फ्रेंच सरकारचा नोकर असून दुसरीकडे कार्सिकाचे सैन्यांतहि तो दाखल झाला होता व मनोभावेंकरून त्या देशाच्या सर्व खटपटींत तो पडूं लागला. वाजवीपेक्षां जास्त दिवस फ्रान्समधून गैरहजर राहिल्यामुळें त्याचा नोकरीवरील हक्कहि आतां गेला होता.

यावेळीं सर्व फ्रान्सभर एक भलतीच वावटळ वाहूं लागली. तेथील राजा व बडे लोक आणि मध्यम स्थितींतील लोक व गरीब लोक यांमध्यें भांडण तंटे सुरू झाले. पुष्कळ तऱ्हेचे कर बडे लोकांस माफ असत; पण गरीब शेतकऱ्यांस ते द्यावे लागत. बडे किंवा अमीर उमराव नाहींत अशा सर्व वर्गांतल्या लोकांनां वाटे कीं, फ्रेंच मनुष्य म्हटला म्हणजे तो कोणीहि असो, त्याचा हक्क व त्याचेवरील कर सर्वत्र सारखेच असले पाहिजेत इतकेंच नव्हे तर हा उमराव आणि तो साधा रयत किंवा हा मोठा आणि तो लहान हें कांहीं नसावें. या व असल्या इतर अनेक गोष्टींवरून ते अमीर उमरावांचा, त्यांच्या श्रीमंतीचा आणि त्यांच्या थाटाचा हेवा करीत. हें भांडण कांहीं लोकांच्या चिथावणीनें दिवसेंदिवस जास्त जास्त विकोपास जाऊं लागलें व सर्वत्र लहान मोठे दंगे होऊं लागले. यापूर्वीं इंग्लंडांत असल्याच तऱ्हेचीं भांडणें होऊन लोकांनीं राजाचे हक्क कमी केले होते व परंपरेनें लोकांची हुकमत राजावर चालावी, असे कायदे करून टाकले होते. हें इंग्लंडचें उदाहरण फ्रेंच लोकांपुढें होतेंच. शिवाय फ्रान्सांत त्यावेळीं दुष्काळहि पडला होता. यामुळें लोक जास्त जास्त पिसाळून जाऊन अनेक अनन्वित कृत्यें करूं लागले. कोणी थोर संभावित दिसला तर त्याला धरावा, छळावा व वेळीं मारावा, असेंहि होऊं लागलें. लोकांची कांहीं मागणी लुई राजानें कबूल केली, तेव्हां तर ते अधिकाधिकच धिटाई करूं लागले. अखेर एके दिवशीं खुद्द राजाच्या राजवाड्यांत शिरून तेथें लोकांनीं दंगा केला व पहाऱ्यावर सैन्यांतले स्वीज शिपाई होते त्यांच्याशीं कलह

करून त्यांपैकीं कैकांस त्यांनीं जिवें मारिलें. त्या बंडवाल्यांत अनेक बायकाहि होत्या. त्यांनींदेखील स्त्रीजातीची सर्व मर्यादा सोडून त्या मेलेल्या शिपायांच्या शरीरावर उपमर्दकारक अनेक अभद्र प्रकार केले. लोक राजवाड्यांत अशी बंडाळी करीत होते, तेव्हां नेपोलियन आपला शाळेंतला सोबती बुरीआं याच्या भावाच्या दुकानांत बसला होता व तेथून त्या सर्व गोष्टी पाहात होता. गांवकुटार लोकांनीं येऊन असा दंगा करावा व लष्करी पोषाख घातलेल्या लढवैय्या लोकांचा गांवढळ शेतकऱ्यांनीं असा खुर्दा करावा, याची त्याला फार चीड आली. कारण असें होण्यानें एकंदर लष्करीपेशाची मोठी नामोशी झाली, असें त्याला वाटलें. तो मागाहून म्हणे कीं लुई राजा यावेळीं धीटपणानें घोड्यावर बसून पुढें आला असता व एकदम गोळ्या झाडण्याचा त्यानें हुकूम सोडला असता, तर लोक आल्या वाटेनें पळून गेले असते आणि पुढील अनेक अनर्थ सहज टळले असते.

पण फ्रान्स देशांत यावेळीं इतकी बंडाळी माजली होती कीं, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नव्हता. मोठ्यानें बोलेल तो शहाणा व पुष्कळ बोलेल तो पुढारी, असा प्रकार चालला होता. राजाची सत्ता आणि त्याचे अधिकार तर जवळ जवळ नाहींसे झाले होते व लोकांनीं पंच नेमले होते त्यांचे हातून सर्व कारभार चालूं लागले होते. फ्रान्सची ही अवस्था पाहून कार्सिकांतल्या लोकांनींहि तेथें दांडगाईचे प्रकार सुरू केले. आपला देश स्वतंत्र करून घेण्याला ही संधी चांगली आहे, असें पाहून त्यांनीं राजसत्तेला अपमानास्पद अशा अनेक गोष्टी घडवून आणल्या व या दोन देशांत उघड उघड वैमनस्य सुरू होण्याचें लक्षण आतां दिसूं लागलें. या वेळीं कार्सिका देशावर एवदम सैन्य रवाना करणें, किंवा त्या लोकांवर जास्त सक्तीचा अम्मल चालू करणें सोयीचें आणि मुत्सद्देगिरीचें नव्हतें, हें पाहून फ्रान्समधल्या लोकांनीं अशी तोड योजली कीं, कार्सिकन लोकांचा आवडता व ज्ञानानें आणि वयानें वृद्ध असा पुढारी जो पेआली त्याला हद्दपारींतून परत बोलवावा व कार्सिकाचा बंदोबस्त त्याचेकडे सोंपवावा. म्हणजे त्या योगानें कार्सिकन लोक संतुष्ट होतील, बंडाळी मोडेल व सर्व भांडणें आपोआप बंद होतील.

पेआली हा यावेळीं इंग्लंडांत राहात असे. फ्रेंचांनीं कार्सिकांतून घालवून दिल्यापासून आज एकवीस वर्षे तो इंग्लंडांतच होता. इंग्लंडच्या राजानें त्याला आपल्या राज्यांत ठेवून घेऊन पोटापुरती नेमणूकहि करून दिली होती. आपणांस परत कार्सिकांत बोलावल्याची खबर कळली, तेव्हां त्याला मोठा आनंद झाला व कार्सिका येथील लोकहि ती बातमी ऐकून फार हर्ष पावले. त्यांनीं त्याच्या सीमांत पूजनाची चोहोंकडे फार तयारी केली. किनाऱ्यावरील प्रत्येक शहरच्या लोकांनीं पेआलीनें आपल्या शहरीं प्रथम उतरावें व मग तेथून बेटाच्या आंतल्या भागांत प्रवेश करावा, असें वाटे आणि अनेक शहरचे लोक त्याला तसा आग्रहहि करूं लागले. अखेर तो मागीनाजो गांवीं प्रथम उतरला. गलबतांतून उतरतांच त्यानें भूमीवर दोन्ही गुडघे टेंकून त्या देशच्या रीतीप्रमाणें आपल्या जन्मभूमीचें वंदन केलें व मग हात टेंकून आणि खालीं लवून त्यानें त्या भूमीचें चुंबन घेतलें. नंतर तो गांवांत शिरला. तेथें लोकांनींहि त्याचें फार प्रेमानें व आदरानें स्वागत केलें. त्यास भेटावें, त्याच्याशीं बोलावें, निदान त्यानें बोललेलें आपण ऐकावें, इतकेंहि नच साधलें, तर त्याला किंवा त्याच्या कपड्याला नुसता हात तरी लावावा, असें प्रत्येकास वाटे व तसें झालें म्हणजे लोक आपणाला कृतकृत्य समजत. अशी त्याच्यावर त्या लोकांची प्रीति मनापासून होती. यावेळीं त्याचें वय सहासष्ट वर्षांचें होतें व आंगावरील सर्व केंस पिकून गेले होते. या वयांतहि त्यानें कार्सिकांत पोंचल्यावर अनेक राजकारणें व मसलती सुरू केल्या. तीन सप्तकें इंग्लंडांत घडलेल्या अनेक उलाढाली, व त्या देशांतील दांडग्या चिकाटीच्या लोकांचे अनेक उद्योग त्यानें सावधान चित्तानें पाहिले होते व त्यांचें त्यानें नीट मनन केलें होतें. ही फ्रान्स देशांतल्या अंदाधुंदीची संधी आपला कार्सिका देश स्वतंत्र करण्यास फारच उत्कृष्ट आहे, असें त्यास वाटलें व त्या धोरणानें त्यानें इंग्लंडच्या साहाय्यानें आपले उद्योगहि चालविले. अर्थात फ्रेंच लोकांनीं ज्या उद्देशानें त्याला कार्सिकांत धाडिलें तो उद्देश फुकट गेल्यासारखें झालें.

प्रथम कांहीं दिवस पेआलीचीं मतें व कृत्यें नेपोलियनला सर्वथैव मान्य होतीं; परंतु पुढें या दोघांच्या विचारांत थोडें थोडें अंतर पडूं लागलें.

पेआली हा वयानें वृद्ध होता. नेपोलियन हा अगदीं तरुण होता. पेआलीची देशभक्ति आंधळी होती. नेपोलियनची देशभक्ति हिशेबी होती. पेआलीला कार्सिका देश स्वतंत्र व्हावा असें वेड लागलें होतें. नेपोलियनचा तो देश स्वतंत्र व्हावा असा मतलब होता. देश स्वतंत्र व्हावा, हें एकाला वाटे तर तो कायमचा सुखी व्हावा, हें दुसऱ्याला वाटे. कार्सिका नुसताच स्वतंत्र होऊन त्याचा निभाव लागणार नाहीं. त्या अगदीं थोड्या वस्तीच्या बेटाला कोणीहि सहज चिरडूं शकेल. याकरितां त्यानें कोणाला तरी चिकटून असणें अवश्य आहे. त्या बेटाचा व्यापार, लोकांचें शिक्षण व संपत्ति वाढण्याला दुसऱ्या एकाद्या मोठ्या देशाचा आधार घेणें जरूर आहे, असें विचाराअंतीं नेपोलियननें आपल्या मनाशीं ठरविलें. याशिवाय दुसरी एक गोष्ट अशी कीं एव्हांपासून नेपोलियन कोणतीहि गोष्ट त्रैराशिकानें, गणित करून ठरवी. विकारापेक्षां विचाराचें व स्वार्थाचें प्राबल्य त्याच्या मनांत फार होतें आणि यामुळें आपल्या पुढील कार्याचें धोरण संभाळून तो प्रत्येक लहान मोठी गोष्ट करी. कांहीं बोलणें तरी तें विचारानेंच, कांहीं करणें तरी विचारानेंच, लग्न करणें करी नीट पुढला हिशेब करून, तें मोडणें तरीहि पुढलें धोरण ठरवून, स्वारी लढाईहि तशीच; अशी त्याची शिस्त होती. कोणतीहि गोष्ट मग ती कितीहि क्षुल्लक कां असेना, पूर्ण विचार करून, त्यासंबंधीं आगाऊ बारीक सारीक बाबी शांत चित्तानें ठरवून, मग तो करी. आणि मग ती तो अशी करी कीं, इतरांना ती साहजिकपणें एकदम केली असेंच वाटावें. या वेळीहि फ्रान्सची आणि कार्सिकाची स्थिति लक्षांत आणून फ्रान्सला चिकटून असणेंच कार्सिकाला योग्य आहे आणि आपण कार्सिकन म्हणून पराक्रम करण्यापेक्षां फ्रान्सला मिळून फ्रेंच म्हणवून उद्योग व पराक्रम केल्यास ते जास्त फायदेशीर होतील असें त्यानें ठरविलें व एकदां मनाचा असा निश्चय झाल्यावर त्यानें पेआलीस तसें स्पष्ट कळविलें. त्याची बाजू आपण होऊन सोडून दिली व ती आपल्या भावाकडूनहि सोडविली. फ्रेंच संस्कृतीचा पेआली हा पक्का द्वेष्टा असल्यामुळें नेपोलियनचें हें करणें त्या वृद्ध मुत्सद्यास व देशभक्तास बिलकूल पसंत पडलें नाहीं. त्यानें या कृत्याचा फा

निषेध केला व करविला. अखेर या दोघांत वैमनस्य उत्पन्न झालें व उघड उघड भांडणहि जुंपलें. नेपोलियन व त्याचे अनुयायी या वृद्ध देशभक्ताला अडचणींत आणि संकटांत घालण्याचे अनेक तऱ्हेचे उपाय योजूं लागले. शेवटीं नेपोलियन व त्याचा धाकटा भाऊ लुसीन यांच्या खटपटीनें पेआलीला पुनः हद्दपार होण्याचा हुकूमहि पारीस मधून सुटला. जो महात्मा आपल्या उतारवयांत स्वदेशसेवेच्या उत्कट इच्छेनें निवासस्थान सोडून कार्सिकांत आला होता, तो पुनः परत लंडन येथें जाऊन राहिला. या भांडणतंट्यांत पेआलीचा पोझोडीबर्गो या नांवाचा एक सरदार होता. त्याला नेपोलियनच्या या कृतीचा फार राग आला व त्याच्या मनानें नेपोलियनविषयीं पुरी अढी घेतली. पेआलीबरोबर त्याचा म्हणजे पोझोडीबर्गोचा पराभव व नाश झाला; पण सुंभ जळलें तरी पीळ तसाच राहतो, अशी अवस्था या पोझोडीबर्गोची झाली. आजन्मपर्यंत नेपोलियनविषयींचा रोष या कार्सिकनाच्या मनांतून बिलकूल कमी झाला नाहीं. कार्सिका सोडल्यावर तो रशियामध्यें जाऊन तेथील झारच्या सावलीचा आश्रय करून राहिला. पुढें नेपोलियननें इ. स. १८१२ सालानंतर रशियन झार अलेक्झांडरशीं जो वैरवन्हीं पेटविला, त्यालाच अलेक्झांडरचे मनांत वारंवार प्रदीप्त करून अखेर त्याच्या ज्वाळा या पोझोडीबर्गोनें इतक्या भडकविल्या कीं, त्यांत नेपोलियनची व त्याच्या घराण्याची व त्याच्या एकंदर सर्वस्वाची आहुती पडली. इ. स. १८१५ सालीं इतर कोणाहि मनुष्यापेक्षां या कार्सिकन पुरुषानें नेपोलियन विरुद्ध झार आलेक्झांडरचें मन अधिक कलुषित करून व वारंवार त्या झारचे कान चावून त्यानें आपला व आपल्या पेआलीचा सूड नेपोलियनवर पूर्णपणें उगवून घेतला.

कार्सिका येथील पुष्कळ लोकांस नेपोलियनचें करणें आवडलें नाहीं. पूर्वी नेपोलियनचा बाप चार्लसबाबा हा फ्रेंच लोकांस मिळाला होता, व त्यांच्या तंत्रानें वागत होता. यामुळें त्यांच्या मनांत बोनापार्टीच्या कुटुंबाविषयीं मोठा वैरभाव आला होता. पण त्यावेळीं चार्लसबाबाचें करणें त्याच्या कुटुंबांतील इतर माणसांस पसंत नव्हतें व नेपोलियन तर उघडपणें आपल्या बापाचा निषेध करी. यामुळें ते त्या कुटुंबावर फारसे रागावले नाहींत;

पण आतां नेपोलियन हाहि आपल्या देशाविरुद्ध वागून फ्रेंच लोकांस जाऊन मिळाला, त्यानें आपल्या भावास पेआलीची बाजू सोडण्यास भाग पाडलें आणि या बोनापार्टीच्या कारवाईनें पेआलीवर पुन्हां प्रसंग येऊन त्यास कार्सिका देशाचा त्याग करून परत इंग्लंड देशास जाणें भाग पडलें, हें पाहून त्या लोकांस या बोनापार्टीच्या कुटुंबाची फार चीड आली. त्यांनीं त्यांच्या घरावर हल्ला करून त्यांचा सूड घेण्याचें योजलें व त्यासाठीं कांहीं लोक रवानाहि झाले. परंतु ही वातमी नेपोलियन व माडम मीर यांस वेळेवर कळल्यामुळें त्यांनीं यावेळीं कार्सिका देश सोडून कुटुंबासुद्धां बाहेर देशीं जाण्याचा विचार केला. त्याप्रमाणें मोठ्या युक्तीनें नकळत हें बोनापार्टीचें कुटुंब आपलें घरदार व आपला देश सोडून रात्रीचे वेळीं तेथील बंदरांत येऊन दाखल झालें व येथून एका गलवतांत बसून प्रथम नाइस येथें व नंतर तेथून मार्सेल्स येथें हें कुटुंब येऊन दाखल झालें.या वेळीं नेपोलियन-जवळ पैसाअडका नसल्यामुळें त्याचे आणि त्याच्या कुटुंबाचे फार हाल झाले. इतके दिवस अनुभविलीं नाहींत अशीं अनेक दुःखें व संकटें त्यांस अनुभवणें भाग पडलें व फार संकटावस्था प्राप्त झाली. कार्सिकामधील देशभक्तांच्या पाठलागांतून व नजरेंतून नेपोलियनला एक चोरवाट दाखवून निकोलाफ्रेट नांवांच्या एका गृहस्थानें युक्तीनें पार पाडून सुखरूपपणें बाहेर आणलें. ही आठवण ठेवून कृतज्ञतेनें या गृहस्थाच्या मुलांस नेपोलियननें मरतेसमयीं आठवणीनें एक मोठी रक्कम देण्याविषयीं मृत्युपत्रांत लिहून ठेवलें.

अशा रीतीनें बरोबर सर्व कुटुंब घेऊन नेपोलियनला फ्रान्सच्या किनाऱ्या-वर मोठ्या संकटावस्थेंत येणें भाग झालें. यामुळें त्याला त्रास झाला खरा; पण याच गोष्टीमुळें त्याचा एक तऱ्हेनें फार फायदाहि झाला. हा कार्सिकन असल्यामुळें फ्रेंचांच्या उलट बाजूचा आहे, असा साहजिकपणें असणारा फ्रेंच लोकांचा ग्रह दूर झाला. कार्सिकाच्या अत्यंत जाज्वल्य देशभक्तांनीं, आणि पुढाऱ्यांनीं याला घालवून दिल्यामुळें व त्या देशांतील पुढाऱ्यांचा आणि याचा बेबनाव झाल्याचें आतां उघड सिद्ध झाल्यामुळें याच्याबद्दल फ्रान्समधील लोकांना शंका घेण्याला यापुढें जागा राहिली नाहीं व तो एक तऱ्हेनें त्यांच्या विश्वासास विशेष पात्र ठरला.

नेपोलियन कार्सिका देशांतून फ्रान्समध्यें आला, त्या वेळीं म्हणजे इ. स. १७९३ च्या जूनचे सुमारास फ्रान्स देशांतील लोकांच्या बंडाळीस पुष्कळच ऊत आला होता व त्यांच्या भांडणाचें स्वरूपहि या वेळीं फार उग्र व भेसूर झालें होतें. वास्तविक पाहतां हें लोकांचें व राजाचें भांडण यापूर्वींच तीन चार वर्षें सुरू झालें होतें. या भांडणाचा प्रारंभ केवळ शाब्दिक होता. राज्ययंत्राची रचना अमूक एका प्रकारची असावी व राजा हा लोकांच्या सत्तेचा प्रतिनिधी असावा, त्या सत्तेचा अंमल राजानें करावा; पण सत्ता लोकांची समजली जावी व लोकांनीं आपली सल्ला राजास कळवावी व ती तशी त्यानें स्वीकारावी अशा अर्थाचें व अशा स्वरूपाचें हें भांडण प्रारंभीं होतें; पण एकदां थोड्याशा घेवनावास सुरवात झाली व दोन्ही बाजूंनीं ओढाताण होऊं लागली, तेव्हां हें भांडण वाढूं लागलें. राजा आणि प्रजा यांच्यामध्यें गैरसमज उत्पन्न झाला. हळू हळू अविश्वास वाढला. नंतर द्वेष आणि शेवटीं उघडउघड यादवीपर्यंत मजल येऊन ठेपली. लुई राजाच्या हातांत लष्करी सैन्य, खजीना व शस्त्रास्त्रें हीं होतीं; परंतु राजा हा सर्वस्वीं राणीच्या हातांत होता. यामुळें स्वतःच्या लष्कराइतकीच किंबहुना त्याही-पेक्षां जास्त भिस्त त्यानें राणी मेरी आंतुआनेत हिच्या सल्यावर ठेविली. राणी मेरी आंतुआनेत ही आस्ट्रीयन घराण्यांतील मुलगी असून तिची आई मेरी थेरीसा ही मोठी कर्तृत्ववान् व राजकारणी बाई होती. मेरी आंतुआनेत हिनें फ्रेंच लोकांस ताळ्यावर आणण्यासाठीं व त्यांची बंडाळी मोडून चांगली खोड जिरविण्यासाठीं आपल्या माहेरीं म्हणजे आस्ट्रीयाच्या राजास पत्र लिहून त्याची मदत मागितली. आस्ट्रीयाच्या राजानें पुष्कळ सैन्य घेऊन फ्रान्सचे हद्दींत यावें व फ्रेंचांची बंडाळी मोडून त्यांचेकडून 'फ्रेंच राजसत्ता पूर्वीप्रमाणें अबाधित राखं,' अशी कबुली करून घ्यावी, अशी आपल्या नवऱ्याकडून म्हणजे राजा सोळावा लुई याजकडून आस्ट्री-याच्या राजास विनंति करविली.

ही विनंति आपलें नातें व कर्तव्य म्हणून आस्ट्रीयाच्या राजानें मान्य केली. या फ्रेंच राजाराणीच्या विनंतीवरून त्यानें फ्रान्स देशावर आपलें सैन्य रवाना केलें. त्याचप्रमाणें या राजाराणीनीं प्रशियाच्या राजासहि अशीच

विनंति केली व बंडाळी मोडून पूर्वीप्रमाणें नीट सुव्यवस्थित रीतीनें अंमल सुरू झाल्यावर तुमचा या प्रीत्यर्थ जो खर्च होईल, तोहि तुम्हांस पुढें आम्हीं देऊं असें कबूल केलें. त्याप्रमाणें प्रशियन सैन्यहि आस्ट्रियन सैन्याच्या मदतीस फ्रेंचांची खोड मोडण्यासाठीं आणविण्यांत आलें. मेरी आंतुआनेतचें माहेर आणि सासर हीं दोन्हीं घरणीं फार प्राचीन व वैभवशाली असल्यामुळें त्यांचें व त्यांच्यामुळें राणी मेरीचें यूरोपांतील इतर राजदरबारांत फार वजन होतें. म्हणून तिला इतर अनेक राजे साह्य झाले व सर्वांनींहि अनादि कालापासून चालत आलेल्या राजसत्तेविरुद्ध चार फ्रेंच बाडग्यांनीं सुरू केलेली ती नवी बंडाळी मोडण्याचे कामीं एकवटून यत्न सुरू केले. फ्रान्स देशांत राजा आणि प्रजा यांमध्यें बयाद सुरू असतां, परकी राजांचें सैन्य देशावर चाल करून आलेलें—आणि तेंहि आपल्याच राजाराणीच्या विनंतीवरून आलेलें—असें पाहून फ्रेंच लोक अगदीं खवळून गेले, व त्यांनीं त्या परकी सैन्यास तोंड देऊन त्याच्याशीं लढाई करण्याचा निश्चय केला. लोकांनीं केलेले लढाईचे बेत व योजिलेले डाव राणीच्या मार्फतीनें परकी राजांच्या सैन्यास कळलें, हें पाहून तर लोकांच्या क्रोधाग्नीनें फारच पेट घेतला. त्यांनीं राजाराणीस कैद केलें व त्यांच्यावर फ्रेंचांविरुद्ध परकी लष्करास लढाई करण्यास उत्तेजन दिल्याचा व त्यायोगें लोकद्रोह केल्याचा आरोप ठेवून, त्यांची पंचांसमोर व न्यायाधिशांसमोर यःकश्चित गुन्हेगारांप्रमाणें चौकशी करविली. आणि त्यांचेवर गुन्ह्याची शाबिती करून त्यांस भर दिवसां, चवाठ्यावरून वधस्तंभाजवळ नेऊन सुळीं दिलें. ही शिक्षा ३६० विरुद्ध ३६१ अशा अवघ्या एका मताधिक्यानें देण्यांत आली होती. राजाला सुळीं न देतां कैदेंत देखील ठेवतां आलें असतें; परंतु अशा रीतीनें एक हात या घरांतल्या शत्रूला सांभाळण्यासाठीं गुंतवून ठेवण्यापेक्षां लोकांनीं त्याला सुळी देऊन बाहेरच्या शत्रूंशीं लढण्यासाठीं आपले दोन्ही हात मोकळे करून घेतले. लोकद्रोहाच्या आरोपावरून राजा आणि राजमंडळ यांस अशी भयंकर शिक्षा झाल्याचें इतिहासांत हें पहिलेंच उदाहरण होय. राजाचे किल्लेकोट होते ते फोडून टाकले. सिंहासनाचे तुकडे केले. राजमुकुट जणों गटारांत उडवून दिले व राजदंड मोडून त्याचे तुकडे

तुकडे करून टाकिले. या वेळीं राजाबरोबरच जे जुने अमीर, उमराव, श्रीमंत, धनवान आणि घरंदाज होते, त्यांचाहि त्या लोकांनीं फार छळ केला. जुनें जेवढें कांहीं नाश करतां येण्याजोगें होतें, त्या सर्वांचा नाश करून जुन्या राजवटीच्या खाणाखुणाहि त्यांनीं पुसून काढिल्या. जुन्या धर्मसंस्था व देवळें यांचा विध्वंस केला. जुनीं मापनाचीं कोष्टकेंहि बदललीं. जुने महिने, जुने आठवडे व जुने वारहि त्यांनीं रद्द केले व त्यांचे ऐवजीं नवे महिने, नवे आठवडे व नवे वार योजिले. जुनें सण देखील यापुढें पाळण्याचें त्यांनीं बंद केलें. इतकेंच नव्हे तर ख्रिस्ती शकहि टाकून त्याचे जागीं नवा शक सुरू केला. वैतागाच्या भरांत फ्रेंच लोकांनीं त्या वेळीं विश्वामित्राप्रमाणें नवी सृष्टी निर्माण करण्यास प्रारंभ केला.

राजसत्तेविरुद्ध लोकांची ही पिसाळलेली वृत्ति पाहून त्यांचेविरुद्ध आस्ट्रीया, प्रशिया, इंग्लंड आदिकरून युरोपांतील अनेक राजे एकवटून त्यांनीं प्रथम पारीस शहर आपले ताब्यांत घेऊन तेथील राजसत्ता पूर्ववत् स्थापण्याचा व नंतर या लोकसत्तावाल्यांचीं हाडें चांगली नरम करण्याचा निश्चय केला. यांपैकीं पहिलीच गोष्ट घडवून आणण्याला लक्षावधी सैन्य, कोट्यावधी रुपये व सबंध वीस एकवीस वर्षें त्यांना लागलीं व दुसरी तर अजूनहि घडून आली नाहीं. असो.

परकी राजांचीं कवाईती लष्करें व तोफखाने फ्रान्सच्या सरहद्दीवर डोकावत असतां देशांतहि अनेक ठिकाणीं राजाच्या वतीनें बंडाळ्या सुरू झाल्या. कारण आज इतकीं वर्षें हाडींमासीं खिळलेली राजसत्ता, धर्म व इतर अनेक संस्था हीं सर्वांच्यानेंच थोडींच एकदम झुगारून देववतात? तेव्हां देशाबाहेरच्या व देशांतल्या सर्व विरुद्ध लोकांशीं टक्कर देणें क्रांति घडवणाऱ्या लोकांस भाग पडलें. त्यासाठीं त्यांनीं लष्कर उभें केलें व शस्त्रास्त्रांची सामुग्रीहि तयार करून लढण्यास सुरवात केली. या लोकांत कार्नो या नांवाचा एक अंमलदार फार हुषार पुरुष होता. त्यानें लष्कराची सर्व नवी घडण घडविण्यास प्रारंभ केला. देशाच्या रक्षणासाठीं देशांतल्या प्रत्येक पुरुषानें शस्त्र घेऊन लढण्यास उभें राहणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे व तें त्यानें अवश्य केलेंच पाहिजे, असा निर्बंध कार्नोनें घालून दिला. या

कायद्यामुळें परकीयांच्या भाडोत्री लष्करावरोबर लढण्यासाठीं हजारों शिपाई फ्रेंच लोकांस जमवितां आले. हे कार्नोचे शिपाई भाडोत्री नसून, स्वातंत्र्यप्रिय असे उत्साही गडी होते. यांना पगार वगैरे कांहींएक नसे. हे आपल्या घरचें खाऊन, केवळ देशरक्षणासाठीं, घरच्या सुखांवर आणि आरामावर तुळशीपत्र ठेवून, स्वतंत्रतेच्या महायात्रेसाठीं घरांतून बाहेर पडले होते. यामुळें ते मनापासून लढत. कार्नोसारखाच डुमारीए नांवाचा एक हुषार सरदार होता. त्याच्या हातीं सैन्य देऊन त्यास प्रथम लढाईवर पाठविलें; पण हा सरदार थोडा वेळ लढून, फितून गेला व शत्रूंस मिळाला. तेव्हां दुसरेच दिवशीं लोकांनीं एक ' कमेटी ऑफ पब्लिक सेफ्टी ' म्हणून पंचसभा नेमली व त्यांचेकडे असल्या देशद्रोह्यांनां शिक्षा लावण्याचे व इतर न्यायाचे सर्व लष्करी अधिकार सोंपविले. या पंचसभेनें आपले अखत्यार कडक रीतीनें वजावून सर्वभर एकसहा लष्करी अंमल सुरू केला. जे जे पूर्वीच्या राजाच्या अनुमतानें वागले, ज्यांनीं ज्यांनीं परकी राजांच्या सैन्यास मदत केली, किंवा मदत केली असा ज्यांचा नुसता संशय आला, त्या सर्वांस यांनीं एकदम सुळीं दिलें. लोकांनीं सुरू केलेल्या नव्या पद्धतीविरुद्ध वागणें, नवीन केलेले कायदे मोडणें किंवा नुसत्या नव्या शिस्तीबद्दल तिरस्कार किंवा प्रतिकूल मत व्यक्त करणें, हाहि जुन्या राजास आणि शत्रूंस मदत करण्याइतकाच अक्षम्य गुन्हा आहे, असें मानून या गुन्हेगारांसहि मरणाचीच शिक्षा ही नवी पंचसभा ठरवूं लागली. या यांच्या कृत्यामुळें देशांत चोहोंकडे हाहाःकार माजून गेला.

राजवधानंतर सर्वच फ्रान्सभर अंदाधुंदी सुरू झाली. देशांत निरनिराळ्या मतांचे पक्ष झाले व हे आपल्या राजाचा गळा कापल्यावर एकमेकांचे गळे कापूं लागले. इतके दिवस पिढ्यानपिढ्या राजछत्राखालीं नांदलेले लोक पुष्कळ होते. त्यांना या घडलेल्या अघोर कृत्यांचा व पुढें घडून आलेल्या अंदाधुंदीचा इतका किळस आला कीं, त्यांपैकीं कैक लोक फ्रान्स देश सोडून देशोधडीस लागले. कोणी तेथेंच राहून त्यांतल्या त्यांत कांहीं मार्ग निघाल्यास योजूं लागलें. या मंडळीखेरीज नवीन मताची पण इतक्या अघोर थराला न पोंचलेली अशीहि कांहीं मंडळी होती. त्यांनां हीं कृत्यें

मनापासून आवडत नसत; पण ते इकडेहि नाहीं व तिकडेहि नाहीं असे स्वस्थ होते. असे निरनिराळ्या मतांचे लोक देशांत पसरलेले असल्यामुळें त्यांनां एकमेकांचा संशय वाटे. यामुळें ज्यांच्या हातांत अधिकार येई ते इतरांचा फार छळ करीत. डोक्यावरील मुख्य सत्ता नाहींशी झाल्यामुळें व राज्ययंत्राचे आणि कायद्याचे सर्व बंद तुटून गेल्यासारखें झाल्यामुळें स्वतंत्रतेच्या नांवाखालीं, हे लोक इतके भयंकर प्रकार करीत कीं, तें ऐकून रक्तच गोठून जावयाचें. स्वसंरक्षणासाठीं आपल्या मताच्या मंडळीविरुद्ध कोण काय करतो याची ते गुप्त हेरांकडून बातमी काढीत व मग ज्या इसमांचीं नांवें हे हेर कळवीत त्यांनां तांत्रिक चौकशीचा फार्स करून व केव्हां केव्हां तर तोहि केल्याशिवाय हे खुशाल मारून टाकीत. असलीं कामें करणारे गुप्त हेर काय करणार नाहींत ? आपली तुंबडी भरण्यासाठीं, आपले खाजगी सूड उगवण्यासाठीं आणि आपल्या सारख्यांची आवश्यकता फार आहे हें जाणावण्यासाठीं मनचेच खोटे कट, खोटेच आरोपी आणि खोटेच साक्षी उभे करून हे फार अनर्थ करीत. अशा वेळीं संकट ओढवण्याला कांहीं कृत्य करावें लागतें असेंहि नाहीं, तर अमका तमका प्रचलित सत्ताधाऱ्यांच्या विरुद्ध असें बोलतो किंवा नुसतें त्याचें मत असें आहे, इतकेंहि त्याच्या जीविताचा अंत होण्यास पुरे होई. या वावटळींत पुरुषच काय पण बायका आणि वृद्ध व अज्ञान अशा अनाथांचाहि संहार होत असे. " संशयी " म्हणून शेंकडो लोकांच्या याद्या रोज प्रसिद्ध होत, व त्यांना अटकेंत नेलें जाई. कोणी तुरुंगांत गेल्यावर तेथून परत आला किंवा तेथें फार दिवस खिचपत राहिला असेंहि क्वचित घडत असे. थडग्याच्या द्वारांत त्यांची तुरुंगाच्या द्वारांतून रवानगी लवकरच होई.

अशा अंदाधुंदीच्या काळांत मालमत्ता आणि जीवित फार धोक्याचें वाटून पूर्वीच्या लुई राजाचे भाउबंद व इतर पुष्कळ लोक देश सोडून बाहेर गेले होते. ते बाहेरून फ्रान्समधील या लोक सत्तावादी पुढाऱ्यांचा नाश करण्याची वारंवार खटपट करीत. तसेंच देशांतल्या देशांतहि पुष्कळ दंगे व बंडाळ्यांचे यत्न होऊन सारखी यादवी माजली होती. याशिवाय सर्वांत महत्वाची गोष्ट अशी होती कीं, फ्रेंच लोकांनीं स्वतंत्रतेच्या नांवा-

खालीं आपल्या परंपरागत राजाचा आणि राणीचा वध केला हें पाहून तशाच वेडाच्या भरांत आपले प्रजाजनहि असेंच करतील कीं काय, असा यूरोपांतील इतर राजपुरुषांस मोठा धाक पडला व या फ्रान्सच्या लोकांनां राजवधाबद्दल चांगलें शासन करावें आणि या राजवधाचा ठाव मूळापासून पुसून टाकावा, असें सर्व राजपुरुषांस वाटूं लागलें. ज्यांचीं मनें या कृत्यांनीं असंतोष पावलीं होतीं, व ज्यांनां या राजवधाची चीड आली होती, अशा लोकांनां हातीं धरून ही नवी बंडाळी साफ मोडून टाकावी, असें योजून यावेळीं फ्रान्स देशावर स्वारी करण्याचा युरोपांतील कांहीं राजांनीं निश्चय केला. इतके दिवस परकी राजे नुसते सरहद्दीवर डोकावत होते; पण त्यांनीं आतां फ्रान्सच्या एका मुलुखांत प्रत्यक्ष ढवळाढवळ सुरू केली. आजपर्यंत लीयान्स येथें बंडाळी झाली, केन्सला दंगा झाला किंवा मार्सेल्सच्या लोकांनीं बंडाचें निशाण उभारलें व संतापाचे भरांत राजाचें निशाण फाडून टाकलें आणि वधापर्यंत मजल नेली, तरी ती सर्व आपआपसांतील यादवी होती. यांत एक फ्रेंच मनुष्य दुसऱ्या फ्रेंच मनुष्याचा गळा कापीत होता. यांत तिसऱ्या कोणाचें बोट शिरकत नव्हतें; पण आतां फ्रेंचांच्या घरच्या भांडणांत बाहेरचे लोक पडूं लागले आणि कांहीं फ्रेंचांनां पुढें करून परकी लोक त्यांच्याकडून इतर फ्रेंचांचे गळे कापू लागले. फ्रान्स देशांत असा अडचणीचा प्रसंग आला असतां नेपोलियन कार्सिका देश सोडून याच वेळीं फ्रान्समध्यें येऊन दाखल झाला. त्यानें आपल्या चाणाक्ष नजरेनें ही परिस्थिति पाहून या वेळीं सर्व फ्रेंचांनीं एक होऊन एक मतानें प्रचलित राज्यव्यवस्थेस पूर्ण पाठिंबा देऊन या नव्या प्रसंगास तोंडदेणें अवश्य आहे, असें ठरविलें व हें आपलें म्हणणें त्यानें एका लहानशा पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें. यांत सर्व बाजू प्रश्नोत्तररूपानें पुढें मांडून, पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून अखेर एकीचा मार्ग सुचविला होता. हें लहानसें चोपडें फार सोप्या व सरळ भाषेंत, कोणा गांवढळालाहि समजेल अशा रीतीनें लिहिलें आहे. यांत उपमा आणि अलंकार नाहींत, काव्य नाहीं, कल्पनेच्या भराऱ्याहि नाहींत; परंतु वाचणारानें अर्थाबरोबर धांवत जावें आणि आंतल्या सिद्धांतांनीं वाचणाऱ्याच्या काळजाला जाऊन एकदम भिडावें अशी याची सरळ

रचना आहे. घरच्या व्यवस्थेंत व भांडणांत परक्यांचा हात बिलकुल असतां कामा नये, हा या चोपड्यांतला मुख्य मुद्दा होता.

हें नवें वंड व हें परराष्ट्रांचें पाऊल प्रथम टूलोन येथें दिसूं लागलें. टूलोन बंदर फ्रान्सचे दक्षिणेस फार महत्वाचें ठिकाण होतें. येथें दारुगोळा व इत्तर तयारीहि फार चांगली होती; पण येथें असलेले फ्रेंच लोक पारिसमधल्या हल्लींच्या राजमंडळाविरुद्ध होते. त्यांनीं हें महत्वाचें व मजबुतीचें ठिकाण बंड करून इंग्रजांचे ताब्यांत दिलें. हें पाहून या बंडखोरांची खोड मोडावी व इंग्रजांचा पाय तेथें रुजूं देऊं नये म्हणून पारिसमधून हुकूम सुटले. या कामगिरीवर कार्टो नांवाच्या फ्रेंच सरदाराची नेमणूक झाली. कार्टो हा मुळचा रंगारी होता; पण या झोटिंगपादशाहींत तो सरदार झाला होता. याचा चेहरा भव्य असून शरीर बांधेसूद होतें. हा पोशाख वगैरे बाबतींत फार दक्ष व व्यवस्थित होता. आंगांत जांभळा कोट घालून त्यावर जरीच्या फिती व झालरी हा फार नीटनेटक्या लावी व आपल्या मोठाल्या काळ्याभोर मिशांवर हात फिरवीत, त्यांनां सारावेळ पीळ देत, मोठ्या तोऱ्यानें बोले. या कार्टोच्या हाताखालीं नेपोलियनची दुय्यम दर्जाची नेमणूक होती.

टूलोन येथें आल्यावर तें ठिकाण व भोंवतालच्या जागा यांचीं नेपोलियननें नीट पाहणी केली. टूलोन शहरच्या बाहेरचे अंगाला जरा पलीकडे लएग्युलेट नावांचें एक ठिकाण होतें. हें जमिनीचा भाग दूरवर समुद्रांत शिरून बनलेलें होतें. याचे योगानें समुद्र थोडा दुभंगला होता व या ठिकाणावरून दोन्हीकडच्या समुद्र भागावर तोफ चालण्यासारखी होती. याच ठिकाणाजवळच्या समुद्र भागामधून गलबतें आणल्यशिवाय दुसरीकडून शत्रूचीं गलबतें येऊन आंतील लोकांनां रसद पोंचण्याला मार्ग नव्हता. हें ठिकाण हातीं आलें तर शत्रूचीं गलबतें निरुपयोगीं होतील, त्यांचे टूलोन शहराशीं दळणवळण तुटेल व टूलोन सहज काबीज होईल, असें नेपोलियननें ताडलें. सर्व बंदराला वेढा देऊन सैन्याची खराबी करीत बसण्यापेक्षां या महत्वाच्या जागेवर बळ एकवटवून खर्चावें असें त्यास वाटलें व दुसरे दिवशीं कार्टो आणि इतर अधिकाऱ्यांचे पुढें त्यानें आपली ही टूलोन घेण्याची योजना

मांडली. नकाशा पुढें मेजावर पसरून आपलीं ठिकाणें व संकेत नीट विशद करून सांगत असतां लएग्युलेटचे ठिकाणावर बोट ठेवून नेपोलियन म्हणाला, ' टूलोन शहर हें येथें आहे, आपला मारा येथेंच झाला पाहिजे.' हें ऐकून कार्टो आपल्या जवळच बसलेल्या दुसऱ्या सरदाराला कोपरानें खुणावून म्हणतो, ' या स्वारीला–नेपोलियनला–भूगोलाचें ज्ञान साधारणच दिसतें.'

कार्टोचे हुकूम नेपोलियन नीटसे मानीना व कांहीं वेळां तर तो त्यांचेकडे अगदीं दुर्लक्ष करी. कार्टोनें एके ठिकाणीं तोफांची बातेरी उभी करण्यास सांगितलें असतां नेपोलियननें ती तेथें उभी करण्याचें साफ नाकारलें. कारण उडवल्यावर ती मागें झटकण्यास पुरेशी खुली जागादेखील त्याठिकाणीं नव्हती. तो शेजाऱ्यांस म्हणाला, 'ज्याला लष्करी ज्ञानाचा नुसता ॐनामाहि येत नाहीं, अशाच्या हाताखालीं काम करणें मला बिलकूल पसंत नाहीं.' कांहीं दिवस तयारी आणि हल्ले रेंगाळत रेंगाळत चालू होते. यावेळीं कार्टोची सल्ला नेपोलियनला आवडेना आणि नेपोलियनचे डावपेंच कार्टोला आवडेना. अशा रीतीनें दोघांचें नीट न जमून नेहमीं तक्रारी आणि धूसफूस होऊं लागली. पण कार्टोची बायको शहाणी,धूर्त व हिकमती होती. तिनें आपल्या नवऱ्यास सांगितलें, " तुम्हीं या नेपोलियनला वाटेल तसें करूं द्या; तो तुमच्यापाशीं कांहीं मागत नाहीं व तुमचें कांहीं नेत नाहीं. याचे डाव साधले तर तुम्ही मुख्य सरदार आहां तेव्हां, सगळें यश आयतेंच तुमच्या पदरांत पडेल. वरें याला अपयश आलें तर त्या अपयशाचें खापर त्याच्याच डोक्यावर फोडतां येईल, व त्याचें प्रायश्चित तो भोगील." बाईलेची ही अक्कल दादल्याला पसंत पडली व त्यानें 'तुझ्या कृत्याचा जबाब तुला तुझ्या शिरानें द्यावा लागेल,' अशी खरमरीत ताकीद नेपोलियनला देऊन त्याच्या व्यवस्थेंत यापुढें ढवळाढवळ केली नाहीं.

पण नेपोलियननें कार्टोचें सगळें शहाणपण पारिसमध्यें अगोदरच लिहून पाठविलें होतें, व स्वतः कार्टोच्याहि लिहिण्यामुळें त्याची बदली अर्थातच दुसरीकडे झाली व त्याच्या जागीं दुसऱ्या एका सरदाराची नेमणूक झाली. हा धंद्यानें वैद्य होता; पण अकलेनें अगदीं शेतकरी होता. त्याच्या थोडयाश ढलाइनें टूलोन अगदीं हातांत आलेलें गेलें; पण याचीहि बोळवण लवकरच

झाली. याचे मागून डुगोमीर नांवाचा तिसरा सरदार आला. जेकूस् कोक्वील डुगोमीर हा पंचावन वर्षांच्या वयाचा, शरीरानें उंच, धिप्पाड व दिसण्यांत मोठा क्रूर दिसे. याच्या उग्र मुद्रेनेंच शिपायावर याचा वचक चांगला बसे. हा येथें येऊन व सर्व ठिकाणें पाहून मनांत थोडा कचरला व हें काम आपल्या आवांक्या बाहेरचें आहे, असें उमजून त्यानें सर्व जबाबदारी व अधिकार हीं जेव्हां नेपोलियनच्या हातीं दिलीं तेव्हां पुढलें काम सुरळीत चालू लागलें. नेपोलियननें आसपासच्या ठिकाणावरून तोफा आणि दारूगोळा व इतर हरएक सामान फार मेहनतीनें गोळा करून व फार श्रम करून मोर्चे बांधले व तो रोज निकराचे हल्ले धडाक्यानें चढवूं लागला. या ठिकाणीं इंग्रजांच्या बाजूनें ओहारा व डन्डास हे सरदार होते. फ्रेंच्याच्या बाजूला नेपोलियन बरोबर मारमॉ, म्यूरान, व्हिक्टर, जुनो वगैरे लोक होते. एक दिवशीं तोफांची मारगिरी चालली असतां सैन्याला हुकूम लिहिण्याकरितां कोणी लिहिणारा पाहिजे म्हणून नेपोलियननें हांक मारली. जुनोचें अक्षर चांगलें व लिहिणारा जलद म्हणून तो पुढें आला व नेपोलियनचे शब्द त्यानें शाईनें कागदांवर लिहून घेतले. इतक्यांत समोरून शत्रूकडून तोफेचा गोळा आला, तो जुनोच्या पायापाशीं पडून त्याचे धडाक्यासरशीं माती उधळली ती सर्वभर पसरली व कागदावरहि पडली. तेव्हां तोफेचा एवढा मोठा गोळा इतक्या जवळ येऊन पडला असतांहि बिलकुल न कचरतां व आपली मांडी न हालवितां जुनो शांतपणें म्हणाला, " साहेब, हें बरें झालें. आतां यावर वाळू घालण्याची गरज उरली नाहीं. " जुनोची ही हिंमत व मनाची शांतता पाहून नेपोलियनला मोठें नवल वाटलें व पुढें त्यानें या धैर्यवंताला मोठ्या नांवालौकिकास चढविलें. टूलोन येथील शत्रूकडील हालचालीचीं सूत्रें प्रमुखतेनें ओहारा नांवाच्या इंग्रज सरदाराच्या हातीं असून त्याच्या दिमतीस इंग्लिश, सार्डेनियन, निआपोलिटन, स्पॅनिअर्ड, फ्रेंच वगैरे बऱ्याच जातीचें; पण राजपक्षीय सैन्य होतें. ओहारा हा कच्चा नसून युद्धाचे डावपेंच त्याला चांगले माहित असल्यामुळें नेपोलियनची व्यूहरचना त्याच्या तेव्हांच लक्षांत आली व त्यानें प्रथम नेपोलियनच्या तोफा पाडाव करण्याचा

प्रयत्न आरंभिला. तारीख ३० नवंबर रोजीं सकाळींच ओहारानें तोफखान्याची एक तुकडी व बरोबर दोन हजार निवडक शिपायी घेऊन मोठ्या हुशारीनें हल्ला चढविला. समोर एक नदी होती ती त्यानें पहांटेसच मागें टाकली व सैन्याचे चार भाग करून ते त्यानें चार दिशांनीं पुढें सरकावले. या चाऱ्ही टोळ्यांनीं घेमार करीत नेपोलियनच्या तोफांवर अशा निकरानें हल्ला चढविला कीं, कांहीं तोफा काबीज करून कित्येकांच्या कान्ह्यांत खिळेहि ठोकले; परंतु प्रजापक्षीय फ्रेंच सैन्यानेंहि अशा त्वेषानें उलट हल्ला चढविला कीं, सगळ्या शत्रु सैन्यांस त्यांनीं थोडक्याच वेळांत उधळून लावलें. या गर्दींत ओहाराच्या दंडाला जखम होऊन तींतून रक्तस्त्राव इतका झाला कीं, बसल्या जागेवरुन उठणें अशक्य होऊन तो अर्थातच कैद केला गेला. दुसऱ्या दिवशीं ओहाराच्या भेटीस नेपोलियन गेला व त्याची त्याच्या इतमामाप्रमाणें नीट व्यवस्था लावून 'तुम्हांस आणखी कांहीं पाहिजे काय?' म्हणून विचारलें. यावर त्या शूर इंग्रज सरदारानें उत्तर दिलें, "तुमच्या दयेचा मी भिकारी नाहीं, मी आहे, असाच मला येथें राहूं द्या" ओहाराच्या शिपायी गिरीबद्दल नेपोलियनला जरी फारसा आदर केव्हांच नव्हता, तरी, त्याची ही बाणेदार वृत्ति पाहून नेपोलियननें त्याची फार वाखाणणी केली व म्हणाला, "पाडाव केलेल्या कैद्यानें आपला दर्जा संभाळून असेंच बाणेदारपणानें वागावयाला पाहिजे. तोंड वेंगाडून उगीच वाटेल तें मागत सुटल्यानें स्वतःची व देशाची दोघांचीहि किंमत कमी होते." पुढें कालांतरानें नेपोलियनच्या दुर्दैवानें नेपोलियनवर जेव्हां असाच प्रसंग ओढवला तेव्हां तो तंतोतंत आपल्या या शब्दाप्रमाणें वागला. हेलीनाच्या तुरुंगांत असतां त्याची वृत्ति पूर्ण बाणेदारपणाची होती.

ओहारा पडल्यानंतर फ्रेंचांना जोर चढला व त्यांचे हल्ले आणखी आणखी नेटानें सुरू झाले. डिसेंबरच्या १४, १६ व १७ तारखेस फ्रेंचांनीं लएग्युलेट या ठिकाणावर एकदम हल्ला केला. या ठिकाणाचें महत्व पूर्वींच इंग्रजांच्या लक्षांत येऊन त्यांनीं तेथें एक किल्लाहि उभा केला होता. इंग्रज लोकांनीं त्याला फोर्ट मलग्रेव्ह असें नांव दिलें होतें व

फ्रेंच लोक त्याला छोटें जिब्राल्टर म्हणत. ता. १६ रोजीं यावर फ्रेंचांनीं एक मोठा हल्ला केला; पण शत्रूपुढें टिकाव न लागतां ते लोक परत आले. हें ठिकाण जरा उंचवट्यावर होतें व वर इंग्रजांचा तोफखाना उभा असल्यामुळें तेथून खालीं तोफेचा मारा जोरानें होई. तेच दिवशीं पुन्हा दुसरा हल्ला केला, तेव्हां लोक थोडेसे वर चढले; पण फार जोराचा मार मिळाल्यामुळें पुष्कळ लोक मेले व अगदीं थोडे परत आले. हें पाहून डुगोमीरचा धीर पार खचला व तो म्हणाला, " ठिकाण सर झालें तर बरें, नाहीं तर "—असें म्हणून त्यानें आपलें बोट आपल्या गळ्यावरून फिरविलें. त्याला पक्कें ठाऊक होतें कीं, टूलोन सर झालें नाहीं, तर पारीसमध्यें नेऊन फ्रेंच लोक आपली गर्दन मारतील. तिसऱ्या खेपेस पुन्हा पहांटे तीन वाजतांच हल्ला केला. वरचा मार सोशीत लोक तशींच निकरानें ती चढण चढले व अखेर किल्ल्यांत शिरले. अघाडीवर म्युरान होता, त्यानें प्रथम आंत पाय टाकला. नंतर डुगोमीर शिरला. फत्ते झाली. सर्वांस आनंद झाला. हें ठिकाण सर झालेलें पाहून नेपोलियन म्हणाला, " आतां उद्यां किंवा फार तर परवां आपण आपलीं जेवणाचीं ताटें टूलोन शहरांत मांडूं." नेपोलियनचें हें म्हणणें खरें झालें. तिसरेच दिवशीं म्हणजे ता. १९ डिसेंबर इ. स. १७९३ रोजीं टूलोन शहर फ्रेंचांच्या हातांत आलें व संयुक्तांचें सैन्य वाट सांपडेल तसें निघून जाऊन बंडखोरांची खोडकी मोडली गेली. या वेळीं त्यांचा सूड घेण्यासाठीं फ्रेंचांनीं जीं अनन्वित कृत्यें केलीं, त्यांचें नेपोलियनला फार वाईट वाटलें; पण त्या बाबतींत त्याचा कांहीं इलाज चालण्यासारखा नव्हता.

कार्सिकांतून थोडे दिवसांपूर्वीं हद्दपार केलेला आणि नामोहरम झालेला हा नेपोलियन टूलोन येथें आरंभीं अशा रीतीनें नावांलौकिकास चढला. वरीष्ठ अमलदार बुळे असल्यामुळें याला पुढें येण्याला चांगली संधी मिळाली व तिचा त्यानें उपयोगहि पूर्णपणें करून घेतला. अखेर नेपोलियननें प्रथमपासून सुचविलेल्या युक्तीनेंच यश आल्यामुळें जो तो त्याचीच स्तुति करूं लागला आणि सर्वांनीं त्याची मेहनत, उद्योग व साहस पाहून मोठी तारीफ केली. पारीसमध्येंहि त्याचा लौकिक फार वाढला व तेथील अधिकाऱ्यांनीं त्याला

मोठेमोठे किताब व चांगली बढती देऊन त्याचा पुष्कळ गौरव केला या टूलोनच्या हल्यांत नेपोलियनचा बैठकीचा घोडा एकदम मारला जाऊन नेपोलियन पायउतारा झाला, तेव्हां एका इंग्रज भालाइतानें संधी साधून भाल्याचा मारा जोरानें नेपोलियनच्या अंगावर केला. मार जरा चुकला आणि भाल्याची जखम मांडीला झाली; पण तसाच तो शेजारच्या दुसऱ्या घोड्यावर स्वार होऊन लढाईंत घुसला. पुढें नार्दंबरलंड जहाजावर असतां नेपोलियननें या जखमेच्या वाराकडे बोट दाखवून म्हटलें, 'माझ्या अंगावरची ही पहिली जखम एका इंग्रज भाळाइतानें केली आहे.'

टूलोनच्या संग्रामाचें महत्व नेपोलियनच्या चरित्रांत, यूरोपच्या घडामोडींत व जगाच्या इतिहासांत फार आहे. वरिष्ठ अधिकारी नालायक असल्यामुळें येथें पुढें येऊन नांव करण्यास नेपोलियनला उत्तम संधी मिळाली. येथें यावेळीं इंग्लंडनें व इतर संयुक्तांनीं मिळून दूर दृष्टि पोहोंचवून ओहाराच्या मदतीला आणखी पंचवीस हजार सैन्य व अर्धा लक्ष रुपये पाठविले असते तर पुढें वीस वर्षांनीं इंग्लंडला आठ अब्ज रुपये खर्च करण्याची व सर्व संयुक्तांनीं मिळून दहा बारा लाख सैन्य बळी देण्याची पाळीच आली नसती. त्यावेळीं इतक्या थोड्या खर्चानें बोरबॉन् वंश पुन्हा फ्रान्समध्यें सहज राज्यारूढ झाला असता. राजपक्षियांचें वर्चस्व प्रस्थापित झालें असतें व बाकीच्या पक्षांस किड लागून ते आपोआप मरून जाते; पण तसें कांहीं न होतां या ठिकाणीं नेपोलियनला पूर्ण यश आलें. त्याच्या हिंमतीला दुप्पट जोर चढला व त्याची शक्ति वाढूं लागली. युद्ध कलेंत नैपुण्य, बुद्धीची कुशाग्रता, अतुल पराक्रम, अलोट धैर्य व प्रचंड उद्योग या गुणांमुळें हा तरुण कार्सिकन शिपाई थोडेच अवधींत फ्रेंच सरदार या पदवीस चढला. ही त्याची पहिली पायरी होय. तेथून त्याच्या चढत्या कमानीस सुरवात झाली. गरीबीशीं झगडतांना आंगांत उद्योग, साहस व डावपेंच पूर्वींच आले होते. ते पुढें वाढतच गेले व गरगर फिरणाऱ्या या जगरूपी साहणेवर त्याचे निरनिराळे गुण निरनिराळ्या बाजूनें सतत घासत राहिल्यानें ते तीक्ष्ण होऊन फारच तेजास चढले व त्यामुळें हा पैलूदार हिरा सतत अधिकाधिक तेजानें चमकूं लागला.

प्रकरण चवथें.

## तेरावी व्हेंडेमेयर.

टूलोनकडून आल्यानंतर पारीसमधल्या मुख्य अधिकाऱ्यांनीं नेपोलियनला जिनोव्हाकडे रवाना केलें. दक्षिण फ्रान्सच्या समुद्र किनाऱ्याची पाहणी करावी, त्या बाजूला किल्ले आणि इतर महत्वाच्या जागा असतील त्यांच्या स्थितीसंबंधीं माहिती पाठवावी, व जरूर तर त्या सुधारण्यासंबंधीं सूचना कराव्या, आणि तिकडे एकंदर लोकमत काय आहे तेंहि कळवावें, असा त्याला हुकूम दिला होता. याशिवाय तिकडील राजकारणासंबंधानें आणखीहि कामगिऱ्या त्यास तोंडीं सांगितल्या होत्या. राज्यक्रांतीनंतर पुढील राज्यकारभाराची घटना व पद्धति कायम ठरेपर्यंत कानव्हेनशन या नांवाची एक तात्पुरती सभा नेमून तिजकडे सर्व कारभार सोंपविला होता. या कानव्हेनशनचा मुख्य अधिकारी राब्सपीएर हा होता. सैन्याचें व मोहिमांचे अधिकार बारस याजकडे होते. राब्सपीएर व बारस यांचें सूत होतें. टूलोनमधल्या कामगिरीबद्दल बारसनें नेपोलियनची विशेष वाखाणणी केल्यावरून राब्सपीएरनेंहि जिनोव्हाची कामगिरी नेपोलियनवरच सोंपविली होती व तिकडे जातांनां हा हुशार व विश्वासू म्हणून याला अनेक सूचना व कामगिऱ्या तोंडींच सांगितल्या होत्या. मुख्य कारभारी राब्सपीएर याला एक धाकटा भाऊ होता. त्याचें व नेपोलियनचें चांगलेंच सख्य होतें. शिवाय राब्सपीएरच्या पक्षाचें म्हणजे जाकोबाईन लोकांचें पारिसमध्यें एक मंडळ —क्लब—होतें. त्याचा नेपोलियन हा एक सभासद होता. यामुळें त्या पक्षाचा आणि या राब्सपीएर बंधुद्वयांचाहि नेपोलियनवर जास्त विश्वास बसला होता. थोरला राब्सपीएर म्हणजे एक काळपुरुष होता. मनुष्यांच्या जीवाची किंमत आणि कोंबडी कुत्र्यांच्या जीवाची किंमत त्याला सारखीच वाटे. डबक्यांतलें पाणी सांडावें असें तो मनुष्यांचें रक्त सांडवी. अंगांत कर्तबगारी विशेष नसल्यामुळें त्याला जिकडे तिकडे कट दिसत आणि आपल्या कारभाराविरुद्ध जो तो खटपट करतो, असा त्याला संशय येई. आणि यामुळें

"कमेटी ऑफ पब्लिक सेफ्टी" या नांवाची जनतेच्या संरक्षणाकरितां, जी एक मंडळी नेमली होती, तिजकडून रक्षण न होतां संहार आणि रक्षा मात्र होण्यास सुरवात झाली. पोलिसला ज्याचा यत्किंचितहि संशय वाटेल त्याच्यावर कसलाहि खोटानाटा आरोप करून त्याला त्यांनीं या कमेटीपुढें उभा करावा व तेथें त्याचा न्याय व्हावा, असा प्रकार चालू झाला. या न्यायासनासमोर सहस्रवधी गरीब निरपराध्यांना शिक्षा झाल्यामुळें लोक या न्यायासनास व राब्सपीएर आदीकरून मंडळीला अगदीं त्रासून व त्यांच्यावर संतापून गेले होते.फ्रान्स देश सोडून कुटुंबेंच्या कुटुंबें देशोधडीस लागलीं होतीं.

या राब्सपीएरचा व त्याच्या भावाचा नेपोलियनवर चांगला विश्वास असल्यामुळें त्यांनीं अनेक कामगिऱ्या सांगून नेपोलियनला दक्षिण फ्रान्सांत आणि जिनोव्हाकडे इ. स. १७९६ च्या दिजंवरांत पाठवून दिलें होतें. या कामगिरीवर रुजू झाल्याघटकेपासून नेपोलियननें काडीचाहि आळस न करितां सर्व कनाऱ्याची पाहणी केली. रात्रीच्या रात्रीं निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन व सर्व जागा दिवसास आपण स्वतः पाहून त्यानें या बाजूचें रक्षण नीट रीतीनें कसें करतां येईल, व त्यासंबंधें काय तजविजी करणें अत्यंत अवश्य आहे, याचा एक खर्डा लिहून पाठविला. याच सुमारास म्हणजे इ. स.१७९४ च्या फेब्रुवारींत इतालीकडच्या फ्रेंच सैन्यांत नेपोलियनला जागा मिळाली होती व त्याहि कामगिरीवर नेपोलियन रुजू झाला होता. यावेळीं सैन्यासह मार्सेल्स येथें असतांनां नेपोलियन क्लेरी नांवाच्या एका कारखान दाराकडे राहात असे. या क्लेरीला जुली आणि डेसिरी नांवाच्या दोन मुली होत्या. या दोधींवर नेपोलियनची फार ममता असे. यांपैकीं धाकटीशीं नेपोलियनचें मन मिळून गेलें होतें व तिला सहचारिणी करावी असा त्याचा विचार होता; पण हें जमलें नाहीं. तरी यांपैकीं मोठीचें जोसेफशीं व धाकटीचें बर्नेदोशीं लग्न जमवून देऊन त्या दोघींस त्यानें राणीच्या पदास चढविलें. वरील कामगिऱ्यांवर नेपोलियन फ्रान्स बाहेर गेला असतां इकडे देशांत एक फार महत्वाची गोष्ट घडून आली. राब्सपीएरचा जुलूम दिवसेंदिवस जास्त वाढूं लागला व तो उन्मत्त होऊन हळूहळू डायरेक्टर किंवा राजा होऊं

पहात असल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां अर्थातच त्याच्या विरुद्ध कानव्हेनशन मधल्या कांहीं लोकांना खटपटी आणि कारस्थानें करणें भाग झालें. या खटपटींत टालिआं, फुशे, बारस व फ्रेनान यांचें अंग विशेष होतें. हे सर्व पूर्वी लुई राजाला जीवें मारला पाहिजे, असें आग्रहानें म्हणणारे असल्यामुळें राब्सपीएरचीहि त्यांनीं जगांतून हकालपट्टी करण्याचें योजिलें. राब्सपीएर हा इसापनीतींतील लांकडाच्या ओंडक्याप्रमाणें निरुपद्रवी राजा असता, तर कदाचित त्यांनीं त्याला तेवढें ऐश्वर्य भोगूं दिलें असतें; परंतु हा लांकडाचा ओंडका नसून करकोंचा पक्षाप्रमाणें तळयांत राहून तळ्यांतल्या प्राण्याचा संहार करणारा आहे, असा कटु अनुभव येतांच तारीख २७ जुलै रोजीं त्याला त्यांनीं सभेच्या न्यायासनासमोर उभें केलें व दुसऱ्याच दिवशीं म्हणजे तारीख २८ जुलैला संध्याकाळीं साडे सात वाजतां थोरला व धाकटा राब्सपीएर व त्याचे एकवीस अनुयायी या सगळ्यांना फांसावर लटकविण्यांत आलें. या कृत्याबद्दल देशांत पुष्कळांना समाधान वाटलें व बारसचे वजनहि जास्त वाढत चाललें हें खरें; तथापि एकंदरीनें कानव्हेनशनच्या सगळ्या मंडळी बद्दल सर्व साधारण जनतेच्या मनांत राब्सपीएरच्या मृत्यूच्या अघोरी कृत्यामुळें जो तिरस्कार उत्पन्न झाला, तो फारसा कमी न होतां किंबहुना वाढतच गेला.

राब्सपीएरच्या खुनानंतर देशांत जी थोडी चळवळ माजली, तिच्या मुळें ही संधी आपणांस चांगली आहे, असें राजपक्षियांच्या मनांत येऊन तें पुन्हा बोरबॉन् राजास परत आणण्याच्या खटपटीस लागले. या खटपटींत सरदार पीशेग्रू सारखी मंडळी होती व त्यांस आंतून इंग्रजांचें चांगलें साह्य होतें. याहि मंडळीनें कानव्हेनशनच्या विरुद्ध पुष्कळ ओरड केली व त्याच्या संबंधीं लोकांत द्वेष माजविला. याप्रमाणें राजपक्षीय व जेकोबाईन म्हणजे अराजक अशा दोन्ही पक्षांचे लोक निरनिराळया भावनेनें एकच कृत्य करूं लागले व त्याचा परिणाम कानव्हेनशनला जाचक होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

कानव्हेनशन ही तात्पुरती कांहीं वेळेपुरता राज्यकारभार चालविण्या साठींच, म्हणून अस्तित्वांत आणलेली संस्था होती. त्यांनीं अजून आपल्या

कायमच्या घटनेचा व शासन-पद्धतीचा मसुदा देशापुढें मांडला नव्हता व आतां दिवसेंदिवस त्यांची सत्ता डळमळूं लागली होती. याकरितां या लोकांनीं म्हणजे कानव्हेनशननें शासन-पद्धतीचा व राज्यघटनेचा एक मसुदा कांहींसा रोमच्या प्राचीन राज्यसत्तात्मक कारभाराच्या नमुन्यावर तयार करून देशबांधवांपुढें मांडला. या मसुद्यान्वयें असें सुचविलें होतें कीं, सर्व सूत्रें चालविण्यासाठीं पांच डायरेक्टर किंवा सरपंच नेमावे. सैन्यावरचे सरदार, राज्यांतले प्रधान व मुलकी कारभारांतल्या बहुतेक सर्व जागेवरचे कामगार या सरपंचांनीं म्हणजे डायरेक्टरांनीं आपले पसंतीप्रमाणें नेमावे. तसेंच परराष्ट्राशीं तह ठरविण्याचा अधिकारहि यांचेकडेच असावा. याशिवाय कायदेकानू करण्यासाठीं दोन स्वतंत्र सभा असाव्या. एक कौन्सिल ऑफ एनशंटस ऊर्फ शिष्टांची सभा. हिचे अडिचशें सभासद असावे. हे सर्व सभासद लग्नझालेले असून वयानें प्रौढ म्हणजे निदान चाळीस वर्षांपेक्षां जास्त वयाचे असावे. दुसरी सभा कौन्सिल ऑफ जुनियर्स म्हणजे तरुणांची सभा. हिचे पांचशें सभासद असावे व यांपैकीं प्रत्येकजण चांगल्या वर्तनाचा असून वयानें पंचविशीपेक्षां जास्त उमरीचा असावा. या दोन्हीं सभांतील सभासदांची निवड लोकमतानें व्हावी. याशिवाय या सभांच्या सभासदांना विद्या, मिळकत वगैरे सारख्या शिफारस पत्रांचीहि आवश्यकता होती. वास्तविक पाहतां ही शासनपद्धति चांगली होती व थोडयाफार फरकानें ही सर्वमान्य होऊन सुयंत्रपणें चालण्यासारखी होती. हीच शासनपद्धति थोडे दिवस अगोदर देशापुढें मांडली गेली असती तर तिला कदाचित् मुळींच अडचण न येतां ती सर्वमान्य झाली असती; पण हल्लीं लोकांचीं मनें कानव्हेनशनच्या सभासदांविषयीं फार कलुषित झालेलीं असल्यामुळें हीं त्यांनीं सुचविलेली रचना लोकांस व्हावी तशी मान्य झाली नाहीं. लोकांचीं मनें या सूचनेविरुद्ध होण्याला दुसरें एक कारण असें होतें कीं, कानव्हेनशननें ही सूचना पुढें ठेवतांना हल्लींच्या कानव्हेनशनच्या सभासदांपैकीं दोन तृतीयांश सभासद या नव्या सभेचे सभासद होण्यास हरकत नाहीं, असें एक कलम त्यांत घातलें होतें. हें कलम पाहून पुन्हां हीच मंडळी सत्ताधारी होणार असें लोकांस वाटलें व ते या शासनपद्धतीचा उघड उघड निषेध करूं लागले.

नेपोलियन मागें सांगितलेल्या कामगिरीवर गेला असतां इकडे त्याचे स्नेही व मुख्य आधार जे राब्सपीएर त्या दोघांहि भावांचा वध झाला. त्यांच्या बाजूचे जे जे लोक होते त्यांच्यावर लोक अनेक तऱ्हेचे आरोप करूं लागले. नेपोलियनचा व राब्सपीएर बंधूंचा स्नेहसंबंध पुष्कळांस माहीत होता. लोक नेपोलियनला राब्सपीएरचा हस्तक असेंच समजत. ढोर दुखणाईत झालें म्हणजे कावळे त्याच्या कपाळावर बसून त्याच्या डोळ्याला टोकी मारूं लागतात. तसेच यावेळीं नेपोलियनच्या विरुद्धहि चांगले चांगले लोक उगाच ओरड करूं लागले. यांत विशेष नवल करण्यासारखी गोष्ट ही कीं, त्याचाच देशबंधू व जुना स्नेही सालिसिटी म्हणून एक होता. यानेंच त्याच्या विरुद्ध मोठी तक्रार केली व खोटया चहाड्या करून यानेंच त्याच्यावर त्यावेळीं देशद्रोहाचा आरोप आणविला. पूर्वीं पेआलीच्या भांडणतंटयांत सालिसिटी व नेपोलियन एक दिलानें वागले होते व नेपोलियन अनेक प्रसंगीं याच्या उपयोगीं पडला होता. कोणावर उपकार केले तर ती वेळ निघून गेल्यावर त्यानेंच आपलें अहित चिंतावें अशांतला प्रकार येथें झाला. सालिसिटीच्या या कृत्यानें नेपोलियन आरोपी म्हणून कैद केला गेला व एक पंधरवडापर्यंत त्याला कारागृहवास भोगावा लागला; परंतु याची कर्तबगारी व यानें टूलोन येथें केलेली कामगिरी पाहून त्याला पुष्कळ लोकांनीं यावेळीं मदत केली. नेपोलियनला तुरुंगांत टाकलेला पाहून सैन्यांतल्या शिपायांना फार राग आला व त्याच्या हाताखालीं काम केलेले सरदार जूनो व मारमंट यांनीं तुरुंगावर हल्ला करून किंवा अन्य मार्गानें त्याला तेथून बाहेर काढण्याचा संकल्प केला; परंतु हें करणें गैर आहे व या भानगडी करूं नका असें नेपोलियननें त्या सरदारांना निक्षून कळविलें. पुढें थोडेच दिवसांनीं त्याला न्यायासनासमोर उभें केल्यावर त्याचा जबाब ऐकून त्यास दोषमुक्त करण्यांत आलें. न्यायाधिशांनीं त्यास पूर्णपणें दोषमुक्त केला खरा; पण सैन्यांवरच्या अधिकाऱ्यांनीं त्यास त्याच्या पहिल्या अधिकारावर न नेमतां तोफखान्यांतून काढून स्वारांच्या पलटणींत दाखल केला. हा आपला अपमान आहे, असें समजून नेपोलियननें ती जागा पतकरली नाहीं. दिलेली जागा नेपोलियन पतकरीत

नाहीं व हुकूमाप्रमाणें कामावर रुजू होत नाहीं, असें पाहून अधिकाऱ्यांनीं त्याचें नांव सैन्याच्या पटांतून मुळींच काढून टाकलें व त्यामुळें नेपोलियनला घरीं राहणें भाग पडलें.

अभिमानाच्यापायीं नोकरी घालवून नेपोलियन घरीं राहिला खरा; परंतु यावेळीं त्याची सांपत्तिक स्थिति फार खालावलेली होती. राब्सपीएरच्या वधानंतर त्यानें लावलेल्या व त्याच्या बाजूच्या पुष्कळ लोकांस कमी करण्यांत आलें होतें. त्यांतच जोसेफ बोनापार्टची नोकरी गेली व नेपोलियनच्या दुसऱ्या भावालाहि आपली जागा सोडून द्यावी लागली आणि आतां तर नेपोलियनचीहि नोकरी गेली. यामुळें त्याची व बोनापार्टच्या एकंदर कुटुंबाची पुन्हा मोठी कष्टमय स्थिति झाली. त्यानें विकण्यासारखें होतें तें सर्व विकलें. पुस्तकें विकलीं व अगदीं लहानशा जागेंत राहून एका भिकार खाणावळींत जाऊन तो जेवूं लागला. उदरनिर्वाहासाठीं त्यानें अनेक प्रकारचे उद्योग केले. पुस्तकें लिहिलीं, कांहीं धंदेहि योजिले, पण व्यवस्थित असें कांहीं जमलें नाहीं. दुसऱ्या सैन्यांत नोकरी मिळण्याविषयीं त्यानें अर्ज देखील केला; पण त्याचा मुळींच जबाब आला नाहीं. यावेळीं एखाद्या धनवान अशा विधवेशीं विवाह करावा म्हणजे तिच्या पैशानें आपली अडचण दूर होईल असें योजून माडम परमान नांवाच्या एका संपत्तिमान विधवेजवळ तिच्याशीं लग्न करण्याची गोष्ट त्यानें काढली. तिच्याकडून त्याला जबाब मिळाला पण तो मनाजोगा नव्हता. त्या बाईनें म्हटलें, 'माझा व तुझा विवाह कसा जमेल ? तुला काय पण तुझ्या वडील भावाला देखील आई शोभेन इतकें माझें वय आहे.' ही बाई नेपोलियनच्या आईची मैत्रीण होती व वयानें नेपोलियनच्या आईपेक्षां वडील होती. तिनें असें झिडकारलेलें पाहून त्याला जरा वाईट वाटलें; पण तो गरजवंत होता, त्यानें त्याचें कांहीं न मानतां व धीर न सोडतां पुन्हां थोडेच वेळांत तिच्या लेकीची तिच्याजवळ मागणी केली; पण तेंहि त्या बाईनें कबूल केलें नाहीं व पैका मिळविण्याचा हाहि मार्ग सर्व बाजूनें खुंटला.

अशा या संकटांत नेपोलियन सारा वेळ घरींच बसलेला असे. आपले कपडेलत्ते आणि स्थिति पाहून तो कोणाकडे फारसा जात येतहि नसे. केव्हां

गेलाच तर कांहीं चांगल्या परिचयाच्या स्नेह्यांकडे मात्र जात असे. यावेळीं आपण कोणत्यातरी पक्षास जाऊन मिळावें व त्याच्या मदतीनें कांहीं सोय लागल्यास पहावी अशा विचारांत तो होता. तूर्तची गरज भागण्यासाठीं त्यानें आपल्या टाल्मा नांवाच्या एका स्नेह्यास पत्र लिहून त्याच्याजवळ कांहीं मदत मागितली. हें नेपोलियनचें स्वदस्तूरचें पत्र अजून एल्वा येथील अजवखान्यांत ठेवलेलें आहे. यांत नेपोलियन लिहितो, ' माझी स्थिति फार वाईट आहे, मजजवळ आतां कांहीं देखील राहिलें नाहीं. सरकारासाठीं मी सिंहाप्रमाणें लढलों; पण त्याच्याबद्दला हा असा उपासमारींत मला मरूं देण्याचा त्यांचा बेत आहे. तूं दोन तास नाटकांत काम केलेंस कीं, तुला सर्व कांहीं मिळतें. आमची शिपाईगड्यांची गोष्ट अगदींच निराळी. आम्हांस फार अवघड ठिकाणीं आपलें काम करावें लागतें व तेंहि करण्यास नेहमीं संधी मिळतेच असें नाहीं. मित्रा वाईट वाटूं देऊं नको. तुझ्या मंडळींत तूं आपलें काम चालव. माझें काम मला आतां पुन्हा करण्यास मिळेल कीं नाहीं, हें आज कांहींच सांगतां येत नाहीं. मला मनवेल भेटला होता. त्यानें स्नेह कायम ठेवला आहे. बारस वचनें मात्र सडकून देतो; पण तीं पाळीलच याचा भरंवसा काय ? मला तर त्याचेबद्दल संशयच वाटतो. यावेळीं माझ्या जवळच्या अगदीं शेवटच्या दमडीवर पाळी आली आहे. तूं मला यावेळीं कांहीं पैसे देऊं शकशील काय ? हें ऋण मी केव्हांहि विसरणार नाहीं. मी आपल्या तरवारीनें पहिलें राज्य जिंकिलें म्हणजे लागलेच तुझे पैसे परत करीन. तुझा अक्षय स्नेही, बोनापार्ट."

नेपोलियन असा काळ कंठित असतां व त्याच्या मनांत अनेक निराशेचे विचार येत असतां त्याच्या दृष्टीपुढें देशांत एक मोठी गडबड दिसत होती. त्याच्या कानांला तिच्या गडगडाटाचा आवाज ऐकूं येऊं लागला होता. कानव्हेनशनच्या विरुद्ध लोकांत असंतोष पसरून बंडाळी माजत चालली होती व या बंडाळीचें स्वरूप दिवसेंदिवस जास्त उग्र होत चाललें होतें. तें वाढतां वाढतां थोड्याच काळांत इतकें प्रचंड व भेसूर वाढलें कीं, त्याची सर्वांना फार भीति वाटूं लागली. त्या लोकांस कांहीं नांवाजलेले सरदार व अनुभवशीर योद्धेहि मिळाले. त्यांनीं हत्यारें गोळा केलीं व तोफाहि मिळ-

विल्या व पारीस शहरावर चालून येण्याचा व तें आपल्या ताब्यांत घेण्याचा त्यांनीं विचार केला. आपलें सैन्य तयार करून त्याला त्या बंडखोरांनीं गुप्तपणें कवाईतहि शिकविली. ही त्या लोकांची तयारी पाहून कानव्हेनशनचे लोक अगदीं गांगरून गेले. आपले सरदार व आपलें सैन्य आपल्या बाजूला चिकटून राहील कीं नाहीं, याचीहि त्यांना जबरदस्त शंका वाटूं लागली. त्यावेळीं त्या लोकांचें बंड मोडण्याबद्दल मेनोऊ या सरदाराला अधिकाऱ्यांनीं हुकूम केला. त्यानें हुकुमाची बजावणी कांहीं थोडीशी केली; पण त्याच्याच्यानें तें कार्य उरकलें नाहीं. कारण तें त्याच्याहि आवांक्या बाहेरचें होतें. त्या बंडखोर लोकांचा जमाव, त्यांचें धैर्य आणि त्यांचा निश्चय पाहून मेनोऊ थोडा कचरला व मागें सरला; पण यामुळें त्या लोकांना उलट जास्त स्फुरण मात्र चढलें. यापेक्षां मेनोऊ या भानगडींत मुळींच न पडता तर बरें झालें असतें. आतां या प्रसंगांत हें काम कोणाला सांगावें या विवंचनेंत कानव्हेनशनची मंडळी असतां बारसला नेपोलियनची आठवण झाली व त्यानें नेपोलियनचें नांव सुचविलें; पण तें सुचविल्यावर हा कार्सिकन थोडा उद्धट आहे, असेंहि त्यानेंच म्हटलें. तथापि नेपोलियनशिवाय दुसरा कोणी या कामीं फत्ते मिळवील, अशी आशा नसल्यामुळें शेवटीं सर्वानुमतें यावेळीं ही कामगिरी नेपोलियनवरच सोंपवावी असें ठरलें व नेपोलियनला बोलावणें पाठविलें; पण त्यावेळीं तो घरांत नव्हता. थोडेच वेळांत तो आला तेव्हां अधिकाऱ्यांनीं हा आपला विचार त्याला कळविला व तूं हें अंगावर घेतोस काय, म्हणून विचारलें. नेपोलियननें क्षणाचाहि विलंब न लावतां तें कबूल केलें; पण अशी एक अट घातली कीं, " माझ्या हातांत सर्व सत्ता पाहिजे. माझ्या कामांत कोणीं ढवळाढवळ करतां कामां नये कीं कोणीं माझेवर हुकमत चालवतां कामां नये. " यावेळीं त्याच्या अटींचा विचार करण्याला अवसर कोठें होता ? त्यांनीं नेपोलियनचें म्हणणें तात्काळ कबूल केलें व सर्व सत्ता नेपोलियनवर सोंपवून त्याला बंदोबस्ताच्या कामावर नेमिलें. कागदावर नांवाला मात्र ही कामगिरी बारसवर सोंपविली आणि नेपोलियनला त्याच्या हाताखालीं दुय्यम म्हटलें. इतकें होण्यास रात्रीचे नऊ वाजले.

हें काम पत्करल्यावर नेपोलियन क्षणभर देखील थांबला नाहीं कीं कोणावर विसंबला नाहीं. सर्व रात्रभर त्यानें तयारी चालविली. तोफखान्यांत तोफा होत्या त्या आणवून त्या नाक्या नाक्यांवर उभ्या ठेवून नाकेबंदी केली. सैन्याला निरनिराळ्या जागा नेमून दिल्या. मिळाला तितका सर्व दारूगोळा जमा करून सैन्याला व गोलंदाजांनां तो जरूरीप्रमाणें वाटून दिला. थोड्या तोफा व बंदुका आणि सैन्य कोठें जरूर पडल्यास आयते वेळीं पुढें करण्यासाठीं शिलकेंत राखून ठेवलें. दुसरा दिवस म्हणजे ता. २५ आक्टोबर उजाडला. तेव्हां दोन्हीं बाजूंची तयारी पुरी झालेली दिसली. सर्वत्र अस्वस्थता होती; पण सुरुवात कोणीहि करीना. येथें एक भय दोन ठिकाणीं झाल्यासारखें दिसलें. अखेर दुपारचे वेळीं दंगाधोप्यांस सुरुवात झाली. नेपोलियननें एकदम जमलेल्या लोकांवर तोफ डागली, व छऱ्यांचा मारा करून आणि एकसारख्या गोळ्या सोडून जमलेल्या लोकांना नेपोलियननें चोहोंबाजूंनीं भेदरवून टाकिलें. त्यांना धड मार्गहि सांपडेना. लोकांचा पहिला जोर संपला, असें पाहून नेपोलियननें वायबारांस सुरुवात केली. आतां तोफांचे नुसते गडगडाट ऐकूनच लोक दूरदूर पळूं लागले. या दिवशीं फ्रेंच्यांच्या नव्या दिवस-मोजणीप्रमाणें व्हेंडेमियरची तेरावी तारीख होती. दिवस मावळून रात्रीचा अंधेर पुरा पडतो न पडतो तोंच बंडवाल्यांचें तेज मावळून गेलें. दुसरे दिवशीं तर बंडखोरांचा आणि बंडाचा अगदीं नायनाट होऊन गेला.

या दोन दिवसांत जे जे प्रकार घडले त्यांत एक तऱ्हेचा विशेष चमत्कार होता. तो असा कीं, स्वतंत्रतेसाठीं जीव देणाऱ्या फ्रेंच लोकांनीं यावेळीं परतंत्रतेचें बीं ज्यांत रुजेल अशी जमीन तयार केली. सभेंतील वादग्रस्त विषयांचा निकाल स्वयंस्फूर्तीनें व शुद्ध मनानें, म्हणजे कोणत्याहि तऱ्हेची भीति अगर दहशत न बाळगतां, दिलेल्या मतांच्या संख्येनें व्हावा, ही स्वतंत्रतेची मुख्य खूण; पण यावेळीं तो निकाल ज्यांनीं मत देण्यासाठीं नुसते हात वर केले त्यांच्या कमी किंवा अधिक संख्या—मापानें न होतां ज्या हातांनीं तरवारी वर केल्या व त्या तशाच तेथें जोरानें परजवीत ठेवल्या त्या हातांच्या संख्येनें झाला. संख्याधिक्यापेक्षां बलाधिक्यावर हा निकाल लावला

गेला. अर्थात संख्येचें महत्व कमी होऊन केवळ बळाचेंच महत्व वाढलें. पुढें ज्या हातीं या बळाची किल्ली आली तो हात बलवान झाला. म्हणजेच ज्याच्या हातीं सैन्याचें बळ आलें त्याच्या हातीं परंपरेनें सर्वस्व आलें. या प्रकारच्या सुरवातीची ही पहिली पायरी झाली. या पायरीपासून पुढें परंपरा कशी वाढत गेली हें थोडया विचाराअंतीं कोणाच्याहि लक्षांत येईल.

थोडेच दिवसांत कानव्हेनशननें सुचविलेली शासनपद्धति फ्रान्स देशानें मान्य केली. डायरेक्टर किंवा सरपंच, कौन्सील ऑफ एनशंट्स किंवा शिष्टांची सभा, व कौन्सील ऑफ जुनिअर्स किंवा पांचशें तरुणांची सभा या अस्तित्वांत आल्या. ही सर्व व्यवस्था नेपोलियनच्या खटपटीनें यशस्वी झाल्यामुळें त्याच्या हातांतहि चांगला अधिकार आला व त्याच्या खिशांत अनेक बाजूंनीं पैसा येऊं लागला. त्याचें दैन्य आतां दूर झालें व संकटें बारा वाटां पळालीं. सुखाचे दिवस जवळ जवळ येत चालले. त्याच्या भावांनांहि त्याच्या वजनानें सरकारी जागा मिळाल्या व जे लोक त्याला पूर्वीं टाळू पहात होते, ते आतां त्याच्या सहवासाची अपेक्षा करूं लागले. या नवीन नेमलेल्या डायरेक्टरांत बारस, रुबेल, कार्नोवगैरे मंडळी स्थानापन्न झाली. या पांच पंचांत –डायरेक्टरांत–कार्नो हा विशेष हुशार, कर्तृत्वान, शहाणा, शांत व सत्याचा अभिमानी असा पुरुष होता. फ्रान्सला नवें सैन्य व सैन्याला युद्धाची नवी पद्धत या कार्नोनेंच उत्पन्न करून दिली. पुढें फ्रान्समध्यें अत्यंत हुशार म्हणून गणलेले मारो बेर्नेदोन, जोरडन, क्लेबर, ने, पीशेग्रू, डीसे, वर्थीयर, ओझरो व हुशारांतला हुशार नेपोलियन बोनापार्ट, यांसुद्धां सर्व योद्धे या कार्नोच्या शाळेंत शिकून तयार झालेले होते. ज्या एका विशिष्ट संग्रामपद्धतीचा नेपोलियननें अंगीकार केला व जिच्या जोरावर सर्व यूरोप त्यानें हालवून सोडलें ती संग्रामपद्धति कार्नोनेंच प्रथम योजिली. पुढें तिचा विकास करून उत्तम उपयोग नेपोलियननें केला. जसा या पांच पंचांत कार्नो एका टोंकाला बसण्यास योग्य होता, तसाच बारस हाहि त्या पंचसभेच्या दुसऱ्या टोंकास बसण्यास योग्य होता. यानें आपल्या वर्तनाला कोणत्याहि तत्त्वाचें बंधन लाविलें नाहीं. हातीं सत्ता रहावी व सदां सर्वदां काळ आनंदांत व विलासांत जावा, हेंच त्याचें मुख्य तत्व होतें. पारीसमधल्या

शूरांचा आदिगुरू जसा कार्नो होता, तसाच त्या देशांतल्या विलासवंतांच्या आदिस्थानचा अधिपति बारस हा होता. चैनी आणि विषयासक्त अशा या अधिकाऱ्याचें घर खुशालचंद व समव्यसनीं लोकांनीं गजबजलेलें असे. हा नबाव एके वेळीं हिंदुस्थानांतहि येऊन गेला होता. जनानखाना उभारून त्याचे सुखसोहाळे कसे भोगावे ही कला त्यानें येथील सुलतानांपासून उचलली असावी असें दिसतें. त्यानें एके वेळीं सैन्यांत तोफखान्यावर अम्मलदारी बजावली असल्यामुळें आपल्या कनिष्ठांशीं ताठा, व वरिष्ठांशीं नम्रता हे सद्गुण त्याच्यांत रुजलेले होते. या दोघांखेरीज बाकीचे पंच साधारण मध्यम वर्गातले होते; पण ते मताभिमानी व निश्चयी होते.

अशा या पंचांपुढें, इतालींत मोहीम करून फ्रेंचांचा शत्रू जो आस्ट्रीया त्याचा प्रत्यक्ष व इंग्लंडचा अप्रत्यक्ष मोड करण्याची आणि त्या बाजूनें देशांत पैसा आणण्याची एक नवीन कल्पना व योजना नेपोलियननें मांडली. ही कल्पना सर्वांना थोडी कठीण व असंभाव्य वाटली; परंतु कार्नोला ती पसंत पडली व ती अमलांत आणणारा कोणी हिमती भेटल्यास अमलांत आणतां येण्यासारखी आहे असेंहि त्यास वाटलें. दुसऱ्या कोणाच्या परिश्रमानें व शौर्यानें फ्रान्सची सत्ता इतर देशांत पसरली तर त्या योगानें डायरेक्टरांची सत्ता आणि प्राप्ती सहजासहजीं वाढण्यासारखी होती. या कल्पनेमुळें ही सूचना बारसलाहि नापसंत झाली नाहीं व आपल्याला योग्य मदत मिळाल्यास व आपल्या बाजूनें चांगलें वजन खर्ची पडल्यास ही योजना सिद्धीस नेण्याचा म्हणजे या योजनेप्रमाणें होणाऱ्या इतालींतील मोहिमेचा पूर्ण अधिकार आपणांस मिळावा असें नेपोलियनला वाटूं लागलें.

---

प्रकरण पांचवें.

## जोसेफाईनशीं लग्न.

राब्सपीएरच्या मृत्यूनंतर फ्रान्समध्यें डैरक्टरीचा अम्मल सुरु झाला व राजकीय घडामोडी बरोबरच तेथें सामाजिक घडामोडीहि फार झाल्या.

राब्सपीएरच्या अमलांत फ्रान्सनें श्रीमंतीचे सर्व प्रकार, ऐषआराम व सुखाचीं सर्व साधनें पार झुगारून दिलीं होतीं. इतकेंच नव्हे तर ते सर्व घोर अपराध समजले जात; पण त्याच्या मरणानंतर सगळा मनू पालटला. पाण्याच्या कारंजावर जोरानें हात ठेवावा, आणि मग तो काढल्याबरोबर जसें तें पाणी दुप्पट जोरानें उडूं लागतें तशीच स्थिति आतां पारिसच्या लोकांची झाली. लोकांच्या मनाची भीति उडून जाऊन त्यांना धीर आला व पुन्हा त्यांच्या मूळ स्वभावानें उचल घेतली. नाटकें, तमाशे आणि नाचरंग हे सर्वभर सुरू झाले व इतके दिवस घरांत दडून बसलेल्या षोकी स्त्रिया आतां चोहोंकडे रस्त्यांत दिसूं लागल्या. रस्त्यांतून तिवाठ्यावर सूळांचे खांब उभे केलेले होते, ते आतां नाहींसें होऊन, तेथें गाणारांचे ताफे बसूं लागले. फार पूर्वीच्या राजघटींत देखील घडले नसतील असे शृंगाराचे प्रकार आतां उघडपणें चालू झाले. पुरुषांनीं लाज सोडलीच, पण लहान मोठ्या स्त्रियांनीं तर त्यांचेवरहि ताण केली. उंची उंची अलंकार, झिरझिरीत पोषाख, उद्दीपक कवनें यांनीं पुरुषांच्या मनावर त्या आपला पगडा बसवूं लागल्या. केव्हां केव्हां तर त्यांच्या पैकीं शिष्ट म्हणून गणल्या जाणाऱ्या बायका देखील उत्तान शृंगारांत यथेच्छ पोहतांना दृष्टीस पडत. फासावर चढवलेल्या तरुण मुलींचे लांब व तुळतुळीत केंस मिळवून त्यांचे टोप करून आणि ते डोक्यावर घालून बायका मोठ्या दिमाखानें रस्त्यांतून हिंडतांना व मजलसींत जातांना दृष्टीस पडत हल्लींच्या कारभारांतला राजा बारस हा होता. त्याच्या प्रमाणेंच पारिसची प्रजाहि इष्कबाज झाली यांत नवल नाहीं. या बारसची नाइकीण मादम टालिआ, मादम रेकामीर, मादम द स्ताएल, मादम हामेलिन या सर्वजणी एकाच माळेच्या पुतळ्या होत्या. आणि त्या नाचवीत तसें त्यांच्या मागें परिस शहरहि नाचे.

या हौशी स्त्रियांचा आणि बारस, हाक, वगैरे मंडळींचा पारिसमध्यें एक प्रसिद्ध अड्डा होता. येथे वर्नेदो, कार्नो, टालिरांसारखीं कर्तृत्ववान् माणसेंहि जमत असत. ही सर्व मंडळी अगदीं खुशाल चंद होती. मन मानेल त्या मजा माराव्या, वाटतील ते इष्क भोगावे, चांगले चांगले पोषाख करावे,

आवडतील तसले खेळ खेळावे, नाटकें, तमाशे पहावे व देवानें दिलेलें टिचभर आयुष्य सुखोपभोगांत घालवावें; अशी या सगळ्यांची मनो रचना होती. अशा मंडळींत शील आणि नीति ती कितीशी असणार? ही सर्व रसीक मंडळी आपल्या लाजा वाटून प्यालेली होती. हे सर्व इष्काचे भुकेले या अड्डयावर जमून वाटेल तशा बहारा उडवीत. ज्यांच्या हातांना जन्मभर काम करतांना घट्टे पडले होते, असे लोक धामधुमींत सुळावर चढविलेल्या गर्भ श्रीमंतांचे दागिने व पोषाख स्वस्त्यांत मिळवून व ते मोठ्या डौलानें घालून येथें खुशाल मिरवत. किंबहुना पोषाख घालण्यापेक्षां पोषाख काढून ठेवणें हाच रिवाज या मंडळींत जास्त प्रचलित होता. एके वेळीं टालेरानें एका बाई जवळून अशी कबुली करून घेतली कीं, मी पाठवीन तो पोषाख घालून तूं मजकडे आलें पाहिजे. ठरले दिवशीं टालेराकडून बोलावणें आणि पोषाखाची पेटी आली. बाई पेटी उघडून पाहते तों त्यांत फक्त अंजिराच्या झाडाचें एक पान मात्र होतें. निराश्रित अशा कोणत्याहि रूप संपन्न स्त्रियेची येथें केव्हांहि सोय लागे. या ठिकाणीं काय काय प्रकार चालत असत, याचा कांहींसा अंदाज एका बारिकशा गोष्टीवरून होण्यासारखा आहे. ती गोष्ट अशी कीं, जे लोक येथें जमत, ते आपल्या बायकानां आपल्या बरोबर तेथें नेत नसत व एकट्या बायकांनां तर ते केव्हांहि तेथें जाऊन देत नसत. जुगाराचे लहानसहान प्रकार तर येथें हमेशा चालत. या ठिकाणीं नेपोलियन आतांशे जाऊं येऊं लागला होता. येथें हल्लीं अधिकारारूढ व राज्यकारभारांत प्रमुख असलेले असे अनेक लोक येत असत. यामुळें या क्रीडाभुवनांत येणें व बसणें उठणें हा मोठ्या लोकांत मिसळण्याचा एक सोपा मार्ग होता. तेथें मोठ्यांशीं सलगी सहज जमे व त्यामुळें पुष्कळ कामें सहजा सहजीं होत. यामुळें येथें केव्हां केव्हां येणें हें नेपोलियनच्या फायद्याचें किंबहुना अगत्य होतें.

या मंडळींच्या सहवासानें म्हणींतल्या ढवळ्या शेजारीं बांधलेल्या पोवळ्या बैलाची अवस्था नेपोलियनची झाली. स्त्रियांच्या मऊ शब्दानें कधींहि नरम न पडणारा, व पंचशरांच्या माऱ्यांत न सांपडणारा नेपोलियन स्त्रियांच्या

सहवासांत आतां थोडा आनंद मानूं लागला. एकंदर पारिस शहरच्या आणि फ्रान्स देशाच्या पालटलेल्या वृत्तीची थोडीशी छाप याचेहि मनावर पडली व एकटे फटिंग राहण्यापेक्षां आपण लग्न करावें आणि स्त्रीसुखाच्या लाभाची जोड मिळवावी असे विचार आतां त्याच्या मनांत येऊं लागले. आणि मनांत असे विचार येण्यासारखी हल्लीं त्याची स्थितीहि झाली होती. या पूर्वीच्या आणि या वेळच्या त्याच्या परिस्थितींत पुष्कळ फरक पडला होता.

इतके दिवस नेपोलियन फ्रान्स देशांत नवा नवा होता. तो आतां चांगला जुना झाला. त्याच्याजवळ पैसाहि जमला. त्याचें वजन वाढलें. व त्याच्या वजनानें लोकांचीं कामेंहि होऊं लागलीं आणि लोकांवर आपलें वजन राहावें म्हणून तीं तो करूं लागला. सर्व बाजूंनीं गोष्टी जमून येऊं लागल्या. आणि म्हणून यावेळीं आपण लग्न करावें असें नेपोलियनच्या मनांत आलें व त्याच्या मित्रांनीं आणि हितचिंतकांनींहि तीच सल्ला त्यास दिली. फार पूर्वी व्हालेन्स येथें असतांनां याचे मनांत सेंट जरमेन नांवाच्या मुलीबरोबर लग्न जमवावें असें होतें; पण त्यावेळीं मांचेनु नांवाचा एक लाघवी मनुष्य तिच्या नादीं होता. हाच मांचेनु पुढें मार्किवस होऊन सेंट हेलिना येथें फ्रेंचांचा हस्तक म्हणून गेला होता. या दोघांपैकीं कोणाचें तरी हिच्याशीं लवकरच लग्न जुळेल असें सर्वांनां वाटत होतें; पण पुढें कांहीं कारणानें नेपोलियननें हिचा नाद सोडला. यानंतर नेपोलियनला फार गरीबीचे दिवस आले. लग्नाची उठाठेव करण्याला संधि आणि सुस्थिति मिळाली नाहीं व गरीबीमुळें त्याला मुलीहि मिळत ना. कांहीं दिवसांनीं नेपोलियनचा वडील भाऊ जोसेफ याचें जूली क्लेरी नांवाच्या एका श्रीमंताच्या मुलीशीं लग्न झालें. बापाकडून मुलीला हुंडा व देणगीहि चांगली मिळाली. यामुळें सासूचें म्हणजे माडम मीरचें व या सुनेचें चांगलें सूत जमलें व तिच्यापासून बोनापार्टीच्या कुटुंबाला चांगली मदतहि झाली. हिचीच एक धाकटी बहीण डेसिरी क्लेरी नांवाची होती. दोन्हीहि बहिणी रूपानें दहा जणी सारख्याच होत्या; पण त्यांतल्या त्यांत धाकटी कांहीं बरी होती. बापाजवळ पैसा चांगला होता व तो हाताचा

सढळ होता. तेव्हां धाकट्या बहिणीशीं आपलें लग्न जुळल्यास फार बरें होईल असें समजून नेपोलियननें तें जुळवण्याचा प्रयत्न केला. मुलीचीहि हरकत नव्हती; पण एक मुलगी बोनापार्टीकडे दिली असतां दुसरीहि तेथेंच नको असें म्हणून बापानें आपला रुकार दिला नाहीं व थोडी नाखुषीहि दाखविली. कदाचित् माडम मीरच्या व वडील बहिणीच्या मध्यस्थीनें हा संबंध जुळला असता, पण नोकरी संबंधानें नेपोलियनला तितक्यांतच दूर जाणें भाग पडलें व त्यामुळें हें लग्न जुळलें नाहीं. पुढें या डेसीरी क्लेरीचें बर्नेदोशीं लग्न लागलें. हीं दोन्ही जोडपीं म्हणजे थोरली व धाकटी क्लेरी आणि त्यांचे नवरे जोसेफ व बर्नेदो हीं पादशाहींत नेपोलियनच्याच मदतीनें अनुक्रमें स्पेन व स्वीडनच्या सिंहासनावर बसलीं.

तेव्हां इतके दिवस नेपोलियनच्या मनांत लग्न करण्यासंबंधाचे आलेले विचार आतां पुन्हा त्याच्या मनांत येऊं लागले. पूर्वीं प्रमाणेंच सांपत्तिक स्थिति आणि मतलब, हीं कारणें तर लग्नाचे विचार मनांत येण्याला हल्लींहि होतींच, पण यांतच आतां तिसऱ्या एका मृदू विकाराची यांना जोड मिळाली. यावेळीं पारिसमध्यें बारस वगैरे मंडळीचा एक बैठकीचा अड्डा होता आणि तेथें नेपोलियन जात येत असे, हें वर सांगितलेंच आहे. या अड्ड्यावरील मंडळींत लग्न जमवून घेण्यासारखीं एक दोन ठिकाणें होतीं. तेव्हां नेपोलियनचें मन सहाजीक तिकडेच वळलें.

या क्रीडाभुवनांतील खेळ्यामेळ्यांच्या गळाठ्याचा मुख्य घटक बारस हा होता व तो हल्लीं फ्रान्सची व्यवस्था पाहण्यासाठीं नेमलेल्या पंचांपैकीं सरपंच होता. यामुळें नेपोलियनचें बरें करणें त्याच्या हातांत पुष्कळच होतें. तेव्हां आपली लग्न करण्याची मनीषा त्यानें बारस यास कळवून त्याचीहि सल्ला घेतली. नेपोलियनचे टुलोनयेथील शौर्य, व त्यानंतरचें तेराव्या व्हेंडे-मेयरच्या दिवशींचे नेपोलियनचें कौशल्य हीं पाहून याचें लग्न आपल्या अड्यावरील व आपल्या हाताखालच्या बायांपैकीं कोणाशीं तरी जमवून टाकावें असें बारसच्याहि मनांत होतें.

या अड्यावरील बायांत मादम टालिआ ही बाई सुंदर होती व नटवेगि-रीमुळें आणि आंगच्या तरतरीमुळें एकंदर पारिसमध्यें तिचें वजन फार

असे. हिच्याशीं लग्न जमलें असतां हिच्या वजनामुळें व हिच्या ओळखीमुळें जुन्या घराण्यांत शिरकाव होऊन अनेक गोष्टी साधण्यासारख्या होत्या. याकरितां हिच्याशींच लग्न जमवावें असा विचार प्रथम कांहीं दिवस नेपोलियनच्या मनांत होता; पण तिला बारस सोडील असें नव्हतें. शिवाय तिचा नवराहि जिवंत होता. त्याच्याशीं आधीं काडी मोडावयाची व मग मागाहून नेपोलियनशीं लग्न लावावयाचें म्हणजे तो एक मोठा खटाटोपच होता.ही इतकी दगदग करण्यास मादम टालिआ ही तयार नव्हती. शिवाय ती बाई फारच जहांबाज होती. तिला बारसचा पक्का वशिला असल्यामुळें आज मीच फ्रान्सची राणी आहें असें तिला वाटे. तिच्या हातांतून पाण्याप्रमाणें सोन्याचा प्रवाह हल्लीं वाहत असे. यामुळें नेपोलियनच्या हल्लींच्या स्थितींत हें बारदान पेलण्याला त्याला अंमळ जडच होतें;पण मादम टालिआबरोबर अलिकडे तेथें दुसरी एक रूपवान स्त्री, विधवा असून लग्न करण्यासारखी अशी त्या बैठकींतच येत असे. हिचें नांव जोसेफाईन. थोड्याशा खटपटीनें हें जमण्यांतलें होतें व सणंगहि ठीक असून बारसच्या वळणांतलें होतें. तेव्हां जमल्यास हें जमवून घ्यावें, असें नेपोलियनच्या मनांत आलें.

जोसेफाईन ही एका मळेवाल्याची मुलगी; लहानपणापासून आईबापांची आवडती व लाडानें वाढलेली अशी होती.ही दिसण्यांत मोठी अप्रतिम खुबसुरत बायको होती, असें नाहीं; पण एकंदरीनें हजार पांचशेंत ती देखणी होती. चेहरा जरा लांबट, कपाळ मोठें, नाक तरतरीत व डोळे पाणीदार असून ती शरीरानें चांगली गोंडस असल्यामुळें पाहणाराचे मनांत तेव्हांच भरे. ही लहान म्हणजे बारा तेरा वर्षांची असतांनांच वुइल्यम स्टुअर्ट नांवाच्या एका तरुण व रूपसंपन्न अशा मनुष्याशीं हिचें मन जमून गेलें होतें. कोणी म्हणतात गालाला गालहि लागले होते व आपलें लग्न लावावें असें या दोघांचें आपसांत पक्कें ठरलें होतें; पण ब्रह्मदेवाचे नेमानेम व आईबापांच्या योजना अगदीं निराळ्या असल्यामुळें हा योगायोग घडला नाहीं. यामुळें हीं दोघें फार खिन्न झालीं. वुइल्यम स्टुअर्ट हा तर जोसेफाईनवर लुब्ध होऊन, तिच्या प्रेमानें इतका वेडा झाला होता कीं, तिचें

दुसऱ्या कोणाशीं लग्न लागणार असें कळल्यावर तो अगदीं वैतागून गेला. आणि यापुढें पुन्हां केव्हांहि कोणत्याहि दुसऱ्या सुंदरीच्या भानगडींत न पडतां, आल्पस पर्वतांतल्या दरीकंदरांत सन्यासवृत्ति धारण करून तो मठाधिपति होऊन राहिला. तेथें हा परमेश्वराचें चिंतन व नामस्मरण करून काळ काढीत असे व त्या बिकट जागीं वाट चुकून अडचणींत सांपडणाऱ्या पांथस्थांना सदैव मदत व अन्नदान करी. याच्या उत्तर वयांत फार वर्षांनीं नेपोलियन बादशहा तेथें एकदां गेला होता. त्यावेळीं त्याचे बरोबर जोसेफाईन राणीहि होती. हीं दोघें हा मठ पाहण्यासाठीं आंत गेलीं असतां वुइल्यम स्टुअर्टची व जोसेफाइनची दृष्टादृष्ट झाली आणि ओळखहि पटली. जिच्या प्रेमापुढें सर्व सुखें आपण तुच्छ मानलीं, व जग सोडून देऊन या पर्वतांत हा एकांतवास पत्करला, ती जोसेफाईन आतां आणखी पुन्हां दुसऱ्या पुरुषाशीं लग्न लावून त्याच्या बरोबर येऊन आपल्या समोर उभी ठाकलेली वुइल्यमच्यानें पाहववेना. याकरितां, ओळख पटतांच वुइल्यम तेथून निसटला आणि जोसेफाईन तेथें होती तोंपर्यंत तिच्या समोर मठांत पुन्हां आला नाहीं. अखेर जोसेफाइनला तिच्या नवऱ्यानें सोडून दिलें, तिचें तें राणीपदहि गेलें, तेव्हां सन १८१४ मध्यें याच्या हाताला जखम होऊन हात थोटा झाला असतां जिची गोड मूर्ती आपल्या मनांतून आजन्मपर्यंत कधींहि ढळली नाहीं, तिला एकवेळ तरी आतां दोन डोळ्यांनीं प्रत्यक्ष पोटभर पाहावी असें मनांत आणून तो एकदां जोसेफाईनला भेटण्यासाठीं माल्मेझान येथें तिच्या मंदिरांत गेला होता; पण त्यावेळींहि त्याची जोसेफाईननें भेट घेतली नाहीं किंवा नुसती ओळखहि दाखविली नाहीं. म्हणजे यांचा लहानपणीं घडू घातलेला व जवळजवळ जमलेला लग्न-संबंध केव्हांहि घडून आला नाहीं. यानंतर म्हणजे वुइल्यमचा नाद सुटल्यावर, लवकरच हिचें लग्न अलेक्झांडर-दी-बोहारने नांवाच्या एकोणीस वर्षे उमरीच्या एका श्रीमंत सरदाराच्या मुलाशीं लागलें. ही शरीरानें फार उफाडयाची होती. यामुळें वय अवघें सोळा वर्षांचें असूनहि नवऱ्यापेक्षां बायको थोराड दिसे. लग्नानंतर सासऱ्याच्या श्रीमंतीमुळें व नवऱ्याच्या लौकिकामुळें त्यावेळच्या अमीर उमरावांत हिचें जाणें येणें

फार घडत असे व फ्रान्सची महशूर राणी मेरी आंतूआनेत हिचाहि जोसेफाईनवर विशेष लोभ असे. या नव्या घरीं जोसेफाईनला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्येंहि झालीं होतीं; परंतु या जोडप्यांत असावें तसें प्रेम नव्हतें. लग्नानंतर थोडेंच दिवसांत जोसेफाईनच्या वर्तनाबद्दल तिच्या नवऱ्याचे मनांत वांकडें आलें व तुला झालेलें मूल माझें नाहीं, व तो कोणाचा लेकवळा आहे तें मी पुरतेपणीं जाणतों,असें स्पष्ट लिहिण्यापर्यंत पाळी आली. कोर्टांत काडी मोडून घेण्याची फिर्यादहि झाली; पण कोर्टाच्या दृष्टीनें यांत जोसेफाईनचा तर अपराध होताच, पण कांहीं थोडासा दोष तिच्या नवऱ्याकडेहि येतो, असें दिसून आलें आणि जोसेफाईननें वेगळें राहावें व तिला बोहारनेनें अन्नवस्त्राबद्दल अमुक रक्कम द्यावी असें ठरलें. कोर्टाचा हुकूम मिळाल्यावर जोसेफाईन यापुढें निराळी स्वतंत्रपणें राहूं लागली. पुढें लवकरच अलेक्झांडर-दी-बोहारने याच्यावर राब्सपीएरच्या धामधुमींत कांहीं ठपका येऊन त्यास सुळीं देण्यांत आलें आणि जोसेफाईनला ढलढळीत वैधव्य आणि पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झालें. नवऱ्याचे बरोबरच हिचाहि राजपक्षांच्या लोकांकडे ओढा आहे, अशा संशयावरून हिलाहि कैद केली होती व ती फांशींहि गेली असती; पण तितक्यांत राब्सपीएर हाच मारला गेल्यामुळें बारसच्या वजनानें व मध्यस्थीनें हिची सुटका झाली. आरोपांतून आणि तुरुंगांतून सुटल्यानंतर हिला पैशाची फार अडचण येऊं लागली. पहिल्या नवऱ्याकडून कोर्टाच्या ठरावावरहुकूम पैसा येत होता, तो आतां बंद झाला; पण पूर्वीच्या श्रीमंतीच्या संवयी व ऐषआरामाचे चोचले होते ते तसेच कायम राहिले आणि हल्लीं तर हातांत पैका नाहीं. यामुळें दिवस कंठणें त्रासदायक होऊं लागलें, म्हणून हिनें आपला मुलगा एका सुताराच्या हाताखालीं व मुलगी कपडेवाल्या दर्जीच्या दुकानांत काम करण्यास ठेविली. याप्रमाणें मुलें स्वतःचें पोट भागवूं लागलीं व जोसेफाईन इष्टमित्रांच्या आशीर्वादानें व प्रसादानें दिवस काढूं लागली. थोडेच दिवसांत तिचें माडम टालिआकडे जाणें येणें फार होऊं लागलें आणि येथेंच बारसची व तिची प्रथम सलगी जमली.

जोसेफाईनचें लहानपणचें लाडकें नांव 'रोझ' म्हणजे गुलाब असें होतें व या मंडळींत तिला या लाडक्या नावानेंच केव्हां केव्हां हाक मारीत. येथें असतानां प्रथम जनरल हाक नावांच्या सरदाराशीं हिनें लगट केली व जमल्यास याच्याशीं पाट लावावा असें हिच्या मनांत होतें. हाकच्या मनांत देखील कांहीं दिवस ही गुलाब चांगली भरली होती; पण पुढें ती त्याच्या मनांतून साफ उतरली. बारस आपल्या आत्मवृत्तांत लिहीतो कीं, 'हाकचा एक मोठा देखणा जवान नोकर होता. त्याला गुलाबनें आपली छबी, एक सोन्याची ताईती व असलेच आणखी कांहीं नाजुक नजराणे दिलेले हाकला कळल्यामुळें त्यानें गुलाबचा नाद तोडून टाकला. या वेळीं हिच्या वर्तनाबद्दल सर्व पारिसभर लोक फार कुजबुजूं लागले होते; पण हिला बारसची आवडती नाइकीण मादम टालिआचा आधार होता. आणि बारसचीहि हिच्यावर प्रीति होती, यामुळें हें सर्व निभावून गेलें; पण हाकनें नाद सोडल्यावर जोसेफाईनचा आधार साफ तुटला. म्हणजे लग्नाचा थाट पुरा बिघडला. तरी बारसच्या प्रेमाचा आधार हिला बराच होता; पण तो कायम मानण्यासारखा नव्हता. कारण बारसच्या जनानखान्यांतल्या पट्टराणीचा मान माडम टालिआला होता आणि जोसेफाईन ही तेथें नव्यानेंच जाऊं येऊं लागली होती व तेथील सुखाचा सर्व अनुभव नुकतीच घेऊं लागली होती.

बारसच्या सावलींत सुखानें लोळत असतानां एक दिवस जोसेफाईनची व नेपोलियनची सहज भेट झाली. बारसच्या अनुमोदनानें माडम टालिआनें पारिसमध्यें आपले घरीं एक मजलिस केली होती. या रात्रीं पारिसमधले अनेक लोक तेथें जमले होते. माडम टालिआ ही त्या मजलशीची आदिस्वामिनी असल्यामुळें सर्व तऱ्हेच्या शृंगारानां तेथें ऊत आला होता. त्या रात्रीं तो वाडा आणि त्या भोंवतालचें पटांगण दिव्यांच्या लखलखाटानें झळकत होतें. पण त्या उजेडापेक्षां ज्यांच्यावर तारुण्याचा फुंद चढला आहे, अशा गोऱ्या पुतळ्यांच्या चंद्रजोतीसारख्या आंगकांतीच्या उजेडानेंच पाहणारांचे डोळे जास्त दिपत. त्या ठिकाणीं वाद्यांचे सुस्वर आलाप चालू असल्यामुळें जमलेली पाहुणे मंडळी तर चांगलीच नादावली होती.

व तऱ्हेतऱ्हेचीं खाद्यें आणि पेयें तेथें ठेविलीं असल्यामुळें आकंठ तृप्त होऊन शराबाच्या धुंदीनें ही रसिकरंगेल मंडळी मोठ्या खुशींत आली होती. तेथें आलेल्या लहान मोठ्या सुंदर स्त्रिया नटून थटून लोकांच्या डोळ्यांत भरतील असे उंची पोषाख ल्याल्या होत्या. पण त्यांच्या अंगावरच्या त्या पोषाखाला पोषाख म्हणण्यापेक्षां कलाबतूच्या आणि जरांच्या त्या जाळ्याच होत्या, असें म्हणणें नीट होईल. कारण ज्यावर तें भरित काम केलें होतें तें रेशमी कापड इतकें झिरझिरीत होतें कीं, त्यामुळें आंतील गोरें आंग स्वच्छ दिसे. आंतील आंग असें दिसावें आणि पाहणारांचें चित्त आपणाकडे ओढलें जावें हाच त्या पोषाखाचा मुख्य उद्देश होता. ज्यांनां या असल्या नटवेपणाची मनापासून हौस, ज्यांची आंगलट फार लुसलुशीत, ज्यांचें तारुण्य, लिंवाप्रमाणें तेजस्वी ज्यांची लावण्यकांती जात्याच चेतोहर; पण ज्यांनां लज्जा किंवा भीड यांची आडकाठी मुळींच नाहीं, अशा अनेक छेल छबेल्या तेथें गोळा झाल्या होत्या. मादम टालिआ ही स्वत: तर फारच नटून येथें यावेळीं डौलानें मिरवत होती. बारस-सारख्या सत्ताधाऱ्याच्या प्रेमाची ही पेटी होती. तेव्हां जमलेले सर्व लोक हिला मुजरे करीत आणि हिच्या भोंवतीं येराझारा घालीत. या बैठकींत माडम टालिआनें आपल्या पिंजऱ्यांतली एक नवीन मैनाहि बरोबर आणली होती. ही नवीन बाई, म्हणजे नुकत्याच सुळावर चढलेल्या बोहारनेची विधवा, जोसेफाईन होय, हीहि मोठ्या तोऱ्यानें टालिआच्या बरोबर हिंडत होती. या नाचरंगाच्या बैठकीला नेपोलियनलाहि आमंत्रण होतें व तोहि तेथें गेला होता.

असल्या मजलसींचा व मंडळीचा नेपोलियन मोठासा चाहता होता, असें मुळींच नाहीं; पण माडम टालिआसारख्या बाईच्या आमंत्रणाचा लाभ घेणें फार फायद्याचें होतें. एक तर तेथें हल्लींच्या कारभारांतल्या पुष्कळ वजनदार लोकांच्या भेटी घडणें संभवनीय होतें. शिवाय बारस सत्ताधारी असल्यामुळें लहान मोठ्या अनेक देणग्या देणें त्याच्या अधिकारांत होतें व त्याच्या अधिकारांतील देणग्यांची किल्ली माडम टालिआच्या हातांत होती. तेव्हां हिच्याशीं सलगी जोडावी, हिचा लोभ संपादन करावा,

आणि आपलीं संकटें निवारावीं, हें नेपोलियनच्या साहजिक मनांत आलें व तशी संधी येतांच,साधून घेण्याच्या हेतूनें नेपोलियन त्या ठिकाणीं गेला. त्या रात्रीं नेपोलियन आपला लष्करी पोषाख घालून तेथें गेला होता. नेपोलियन गेला, तेव्हां मंडळी नाचाच्या रंगांत आली होती. ही विद्या नेपोलियनला फारशी अवगत नव्हती; म्हणून तो नुसताच फिरत होता. थोडें वेळांत तो मादम टालिआजवळ जाऊन जरा धिटाईनें पण गमतीनें बोलूं लागला. त्यानें तिचा हात आपल्या हातांत उघडून धरला व तो तिचें सामुद्रिक सांगूं लागला. हें पाहून त्यांचे भोंवतीं जरा गर्दी जमली. त्यांत जोसेफाईनहि तथें होती, तीहि जवळ आली व तिनें सामुद्रिक जाणण्यासाठीं आपला हात पुढें केला. ही जोसेफाईनची व नेपोलियनची पहिलीं भेट. यानंतर तिच्या व त्याच्या अनेक वेळां भेटी झाल्या.

लाघवी भाषणानें, गोड स्वभावानें आणि सोशिक वर्तनानें नेपोलियनचें मन जोसेफाईननें आपल्याकडे ओढून घेतलें व आपलें त्याच्यावर प्रेम बसलें आहे, असें ती त्यास भासवूं लागली.या वेळचें एक पत्र दि कॉंस्टानें आपले ग्रंथांत दिलें आहे. त्यांत जोसेफाईन लिहीते:—

" जिचें तुमच्यावर प्रेम आहे त्या मैत्रिणीला भेटावयाला आतांशा तुम्ही येत नाहीं. तुम्ही तिला आतां अगदींच टाकल्यासारखें केलें आहे. हें तुमचे करणें गैर आहे. तिला तुमच्या प्रीतीचें वेड लागलें आहे."

" तर आतां या. तुम्ही उद्यां–सातवीला–माझेकडे फराळाला या. तुम्हाला भटावें आणि ज्यांत तुमचा फायदा आहे, अशा गोष्टीविषयीं तुमचेबरोबर बोलावें, असें माझे मनांत आहे."

" आजची रात्र सुखाची जावो. जिवलगा, मी मनांतून तुम्हाला मिठी मारत्यें."

आज ता. ६ ब्रुमेयर,

आपली " बोहारने."

पूर्वीच्या खानदानींतल्या घराण्यांतील एका रुपवान तरुण निराश्रित विधवेनें लिहिलेलें हें पत्र. यांत किती तरी अर्थ भरला आहे आणि अशीं किती तरी पत्रें.या कवटाळणीनें लिहिलीं असतील. तीं वाचून नेपोलियन

तिला वळला असला किंवा भाळला असला, तर काय नवल ? पण तो तिला किंवा तिच्या लावण्यपणाला तितका भाळला नाहीं. पुढें दिसून येणारें अव्याज प्रेम अजून त्याचे मनांत उद्भवलें नव्हतें. त्याचें मन तिच्याकडे थोडेंसें वळलें होतें हें खरें; पण मनाचें पारडें असें लवण्याला प्रीतीपेक्षां मतलबाचेंच वजन त्यांत जास्त पडलें होतें. हिच्याशीं लग्न लावलें असतां आपल्याला अनेक तऱ्हेचे लाभ घडतील आणि बारसच्या व हिच्या मैत्रीचा चांगला उपयोग करून घेतां येईल असेंहि नेपोलियनला उघड दिसत होतें. शिवाय ती एका जुन्या खानदानीच्या, पहिल्या प्रतीच्या घराण्यांतली होती. यामुळें तिच्याशीं संबंध जडला असतां आपली गणना 'फ्रेंच' लोकांत होईल, आपला लौकिक व वजन वाढेल आणि आपल्या जन्मासंबंधानें लोक आपणास हिणावतात, तेंहि कमी होईल; असें त्यास वाटलें. नेपोलियन लिहितो कीं " टवाळ लोक मला जीं दुरुत्तरें बोलत, त्या सर्वांत त्यानीं मला 'कार्सिकन' म्हणून हिणावल्यानें माझे मनाला फार वाईट वाटे. माझी गणना जातिवंत फ्रेंच लोकांत व्हावी असें मला फार वाटे." जोसेफाईनशीं लग्न लावलें असतां हें साधण्यासारखें होतें, हें नेपोलियन जाणून होता.

नेपोलियनप्रमाणेंच जोसेफाईनहि आपल्या मतबलाच जागून होती. तीहि नेपोलियनला पाहून वेडी झाली होती असें मुळींच नाहीं. या सुमारास आपल्या एका हितचिंतक मित्राला लिहिलेल्या पत्रांत ती म्हणते:– ' काल तुमची व जनरल बोनापार्टची माझे येथें भेट झालीच. तो आलें० बोहारनेसच्या निराश्रीत मुलांना त्यांच्या बापाच्या ठिकाणीं व त्यांच्या विधवेला ( मला ) नवऱ्याच्या ठिकाणीं होऊं इच्छितो; पण तुम्ही विचाराल कीं, तो तुझे मनास कसा काय येतो. तर तो मला तितका आवडत नाहीं; पण तो मला अगदीं पसंत नाहीं असेंहि नाहीं." आणि हें खरे आहे. आवडी, नावडी संबंधीं या पत्रांत स्वच्छ मनानें लिहिलेला मजकूर अगदीं खरा दिसतो. जोसेफाईनला, आपण व आपलीं मुलें अशीं निराश्रित भटकत राहण्यापेक्षां, कोणाचा तरी आधार धरावा, व तो या नेपोलियनसारख्या होतकरू सरदाराचा मिळाल्यास पुढें आपलें फार बरें होईल, असें

खास वाटलें. तिच्या कांहीं स्नेह्यांनीं व कायदेशीर सल्लागारानेंहि तूं या भणंगाशीं लग्नाची गांठ बांधूं नको, असें सांगितलें होतें; पण १३ तेरावे व्हेंडेमेयरचे दिवशीं नेपोलियननें मिळवलेला लौकिक आणि मादम टालीआ व बारस यांचा आग्रह यामुळें तिनें हाच वर कायम करण्याचा निश्चय केला. आणि अखेर नेपोलियनचाच वरनिश्चय कायम झाला. आतां बाह्यतः याला एक दोन अडचणी होत्या. एक जोसेफाइनचें वय नेपोलियनच्या वयापेक्षां सहावर्षांनीं अधिक होतें व दुसरे जोसेफाईन जवळ थोडाफार हुंडा देण्याचीहि ऐपत बिलकूल राहिली नव्हती. वयाची अडचण कांहीं फारशी विशेष नव्हती. कारण यापूर्वीं नेपोलियननें परमान नांवाच्या एका चाळीस वर्षांच्या उमरीच्या फारच धनवान् अशा विधवेशीं लग्न लावण्याचें योजलें होतें. तिच्या मानानें जोसेफाईन म्हणजे पोरसवदा, अगदींच कोंवळी होती. तेव्हां ही अडचण नव्हतीच म्हटलें तरी चालेल. आणि हुंड्याच्या देणगीबद्दल नेपोलियनला इटालींतल्या मोहिमेची सरदारकी बारसनें देऊं केली व लगेच लग्नाचे आधीं तीन दिवस ती दिली. यामुळें दुसरीहि अडचण राहिली नाहीं. अर्थात् कोणतीहि नड न येतां सर्व गूण पटून हें लग्न—हा पाट--जमला. व ता. ९ मार्च १७९६ हा दिवस कायम धरला. ते दिवशीं माघी अमावास्या होती. लग्नाची घटका रात्रौ आठ वाजतां धरली. जोसेफाईनकडे घरच्या करवल्या कोणीच नव्हत्या. तेव्हां बरोबरची लेमारिस, टालिआ, बारस वगैरे मंडळी ठरल्यावेळीं मेयरकडे हजर झाली. पण आठ वाजून गेले, नऊ झाले, दहाचा ठोका पडला, तरी जांवईबुवांचा ठिकाणा नाहीं. लग्न लावणाऱ्या मेयरला बसल्या खुर्चीवर जरा डुलकीहि लागली. इतक्यांत एकदम नेपोलियन—नवरा—घाईघाईनें आला व एकदांचे लग्नाचे सर्व विधी उरकून घेतले. लग्नाचे विधी हे शब्द थोडे चुकीचे आहेत. कारण हा शरीरसंबंध जुळविण्यांत किंवा ही ग्रंथी बद्ध करण्यांत कोणाहि भिक्षुकाचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नव्हता.मंत्रांचें गाबाळ येथून दूर ठेविलें होतें. दोघांनीं आपखुषीनें व स्वसंतोषानें ही गांठ मारून ती शहरच्या मेयरसमक्ष मंजूर व रजिष्टर केली होती. या लग्नकरारावर टालिआ व बारस यांच्या साक्षी घातल्या होत्या. लेमारीसचीहि सही

होती; पण तो वयानें अज्ञान असल्यामुळें ती कायद्यानें फुकट होती. शिवाय विजोड दिसूं नये म्हणून यांत नेपोलियनचें वय जास्त लावलें होतें व जोसेफाईनचें कमी लावलें होतें. दोघांचींहि वयें सत्तावीसच लावलीं होतीं. नेपोलियननें आपले जन्माची दाखलेपत्रिका—जन्मपत्रिका—देण्याचे ऐवजीं आपला भाऊ जोसेफ याचीच दिली होती. कारण आयतेवेळीं त्याची सांपडली नाहीं. म्हणून जोसेफची होती तीच पुढें केली. यामुळें लग्नाचे नोंदणींत वराचा जन्म ता. ५ फेब्रुवारी १७६८ रोजीं झाला. असें लागलें. पण याची कांहीं पुढें अडचण येण्यासारखी नव्हती. मुलीचाहि जन्म चुकीचाच लागला होता आणि तिचें नांव रीतिप्रमाणें व कायद्याप्रमाणें 'अमुक अमुक पहिल्या अमक्या नवऱ्याची विधवा बायको,' असें न लागतां माहेरच्या आडनांवानेंच लागलें. अशा बारीकसारीक गैरकायदा बाबी यावेळीं कैक होऊन गेल्या; पण तितक्या रात्रीं व तसल्या लग्नाच्या त्या धांदलींत त्यांचें एवढें काय आलें आहे! एकदांचें लग्न लागलें, असें नोंदवून गेलेली सर्व मंडळी संतुष्ट होऊन आपआपल्या ठिकाणीं सुखाचा अनुभव घेण्यास घरोघर निघून गेली. राक्षसनाम संवत्सरीं माघ वद्य अमावास्येच्या दिवशीं—नव्हे अमावास्येच्या रात्रीं—हें लग्न झालें.

लग्नाचे पूर्वींच दोन तीन दिवस इटालीमधील सैन्याच्या अधिकाराचीं वस्त्रें व हुकूम नेपोलियनच्या हातांत पडले होते. यामुळें या नव्या नवरीच्या मायेंत फारसा न गुरफटतां नेपोलियन हा मोजका दोनच दिवस पारीसमध्यें राहून ताबडतोब लग्नाची हकीकत वरीष्ठांस कळवून इटालीकडे जाण्यासाठीं ता. ११ मार्च रोजीं चार्टेलीन येथें निघून गेला. या दोन दिवसांत देखील त्यानें सैन्याचे खर्डे, लढाईची पुढील तयारी व निरनिराळ्या योजना करण्यांत बहुतेक वेळ खर्च केला. जोसेफाईनशीं करमणूक करण्यास त्याला फुरसूदच झाली नाहीं. आणि त्या तसल्या करमणुकीपेक्षां पुढें रणदेवतेबरोबर होणाऱ्या करमणुकीचेच विचार त्याच्या मनांत सारा वेळ भरून राहिले होते. हल्लीं तरी नेपोलियनचे दृष्टीनें जोसेफाइनचें लग्न हें त्या मोठेपणाला चढण्याची मधली पायरी होती. पहिलेच दिवशीं जोसेफाईन भेटावयाला आली, तेव्हां तो इतालीकडील मोहिमेच्या योजनेंत गुंतला

होता. म्हणून त्यानें त्यावेळीं आपण फार कामांत आहों, असें सांगून तिला परत पाठविली व तो पुढें घेतलेल्या इटालीच्या मोहिमेच्या तयारीचे कामांत गर्क होऊन गेला.

पुढें इतालीच्या मोहिमेवर इतालींत असतांनां एकदां जिच्याशीं लग्न लावलें, त्या या जोसेफाईनकडे नेपोलियनचें मन वारंवार वळे व सैन्याच्या छावणींतून तो तिला वारंवार पत्रें धाडी. केंव्हां केंव्हां एकेका दिवसांत पत्रें घेऊन तिच्याकडे तो दोन दोन जासूद रवाना करी व आपल्या इतालींतील बहाद्दरीच्या बातम्या तिला वारंवार कळवी. असें करण्यांत थोडा हेतूहि होता. तो असा कीं, या बातम्या तिच्या मार्फतीनें अर्थात सहजच सर्वभर पसरत, आणि यांबद्दल कोणाच्यावर यांत जबाबदारीहि फारशी नसे. यावेळचीं व पुढलींहि नेपोलियनचीं पत्रें प्रेमानें वेडावलेल्या तरुणानें लिहावीं, तशींच आहेत. त्यांतलीं भाषासरणी व शब्दहि त्या मनोविकाराला पूर्णपणें शोभतील असेच आहेत. या पत्रांनां गेलेलीं जोसेफाईनचीं उत्तरें मात्र तितकीं कळकळीचीं व प्रेमाचीं नाहींत. इतालींत असतांनां प्रथम नेपोलियननें तिला तिकडे बोलाविली होती; पण ती गेली नाहीं व मी आजारी आहे, मला दिवस गेले आहेत, असा तिनें बहाणा सांगितला. पण पुढें हें सर्व कुभांड ठरलें. इताली प्रांत जिंकून तेथें नेपोलियनचा दरारा व बस उत्तम बसला आणि आपल्या यशाची खबर फ्रान्स देशांत महशूर करण्यासाठीं त्यानें शत्रूंचीं हिरावून घेतलेली बावीस निशाणं सरदार जुनो याच्याबरोबर पारिस शहरीं नजर म्हणून पाठविलीं. जुनो बरोबर पारिस शहरला निशाणें धाडलीं होतीं, त्या बरोबरच जोसेफाईनला एक पत्रहि पाठविलें होतें. त्यांत लिहिलें होतें कीं "जुनो निशाणें पोंचतीं करून इताली मध्यें परत येईल, तेंव्हां तूंहि त्याचेबरोबर अवश्य इकडे ये." हें पत्र वाचून जोसेफाईनचे मनाला फारच वाईट वाटलें. तें पारीस शहर, तेथली ती मित्रमंडळी आणि तेथलें ते सुखविलास सोडणें, तिच्या अगदीं जिवावर आलें; पण नेपोलियनच्या या वेळच्या पत्रातलीं भाषा बरीच खरमरीत होती. त्याचा तो हुकूम मोडून चालण्यासारखें

नव्हतें. तेव्हां नाईलाजास्तव ती जुनो बरोबर इतालींत आपल्या नवऱ्याकडे जाण्यास निघाली. या वेळीं जुनोचें वय पंचवीसीच्या आसपास असून तो अगदीं भरज्वानींत होता. त्याचा निकटसहवासानें जोसेफाईनची आधींचीच चंचळ बुद्धि जरा जास्त चळली व हें जुनोचे राशीला प्रवासांत एक नवे संकट उभें राहिलें. अखेर ती इतालींत जाऊन पोहोंचली तेव्हां नेपोलियननें थाटानें तिला घरीं आणून मोठ्या इतमामानें आपले जवळ ठेविली. असो.

नेपोलियन प्रमाणेंच जोसेफाईनची नजर आपल्या मतलबावर पहिल्यापासून नीट कायम होती. अर्थात् हें लग्न म्हणजे एक तऱ्हेचा व्यवहार होता. हा एक जातीचा सवदाच होता, असें म्हटलें असतांहि चालेल; पण हें लग्न लागून गेल्यावर पुढें नेपोलियनचे मनांत जोसेफाईनविषयीं प्रेम उत्पन्न झालें. तो तिला मनापासून चाहूं लागला व तिजवर अव्याज प्रीति करूं लागला. असें दिसतें कीं, आमरणान्त तो तिला विसरला नाहीं. फार महत्त्वाच्या कारणामुळें तिला त्यानें लग्नसंबंधापासून दूर केलें; पण आपल्या मनापासून दूर केलें नाहीं. केवळ नफ्या तोटयाच्या दृष्टीनें जमवून आणलेल्या विवाहानंतर पुढें त्या नवऱ्याचें आपल्या बायकोवर उत्कट प्रेम कसें जडतें व प्रीती कशी उत्पन्न होतें हें कोणाहि हिंदूस सहज समजेल. आपगा हिंदूच्या समजुतीप्रमाणें नवऱ्याच्या इतकेंच बायकोचें नवऱ्यावर प्रेम बसावें हें अगदीं योग्य व सहाजिक आहे. असें दिसतें कीं नेपोलियनचें आपल्या बायकोवर जितकें मन जडलें, तितकें जोसेफाईनचें नेपोलियनवर जडले नाहीं. तिच्या मनांतला मतलब व स्वार्थ केव्हांहि दूर झाला नाहीं, तिचे चाळे केव्हांहि सुटले नाहींत. तिच्याविषयीं बारसनें आपल्या चरित्रांत लिहून ठेविलें आहे कीं, आपल्या नवऱ्याच्या कपाळाच्या कवटींत सोन्याचा रस करून तो पिण्यास ती हौशीनें तयार होईल, अशी तिची मनोरचना होती.

पुढील कथाभागाचा संदर्भ नीट ध्यानांत येण्यासाठीं जोसेफाईनचा गोतवळा पुढें दिला आहे.

जोसेफाईन + आले० बोहारनें, ( प्रथम विवाह )

युजीन + बव्हेरियाची राजकन्या

जोसेफाईन + आस्कार, स्वीडनचा राजा.

हार्टेन्स + नेपोलियनचा भाऊ लुई ( हालंडचा (राजा) याच्याशीं लग्न ४ जानेवारी १८०२.

चार्लस नेपोलियन

नेपोलियन ( ३ रा ) जन्म १० आक्टोबर १८०२ पुढें गादीवर बसला

प्रकरण सहावें.

## इतालींतील मोहीम.

राजक्रांतीनंतर फ्रान्सची स्थिति फार घोटाळ्याची झाली होती. जुन्या सर्व संस्था उधळून टाकल्यामुळें जुनी घडी विस्सखळून गेली होती व नव्या संस्थांची घडी अजून जमली नव्हती. देशांतले सरकारी कर्जरोखे सरकार केव्हां तरी फेडील, ही आशा वाटेनाशी झाली. अडचणीची वेळ निभावून नेण्यासाठीं म्हणून वेळोवेळीं कागदाच्या नोटा इतक्या पाडल्या गेल्या होत्या कीं, त्यानां आतां फारशी किंमत राहिलीं नाहीं. यामुळें सर्वभर महागाईची हाकाटी झाली. देशांतले पुष्कळ लोक सुळावर चढवल्यामुळें व हजारो लोक देशाबाहेर निघून गेल्यामुळें उद्योगधंदे बसले, शेती बुडाली, आणि जमीनी ओसाड पडल्या. आपल्या राजाला मारून टाकून लोकसत्तेची ध्वजा उभारल्यामुळें भोंवतालचे सर्व राजे शत्रू झाले. देशांत नवीन कायद्यामुळें व स्वसंरक्षणाच्या निकटीसाठीं शिपायांच्या पलटणी उभ्या केल्या होत्या, त्या अधीर होऊं लागल्या. त्यांचे पगार अंगावर थकून राहिले. त्यांना खाण्यापिण्याचीहि अडचण पडूं लागली. हल्लीं या पलटणी बाहेर

होत्या; पण त्या तिकडून देशांत आणल्या, तर त्यांना पोसण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें दंगा करतील आणि पुन्हां उलथापालथ होईल. त्यांना कोणी परकीय राजांनीं हाताशीं धरलें तर त्या अनर्थ उडवतील. कदाचित् ही संधी साधून बोरबानराजे पुन्हां डोकें वर काढतील आणि मग इतके दिवसांची खटपट व्यर्थ जाईल. इतका रक्तपात, इतक्या हालअपेष्टा फुकट जातील हें उघड होतें.तेव्हां या वेळीं सभोंवतालच्या अभिषिक्तराजाशीं लढाई चालू ठेऊन त्यांना दूर अंतरावर ठेवणें हें तर अवश्य होतेंच. पण याहिपेक्षां आपलीं पलटणें लढाईच्या कामासाठीं बाहेर देशांत पाठवून तेथील सुपीक कुरणांत हें वळू घोडे यथेच्छ चरूं देणें व त्यांना तिकडेच अडकावून टाकणें, जास्त अवश्य होतें. यासाठीं डारेक्टरानीं अनेक योजना योजून त्यांच्या वाटाघाटी चालविल्या होत्या. फ्रान्सबाहेर जर्मनी, स्विट्झरलंड, इताली वगैरे देशांतील लोकांनां चिथाऊन राजक्रांत्या कराव्या व फ्रान्स भोंवतीं लोकसत्तात्मक कफल्लांचे जाळें पसरावें. आयर्लंडचे बाजूनें इग्लंडमध्यें सैन्य नेऊन उतरावें, मध्यसमुद्र ताब्यांत घ्यावा, हिंदुस्थानावर मोहीम करावी, वगैरे योजनाहि त्यांचेपुढें हल्लीं होत्याच. याच सुमारास इतालीवर प्रथम मोहिम करून आस्ट्रीयाला हतबळ करावा आणि लांबाडी-सारख्या सुपीक प्रदेशांत आपल्या सैन्याला नेऊन तेथें चरूं द्यावें, ही आपली योजना नेपोलियननें बारसचे मार्फतीनें पुढें मांडली व ही त्या पंचांना पसंत पडली आणि त्यांनीं त्या मोहिमेची सरदारकी नेपोलियनला दिली.

इतालीच्या मोहिमेची मुख्य सरदारकी नेपोलियनला मिळाली; पण त्याबरोबर त्या मोहिमेला अवश्य अशी इतर सामुग्री त्याला सरकारांतून मुळींच मिळाली नाहीं. द्रव्य तर सरकारी खजिन्यांत फारसें नव्हतेंच. तेव्हां तें नेपोलियनला कोठून मिळणार ? नेपोलियननें पायीं पैजारा चढवून धनाढ्य सराफांकडून तें फार खटपटीनें मिळविलें. यावेळीं त्याचा या सराफांनी जो छळ केला, त्याचा परिणाम अखेरपर्यंत नेपोलियनचे मनावर कायम होता. बरोबर सैन्य होतें, त्यांनां कपडे व शस्त्रेंहि नीट नव्हतीं. कोणाच्या पायांत तर धड बूटहि नव्हते. युद्धसामुग्रीहि अगदीं साधारण प्रतीची होती; पण जें सरकारांतून मिळालें, तें घेऊन, त्यांत स्वतःच्या

जोखमदारीनें आणि मेहनतीनें घालतां आली तितकी भर घालून तो एका पंधरवड्यांत फ्रान्सच्या सरहद्दीवर आला. तेथें आपल्या शिपायांची कंगाल स्थिति पाहून त्यांस तो म्हणाला, 'नीट पुरेसें अन्न नाहीं व वस्त्रहि नाहीं. सरकारनें हें सर्व तुम्हास पुरवावें हें योग्य आहे. पण तें तुम्हांस पुरविण्याचें साधन सरकारजवळ नाहीं. या खडकाळ प्रदेशांतला तुमचा काटकपणा व तुमची शांतवृत्ति वाखाणण्याजोगीं आहेत. पण यांत कांहीं मोठी थोरवी नाहीं. मी तुम्हांला लवकरच जगांतल्या अत्यंत सुपीक प्रदेशांत नेऊन सोडतों. तेथें वैभव आणि सुखाचीं सर्व साधनें सहज तुमच्या स्वाधीन होतील. संपन्न शहरें तुमच्या हस्तगत होतील, हें पुढें स्पष्ट दिसत असतां आपला धीर आणि उद्योग तुमच्याच्यानें कधींहि कमी होणार नाहींत.' नेपोलियनचे हे शब्द ऐकून त्या कंगाल शिपायांनां मोठा दम आला. पुढच्या सुखाच्या कल्पनेंत ते आपलें सध्यांचें दैन्य पार विसरून गेले व तें कल्पनेंतलें सुख प्राप्त करून घेण्यासाठीं वाटेल त्या अडचणी सोसण्यास व अनेक साहसाचीं कृत्यें करण्यास ते तयार झाले. नेपोलियनचें आपल्या शिपायांनां उद्देशून केलेलें हें पहिलेंच भाषण होतें. यावेळीं व पुढेंहि त्याचे शब्द ऐकून शिपायांच्या आंगांत वीरश्रीचा संचार होई व त्याचे ते खडे बोल त्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडत. त्याच्या शब्दांत अशी जादू भरलेली असे कीं, ते ऐकणाऱ्या माणसांनां रेड्याचें बळ चढे व ते जिवाची बिलकूल परवा न बाळगतां अचाट कृत्यें करण्यास एकदम तयार होत. उत्साहहीन व क्षुधित अशा स्थितींतहि त्याचे शब्द शिपायांनां पोकळ शब्द नसून केवळ अमृताचे कल्लोळ वाटत. असा त्याच्या रसवंतीचा फार थोर प्रभाव होता.

आपल्या भाषणानें व उत्तेजनानें शिपायांच्या मनांत मोठी हौस उत्पन्न केल्यानंतर त्यांस त्यानें असें सांगितलें कीं, 'आपल्या सारख्या शिपाई गड्यांनीं सैन्याबरोबर तंबू आणि बाड बिछान्यांचें इतर लटांबर बाळगणें हें उगीच पायांत लोढणें आहे. या वस्तू आळशांच्या चैनीला योग्य आहेत. त्यांची परवा न करितां वाटेल तसें सुटवंगपणानें वावरावें, खाण्याचें सामानहि न घेतां ज्या मुलखांत जाऊं तेथेंच सर्व सोयी लावून घ्याव्या व एकदम

मोठाल्या भराऱ्या मारून अवचितपणानें छापे घालावे, हेंच तुम्हांस योग्य आहे.' फिरावें तेथेंच चरावें, असें शिक्षण त्यानें आपल्या शिपायांस पढविलें म्हणूनच त्याला असामान्य कृत्यें करितां आलीं.

या मोहिमेंत नेपोलियनचा मुख्य रोंख आस्ट्रीयावर होता. आस्ट्रीया हा फार बलाढ्य शत्रू असून त्याला चतुरंग बळ होतें. त्याचा चांगला मोड झाला म्हणजे त्या दिशेचें बहुतेक कार्य सहज आटपण्यासारखें होतें. परंतु आस्ट्रीयाच्या बाजूवर सारडीनीया हा प्रांत असून तेथील राजाचाहि मोड करणें भाग होतें. या सारडीनीयाच्या राजाचें व लुई बोरबॉन्‌चें नातें असल्यामुळें राजपक्षाच्या लोकांनां तें राज्य अनेक उचापतीसाठीं फार सोयीचें असे. फ्रान्समधून हांकललेल्या लोकांनां येथें हटकून थारा मिळे व येथेंच अनेक व्यूह फ्रेंच रिपब्लीकच्या विरुद्ध रचले जात. तेव्हां हाहि कांटा काढून टाकावा हें नेपोलियनच्या चित्तांत फार होतें व तिसरें कार्य म्हणजे खुद्द इताली देशांतील लहान लहान राज्यें बुडवून टाकून तेथें फ्रान्सच्या धर्तीवर लोकसत्तात्मक सरकार स्थापावें आणि पोपच्या जुलमाचा प्रतिकार करून त्याचाहि थोडाफार समाचार घ्यावा.

एप्रील महिन्याचे दाहाव्या तारखेचे सुमारास नेपोलियननें एक लढाई देऊन शत्रूच्या सैन्याचा थोडासा मोड केला होता व आपल्या हाताखालील सरदार राम्पन याला एका नाकेबंदीच्या ठिकाणावर जाऊन बसण्यास सांगितलें. आस्ट्रीयन सैन्याचा मुख्य सेनापती बोलू हा होता व याच्या हाताखालीं दुसरे दोन सेनापती होते. हे सर्व वयानें, ज्ञानानें व अनुभवानें वृद्ध होते. जनरल बोलू याचें वय एकाहत्तर वर्षांचें असून तो संगर-पांडित्यांत फार निपूण होता. यानें अनेक युध्दें पाहिलीं होतीं व कैकवेळां शत्रूला तोंड दिलें होतें. बोलूच्या हाताखालचे दुय्यम सरदारहि बोलूप्रमाणेंच पोक्त व अनुभवी होते. धैर्यांतहि ते कांहीं कमी नव्हते. नेपोलियनच्या आईच्या हातांत नेपोलियनच्या पाळण्याची दोरी होती, त्याच्या अगोदरपासूनच यांच्या हातांत तरवारी नाचत होत्या व ते समरांगणावर लढत होते. नेपोलियन हें कालचें पोर आहे, असेंच बोलूला वाटे. हा अजून शस्त्रविद्येंत शिकाऊ बच्चा आहे व आपण त्या विद्येचे आचार्य

आहों, असा त्याला मोठा अभिमान होता आणि तो तसा असणें साहजिकहि होतें. आपण या पोराला पाहिजेल तसा खेळवूं व वाटेल तेथें लोळवूं असें त्याचें मन त्याला सांगे. वोलूनें यावेळीं आपल्या सैन्याचे तीन भाग करून त्यांपैकीं एक त्यानें स्वतःचे हाताखालीं घेतला व नेपोलियनच्या मार्गावरचें एक ठाणें अडवून धरलें. आणि दुसऱ्या दोन भागांवर आपल्या हाताखालचे दोन सरदार ठेवून त्यांनां बाकीच्या दोन ठाण्यांवर बसविलें. अशी नाकेबंदी करून आस्ट्रीयाच्या मार्गाचा पुरा बंदोबस्त करून तो फार तजविजीनें राहिला. या तिहींपैकी कोणताहि एक भाग उधळून लावल्या शिवाय पुढील प्रदेशांत शिरकाव होण्यास मार्ग नव्हता. या तिन्ही भागाच्या तोंडावर नेपोलियननें आपले तीन सरदार पाठविले. यांपैकीं एका ठाण्यासमोर नेपोलियनचा सरदार राम्पन हा आला असतां त्याचेवर आस्ट्रीयाच्या सैन्याच्या एका सबंध भागानें फार निकराचा हल्ला केला. राम्पनजवळ अवघें पंधराशेंच सैन्य होतें; पण राम्पननें धीर सोडला नाहीं. त्यानें आपले सर्व लोक आपले भोंवतीं उभे केले व मग मध्यें एका दगडावर उंच उभा राहून त्यानें मोठयानें 'ओरडून अखेरपर्यंत मेलों तरीहि कोणी शस्त्र खालीं ठेवूं नये' अशी सर्व शिपायांनां ताकीद दिली व सर्वांकडून अशीच शपथ वाहविली आणि मग त्यानें शत्रूस चांगलें तोंड दिलें. इतक्यांत रातोरात नेपोलियननें आपलें सैन्य एकदम हालवून आस्ट्रीयाच्या सैन्याला चोहोंबाजूंनीं घेरलें. मासीना व बरथीए हे नेपोलियनचे दोन्ही सरदार शत्रूच्या दोन बाजूवर हल्ले चढवूं लागले. सकाळीं अरुणोदय होतो न होतो तोंच नेपोलियननें शत्रूस अगदीं पेंचांत धरलें. प्रहर दिवसाचे सुमारास लढाई फार निकराची झाली व थोडेच वेळांत आस्ट्रीयन सेनेचा पुरा मोड झाला. ही आपल्या सर्व सैन्याची हालचाल व हा हल्ला नेपोलियननें इतक्या चपलतेनें केला कीं, आस्ट्रीयन सरदार जनरल बोलू यास लढाईला तोंड कोठें लागलें आहे, ही बातमी पोंचण्यापूर्वींच त्याच्या सैन्याच्या एका मुख्य भागाची नेपोलियननें अगदीं राळ उडवून दिली. या लढाईला मांटेनोची लढाई म्हणतात. पुढें बादशाहा झाल्यावर या 'लढाईचे दिवसापासून मी माझी गणना सरदारांत करूं

लागलों,' असें नेपोलियन मोठ्या अभिमानानें म्हणे. ही मांटेनोची लढाई एप्रीलच्या बाराव्या तारखेस झाली व तेच दिवशीं नेपोलियनन शत्रूच्या दुसऱ्या भागावर एकदम जाऊन हल्ला केला. अर्थात शत्रूस यावेळीं गैरसावध असतांच लढाई देणें भाग पडलें. दुसरच दिवशीं म्हणजे तारीख तेरा रोजीं त्यानें शत्रूचा मिलेसिमो येथें पुन्हा मोड केला. या मिलेसिमोच्या लढाईंत नेपोलियनच्या हातीं पुष्कळ दारुगोळा व अनेक तोफा सांपडल्या. कारण हल्ला इतका अवचित झाला कीं, त्यापुढें निभावून पळतांना शत्रूला आपली आवराआवरहि नीट करतां आली नाहीं. मिलेसिमोच्या दुसर दिवशीं फ्रेंच सैन्यानें आस्ट्रीयाचा डीगो येथें पुन्हां पराभव केला. डीगोच्या लढाईंत पुढें प्रसिद्धीस आलेल्या लेन्स नांवाच्या सरदारानें चांगली तरवार गाजविली. ते दिवसापासून लेन्स हा नेपोलियनच्या खात्रीस उतरला. लेन्स हा मूळ रंगाऱ्याचा मुलगा. लहानपणीं हा रंगाऱ्याचें काम करून आपले बापाला थोडी फार मदत करी; पण राज्यक्रांतीनंतर परकी राजे आपल्या देशावर चालून आलेले पाहून, त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं, जे तरुण लोक घरेंदारें टाकून, हातीं शस्त्र घेऊन सैन्यांत येऊन मिळाले, त्यांतच लेन्स हा एक होता. थोडे लिहितां येत असल्यामुळें, व आंगच्या धाडसामुळें हा लवकरच प्रसिद्धीस आला. या डीगोच्या लढाईंत तर त्यानें चांगलेंच नांव मिळविलें. एव्हांपासून तो नेपोलियनच्या प्रितीचें, विश्वासाचें व मैत्रीचें पात्र झाला. हे दोघेहि एकमेकांस नेहमीं अरे तुरेच म्हणत व पुढें पाछाईंतहि हा नेपोलिनशीं असाच एकेरी शब्दानें बोले. नेपोलियनचा हा एक जिवाचा मित्र होता. अखेरपर्यंत त्यानें नेपोलियनचे शब्दास अंतर दिलें नाहीं व नेपोलियननेंहि त्यास मार्शल पदवीपर्यंत नेऊन मोठ्या लौकिकास चढविलें. नेपोलियनला यशःश्री सोडून जाण्यापूर्वींच जे थोडे त्याचे भाग्यवान् सरदार हा लोक सोडून गेले, त्यांपैकीं लेन्स हा एक होता. पुढला वाईट काळ दिसूं लागण्यापूर्वींच यानें आपले डोळे मिटले.

डीगोच्या लढाईनंतर इतर ठिकाणींहि अनेक लढाया झाल्या. यानंतर थोडेच दिवसांत मांडोवी या ठिकाणीं एक चांगली लढाई होऊन तींत

फ्रेंच सरदार म्युरा यानें सारडीनियन सैन्याचा पराभव केला. या मोहिमेंत नेपोलियननें इतक्या लढाया दिल्या व ठिकठिकाणीं शत्रूचा इतके वेळां पराभव केला कीं, त्यांच्या हकीकतीचा एक मोठा ग्रंथच होईल. थोडेच दिवसांत सारडीनियन राजाचा चांगला पराभव झाला व त्यानें नेपोलियनशीं त्याच्या मनाजोगा तह करून दिला. त्या राजाच्या मुगुटाव-रच पाळी आली होती; पण शेवटीं तहावर भागून त्या राजाचा मुगूट त्याच्या शिरावर जसातसा कायम राहिला. हा तह केल्यानंतर नेपोलिय-ननें आपल्या सैन्यास एक जाहिरनामा काढला व रणवाद्यांच्या समारं-भांत तो त्यानें सैन्यांस वाचून सर्वांनां ऐकविला. यांत नेपोलियन म्हणतो, "शिपाई हो, तुम्हीं पंधरा दिवसांत सहा लढाया जिंकल्यात, एकवीस निशाणें हिरावून घेतलींत, पंचावन तोफा काबीज केल्यात व अनेक किल्ले सर करून पिटमांचा अत्यंत सुपीक भागहि सहज जिंकलात. तुम्हीं पंधरा हजार लोक कैद केलेत व आणखी दहा हजार लोक जखमी करून निकामी करून सोडलेत. तुम्हीं या शौर्यानें कीर्ति संपादन केलीत हें खरें; पण यांत तुमच्या देशाला उपयोगीं असें अजून कांहींच मिळालें नाहीं. तें सर्व पुढें मिळवावयाचें आहे ! तुमच्याजवळ नव्हती अशी सामग्रीहि आतां तुमच्या स्वाधीन झाली. तोफखान्याशिवाय तुम्हीं लढाया जिंकल्यात. पुलांच्या सामानाशिवाय नद्या ओलांडल्यात आणि पायांत जोडे असल्याशिवाय तुम्हीं अनवाणीच लांबलांबच्या मजला मारल्यात. तुम्हीं छावणी केलीत त्या ठिकाणीं शीणभाग हरण्याला तुम्हांला निशाहि मिळाली नाहीं. फ्रान्साचे तुम्हीं खरे लढवय्ये, देवी स्वतंत्रतेचे तुम्हीं खरे शिपाई आणि म्हणूनच हें तुम्हांला सगळें साधतां आलें. त्यांवाचून इतरांच्यानें हें कसें होईल ? हें सर्व तुम्हीं केलेंत खरें; पण शिपाई लोकहो, अजून शिपाईगिरीची कर्तबगारी ती पुढेंच आहे. तूरीन व मिलन हीं शहरें अजून जिंकावयाचीं आहेत व इतालीचा प्रांत अजून सर करावयाचा आहे."

सारडीनियाच्या राजाशीं नेपोलियननें तह केल्यावर जनरल बोलू हा कांहींसा मागें हटला व पो नदीच्या पलीकडे एका चांगल्या ठिकाणीं जाऊन राहिला. त्याच्या पाठीवर नेपोलियनची फौज दौड करून येतच होती.

आडा नदी हा एक पो नदीचा फांटा आहे. या आडा नदीच्या उताराचें एक ठिकाण पाहून आपल्या सैन्यास त्या ठिकाणीं नदी उतरून पार न्यावयाचें, अशी नेपोलियननें खोटीच बातमी पसरून दिली. तेथून पलीकडे जाण्याची दिखाऊ तयारीहि त्यानें चालविली. या बातमीनें कांहींसा फसून जनरल बोलू तेथें आपल्या फौजेसुद्धां तळ देऊन राहिला व त्या जागेची नीट मजबुती करूं लागला. हें पाहून नेपोलियनला मोठा आनंद झाला. जनरल बोलू हा फसला, असें पाहून रात्रीच्या प्रहरीं नेपोलियननें त्या नदीच्या कांठाकाठानें पांचपन्नास मैलांचीं मोठी मजल मारिली व जातां जातां जेवढ्या लहान सहान होड्या हातीं लागल्या, तितक्या धरून तो पन्नास मैलांवर पलीकडे नदी उतरून आंतल्या मुलुखांत शिरला. तलवेचे स्वार हिंडत होते त्यांनीं ही बातमी बोलूस कळविली. तेव्हां नेपोलियन एकदम मीलनकडे जातो असें पाहून, फौजेचें ठाणें उठवून तो आडा नदीच्या पलीकडे लोदी या ठिकाणीं जाऊन राहिला. आडा ही नदी जरी पो नदीलाच मिळणारी एक लहानशी नदी आहे, तरी हिच्या पाण्याला उतार नेहमींच मिळतो असें नाहीं. जीं कांहीं उताराचीं ठिकाणें आहेत, त्यांत लोदी हें ठिकाण बऱ्यापैकीं असून येथें नदीवर एक साकूसारखा पण त्याहून मोठा असा लांकडी पूल घातलेला होता. या ठिकाणीं नदीचें पात्र सुमारें चारशें हात रुंद आहे. हें ठिकाण अगदीं नाकेबंदीचें आहे, असें पाहून या ठिकाणीं जनरल बोलू यानें आणखी फौज बोलावून घेतली व तेथें नदीच्या अलीकडल्या आंगाला एक किल्ला होता, त्याची तो मजबूती करूं लागला; पण नेपोलियननें त्याला बिलकूल अवसर न मिळूं देतां आपले लोक एकदम त्या किल्यांत घातले. तेव्हां येथें नदीच्या अलीकडे लढाई देण्यापेक्षां पलीकडे होऊन नदी पाठीशीं घालावी व तेथें राहावें; असा इरायानें जनरल बोलू सैन्य घेऊन नदी पलीकडे गेला. या लोदी गांवच्या ईशान्येकडे मीलनचा किल्ला होता व पूर्वेकडे अत्यंत मजबूत व केवळ अभेद्य असा मांचुआचा किल्ला होता. कदाचित् लोदी येथें पराभव झाला, तरी या दोहोंपैकीं कोणत्याहि किल्याचा आश्रय धरून आपल्याला आंगलें लढतां येईल व येथें नेपोलियनला व्यूहविन्यास ठीक पडेल, असें

जनरल बोलू यानें मनाशीं ठरविलें होतें; पण होईल तितकें करून नेपोलियनला लोदी येथें नदी उतरूनच द्यावयाची नाहीं, अशी त्यानें तयारी केली. आणि याकरितां नदीपलीकडे उत्तम ठिकाण पाहून पुलावर मारा चालेल अशा बेतानें तोफा उभ्या केल्या व त्यानें गावांत झाडावरून आणि घरांच्या आढ्यांवरून शिपायांनां चांगला दारूगोळा देऊन बसविलें व सर्वांनीं एकदम मारा करावा, असें ठरवून ठेविलें.

जनरल बोलूचे हे सर्व बेत नेपोलियननें अगदीं बरोबर ताडले व आपल्या सैन्याची एक तुकडी थोड्या पलीकडून हळूच उतरवून बोलूच्या आस्ट्रीयन सैन्याच्या एका बाजूवर धाडली. इतक्यांत जनरल बोलूकडून मारा सुरू झाला. गोळ्यांचा सारखा पाऊस पडत होता; पण तशा आगीच्या कहरांत नेपोलियननें स्वतः पुढें होऊन, बोलूच्या लोकांनां पुलाजवळ येऊन खालीं सुरंग लावतां येऊं नयेत अशा बेतानें, दोन तोफा उभ्या केल्या. बोलूचा मारा पलीकडून सारखा चालू होता. नदीच्या या आंगून फ्रेंचांनींहि दांडगा मारा सुरू केला. दारूच्या धुरानें दिशा अगदीं धुंद होऊन गेल्या आणि तोफांच्या धडाक्यानें थोड्या वेळांत पूल पडेल कीं काय अशीहि भीति वाटूं लागली. पुलाच्या अलीकडे तीन हजार निवडक शिपाई, इशारा होतांच त्यांनीं पुलावरून एकदम पलीकडे जावें, असें सांगून उभे केले होते. इतक्यांत पलीकडे आस्ट्रीयन सैन्याचे एका बाजूला थोडी हालचाल दिसूं लागली. त्यावरून आपण धाडलेली सैन्याची तुकडी पलीकडे जाऊन खास पोंचली, असें नेपोलियननें ताडलें व एकदम आपले लोकांस पूल ओलांडण्याचा हुकूम दिला; पण त्या लहानशा लांकडी पुलावर गोळ्यांचा इतका वर्षाव झाला होता कीं, तो काळाचा प्रत्यक्ष जबडाच वाटे. एकदां लोकांनीं जोराची चाल केली; पण शेंकडों शिपाई पटापट मरूं लागले. झाडांवर आणि घरांच्या आढ्यांवरून बसलेले शिपाई गोळ्या झाडूं लागले, तेव्हां चोहोंकडे आगीचा एकच कल्लोळ झाला. नेपोलियनचे लोक पळभर कच खाऊन मागें येऊं लागलेसें भासलें. एकदां कच खाल्यावर कोणाच्यानें हिंमत बांधवेल? पण यावेळीं क्षणाचाहि वेळ फुकट न दवडतां तापलेल्या तेलांत मोहरी फुटण्याच्या आवेशा—इतक्या वेळांत नेपोलियन हा लेन्स, बरथीए व मासीना

या सरदारांसुद्धां पुढें झाला व " शूर गड्यांनों, चला, आमच्या मागोमाग या, " असें शिपायांना ओरडून सांगून तो पुलावरून चालत जाऊं लागला. आपण डोळ्यांनीं पहातों हें स्वप्न आहे कीं खरेंच आहे, हे लोक या गोळ्यांच्या वर्षावांतून खरोखरच पुढें येत आहेत किंवा हा नुसता भास आहे, याचा विचार करण्यालाहि आस्ट्रीयन गोलंदाजांना वेळ मिळाला नाहीं; इतक्यांत लोक पुलाच्या पार झाले. प्रथम लेन्सचा पाय पलीकडल्या जमिनीला लागला. नंतर पाठोपाठ नेपोलियन उतरला व लागलेच मागून सैन्य उतरलें. त्यानीं आस्ट्रीयन गोलंदाजांना तोफांच्याजवळ उभ्या जागीं ठार केलें. हें अचाट व घोर कृत्य पाहून आस्ट्रीयन सैन्यांत एकच गोंधळ उडून गेला धैर्य, वीरश्री व शेवटीं यश हीं सर्व त्या सैन्याला सोडून दूर निघून गेली आणि फ्रेंचांनीं तें ठिकाण सर केलें. आधीं एक तुकडी पलीकडे धाडली होतीच. तिनें कोठें निसटून जाण्याचा एखादा मार्ग होता, तोहि रोखून धरला व फ्रेंचांनीं हजारों आस्ट्रीयन शिपायांना धारातीर्थीं कंठस्नान घातलें.

कदाचित् ही आडा नदी दुसऱ्या ठिकाणावर ओलांडतां आली असती व आणखीं एखाद्या ठिकाणीं आस्ट्रीयन सैन्याचा नाशहि करतां आला असता. कदाचित् गोलंदाज उभे कापून तोफाहि अन्य ठिकाणीं घेतां आल्या असत्या; पण हा लोदीचा पूल अशा असुरी धाडसानें ओलांडून जें साधलें, तें मात्र दुसरें कशानेंहि झालें नसतें. या अलौकिक हिंमतीच्या कृत्यानें आस्ट्रीयन शिपायांच्या मनांत अशी धडकी भरली कीं, त्यांच्या रक्ताचें जागचे जागींच पाणी झालें. सर्व यूरोपचे डोळे दिपून गेले. नेपोलियनचें नांव दिगंत पसरलें. मी मी म्हणणाऱ्या वृद्ध सरदारांचा रेच उतरला. शत्रूला नेपोलियन हा काळपुरूष भासूं लागला. सभोंवतालच्या प्रांतांतले राजे व लोक नरम पडले. ही सर्व हकीकत फ्रान्सांत कळली, तेव्हां तेथें तर नेपोलियन हा अद्वितीय बुद्धीचा सरदार आहे आणि अलोट हिंमतीचा शिपाई आहे, असें सर्वांना वाटून जो तो नेपोलियनचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागला.

या लोदीच्या पुलावरील अतुल पराक्रमानें व आपल्या या नव्या सरदाराच्या डाव पेंचानें फ्रेंच शिपाई इतके मोहून गेले कीं, त्यानां नेपोलियन हा प्रती परमेश्वर भासूं लागला. स्वतः मागें न राहतां अत्यंत धोक्याच्या जागीं, गोळ्याच्या ऐन वर्षावांत हा बेगुमानपणें आपणाजवळ आपणाला धीर देत उभा राहतो, हें पाहून तर ते त्याला आपल्या देहाचा कलीजा मानूं लागले. या लढाईचे दुसरे दिवशीं सैन्यांतले म्हातारे म्हातारे शिपाई जमून नेपोलियनकडे आले व त्याला म्हणाले कीं, " या फ्रेंच सैन्यांतील शिपायांनीं तुम्हांस आपला हवालदार नेमलें आहे." त्या वृद्ध आणि शूर शिपायांचे हे शब्द ऐकून नेपोलियनला थोडें हसूं आलें व कौतुक वाटलें. या आपल्या साध्या शिपायांनीं, आपण होऊन दिलेल्या या पदवीची किंमत नीट जाणण्या इतका तो खास धूर्त होता. याच फ्रेंच शिपायांची आणि सरदारांची पुढें आजन्म जी अलौकिक निष्ठा त्याचे ठिकाणीं दिसून आली, तिचा अंकूर याच मोहिमेंत प्रथम फुटला गेला. ज्याची कर्तबगारी वाचून शंभर वर्षांनंतर आपण इतकें मोहून जातों, त्याचीं तीं कृत्यें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहणाऱ्या आणि स्वता अनुभवणाऱ्या शिपायांनां त्याचेंबद्दलचें वेड लागावें, यांत काय नवल ! याच शिपायांपैकीं, शूर व धिप्पाड असे शिपाई निवडून नेपालियननें आपलें हुजूर पथक बनविलें. हे जुनें गारदी 'Old guards' या नांवानें सगळ्या युरोपभर प्रसिद्धीस आले.

नेपोलियनची ही चढती कमान पाहून डायरेक्टरांच्या मनांत त्याच्याविषयीं मत्सर व संशय येऊं लागला. आपण येथून आंखून धाडल्याप्रमाणें न चालतां हा तिकडे वाटेल तशी लढाई करतो व सारडीनियासारख्या प्रांताच्या राजाशीं तहाची वाटाघाट आपल्याच मनाप्रमाणें चालवितो, याचें त्यांना वैषम्य वाटूं लागलें. याला थोडा आळा बसावा, म्हणून या वेळीं डायरेक्टरांनीं केलरमन नांवाचा दुसरा एक सरदार नेपोलियनच्या मदतीस पाठविण्याचें योजलें व फ्रान्सतर्फे तहाची वाटाघाट करण्याला व इतर अनेक तऱ्हेचीं राजकारणें बोलण्याला नेपोलियनबरोबर असलेला सालिसिटी यास आपला हस्तक म्हणून नेमून देण्याचें ठरविलें. डायरेक्टरांचा हा पेंच लक्षांत आणून नेपोलियननें त्यांस स्पष्ट कळविलें कीं, 'ही लढाई आहे; ही एका-

त्याच तंत्रानें चालली पाहिजे. यांत ढवळाढवळ उपयोगीं नाहीं. केलरमन हा हुशार व सर्वथैव योग्य सरदार आहे, हें मला ठाऊक आहे; पण लढाईचीं सूत्रें चालविण्याला दोन हुशार सरदार असण्यापेक्षां एक वाईट सरदार असलेला चांगला. याबरोबरच हळूच दुरून त्यानें असेंहि सुचविलें कीं, असें होईल तर आपण आपल्या सरदारकीचा राजीनामा पाठवून देऊं. पहिल्यापेक्षां दुसऱ्या प्रमेयाचा परिणाम जास्त झाला व केलरमनला पाठविण्याचा बेत तसाच राहिला; पण येवढ्यानें पारीसमध्यें वारा कोणत्या दिशेनें वाहतो आहे, याची नेपोलियनला चांगली कल्पना आली.

लोदी येथें पराभव पावलेलें आस्ट्रीयन सैन्य मागें पळत चाललें होतें, त्याला सावरासावर करण्याला फुरसद न देतां नेपोलियननें त्याचा एकदम पाठलाग केला. लवकरच पेन्हीयापर्यंतचीं अनेक शहरें फ्रेंचांच्या ताब्यांत आलीं व शेवटीं तें मीलन शहर घेण्याला त्या शहराकडे गेले; पण भेदरलेल्या आस्ट्रीयन सैन्यानें मीलन शहर आधींच खालीं करून ठेवलें होतें. मीलन शहरांत नेपोलियननें मोठ्या थाटानें नगर प्रवेश केला. या सभारंभाचे वेळीं गांवांतल्या बडे लोकांनीं आपल्या शहरच्या वेशीच्या किल्या नेपोलियन यास नजर केल्या. तेथील सरकारी इमारती आस्ट्रीयनांनीं रिकाम्या केल्या होत्या व शहराचा ड्युकहि पळून गेला होता. त्याचे घरावर कोणी थट्टेखोर गांवकऱ्यांनीं पुढीलप्रमाणें पाटी लाविली

**A HOUSE TO RENT.**

INQUIRE FOR THE KEYS

AT

Citizen Solicittis :- The French Commisioner.

" घर भाड्यानें देणें आहे, किल्या सिटिझन सालिसिटी, फ्रेंच कमीशनर यांजकडे मिळतील." या लहानशा गोष्टीवरून मीलनच्या लोकांची आपल्या जुन्या राज्यकर्त्यांविषयीं कशी बुद्धि होती, हें सहज लक्षांत येईल.

मीलन शहरांत नेपोलियन अवघा सहा दिवस होता; पण तितके दिवसांत इतरांना सहा वर्षांत होणार नाहीं, इतके व्यवसाय त्यानें केले. तेथें त्या लोकांनां योग्य अशी नवी राज्यव्यवस्था निर्माण करून दिली. फ्रेंचांच्या देखरेखीखालीं मीलनमध्यें सर्व कारभार सुरळीत चालतील, असे नियम ठरवून दिले. अनेक बाबींच्या शिस्तीहि बांधून दिल्या. न्यायाचे कायदे केले व जेणेंकरून गरीब रयतेची सुधारणा होईल, अशा अनेक नव्या गोष्टी सुरू केल्या. येथून त्यानें सुमारें दहा कोट रुपये पारीसमध्यें पाठवून दिले. एवढी मोठी खंडणीची रक्कम डायरेक्टरांकडे यापूर्वी कधींच कोणीं पाठविली नव्हती. या शिवाय त्या शहरांतून अनेक महत्त्वाचे हस्तलेख, नामांकित ग्रंथ, उत्तम शिल्पकारांनीं घडलेले पुतळे व अत्यंत सुंदर चित्रें, खंडणी म्हणून नेपोलियननें घेण्याचें ठरविलें. या वस्तू न नेण्याची त्याला आग्रहाची विनंति तेथील लोकांनीं केली होती व त्यांपैकीं फक्त एकाच चित्राबद्दल दहा लक्ष रुपये देण्याचें त्या लोकांनीं कबूल केलें होतें; पण त्याहि वेळीं नेपोलियननें तें साफ नाकारिलें. तो म्हणाला, " तुमचे जवळून घेतलेले पैसे कोठेंतरी सहज खर्चून जातील; पण हीं चित्रें पारीसमध्यें नेऊन ठेविलीं असतां त्या शहराला नवी शोभा येईल. हीं चित्रें समोर पाहून तेथें कोणाचे मनांत एखादे वेळीं तरी आपण तशीं चित्रें काढावीं असा विचार येईल. व तेथील कारागिरीला कायमचें उत्तेजन येईल." हें तर अगदीं खरें होतेंच; पण शिवाय हीं चित्रें व या फार नावांजलेल्या वस्तू म्हणजे नेपोलियनच्या विजयाच्या उत्तम जाहिरातीच होत्या. त्यांच्या नांवाखालीं त्यांचा लाभ पारीसला घडवून देणाराचें नांव कोरल्याशिवाय सर्वांना सहज दिसत होतें. मीलन येथून व इतर शहरांतून पारीसमधल्या अनेक लहानमोठ्या लोकांना त्यानें नवीन नवीन नजराणे पाठविले. डायरेक्टरांना–त्यांच्या गाडीला इतके दिवस साधेच घोडे होते, त्यांचेऐवजीं–दोनशें फार उमदे व देखणे घोडे नजर केले. विद्वानांना ग्रंथ नजर केले. शौकीन होते, त्यांना सुंदर चित्रें धाडलीं. पुराणवस्तु शोधकांना इतालीसारख्या फार प्राचीन कालापासूनच्या विद्याचारसंपन्न अशा देशांतून अनेक वस्तु सहज धाडतां आल्या. कोणाला कांहीं, कोणाला कांहीं,

असे पुष्कळ जिन्नस पारिसकडे रवाना झाले व त्या सर्वांचा पारीसच्या लोकांनीं फार संतोषानें स्वीकार केला. नेपोलियनचें जाळें हळूहळू पसरत चाललें. इतर ठिकाणीं फ्रेंच फौज होती, तिलाहि नेपोलियननें आपण होऊन लक्षावधी रुपये धाडले. वास्तविक पाहतां हे पैसे डायरेक्टरांमार्फतच जाणें रास्त होतें; पण निकड म्हणून नेपोलियननें इतक्या आदरानें परस्परच ते पाठविले. या करितां त्याला कोणी हरकत घेतली नाहीं. बाकी हरकत घेऊन कदाचित भागलेंहि नसतें. अडल्या गरजेला डरेक्टरांपेक्षां हा नेपोलियनच आपल्याला चटकन उपयोगीं पडतो, हें पाहून त्या फौजांतील शिपायांचे मनाचा ओढा नेपोलियनकडे सहाजीकच वळला.

मीलन शहर सोडून नेपोलियन जनरल बोलूचा पाठलाग करीत आणखी पुढे गेला. पेव्हीयापर्यंतचा सर्व मुलूख त्यानें थोडेच दिवसांत काबीज केला. पेव्हीया शहरहि हातांत आलें आणि लवकरच व्हेरोना शहरांत नेपोलियनचे शिपाई जाऊन पोंचले व त्यांनीं मांचुआ या फार बंदोबस्ताच्या ठिकाणाला वेढा दिला. याच सुमारास नेपल्सच्या राजानें तहाचें बोलणें लावलें. याच्याशीं तह केल्यानें याचें सैन्य बोलूच्या सैन्यांतून निघून आपणांस आयतेंच मिळेल, हें मनांत आणून नेपोलियननें नेपल्सच्या राजाशीं तह केला व त्याचें सैन्य आपल्या गोटांत मिळवून घेतलें. हें सर्व पाहून पोपनेंहि नेपोलियनकडे तहाचें बोलणें बोलण्याकरितां आपले वकील पाठविले. पोपशीं तह केव्हांहि करूं नये, त्याचा नाश करावा, असें डायरेक्टरांचें पहिल्यापासून आग्रहाचें सांगणें होतें; पण ती वेळ आणि तो प्रसंग जाणून नेपोलियननें त्या सर्व श्रेष्ठ धर्मगुरुशीं आपण होऊनच एक तात्पुरता तह जुळविला. अर्थात यामुळें त्या धर्माधिकाऱ्याचा लोभहि चांगला झाला व यापुढें पोपमहाराज नेपोलियनला ‘ आमचा श्रेष्ठ पुत्र ’ असें संबोधूं लागले.

नेपोलियनच्या सत्तेचा हा सर्वव्यापी प्रसार पाहून आस्ट्रीयाच्या राजधानींत मोठी गडबड उडून गेली. हा कोठपर्यंत पुढें जाणार ? आतां हा कोठें थांबणार ? हा प्रत्यक्ष व्हीएन्ना–आस्ट्रीयाची राजधानी–शहराच्या तटाजवळ येऊन आपल्या तहाच्या अटी सांगणार कीं काय ? असें तेथल्या

राजाला व मुत्सद्यांनां वाटूं लागलें. नेपोलियननें केवढें तरी मोठें सैन्य इतालींत गारद करून टाकलें होतें व पुढेंहि आस्ट्रीयाला जयाची आशा फारशी दिसत नव्हती. सेनापती जनरल बोलू याचेकडून खलिता गेला, त्यांत बोलूनें आस्ट्रीयन बादशहास स्पष्ट लिहून कळविलें होतें की, "मजजवळ आतां अवघें वीस हजार सैन्य उरलें आहे. नेपोलियन जवळ सैन्याची भरती साठ हजारांवर आहे. मी आतां माघार घेणार. आज, उद्यां, परवां, नेपोलियन जसा पुढें सरकेल, तसा मी मागें हटणार. त्यानें फारच पाठलाग केला, तर मी सैबीरियांत जाईन. आतां येथें निभाव लागणें कठीण आहे. मी तुम्हांस असें सांगतों कीं, तुम्हीं लवकर तह करा; उगीच अटींची वाटाघाट करण्यांत वेळ वायां घालवूं नका." जनरल बोलूच्या या लिहिण्यांतला पहिला भाग खोटा होता. कारण नेपोलियनजवळ साठ हजारांच्या निम्मे इतकेंहि सैन्य नव्हतें. हें असो; पण बाकी सगळा भाग अक्षरशः खरा होता.

ही स्थिति पाहून आस्ट्रियाचे राजे व मुत्सद्दी यांनीं पुन्हा यत्न केला व आपला दुसरा सेनापती वूर्मझर यास नेपोलियनवर पाठविलें. त्याच्या हाताखालीं सैन्याची कुलभरती ऐशीं हजार करून दिली. वूर्मझर वयानें बोलूपेक्षांहि वडील म्हणजे सत्तर वर्षांवर उमरीचा होता; परंतु त्याच्या अंगात तारुण्याची तरतरी अझून कायम होती. स्वभावांत करारीपणा विशेष होता. लष्करी नोकरींत सर्व हयात गेल्यामुळें प्रत्येक शिपायामागें आपल्या सरकारला किती खर्च येतो व एक शिपाई मरणें म्हणजे त्यांत सरकारचें किती नुकसान होतें, हें त्याच्या मनावर चांगलेंच बिंबलेलें होतें. यामुळें तो आंग राखून लढाई करी. होईल तितकें करून डावपेचानें शत्रू जेरीस आणावा, यांतच तो सरदाराची अक्कल विशेष समजे. यानें प्रथम मांचुआचा वेढा उठविण्यासाठीं पुष्कळ फौज त्या बाजूला रवाना केली व बाकी सैन्याचे दोन भाग करून नेपोलियनच्या दोन भागांवर एकदम स्वतः हल्ला करण्यास सुरवात केली. या प्रचंड सेनेनें नेपोलियनचीं कांहीं ठिकाणे झपाट्यानें घेतलीं व स्वतः वूर्मझर नेपोलियनच्या एकदम पाठीवर चाल करून आला. आतां यांतून निभावणें फ्रेंचांनां फार कठीण वाटूं लागलें. स्वतः नेपोलियन देखील बराच घोटाळ्यांत पडला. माघारा पाय

व्यावा, असें एकदम त्यालाहि वाटूं लागलें. शेवटीं हाताखालच्या सरदारांची एक बैठक करून त्यांचीहि सल्ला त्यानें घेतली. एका आजरो या सरदाराशिवाय इतरांनां आपण मागें परतावें असेंच वाटलें. ती बैठक चालू असतां नेपोलियन सारावेळ विचारांत गढून जाऊन खोलींत इकडून तिकडे खेपा घालीत असे. सर्वांनीं मागें परतण्याचीच सल्ला दिल्यावर आजरो हा तेथून तिरस्कारानें व रागावून उठून जाऊं लागला. थोडेच वेळांत नेपोलियननें आपल्या मनांत एक विचार कायम केला आणि मांचुआला वेढा घातला होता, त्या वेढ्याच्या तोफांच्या कान्यांत एकदम खिळे ठोकवून त्या तोफा तेथेंच खंदकांत पुरून टाकविल्या व रातोरात तें सर्व सैन्य तेथून हालवून एकदम लोनेटो येथील आस्ट्रियन सैन्यावर तो चालून गेला. यावेळीं सर्व जबाबदारी आपल्यावर घेऊन आजरोनेंहि उत्तम शिपाईगिरी केली व त्या सैन्याचा पुरा मोड केला. इकडे वूर्मझर हा मांचुआच्या वेढ्यांत गुंतलेल्या सैन्याला मदत करण्यासाठीं तिकडे गेला; पण तेथें कोणीहि ठिकाणावर नव्हता. वेढा उठवून लोनेटोला चाल केल्याची बातमी कळवणारा जासूद इकडे पोंचण्यापूर्वीच लोनेटो येथील आस्ट्रियन सैन्याचा मोड झाला होता. वूर्मझरनें आतां पंचवीस हजार सैन्य लोनेटोचे बाजूला पाठविलें; पण त्यानें मांचुआंत बसून एक दिवस फुकट घालविला. तितकें तें आधीं येतें, तर कदाचित् नेपोलियनची अवस्था कठीण होती; पण तें उशीरां आल्यामुळें याहि सैन्याची लोनेटोच्या मैदानावर पाहिल्याच ठिकाणीं पुन्हा दाणादाण उडवून दिली. या दुसऱ्या वेळीं तर आस्ट्रियनानां नेपोलियनच्या लोकांनीं मार असा दिला कीं, सैन्यांतले लोक भेदरून वाटहि विसरून गेले. ही वेळ पुन्हा मांचुआकडे वळण्यास उत्तम आहे, असें योजून नेपोलियननें आपले सरदार तिकडे रवाना केले व हजार पंधराशें सैन्य जवळ ठेवून तो लोनेटोच्या जवळच एका गांवीं राहिला. तेच दिवशीं चार हजार आस्ट्रियन सैन्य तेथें आलें व त्यानें ही उत्तम शिकार पाहून या फ्रेंच सैन्याकडे " तुम्हीं शरण या " असा निरोप देऊन आपला वकील पाठविला. आपले समोर स्वतः नेपोलियन आहे, ही त्या वकीलाला कल्पनाहि नव्हती. चार हजार ताज्या दमाचें सैन्य पुढें पाहून दोन दिवस

लढाई करून थकलेल्या त्या हजार पंधराशें लोकांना तेथून निसटण्याची काय आशा होती? पण त्या वेळच्या चालीप्रमाणें आलेल्या वकीलाला नेपोलियननें डोळे बांधून छावणींत आपलेसमोर आणविलें. तितक्यांत आपल्या सर्व लोकांनां चांगले पोषाख करून हातांत बंदुका व तरवारी घेऊन त्याच्या सभोंवतीं उभें केलें. वकीलाचे डोळे सोडतांच चौफेर गराडा घातलेले शेंकडो फ्रेंच लोक त्याच्या डोळ्यांनां दिसले. या वेळीं नेपोलियननें रागाचा मोठा आव आणून फार क्रूर मुद्रेनें त्या वकीलाकडे पाहून त्यास म्हटलें, " कोण हा तुमचा उमटपणा! फ्रेंच सरदारास त्याच्या सैन्याच्या छावणींत तुम्हीं खिजवूं पाहतां काय? जा. याक्षणीं परत जाऊन आपल्या सरदाराला सांगा कीं मी तुम्हांस आठ मिनीटांची फुरसूद देतों. तेवढ्यांत शस्त्रें खालीं ठेवून शरण या. तुम्हीं सर्व फ्रेंच सैन्याच्या हातांत सांपडले आहां. तुमचे बाजूनें एक आवाज निघाला, तर मी आतां तुमच्यापैकीं प्रत्येकाला ठार मारून टाकीन. एकहि जिवंत सोडणार नाहीं." हे धिटाईचे शब्द ऐकून व आपण कोणासमोर आहों हें पाहून तो वकील आधींच घाबरून गेला व आपल्या भोंवतालचा देखवा पाहून आपल्यासमोर फ्रेंचांच्या सैन्याची तुकडी नसून सर्व सैन्य आहे, असा त्या वकीलाचा पूर्ण समज झाला. त्यानें हा निरोप तसाच परत जाऊन आपले सरदारास कळविला. लगेच तो सरदार व त्याच्या हाताखालचे कांहीं कामगार शरण आल्याचे बोलणें बोलावयास लागले व ते सर्व चार हजार लोक शस्त्रें स्वाधीन करून शरण आले. थोडेच वेळांत त्यांची चूक त्यांच्या लक्षांत आली. पण आतां त्यांचीं शस्त्रें गेलीं होतीं व देहहि फ्रेंचांच्या स्वाधीन झाले होते. नेपोलियन म्हणे, " तुम्हीं स्वतः होऊन गरीब शेळ्या झालांत तर लांडगे येऊन तुम्हांला सहजच खातील." यावेळीं तरी नेपोलियननें शेळीकडून वाघ जिंकवला खरा. एकहि गोळी न झाडतां, बसल्या जागीं बसून चार हजार आस्ट्रियन त्यानें कैद केले. वूर्मझर हा मागोमाग आला. हा प्रकार कळल्यावर त्याचा फार संताप झाला; पण आतां उगाच हातपाय आपटून नसता त्रास घेण्यांत कोणता पुरुषार्थ होता? तसाच तेथून निघून त्यानें फ्रेंचांचा पाठलाग केला. दोन्ही सैन्यांची गांठ लोनेटो व कास्टिग्लीयान या

ठिकाणांच्या मध्यावर पडली. हें असें होईल हें नेपोलियननें ताडलेंच होतें व त्यानेंहि सावधगिरी ठेविली होती. येथें मोठी लढाई झाली. यांत आस्ट्रीयनांचा पुरा पुरा मोड झाला. अगदीं थोडक्यांत चुकलें, नाहींतर वूर्मझर कैदच झाला असता; पण तो निसटून टायरोलचे आंगाला पळून गेला. तिकडेहि फ्रेंचांनीं त्याचा पुन्हा पाठलाग केला; पण फार शिताफीनें व शौर्यानें तो फ्रेंचांचे मारे चुकवून परत आपल्या हाताखालच्या प्रचंड सैन्यापैकीं सोळा हजार लोकांनिशीं मांचुआच्या वळकट किल्याच्या आश्रयास जाऊन राहिला.


वूर्मझरच्या या झटापटींच्या व लढायांच्या दिवसांत नेपोलियनला सर्व तऱ्हेची अतिशय मेहनत पडली. गेल्या सहा दिवसांत आंगांतले नुसते कपडेहि त्यानें वदलले नाहींत. झोंप तर मुळींच मिळाली नाहीं म्हटलें तरी चालेल. कोठें तास अर्धा तास डुलकी लागली तेवढीच. खाण्याचेहि हाल असेच झाले. एकेवळीं क्षुधेनें व्याकुळ होऊन तो घोड्यावरून जात असतां एक शिपाई न्याहारी करतांनां त्याला आढळला. तेव्हां नेपोलियन तसाच घोड्यावरून उतरून त्याचेजवळ गेला व त्या शिपायाजवळची रूक्ष भाकर दोघांनीं मिळून खाल्ली. त्यावेळीं ती नेपोलियनला मिष्टान्नापेक्षांहि अधिक रुचकर लागली व वर घटाघटा पाणी पिऊन तो फार तृप्त झाला. हा शिपाई पुढें बादशाहि अमलाचे वेळीं हयात होता. एकदां बेलजममध्यें नेपोलियन सैन्याचे मुजरे घेत असतां हाच शिपाई पुढें आला व नीट अदबीनें मुजरा करून म्हणाला, “ महाराज, इतालीमध्यें एका डोंगराचे दरींत मी आपली भाकर खात असतां तुम्हीं भुकेनें व्याकुळ होऊन मजकडे आलां, त्यावेळीं माझ्यांतली भाकर मी तुह्मांस दिली व आपण दोघेहि एका ठिकाणीं बसून ती खाल्ली, हें तुम्हांस आठवत असेलच. आतां माझा बाप वयानें वृद्ध झाला आहे, काम करून अन्न मिळविण्याची ताकद त्याच्यांत राहिली नाहीं. म्हणून आतां तुम्हीं त्याच्या दाणापाण्याची सोय करून द्यावी, इतकेंच माझें मागणें आहे.” नेपोलियननें त्या आपल्या जुन्या शिपायास ताबडतोब ओळखिलें व लागलीच त्याच्या कुटुंबाची उत्तम व्यवस्था लावून दिली आणि त्या शिपायालाहि बढतीची जागा दिली.

मांचुआच्या किल्यांत वूर्मझर जाऊन राहिला असतां नेपोलियन पुन्हा कांहीं निकडीचे कामाकरितां मीलन येथें आला व कांहीं दिवस तेथें राहून त्यानें मांचुआच्या वेढ्याचें काम जोरानें चालविलें. त्यानें यावेळीं आपल्या शिपायांस चांगलीं इनामें दिलीं व एक जाहिरनामा काढला व "या तुमच्या शौर्याची कीर्ति सर्वभर पसरेल; आणि केव्हांहि तुमच्यापैकीं प्रत्येकाकडे कौतुकानें बोट दाखवून फ्रेंच लोक, हा इतालीच्या मोहिमें-तल्या सैन्यांतला शिपाई आहे" असें म्हणतील, असे त्यांत त्या शिपायांच्या मोठेपणाबद्दल उद्गार काढले.

वूर्मझरची ही दशा आस्ट्रीयांत सर्वभर पसरली. तेव्हां आतां आपला अगदीं आब जातो, असें पाहून तेथील राजानें पुन्हा आणखी पंचेचाळीस हजार नवें सैन्य उभें केलें व त्याचें आधिपत्य आलविंझी या नांवाच्या एका सरदारास दिलें. आलविंझी यानें नेपोलियनच्या समूळ नाशाचा विडा उचलला होता. त्याचे हाताखालीं आतां शक्य तेवढें उत्तम सैन्य व उत्तम सामान आस्ट्रीयाच्या राजानें दिलें होतें. आस्ट्रीयन सैन्याची ही पुन्हा नवी लाट आलेली पाहून नेपोलियननें पारीसमध्यें डायरेक्टरांकडे आणखी सैन्याची निकडीची मागणी केली. इतके दिवस ज्या प्रांतांतून जाई त्या प्रांतांत मिळतील ते शिपाई भरतीला ठेवून घेतच असे; पण आतां अशा खोगीर भरतीनें चालण्यासारखें नव्हतें. तेव्हां त्यानें डायरेक्ट-रांकडे लिहून पाठविलें कीं, मी तुमचेकडे वेळोवेळीं सैन्य मागत आलों; पण तुमच्याकडून तो पुरवठा झाला नाहीं. आतां आस्ट्रीयाचें पुन्हा नवें सैन्य रणांगणावर येत आहे. ज्यांनीं मेलीसिमो, लोदी, कास्टीग्लीयान वगैरे अनेक ठिकाणीं शिपाईगिरीची शर्थ करून दाखविली, त्यांपैकीं कैक हल्लीं दिवंगत झाले आहेत. शिवाय जूबर्ट, लेन्स, व्हीक्टर, मुरा, राम्पत, मीनार्ड व पीनन हे माझ्या हाताखालचे शूर सरदार व दुसरे कित्येक सैनिक जखमी होऊन दवाखान्यांत पडले आहेत. मी लिहिल्याप्रमाणें एकशें तिसरी पलटण म्हणजे पस्तीसशें शूर शिपाई मजकडे याचे पूर्वीं आले असते, तर या सर्व आस्ट्रीयनांना मीं तरवारीनें जबाब दिला असता; पण आतां आणखी

थोडे दिवस गेल्यावर मात्र तुमचेकडून पस्तीस हजार सैन्य आलें तरी त्याचाहि फारसा उपयोग होणार नाहीं.”

आलविंझीच्या हातांत सैन्याचें आधिपत्य आल्यावर त्यानें फार जोरानें कूच केलें. येतांच अनेक ठिकाणें काबीज केलीं व व्हाबोय आणि मासीना या नेपोलियनच्या दोन्हीं सरदारांचा पराभव करून त्यांना परत हटविलें. मासीनाला तर लढाई नीट सुरू झाली नाहीं, तोंच मागें हटावें लागलें. हें पाहून आलविंझीचे लोकांना जास्त जास्त बळ चढत चाललें व कांहीं वेळ असेंहि वाटलें कीं, आलविंझी हा आतां सगळीं ठाणीं परत घेऊन नेपोलियनला खास पळवून लावतो. नेपोलियननें जरी इतकी निकडीची मागणी केली होती, तरी अवघ्या बारा तुकड्या फ्रान्सकडून पाठविण्यांत आल्या. येथें दुर्दशा तर अशी; व देशांतूनहि आणखी सैन्य यावें तें येत नाहीं, हें पाहून नेपोलियनचे शिपाई आपआपसांत कुरकुर करूं लागले. ते आपल्या सरदारांना म्हणत, ‘ आमचे पुढें आस्ट्रीयाचा जुना सरदार बोल्यू हा लढण्यास आला, त्याचा आम्ही निकाल लावला. त्यावर आस्ट्रीयानें वूर्मझर यास फिरून पाठविलें. तो आला त्याच्याशींहि आम्हीं लढलों व त्याचाहि पराभव केला. आतां पुन्हा आणखीं सैन्य देऊन आस्ट्रीयानें आलविंझ यास आमचेवर धाडला. याला मारला, तरी पुन्हां आणखी कोणी नवा येईल. तेव्हां आतां येथें आम्हीं तग धरावी तरी कशी ? ’ हें अगदीं खरें होतें; पण त्याला नेपोलियनचा कांहीं इलाज चालण्यासारखा नव्हता. आतां परतलें तर हातचें यश जातें व लोक मेले ते फुकट गेले असें होतें. याकरितां आलविंझीला चांगलेंच तोंड देण्याच्या तयारीस नेपोलियन लागला. प्रथम तो व्हॅाबोयच्या हाताखालच्या जागा सोडून हटून परत आलेल्या शिपायांच्या छावणीमध्यें गेला व तेथें त्यानें त्या शत्रूच्या मारगिरीपुढें धीर सोडून पळालेल्या तुकडीच्या लोकांस आपले भोंवतीं जमविलें. आणि मग थोडी क्रोधाची मुद्रा करून तो त्यांस म्हणाला, “ शिपाई हो !! तुमचेकडे पाहून मला रंजीस वाटतें. तुमच्यांत हिंमत नाहीं, शिस्त नाहीं, काटकपणाहि नाहीं. कोणतीहि जागा नीट धरून तुम्हीं राहात नाहीं. आंगांत भीतीनें कापरें भरावें तसे तुम्हीं भेदरून



नेपोलियन.



जोसेफाई

गेलांत; मूठभर हिंमतदार लोक असतील, तर त्यांना सबंध सैन्य आडवून धरितां येईल अशीं ठाणींहि तुम्हीं सोडून पळालेत. एकोणतीसाव्या व पंचाऐशींव्या पलटणींचे लोकहो ! तुम्हीं खरे फ्रेंच शिपाईच नव्हत. जमादार, यापुढें हे 'इतालीच्या मोहिमेच्या सैन्यांतले शिपाई नव्हत,' असें या पलटणींच्या निशाणावर लिहून ठेवा." ज्यांच्या कानांना नेहमीं उत्साहकारक असे अमृताचे शब्द ऐकण्याची संवय, त्यांना हे शब्द जणों तापलेल्या तेलाप्रमाणें वाटले व हें आपल्या सरदाराचें भाषण ऐकून आकाशीची वीज कडाडून पडावी, असें त्या बाणेदार शिपायांस होऊन गेलें. त्यांतलें कांहींतर हें ऐकतांच पोरांप्रमाणें स्फुंदस्फुंदून रडूं लागले. नेपोलियन दूर जाईतों त्यांचे हुंदके त्यांना आवरतना. थोड्याच वेळानें हे लोक नेपोलियनकडे येऊन गयांवयां करूं लागलें व "आम्हांला आणखीं एकदां वाटेल त्या कामगिरीवर पाठवा, म्हणजे आम्ही तरवार गाजवून दाखवूं व आम्हीं खरे फ्रेंच शिपाई आहों याची तुम्हांस साक्ष पटवून देऊं." असें ते केविलवाणे होऊन बोलूं लागले. ही त्यांची विनंति ऐकून नेपोलियननें आपली मुद्रा बदलली व त्यांचेकडें त्यानें जरा समाधानानें पाहिलें. यापुढें इतालीच्या संबंध मोहिमेंत या पलटणीसारखी कामगिरी दुसऱ्या कोणत्याहि पलटणीनें बजावली नाहीं.

नेपोलियननें आलविंझीशीं फार युक्तीनें लढाई चालविली. आपले डाव साधण्यासाठीं आणखीहि एक दोन ठिकाणीं पराभव घेऊन आलविंझीशीं त्यानें अरकोला या गांवीं गांठ घातली. हें ठिकाण लढाईला फार गैरसोईचें होतें. कारण येथें सर्वभर दलदलीची जमीन असून ती फार लोणाळ होती. या ठिकाणाला पोंचण्यास तीनचारच पुलवजा अरुंद वाटा होत्या. बाकी ठिकाणीं जमीन इतकी मऊ होती कीं वाट सोडून जरा पलीकडे एखादा स्वार गेला, तर घोड्यानिशीं खालींच रुतावा. या ठिकाणीं नेपोलियननें मोठ्या कुशलतेनें लढाईची योजना केली व जी इतरांनां अडचण तीच यानें आपणास साह्याची बाजू करून घेतली. सैन्य असें मांडलें कीं, आलविंझीचें सैन्य कितीहि मोठें असलें, तरी जागेच्या मऊपणामुळें सैन्याची अघाडीच तेवढी पुढें येऊन लढण्यास उपयोगीं पडावी.

इतर ठिकाण असतें, तर आलविंझीनें येवढ्या मोठ्या सैन्यानिशीं फ्रेंच सैन्यास सहज गराडा घालून टाकला असता; पण येथें गराड्याची गोष्ट देखील काढण्याची सोय राहिली नाहीं. चिंचोळ्या आणि अरुंद अशा ल्हानशा जागेवरच लढाईचा मार पडला. तेथें असलेल्या त्या पुलासारख्या तिन्ही रस्त्यांवर नेपोलियननें एकदम चढाई केली. कांहीं वेळ नेपोलियनच्या लोकांचा पाय ठिकाणाला धरेना; पण अखेर लोदीप्रमाणें येथेंहि फार निकराचे यत्न करून शिपाई एकदम पुढें घुसले. यावेळीं हातांत निशाण घेऊन नेपोलियन स्वतः एकटाच प्रथम पुढें झाला. नंतर त्यचे मागोमाग शिपाईहि घुसले. अर्ध्या वाटेवर जातो तों समोरून फार जोराचा नवा हल्ला शत्रूच्या शिपायांनीं केला. नेपोलियनाच्यानें टिकाव धरून पुढें जाववेना व तो घेरला जाऊन अडचणींत सांपडला; पण यातूनहि त्याच्या शूर शिपायांनीं त्याला संभाळून काढून मागें सैन्यांत आणलें. यावेळीं प्रत्येक क्षण महत्वाचा होता. विजयाचा ताजवा इतका तंतोतंत झाला होता कीं, एखाद्या क्षुल्लक गोष्टीनें तो कोणीकडे झुकेल हें कळण्यासारखें नव्हतें. नेपोलियन लगेच पुनः घोड्यावर बसून एकदम अघाडीला जाऊं लागला. थोडी वाट गेल्यावर घोडा एकदम अनावार झाला व वरील स्वारासुद्धां शेजारचे चिखलांत पडून मानेइतका रुतला. मोठ्या कष्टानें व हिंमतीनें नेपोलियन सांवरून वर आला व पुन्हा आपल्या सैन्याला धीर देत उभा राहिला. समोर कोणी फर्डा गोलंदाज हें पहात होता. त्यानें गोळा नीट नेपोलियनच्या आंगावर टाकला. समोरून गोळा येतो तो आपल्या सरदाराचे आंगावर पडणार, हें पाहून जवळच म्यूरान नांवाचा मर्द माणूस हिंमतीचा पुरा असा उभा होता. तो नेपोलियनच्या पुढें झाला व गोळ्याचा मार त्यानें आपल्या आंगावर घेतला. म्यूरानच्या शरीराच्या चिंधड्या होऊन आंतलें रक्त उसळलें व त्याचा लाल शिडकाव नेपोलियनच्या सर्वांगावर झाला. हें अवसान पाहून प्रत्येकाला मोठी ईर्षा चढली व सर्वांनीं निकर केला. फ्रेंच विजयी झाले. आस्ट्रीयनांचा मोड झाला. बारा हजार आस्ट्रीयन शरीरें मरून पडलीं, सहा हजार आस्ट्रीयन फ्रेंचांनीं कैद केले. तोफा, निशाणें व इतर अनेक सामान फ्रेंचांच्या हातीं

लागलें. नेपोलियननें म्यूरानच्या बायकोला तें झालेलें वृत्त कळवून फार कळवळ्याचें पत्र लिहिलें व यापुढें त्या कुटुंबाचें सर्व नीट चालण्याची जबाबदारी आपलेवर घेतली. पुढें सेंट हेलिनाला इंग्रज सरकार त्याला बादशहा म्हणेना व म्हणूं देईना, तेव्हां स्वतःचा जीव देऊन ज्यानें माझा जीव वांचविला, त्या म्यूरानचें नाहीं तर माझा मित्र ड्यूराक याचें नांव धारण करतों असें त्यानें सुचविलें होतें. केव्हांहि गोष्ट निघाली तरी अरकोला येथें मी-सगळ्या आयुष्यांत-फार कठीण प्रसंगांत सांपडलों होतों, असें तो म्हणे व म्यूरानची हकीकत फार कौतुकानें सांगे.

यावेळीं आलविंझीच्या अर्धा लाख सैन्याशीं नेपोलियननें तेरा हजार फौजेनिशीं लढून आस्ट्रियन सेनेचा पुरा मोड केला. आलविंझीचा फार नाश झाला व आतां पुन्हां आणखीं सैन्य त्याच्याकडे पाठविल्याशिवाय त्याचा निभाव लागणार नाहीं, असें पाहून आस्ट्रियांतून त्याच्याकडे पुन्हां आणखीं नवें सैन्य रवाना झालें. पूर्वी इतके वेळां आलेल्या सैन्याची जी वाट झाली, तीच वाट या नव्या सैन्याची झाली. अजूनपर्यंत वूर्मझर हा मांचुआच्या किल्यांत तसाच खिचपत पडला होता. त्याचेजवळची सामुग्री तुटल्यालाहि घरेच दिवस झाले होते. इतर सर्व अन्न संपल्यानंतर अखेर घोडे मारून त्यांचें मांस खाण्यास सुरवात केली व त्यावर हल्लीं वूर्मझरच्या सैन्याचे दिवस फार कष्टानें निघत होते. आलविंझीकडे पुन्हां नवें सैन्य धाडलें, तेव्हां ही बातमी कळवून त्याला धीर येण्यासाठीं आस्ट्रियाच्या राजानें एक विश्वासू जासुद गुप्त रीतीनें वूर्मझरकडे पाठविला. याचा सुगावा लागून हा जासूद धरला गेला. याला धरून नेपोलियनकडे आणल्यावर त्यानें आपले बरोबर एक चिट्टी वूर्मझरला देण्यासाठीं दिली असल्याचें कबूल केलें. चिठ्ठीची बारीक गुंडाळी करून मेण लावून त्याची गोळी केली होती. त्याला पकडतांच ही गोळी त्या शिपायानें पोटांत गिळली होती. तेथून ती बाहेर पाडवून तींतली चिठ्ठी उलगडून पाहिली, तों तींत वूर्मझरला एक कारस्थान कळविलें होतें व चिठ्ठीवर खुद्द आस्ट्रीयाच्या राजाची स्वदस्तूरची सही होती. या चिठ्ठीची अशी उघडीक झाल्यामुळें तें कारस्थान नेपोलियनला कळलें व तोहि बेत फसला. एक दोन वेळां फार

युक्तीनें व लष्करी धोरणानें त्या वृद्ध वूर्मझरनें किल्यांतून बाहेर पडण्याचा यत्न केला; पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. अखेर त्या शूर लढवय्यानें आपला एक जासूद शरण येण्यासंबंधीं बोलणें लावून कौल मागण्याकरितां मांचुआच्या वेढयावरील फ्रेंच अधिकारी सेरूरीर याजकडे पाठविला. वूर्मझरचा जासूद त्यानें लिहून दिलेल्या अटींचा कागद घेऊन सेरूरीरकडे तंबूमध्यें आला, तेव्हां तेथेंच एका कोपऱ्यांत नेपोलियन कांहीं लिहीत बसला होता. तो पुढें येऊन त्यानें तो अटींचा कागद घेऊन वाचला व स्वतः तेथच्या तेथेंच त्या कागदाच्या बाजूवर आपल्या हातानें नव्या अटी लिहिल्या आणि तोच कागद जासुदाजवळ परत देऊन म्हटलें, "वूर्मझरला सांगा—या माझ्या अटी आहेत. तुम्हीं आज शरण या, उद्यां शरण या, किंवा वाटल्यास दोन महिन्यांनीं शरण या. या अटींवर मी तुम्हास मुक्त करीन." जासुदानें तो कागद नेऊन वूर्मझरला दाखविला. तेव्हां त्यांत नेपोलियननें लिहिलेल्या अटी आपण मागितलेल्या अटींपेक्षां फारचसौम्य व सवलतीच्या आहेत, हें पाहून त्या वृद्ध सरदाराला फारच आनंद व उपकार वाटले. त्यानें पुढें कांहीं दिवसांनीं पूज्यभावानें सद्गदित होऊन, नेपोलियनला एक आभारदर्शक पत्रहि लिहिलें. इतकेंच नव्हे, तर त्यांत त्याचे—नेपोलियनचे—विरुद्ध रचलेल्या एका कटाची माहिती वूर्मझरनें नेपोलियनला लिहून कळविली. पुढें शरण येऊन आपली तरवार स्वाधीन करण्याकरितां वूर्मझर ता. २ फेब्रुवारी रोजीं फ्रेंचांकडे आला, तेव्हां नेपोलियन तेथें न राहतां मुद्दाम दुसरीकडे निघून गेला. यांत एकतर तो मान त्यानें तो वेढा चालविणाऱ्या कामगाराला म्हणजे सेरूरीर यालाच घेऊं दिला व दुसरें असें केलें कीं, वूर्मझरसारख्या कुशल, एकनिष्ठ व वयस्क सरदाराला या कमीपणाच्या प्रसंगीं आपणाला पाहून ओशाळल्यासारखें होइल तें न व्हावें. नेपोलियनच्या मनाचा हा मोठेपणा व आपणांस होईल तितकें कमी दुखविण्याची त्याची ही आदरबुद्धि पाहून वूर्मझर फारच संतोष पावला. हे नेपोलियनचे उपकार तो आजन्म विसरला नाहीं. नेपोलियननें अशा फार सवलतीच्या दिलेल्या अटी डायरेक्टरांस कळल्यावर व ही वूर्मझरची अशी अट राखलेली समजल्यावर त्यांनीं नेपोलियनला त्याच्या या कर्णीबद्दल फार

धपका दिला; पण त्यावर नेपोलियननें त्यांस लिहून पाठविलें कीं "वूर्मझर-सारख्या शिपाई गड्याला व शूर शत्रूला साजतील आणि फ्रेंच राष्ट्राच्या थोरपणाला शोभतील, अशाच ज्या अटी मला योग्य वाटल्या, त्या मीं घातल्या आहेत. यांत वावगें असें मीं कांहीं केलें नाहीं."

वूर्मझर शरण येऊन मांचुआचा किल्ला स्वाधीन करण्यापूर्वींच आलविंझीचाहि हिशेब जवळ जवळ चुकताच झाला होता. आलविंझीशीं मोठी व मुख्यलढाई तारीख १४ जानेवारी १७९७ रोजीं रीव्होली येथें झाली. व लागलीच तारीख २ फेब्रुआरी रोजीं वूर्मझर शरण येऊन त्यानें मांचुआचा किल्ला स्वाधीन केला. रीव्होलीची लढाई देखील फार मोठी झाली. त्या दिवशीं युद्धाचे गर्दीत नेपोलियनच्या मांडीखालचे तीन घोडे पाठोपाठ गोळ्या लागून मरून पडले; पण सुदैवानें तिन्ही वेळीं बिलकूल इजा न पोंचतां नेपोलियन वांचतच गेला. रीव्होली येथें आलविंझीचा व त्याच्या सैन्याचा पराभव झालाच होता; पण दुसरे दिवशीं सेंट जार्जचे लढाईंत आणखीहि झाला. कांहीं शेष बाकी होती, ती तिसरे दिवशीं फेव्हरीटचे लढाईंत पुरी होऊन सरदार आलविंझीचें सैन्य अगदींच नाश पावलें. म्हणजे आस्ट्रीयानें या वेळीं धाडलेल्या एवढ्या मोठ्या अर्धालाख सैन्याचा निकाल ता. १४, १५ व १६ जानेवारी १७९७ या तीनच दिवसांत नेपोलियननें लावून टाकला व तें सैन्य होतें कीं नव्हतें, याचा ठावहि उरूं दिला नाहीं.

या एकंदर मोहिमेंत नेपोलियनशीं सामना करण्याला बुलो, वुर्मझर, आलविंझी यांच्यासारखे योद्धे पुढें आले, हा एक योगायोग होय. हे तिन्ही सरदार फार अनुभवी,शूर व वयस्क होते; पण नेपोलियनशीं टक्कर देण्याला ते अयोग्य होते. यांचेबद्दल नेपोलियननें म्हटलें आहे कीं, "हे तिघेहि केवळ मेषपात्र होते. आपल्या हाताखालच्या शूर शिपायांचा नीट उपयोग करून घेण्याची योग्यता त्यांच्यांत मुळींच नव्हती. इतालींतील प्रांतांची आणि वाटांची लवमात्र माहिती बुलोला नव्हती. वुर्मझर हा तर कानानें बहिरा होता आणि अगदीं अयदी होता. आलविंझीचें तर नांवच नको. तो अगदीं चढ होता. त्यांनीं मजजवळून लांच खाल्ला होता, असा त्यांच्या राजांचा त्यांच्यावर आरोप आहे; पण हें साफ खोटें आहे. आतां त्यांच्या

हाताखालचे लोक मला आंतून अनुकूल झाले होते व त्यामुळें त्यांचे बेत मला केव्हां केव्हां आगाऊ कळत, हें खरें आहे." याशिवाय दुसरी गोष्ट अशी कीं, हें सर्व योद्धे जुन्या युद्ध पद्धतींत रूळलेले होते व ती जन्माची आंगवळणीं पडलेली पद्धत टाकून देऊन आतां सामनेवाल्याची नवी पद्धत आपण उचलावी, किंवा आपल्या डावपेचांत कांहीं बदल करावी, इतकी तरतरी आणि इतका लवचीकपणा त्यांच्या मेंदूत उतरला नव्हता. यापेक्षांहि दुसरें एक कारण असें होतें कीं, त्यांना आपल्या राजांकडून आणि दरबारच्या मन्त्र्यांकडून हुकूम येत, त्या धोरणानें लढाई चालवावी लागे. त्यांच्या हाताखालचीं सैन्यें फार खर्च करून उभीं केलेलीं होतीं. यामुळें फार सैन्य मारलें गेलें आणि शेवटीं यश न आलें, तर आपल्यावर ठपका येईल आणि देशांत आपली नाचक्की होईल, हें त्यांच्या मनांत नित्य येई. यामुळें लागतील तितके शिपाई एकदम खर्चीं घालण्यास त्यांचें मन कचरे व साधेल तोंपर्यंत प्रत्यक्ष लढाई आणि कत्तल टाळून, डांवपेचानें व हुलकावणीनेंच कार्य साधून घेण्याचा ते यत्न करीत. नेपोलियनची स्थिति याचे अगदीं उलट होती. आपल्या वरिष्ठांचे हुकुम तो अनेक वेळा गुंडाळून ठेवी. आणि सैन्याची दरकार तो बाळगीत नसे. त्याचें सैन्य उभें करण्याला खर्च फारच थोडा आला होता व त्यांचे रोजमुरे तो बाहेरच मिळवी. रोजचे शेंकडो शिपाई तो खुशाल खर्चीं घाली. महिन्याकाठीं पांच हजार शिपायांचा तनखा त्याला फ्रान्सकडून चालू होता. राब्सपीयरच्या अत्यंत क्रूर व निर्दयी अमलांत जितके लोक एकंदर ठार झाले, त्यांच्यापेक्षां जास्त लोक नेपोलियननें आपल्या अनेक मोहिमेंत खर्चीं घातले आहेत, हें नेपोलियनच्या शौर्याचे गोडवे गातांना अवश्य मनांत ठेकलें पाहिजे; पण इतके करून त्यानें स्वतःचे व फ्रान्सचे आणि परंपरेनें एकंदर दुनियेचे अपरिमित हीत साधलें हेंहि विसरतां कामा नये.

आस्ट्रीयन सरदार आलविंझी याची अशी वाट लावल्यानंतर नेपोलियन पोपकडे वळला. त्यावेळीं पोप पायसचें प्रस्थ फारच माजलेलें होतें. त्याच्या खाजगी सत्तेच्या स्वतंत्र मुलखाशिवाय खिस्ती लोकांवर त्याची एक प्रकारचीं विशेष सत्ता असे. पोपबरोबर पूर्वीं एक तात्पुरता तहहि झालेला होता

पण पोपनें त्या तहाच्या अटी पाळाव्या तशा न पाळल्यामुळें नेपोलियननें त्याच्यावर शस्त्र धरलें व ता. १ फेब्रुवारी १७९७ रोजीं पोप विरूद्ध युद्ध जाहीर केलें. थोडक्याच दिवसांत पोपचें सैन्य हटून जाऊन नेपोलियन आपल्या शहरावर हल्ला करील व असें झालें, तर आपल्या एकंदर वजनाला फार धक्का पोंचेल, असें पाहून पोपनें नेपोलियनशीं टालेंटिनो येथें तह केला. पोपशीं तह न करतां त्याचा मोड करून विध्वंस करावा, त्याचे राजधानींत कांहीं दिवसांपूर्वीं फ्रेंचाचा वकील भर दिवसां मारला गेला होता व त्याबद्दल पोपनें कोणालाहि शिक्षा दिली नाहीं, म्हणून त्याचें चांगलें उसनें घ्यावें, असें डायरेक्टराच्या मनांत फार होतें; पण नेपोलियननें यावेळीं पोपशीं तहच केला. धर्माचें वजन फार असतें, मनुष्याच्या मनावर धर्माची सत्ता अखंड राहते, म्हणून पोपचा नाश करून आपण सर्वांशीं शत्रुत्व पैदा करूं नये, असेंच त्याच्या चाणाक्ष बुद्धीला वाटलें. पोपचा नाश न करितां व एकंदर ख्रिस्ती जनतेला पूज्य असे पोपचें आदिपीठ न दुखवितां नेपोलियननें त्याच्याशीं तह केला, असें पाहून पुष्कळांनां संतोष वाटला. एक तऱ्हेचें समाधान तर सर्वांनांच वाटलें; पण पोपनेंहि या टालेंटिनोच्या तहाअन्वयें फ्रान्सला वीस लक्ष डालर दिले. शिवाय अत्यंत उंची अशीं शंभर चित्रें व फार प्राचीन आणि पूज्य अशा इतर अनेक वस्तूहि पोपनें फ्रान्सच्या स्वाधीन केल्या व तेव्हांपासून पोप नेपोलियनला आपला आवडता पुत्र असें मानूं लागला.

पोपशीं तहाच्या अटी ठरवतांना पोपनें कारडिनल आलबानी यास हद्दपार करावा व त्याचेशीं संबंध ठेवूं नये अशी एक अट नेपोलियननें घातली होती. कारण या आलबानीनें फ्रेंचांविरुद्ध अनेक कारस्थानें केलीं होतीं; पण पोपनें या आलबानीबद्दल फारच रदबदली केली व नेपोलियनच्या गयावया केल्या. अखेर पोपचा वकील आणि मुतालीक कार्डिनल मारी यानें नेपोलियचे पाय धरले व त्याच्या पुढें डोई घासून त्याच्या चरणावर लोळण घेतली, तेव्हां नेपोलियननें दयावंत होऊन आपला हट्ट सोडून दिला. पण त्याच तहांत पोपनें इंग्रजांनां आपल्या बंदरांत येऊं देऊं नये, असें कलम घातलें. सर्व युरोपचा धर्मशास्ता, ख्रिस्त्यांचा जगद्गुरू जो पोप त्याच्या

मुतालिकानें आपल्या पायावर डोकें ठेवावें, याचा परिणाम या अवघ्या पंचविसींतल्या तरुण योद्धाच्या मनावर काय झाला असेल! आपल्या मोठेपणाचा ताठा त्याला किती चढला असेल! सर्व जगाचें स्वामित्व आपण मिळवावें, असल्या महत्वांकांक्षेचा अंकूर त्याचे मनांत रुजण्यास ती जमीन खास तयार होत होती. याचवेळेस त्याला कारनो सारख्या सर्वमान्य शूर मुत्सद्यानें लिहिलें कीं, 'तुमचे कर्तबगारीवर फ्रान्सचा लौकिक अवलंबून आहे. तुम्ही फ्रान्सचे खरे सरदार शोभतां.'

नेपोलियनच्या बातम्या व्हिएन्ना शहरीं समजल्या, तेव्हां त्या राजधानींत फारच गडबड उडून गेली. आपली अतिशय कठीण दशा पाहून आणखी एकदां शेवटचा व निकराचा यत्न त्या फार जुनाट व मानी राजानें केला. यावेळीं सरदारकीचा अधिकार आर्च ड्यूक चार्लस या नांवाच्या हुशार व तरुण राजपुत्राकडे सोंपविला होता. पुर्वी मोरेयु सारख्या युद्धकलाभिज्ञ फ्रेंच सरदाराबरोबर त्यानें रणसंग्राम केले होते. फ्रेंचांचे डावपेंच व त्यांची लढाईची रीत यांची त्याला चांगली माहिती होती. आर्च ड्यूक चार्लस हा आल्यानंतर ता. १६ मार्च १७९७ पासून नेपोलियनच्या व त्याच्या झटापटींनां सुरवात झाली. प्रारंभीच टाग्लीमेंटो नदीच्या दोन्ही तीरांवर या दोन सेनापतींचें सैन्य उतरलें असतां, दोघांच्या सैन्यांत थोडीशी गोळागोळी झाली; पण लवकरच नेपोलियननें माघार घेतली. नेपोलियन सर्व दिवसभर चालून आल्यामुळें या वेळीं व या ठिकाणीं तो लढाई देणार नाहीं, असें आर्च ड्यूक चार्लस यानें ताडलें व उगाच दारूगोळा न नासतां व वृथा श्रमाच्या भानगडींत न पडतां तो स्वस्थ राहिला. सुमारें दोन तासांचा देखील पुरा वेळ गेला असेल नसेल तोंच नेपोलियनचें सर्व सैन्य एकदम घुसून आर्च ड्युक चार्लस याच्या सैन्यावर तुटून पडलें. यावेळीं त्याचें सैन्य विश्रांति घेत थोडें असावधच राहिलें होतें. त्यानां नीट लढाईला उभें राहाण्याचीहि सवड मिळाली नाहीं व त्यांचा नाश होतो असें दिसूं लागलें. तेव्हां त्या तरुण राजपुत्रानें पुष्कळच लगट केली व धैर्यानें पुन्हा पुन्हा हल्ल करून नेपोलियनला सैन्यासुद्धां नदीपार परतवून लावण्याचा यत्न केला; पण त्या बिचाऱ्याचें कांहींएक न चालतां सर्व यत्न

व्यर्थ जाऊन अखेर मागें पळणें त्याला भाग पडलें. आस्ट्रियन सैन्य पुढें व फ्रेंच सैन्य त्याचे मागें असा पळण्याचा प्रकार कांहीं दिवस चालला. कुत्र्यांनीं हरणांच्या कळपामागें लागावें व त्यांनां पळतांनां जीव थोडा व्हावा, अशी गत त्या आस्ट्रीयन सैन्याची झाली. नेपोलियन पाठीमागें लागून अखेर आपल्या राजधानीजवळ शंभर मैलांवर येऊन थडकला, हें पाहून व्हीएन्नाच्या राजवाड्यांत एकच गोंधळ उडाला. राजा व मुत्सद्दी शहरांतल्या प्रजेला एकसारखा धीर देत होते; पण राजवाड्यांतून राजानें आपला खजीना व जडजवाहीर काढून हंगेरींत नेल्याचें पाहून शहरच्या लोकांचा धीर टिकला नाही. राजा व राणी हीं दोघें आपल्या सहा वर्षांच्या लहान मेराया लुइसा नांवाच्या राजकन्येस बरोबर घेऊन राजवाडा सोडून निघालीं तेव्हां तर लोकांनीं आकांत मांडला. आतां ही लढाई पुरी करा, आतां, तह करा, असें लोक म्हणूं लागले. यामुळें आस्ट्रीयाच्या राजानें आर्च ड्युक चार्लस यास निरोप पाठविला कीं " यापुढें जास्त ओढून न धरितां तुम्हीं साधतील त्या अटींवर तह करावा. तहाची संधी आल्यास ती फुकट दवडूं नये "

आस्ट्रीयाची ही धांदल व ही दशा नेपोलियनच्या लक्षांत आलीच होती; पण तो पक्का धूर्त व कावेबाज मुत्सद्दी होता. त्यानें आपण होऊनच आर्च ड्युक चार्लसला एक मोठें गौरवाचें पत्र लिहिलें. त्यांत म्हटलें कीं, " शूर शिपाई जरी लढाई करितात, तरी मनापासून त्यांची खरी इच्छा तह करावा अशीच असते......आपल्यासारख्या फार थोर कुळांत जन्म पावलेल्या राजपुत्राच्या मनांत इतर सरदाराप्रमाणें किंवा प्रधानांप्रमाणें क्षुद्र विकार असूं शकणार नाहींत. आज इतके दिवस हा चाललेला रक्तपात आपण बंद करावा व मानवी जातीचीं दुःखें कमी करावींत, असेंच आपणांला वाटत नाहीं काय ?......फ्रेंच राष्ट्राविरुद्ध उचललेलें शस्त्र आतां सर्व यूरोपनें खालीं ठेवलें आहे. तुमचेंच एकटें राष्ट्र अजून लढत आहे. द्वेष, सूड या सर्व गोष्टींनांसुद्धां शेवट हा आहेच व आणखी कांहीं हजार लोक ठार केल्यावर याचाहि शेवट होऊन आपणां दोघांची एकदां समजूत होईलच, माझें स्वत:संबंधीं म्हणाल, तर मी आज हें तुम्हांस लिहित आहें

याच्यामुळें एकतरी मनुष्य वांचला, एकातरी मनुष्याचा यामुळें जीव कमी खर्ची पडला, तरी मी सार्थक मानीन व लढाईंतल्या यशाच्या असूरी वैभवापेक्षां यांतच जास्त थोरवी मानीन."

हें पत्र वाचून आर्च डयुक चार्लसचे मनाला काय वाटलें असेल तें त्याचें त्यालाच ठाऊक. पण त्यानें पत्र हातीं पडल्यापासून पुरी दीड घटका जाऊं दिली नाहीं, इतक्यांतच त्याचा जबाब पाठविला. पुढें आणखी थोडीशीं प्रश्नोत्तरें होऊन दोघांनीं एक तात्पुरता तह पुरा केला. तहाच्या या पहिल्या मसुद्यांत आस्ट्रीयन मुत्सद्यांनीं "आम्हीं फ्रेंच लोकसत्तात्मक राज्य मान्य करितों," असें कलम प्रारंभींच घातलें होतें. ही मान्यता स्पष्ट केल्यावर पुढील भाग सहजच सुलभ होईल असा त्यांचा अशय होता; पण तहाचा कागद वाचतांच नेपोलियननें सांगितलें, 'हें पहिलें कलम आधीं खोडून टाका. आम्हीं फ्रेंच लोकांचें लोकसत्तात्मक राज्य मान्य करितों, हें कोणी लिहून द्यावयास नको. सूर्याप्रमाणें तें आपल्या प्रकाशानें सर्वांना दिसतच आहे. कोणाहि डोळसाला तें कबूल करावेंच लागेल व शिवाय, आपल्या राष्ट्राला कोणत्या प्रकारची राज्यसत्ता असावी हें आमचें पहाणें आहे, उद्यां हें लोकसत्तात्मक राज्य मोडून आम्हीं दुसरी एखादी राज्यसत्ता चालू केली, तर तुम्हीं म्हणाल कीं त्या तहानें आम्हीं लोकसत्तात्मक राज्यच मान्य केलें होतें. तेव्हां तें उपयोगीं नाहीं.'

आस्ट्रीयाचा हा तात्पुरता तह लिओबेन येथें झाला. हा झाल्यावर थोडेच दिवसांत व्हेनीसच्या संस्थानाचा नेपोलियननें पुरा मोड केला व तें आपल्या पुरतें ताब्यांत आणून टाकलें. त्यांच्यापासूनहि नेपोलियननें जुनें हस्तलेख, सुंदर चित्रें, पुतळे व पुष्कळ पैसा अशी अपार खंडणी घेतली. या संस्थानचा बंदोबस्त चालू असतां आपला तह चांगल्या सवलतीच्या शर्तीवर व्हावा म्हणून तेथील अधिकाऱ्यांनीं त्याला फार मोठया रकमेचा लांचहि देऊं केला; पण या ओंगळ संपत्तीला तो शिवला देखील नाहीं. 'मला जें मिळवावयाचें तें मी फ्रान्सकडूनच मिळवीन. तुमच्या या सुवर्णाला मी आपलें मन विकणार नाहीं' असा रोख जबाब त्यानें त्या अधिकाऱ्यांस पाठविला. या वेळीं राजकारणांत एकंदर नीति अशा प्रकारची होती, असें

पैसे घेणें हें फारसें ओंगळ समजलें जात नसे; पण नेपोलियननें केव्हांहि अशा रीतीनें पैसा घेतल्याचें उदाहरण आढळत नाहीं.

याचा अर्थ बाहेर देशांत लढाईचे कामावर असतानां हातीं आलेला सर्व पैसा, तो पारिसमध्यें डैरेक्टरांकडे रवाना करी असा मुळींच नाहीं. त्याचे हातीं आलेल्या पैशापैकीं साधेल तितका भाग तो हाता वेगळा करून आपल्याच ताब्यांत ठेवी व त्याचा आपल्या पुढील मोहिमेकडे उपयोग करी. फ्रान्सच्या फायद्याच्या आड येऊन किंवा दुसऱ्या कोणाला वश होऊन तो पैसा कधींहि मिळवित नसे. त्याच्या हाताखालचे सरदार वेळोवेळीं दुसऱ्यावर जुलूम करून व अनितीनें अनेक वेळां आपल्या पिशव्या भरीत. हें त्याच्या केव्हां केव्हा लक्षांत येई; पण तें आपल्या लक्षांत आलें आहे, असें थोडेसें त्यानां दर्शवून तें तो तितक्यावरच विझवी. जास्त उघडीक करीत नसे. यामुळें हे सरदार त्याचे मिंधे होऊन एक तऱ्हेनें त्याचे बंदे बनत.

व्हेनीस संस्थानचा मोड केल्यानंतर नेपोलियन मांटीबेलो या सुंदर व रम्य ठिकाणीं राहूं लागला. आस्ट्रीयाशीं तात्पुरता तह झाला होता; पण कायमचा तह होणें राहिलें होतें. त्याबद्दलच्या वाटाघाटी होऊन मसुदा फ्रान्समधून डायरेक्टरांकडून मागविण्यांत बरेच दिवस लोटले. डायरेक्टरांकडून मसुदाहि आला; पण आस्ट्रीयाचे मुत्सद्दी अजून आपला कायमचा मसुदा तयार करून देत ना. त्यांनीं उगाच कांहींतरी सबबी काढून टंगळमंगळ चालविली होती. फ्रान्समध्यें पारीस शहरांत अव्यवस्था माजत चालली आहे व डायरेक्टरांचें आणि नेपोलियनचेंहि नीट सूत नाहीं, असें त्यानां दिसलें होतें व म्हणूनच ते दिवसगत लावीत होते. त्यानां वाटे कदाचित् डायरेक्टरांनीं नेपोलियनला परत बोलाविला, तर आपलें कार्य आयतेंच सहज साधेल. हें त्यांचें कृत्रिम लक्षांत येतांच एक दिवस नेपोलियननें आस्ट्रीयाच्या वकिलास आपल्या वाड्यांत बोलावून आणविलें व आम्हीं दिलेला शेवटचा मसुदा तुमचे आस्ट्रीयन राजास अजूनहि मान्य होत नाहीं काय? असें त्यास विचारिलें. त्यावर वकिलानें मानेच्या खुणेनें "नाहीं" असें दर्शवितांच एकदम मोठा आवेश आणून व लटकेंच तुफान करून तो वकिलास म्हणाला, "तुम्हीं आतां येथून जा. आतां आपला तह

संपला ! लढाईला सुरवात झाली ! पण हें पहा, मी आज पासून तीन महिन्यांचे आंत तुमच्या आस्ट्रीयाचे तुकडे तुकडे उडवून देऊन देश अगदीं छिन्नविछिन्न करून टाकीन ! " असें म्हणून त्यानें जवळ एक चिनी मातीचें सुंदर पात्र होतें, तें त्या वकीलापुढें जमिनीवर जोरानें धाडकन् आपटून त्याचे शेंकडों तुकडे केले व तो तसाच रागानें खोलीबाहेर निघून गेला.

वकील बिचारा गर्भगळित होऊन परत गेला. लवकरच नेपोलियननें दिलेला मसुदा आस्ट्रीयन मुत्सद्यांस मान्य होऊन त्यांनीं तह पुरा केला व त्यावर आपल्या राजातर्फे मान्यतेच्या सह्या घातल्या. हा तह ' कांपो-फोरमियाचा तह ' या नांवानें प्रसिद्ध आहे. हा ता. १४ माहे आक्टोबर रोजीं पुरा झाला.

मांटीवेलो हें ठिकाण फारच रम्य होतें. पाठीमागचे आंगाला आल्प्स पर्वताचीं उंच उंच अशीं हिमाच्छादित शिखरें होतीं व पुढें लांबार्डीचा अत्यंत सुपीक असा प्रदेश होता. समोरचीं हिरवीं गार शेतें पाहून तो एक हिरवा गालीचाच घातला आहे कीं काय असें वाटे. त्या ठिकाणीं ही बहुरत्ना वसुंधरा आपलीं उत्तमोत्तम फळें व फारच सुंदर पुष्पें घेऊन वनश्रीचा हिरवा बुट्टेदार शालू नेसून समोर उभी आहे, असा पाहणाराला भास होई. अशा या रम्य ठिकाणीं विजयश्रीच्या माळा गळ्यांत घालून नेपोलियन कांहीं दिवस विश्रांतीसाठीं येऊन राहिला. या ठिकाणीं नेपोलियनच्या सदरेंत बर्लीन, व्हीयेन्ना, मीलन, व्हेरोना वगैरे अनेक ठिकाणचे मुत्सद्दी येत. अती प्राचीन रोम शहरचे वकीलहि तेथें जमत. त्या वेळच्या यूरोपच्या राजकारस्थानाचें तें एक केंद्रच बनल्यासारखें झालें होतें. राजरोसपणें बोलणीं लावणारे दरबारी वकील, तसेंच पाठीमागच्या दारानें दरबार खर्च करून काम साधणारे खाजगी जासूद, लष्करी व मुलकी अंमलदार आणि लहान लहान सवलतीनें तृप्त होणारे मध्यस्त हे सर्व त्या ठिकाणीं नेहमीं जमत. या ठिकाणचा दरबारचा थाट एखाद्या बाद-शहासारखाच नेपोलिननें ठेविला होता. सत्तची आणि ऐश्वर्याच्या सुखाची चटक त्याच्या जिभेला येथें पुरी लागली व ही चटक वाढत गेली, तस-तसी लोकसत्तेच्या राजकारभारावरची त्याच्या मनाची प्रीती कमी होऊं

लागली. दिवसेंदिवस त्याच्या वर्तनांतली सलगी थोडी कमी झाली आणि अदब व दरबारी भाषण यांचा प्रभाव वाढत चालला.तेथें फक्त पुरुषच येत असें नाहीं, तर त्या प्रांतांतल्या थोर थोर स्त्रियाहि तेथें जमत असत. इतालींतलीं माणसें एंकदरीनेंच सुंदर; पण त्यांत देखील त्यांच्या स्त्रिया तर विशेषच सुंदर असत. नवयौवन संपन्न अशा मिलन शहरांतल्या तरुणी सुंदर फुलांचे गजरे व अशाच आणखी कांहीं लहानसहान भेटी घेऊन नेपोलियनकडे नेहमीं येत. आपली भेट त्या शूर योद्ध्यानें स्वीकारली व तो आपल्याला पाहून थोडेसें बोलला किंवा नुसता किंचित जरी हंसला, तरी त्या तरुणींना मोठी धन्यता वाटे. तेथें असतांना आपली बायको, आपली आई व इतर आपल्या कुटुंबांतलीं माणसेंहि हें ऐश्वर्य भोगण्यास नेपोलियननें तेथें नेलीं होतीं. अत्यंत गरीबीचे दिवस जाऊन हे सुखाचे आणि ऐश्वर्याचे दिवस आपल्या मुलाला आलेले पाहून नेपोलियची आई माडम मीर हिला आनंदाचें भरतें येई व ती अनन्यभावें परमेश्वराचे उपकार मानी. जोसेफाईनचें लग्न होऊन दोन दिवसांनीं नेपोलियन तिला सोडून इतालींत आला होता. पण यावेळीं हे नवे सोहळे भोगण्यास जोसेफाईनहि तेथें आल्यामुळें तिला आतां त्रिभुवन कोतें वाटूं लागलें होतें. नानातऱ्हेचे पोषाख, हिऱ्यामोत्यांचे उंची उंची दागीने व नाच बैठकींच्या मजलसी, यांत ती सर्वकाळ निमग्न असे. सारा वेळ नटावें, मुरडावें, भेटीच्या लालसेनें थोर थोर लोक येतील त्यांच्या मुलाखती घ्याव्या, त्यांनीं उघड किंवा खाजगी रीतीनें आणलेल्या भेटींचा स्वीकार करावा, कोणाची थोडी फार रदबदली करून छोटीं छोटीं कामें करून द्यावीं व आपल्या मनाची सर्व हौस तृप्त करून घ्यावी; अशा रीतीनें आपल्या नव्या नवऱ्याच्या अधिकारावर ती फुलपांखरांची राणी मजेनें कालक्रमणा करीत असे. तेथल्या लोकांनाहि नेपोलियनचा हा थाट व हें ऐश्वर्य पाहून एक प्रकारें समाधान वाटे. कारण तो त्यांच्याशीं आपल्या मूळच्या इतालियन भाषेंतच बोले व लहानसहान बाबींतहि वर्तन असें ठेवी कीं, त्यांना हा फ्रेंच मनुष्य नसून आपला इतालीकडचा कार्सिकनच आहे, असें नेहमीं भासे. त्यांनीं त्याला प्रेमानें 'इताळिकस' हें टोपण नांव

किंवा पदवी दिली होती. कांहीं दिवस येथें राहिल्यानंतर नेपोलियन परत स्वदेशांत निघून गेला.

या इतालीच्या मोहिमेतली पहिली लढाई ता. १२ एप्रील १७९६ रोजीं झाली. त्या दिवसांपासून या मोहिमेच्या शेवटल्या लढाईपर्यंत म्हणजे अवघ्या एक वर्षाच्या अवधींत नेपोलियननें तीस पसतीस लढाया जिंकल्या. यापैकीं अठरा लढाया तर फारच कचाकचीच्या झाल्या आणि या सर्वांत तो जातीनें हजर होता. यापैकीं मिलेसीमो, मातडोवी, लोदी, अर्कोला, कासिग्लिआत, रिव्होली, या लढाया तर इतक्या निकराच्या झाल्या कीं, त्यापैकीं कोणतीहि एक लढाई जिंकली असतां आपल्या कर्तृत्वाचा कळस झाला, असें कोणाहि योध्यास वाटलें असतें व त्याची कहाणी तो जन्मभर गात सुटता. तेव्हां अशा एका पाठोपाठ अठरा लढाया ज्यानें जिंकल्या, या लढायांतल्या डावपेंचानें आपलें युद्ध शास्त्राचे जुने ग्रंथ यापुढें निरुपयोगी म्हणून जाळून टाकले पाहिजेत असें ज्यानें त्या काळच्या लढवय्यांस वाटावयास लावलें व युद्धविद्येची नवी संस्था ज्यानें युरोपला घोकावयास दिली; त्याचेकडे सर्व युरोपचे आतां डोळे लागले. सर्व राजांना त्याच्या नांवाचा वचक बसला आणि त्याच्या शौर्याचे पवाडे सर्वभर ऐकू येऊं लागले यांत नवल तें काय ?

नेपोलियन स्वतः जातीनें युद्धाच्या गर्दींत हजर असल्यामुळें शिपायाचें आणि सरदारांचे पराक्रम याच्या प्रत्यक्ष नजरेस पडत व ते पाहून तो आपल्या कामाला योग्य अशा शूरांची निवड करी. तो स्वतः त्यांना उत्तेजन देई आणि आपल्या धन्याची नजर आपल्या कर्तबगारीवर लागून राहिलेली आहे व तो आपल्या पराक्रमाची कदर चांगली ठेवितो हें पाहून तेहि जिवाची पर्वा न करितां हिमतीनें लढत. आपल्या सैन्यांत बढतीच्या जागा देणें त्या नेपोलियन केवळ योग्यता पाहून देई. खाजगी कृत्यानें कोणी मर्जीचे बाहेर वागला व मर्जीतून उतरला तरी तें तो बढतीचे वेळीं मनांत आणित नसे आणि अयोग्य लोकांना केवळ वशिल्यामुळें तो महत्त्वाच्या जागा कधींहि देत नसे. पुढें पादशाहींत हा नियम इतक्या कडक

पणानें पाळला गेला नाहीं आणि नेपोलियनचा संकटकाळ जवळ ओढव-ण्याला हें एक कारण झालें.

लढाया जिंकून विजय संपादन करण्यापेक्षांहि आणखीं अनेक गोष्टी नेपोलियननें इतालीमध्यें केल्या. मांचुआ येथें जात असतां वाटेंत तो तथील ड्यूकच्या प्राचीन राजवाड्यांत उतरला होता. तेथें पोहोंचला त्याचे दुसरेच दिवशीं एका फ्रेंच जनरलच्या मृत्यूबद्दलच्या सभारंभाला तो सकाळीं गेला होता व तेच दिवशीं प्राचीन व नांमाकित कवि व्हर्जिल याच्या स्मरणार्थ एक स्तंभ उभारण्याची योजना करून त्या कृत्याकडे त्यानें सायंकाळ खर्च केली. म्हणजे त्यानें एकाच दिवशीं सकाळीं फ्रेंचांचा गौरव केला व सायंकाळीं इतालियनांचा गौरव केला. नेपोलियननें केलेला व्हर्जि-लचा सन्मान ऐकून इतालियन लोकांना फार आनंद व अभिमान वाटला. इताली प्रांतांतली जमीन त्यानें आपल्या तरवारीच्या जोरावर जिंकली; पण इतालीयन लोकांचीं मनें त्यानें आपल्या बुद्धीच्या शिताफीनें काबीज करून टाकलीं. इतालींतल्या लोकांना चिथवून त्यांचेकडून त्यानें राष्ट्रीय संघ स्थापन करवले. तेथली कैक पिढ्यांची जुनीं राज्यें मोडून टाकून, फोड-णारा भेटल्यास या जुलमी राजांची सिंहासनें दिसण्यांत कितीहि बळकट दिसलीं, तरी तीं फुटूं शकतात हें त्यानें त्यांच्या निदर्शनास आणून दिलें. पोपची सत्ता किती पोकळ आहे, हें त्यानें जाहीर केलें व लोकांच्या इच्छेपुढें ताठा भरलेल्या राजांनां लवणें भाग पडतें, हेंहि त्यानें त्यांस शिकविलें. जुनीं लहानलहान संस्थानें होतीं तीं मोडून, त्यांचे जागीं त्यानें एक नवें लोकसत्तात्मक राज्य स्थापन केलें. यामुळें तर तो आतां लोकांस फारच प्रिय झाला. फ्रान्समधल्या स्वतंत्रतेच्या झाडाचें एक कलम इतालींत लावून तें त्यानें त्या हवेंत रुजविलें, तेव्हां आतां हा कुशल माळी सर्व युरोपभर स्वतंत्रतेच्या झाडांचा एक मोठा बगीचा बनवील असें तेथील लोकांना सहजच वाटूं लागलें.

### प्रकरण सातवें.

## इजिप्तवरील मोहीम.

इतालीमध्यें अनेक विजय संपादन केल्यावेळेपासून नेपोलियन हें एक मोठें प्रस्थ होऊन गेलें होतें. फ्रान्समध्यें साधारण लोकांच्या भाषणांत देखील त्याचें नांव वारंवार निघे व जो तो त्याच्या विजयाच्या हकिगती, त्याचें युद्धकौशल्य व त्याच्या धैर्याचीं वर्णनें फार कौतुकानें सांगे. आपल्या देशाचा अग्रणी, आपण स्थापलेल्या लोकसत्तेचा त्राता व दुनिर्ग्रेनल्या राज्यसत्तेचा कट्टा शत्रू म्हणून सर्व फ्रेंच लोक त्याची फार वाखाणणी करीत. सूत्रधारी राजमंत्र्यांना म्हणजे पारीसमधील डायरेक्टरांना मात्र तो हळूहळू थोडा डोईजड वाटूं लागला होता; पण त्याच्या विजयामुळें तो आधींच सर्वांचा आवडता झाला होता. नेपोलियन ज्या सभेला किंवा ज्या ठिकाणीं येणार असें आगाऊ समजे, त्या ठिकाणीं लोकांची गर्दी तेव्हांच जमे. त्याच्या तोंडचे चार शब्द ऐकण्याला लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत व तो नुसता रस्त्यावरून गेला, तरी मुलें त्याच्या आणि लोक-सत्तेच्या नांवानें मोठा जयजयकार करीत. यामुळें बरोबरीच्यांना व वरिष्ठांना हें मोतीं नाकापेक्षां जड वाटूं लागलें; पण त्या मोत्याचें पाणी इतकें तेजदार होतें व त्याची चमक इतकी नामी होती कीं, मनांत कांहीं असलें तरी सर्वजण त्याची वाहवा करीत असत. जो तो आपआपल्या परीनें त्याला उंच उंच चढवी. कोणी त्याला अधिकाराच्या उंच पदावर चढविण्यास तयार होते, तर कोणी त्याला सुळावर चढविण्यास तयार होते. तो दूर रहावा, लोकांच्या डोळ्याआड असावा व त्याच्या तेजानें आपली प्रभा फिकी पडूं नये, असेंहि पारीसमध्यें पुष्कळांना वाटूं लागलें होतें. मीलन वगैरे शहरीं असतां एखाद्या राजराजेश्वराला जिचा हेवा वाटावा अशा थाटाची नेपोलियनची मिजास असे. पण तोच नेपोलियन पारीसमध्यें आल्यावर मुद्दाम अगदीं साधेपणानें राही. बरोबर लवाजमा मुळींच नसे. कपडेहि साधे असत. गाडी देखील अशी होती कीं, ती कोणाच्याहि

डोळ्यांत सलूं नये, असा तो धूर्तपणानें वागे. लोकांपाशीं भाषण आपलेकडे कमीपणाच घेऊन व अगदीं नम्रतेनें करी. यामुळें तर तो फ्रेंच लोकांचा फारच आवडता झाला. पण हें सर्व कृत्रिम होतें. साधारण लोकांवर आपली छाप पडावी व त्यांना आपलें कौतुक वाटावें, येवढ्यासाटीं हें सर्व सोंग होतें. आपल्या वरिष्ठांपाशीं तो थोडा तोऱ्यानेंच वागे. आपली त्यांना गरज आहे, हें तो नेहमीं त्यांना भासवी; व आपण काय तोलाचे सरदार आहों, हेंहि तो वेळोवेळीं त्यांना चांगलें समजावी. इतालीमध्यें असतानांच राजसत्तेची चटक त्याच्या जिभेला लागली होती व तेथें त्याची सर्व वागणूक अभिषिक्त राजासारखी बनत चालली होती कांम्पोफोर्नियोचा तह देखळ जणूं काय तो सर्व सत्ताधारी पादशा असावा, असा स्वतःच्याच जबाबदारीनें त्यानें ठरविला होता व तेथून परत आल्यावर फ्रान्समध्यें दुय्यम दर्जानें राहणें, आतां त्याला मनापासून आवडेनासें झालें होतें. एके दिवशीं तो मायो द मेलितो याला म्हणाला, 'मी खरेंच सांगतों आतां माझ्याच्यानें दुसऱ्याची हुकमबंदी साहणार नाहीं. सत्तेची चटक मला आतां सुटणार नाहीं. येथें मला धनीपणानें राहतां न आलें, तर मी फ्रान्स सोडून दुसरीकडे जाईन.' फ्रान्सच्या डैरेक्टरामध्यें शिरण्याचा त्यानें दोन तीन वेळां यत्न करून पाहिला; पण तें जमलें नाहीं. तेव्हां आतां कोठेंतरी नवी मोहीम निघून तीवर जाणें हें सोयींचें होतें. नेपोलियननें आपल्यावरिष्ठांपुढें दोन तीन सूचना मांडल्या. 'आपलें आरमार वाढवावें व एखाद्या आंधाऱ्या काळ्या रात्रीस इंग्लंडच्या किनाऱ्यावर एकदम फौज उतरावी, हा बेत तर पुर्वींच ठरला होता व त्याला डैरेक्टरहि अनकूल होते; पण पुढें ही योजना बदलली व आतां माल्टा बेट घेऊन आपण मध्यसमुद्राचा ताबा घ्यावा व मग इजिप्तवर मोहीम करावी, हा बेत त्यानें आपले वरीष्ठापुढें मांडला. कांपोफोरमीयोचा तह केल्यापासून फ्रान्सला इंग्लंडाशिवाय नांव घेण्यासारखा शत्रू उरला नाहीं व त्याची खोड मोडणें तर ती इजिप्तवर स्वारी करूनच मोडण्यास ठीक पडेल, हें त्यानें मोठ्या युक्तीनें पारीसमधील डायरेक्टरांच्या मनांत भरवून दिलें व आस्ट्रीयाची आणि रशियाची खोड मोडणें तर तीहि त्याच बाजूनें चांगली मोडेल, असेंहि त्यानें

त्यांस समजाविलें आणि इजिप्तवर स्वारी करण्याचा घाट जुळवून आणला. हा घाट त्यानें इतक्या शिताफीनें घडवून आणला कीं, लोकांना याचें खरें कारण काय, यांतलें अंतर्भूत धोरण कोणतें व याची व्याप्ती किती, याची नीटशी कल्पनाहि त्या वेळीं झाली नाहीं. या कामांत त्याला म्यूरा, बरनेडो, डूराक बरथीयर वगैरे मंडळीची फार मदत होती. पण या सर्वांपेक्षां त्याला यावेळीं टालेरांची फार मदत झाली. टालेरांची व नेपोलियनची प्रथम चांगली मुलाखत तो इतालींतून पारीसमध्यें परत आल्यावर झाली. व थोडेच वेळांत दोघांचें मोठें सूत जमलें. टालेरांचें घराणें पूर्वीच्या अमदानींत चांगलें नांवाजलेलें व खानदानीचें गणलें जाई. नेपोलियनचा मार्शल आणि नेपल्सचा राजा जो म्युरा, त्याचा बाप याचे घरीं नोकर होता. फ्रान्सचा राजा लुई याच्याशीं त्याच्या बापाचें व त्याचें फार चांगलें घरोब्याचें वळण होतें. याची आईहि अशीच थोर सरदार घराण्यांतलीं होती. त्याची बायको मात्र हिंदुस्थानांतलीं होती. तिचा जन्म हिंदुस्थानांतच झाला होता. हिची आई तर एक एतद्देशीय स्त्री होती. ही बाई दिसण्यांत अप्रतिम सुंदर असून मनानें प्रेमळ असे व म्हणूनच टालेरांची हिच्यावर फार प्रीति होती. बोरबॉन् राजांच्या कारकिर्दीत टालेरां हा राजसत्तेचा मोठा अभिमानी म्हणून मिरवीत असे; पण राज्यक्रांतीनंतर टालेरांनें आपली पागडी फिरविली व त्याला आतां लोकसत्ताच फार आवडू लागली. फ्रान्समध्यें जसा जसा वारा वाही, तशी तो आपली पाठ फिरवी. केव्हां राजसत्तेवरील एक निष्ठेची, केव्हां डैरेक्टरीवरील एक निष्ठेची, केव्हां बोनापार्टावरील एक निष्ठेची, केव्हां लोकसत्तेवरील एक निष्ठेची, केव्हां बोरनबोनाच्या चरणीं एक निष्ठेची, अशा यानें तेरा वेळां तेरा निरनिराळ्या शपथा घेतल्या होत्या. हा शरीरानें जरा ठेंगणा असून याचा एक पाय अधु होता, यामुळें तो लंगडत चाले; पण शरीराचें हें उणेपण त्याच्या मनानें अगदीं पुरापूर भरून काढलें होतें. कोणाच्याहि पोटांत शिरून व तोंडासारखें बोलून आपला कावा साधण्याची विद्या त्याला चांगली साधली होती. त्याचें तोंड थोडें वाटोळें होतें व खालचा ओंठ जरा मोठा होता. फार बोलणें त्याला आवडत नसे. तो थोडें बोले, पण तें फार मार्मिक असे.

दिसण्यांत त्याचे डोळे जरा बारीक दिसत; पण त्याच्या त्या बारीक डोळ्यांना आपला मतलब फार दुरून व स्पष्टपणें दिसे. किंबहुना आपल्या मतलबापलीकडे त्याच्या डोळ्यांना दुसरें कांहींच दिसत नसे. स्वदेश म्हणून कांहीं निराळी वस्तु आहे,असें त्याला वाटलें नाहीं. स्वतःचा फायदा म्हणजेच आपले देशाचा फायदा, स्वतःचें बरें तेंच आपल्या लोकांचें बरें व आपल्या कुटुंबाचें कल्याण, तेंच आपल्या देशाचें कल्याण, अशी अद्वैत भावना त्याच्या मनाची होती व यामुळें तें साधून घेण्याला कोणताहि उपाय किंवा कोणतेंहि कृत्य तो कमी दर्जाचें समजत नसे. आपल्या कल्याणासाठीं दुनियेचें कितीहि वाईट झालें, तरी त्याची त्याला पर्वा नसे. दुसऱ्याला संकटांत पाहून त्याला मनापासून मोठा हर्ष होई; पण असल्या इतर लोकांप्रमाणेंच तो तो कधींहि बाहेर दाखवित नसे. बुडत्याला हात दिल्याचें श्रेय मिळवितां यावें व साधल्यास त्यांतच हातहि भिजवून घेतां यावा, म्हणून तो कोणालाहि पाण्यांत ढकलण्यास तयार असे. त्यानें प्रथम एका स्त्रीच्या मार्फत नव्या मंडळींत आपला अनेक ठिकाणीं शिरकाव करून घेतला व पुढेंहि स्त्री, द्रव्य किंवा दुसरा कोणताहि उपाय इष्टकार्यसिद्ध्यर्थ तो निःशंकपणें योजी. नेपोलियनसारख्या रणशूराला स्त्रियांची मोठी आवड असावयाची; तेव्हां टालेरांचा खिसा नेहमीं त्या चिजांनीं भरलेला होता. त्यांतहि तो कमीपणा मानीत नसे. दुसऱ्याचें सालडें गेलें, तरी चालेल पण आपल्या आंगाला खरचटतांहि कामा नये, असा तो नेहमीं वागे व मग तें साधण्याकरितां कांहींहि करण्यास तयार असे.

त्याचेसंबंधीं मिराबू म्हणे कीं, 'टालेरां सुवर्णासाठीं आपला आत्मा देखील सहज विकील व असें करण्यांतहि तो फसणार नाहीं. कारण तसें करण्यांत त्यानें शेणाचा मोबदला सुवर्णाशीं केला असेंच होईल.' कार्लाइल म्हणतो, याच्यासारखा प्राणी पूर्वीं कधीं झाला नाहीं व पुढें माडम दि स्ताएलला तर हा सगळ्या गोष्टींत केवळ 'नारिकेल पाक,' वाटे, ती म्हणे, याचें अंतरंग ब्रह्मयालाहि अभेद्य आहे,मग त्यांत माणसाला काय कळणार ? याचें बोलणें एक, करणें एक व मन तिसरेंच. असा हा पाताळयंत्री, धूर्त, मतलबी व कावेबाज होता. पायानें लंगडा असल्यामुळें रणांगणांतली

कोणतीहि नोकरी त्याला होण्यासारखी नव्हती. आणि म्हणूनच तो उपाध्येगिरीच्या व धर्माच्या भानगडींत प्रथम शिरला. त्यांतहि वशिला व बुद्धि यांमुळें त्याला चांगल्या चांगल्या वृत्त्या मिळाल्या व राज्यक्रांतीनंतर हा राजकारणांतहि बराच पडूं लागला. या दोघांनींहि आपलीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत. नेपोलियन आपल्या चरित्रांचे टिपणांत म्हणतो कीं, टालेरांनें मला प्रथम पत्र लिहिलें व भेटीची इच्छा दर्शविली. टालेरां आपल्या 'आयुष्याच्या आठवणींत' लिहितो कीं, मला नेपोलियननें प्रथम पत्र लिहिलें व त्यानें माझी भेट घेण्याची उत्सुकता दर्शविली. दोघांनींहि आपल्या लिहिण्यांत ठिकठिकाणीं पुष्कळच खेळखंडोबा केला आहे. तेव्हां यांत खरा कोण हें निवडीत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. इतकें खरें दिसतें कीं, दोघांनांहि एकमेकाचीं ओळख पटली होती व या जोडीपैकीं प्रत्येकाला, आपल्या मतलबासाठीं दुसऱ्याचा उपयोग होईल, असें वाटलें होतें. व दोघांनांहि एकमेकांचें वर्म कळलें होतें. अशा या ठकाठकांची गांठ पडल्यावर कोणाला कोणठकवितो हें सहज कळण्यासारखें नव्हतें; पण यावेळीं तरी नेपोलियनचा इजिप्तच्या स्वारीचा पक्का व पूर्ण अंदाज टालेरांला झाला नाहीं, असें म्हणणें भाग आहे.

पूर्वी इतालींत असतांनांच नेपोलियननें बरथीयरला इंग्लंडच्या मोहिमेंतला खजिनदार नेमला होता. त्यावेळीं इंग्लंडच्या मोहिमेचा बेत देखील ठरलेला नव्हता. तरीपण बरथीयर हा त्यांतला खजिनदार नेमला गेला होता. या खजिनदारानें खजिन्यांत पिशव्याहि चांगल्या भरून घेतल्या. पुष्कळ पैसा पारीसमध्यें डायरेक्टरांकडे आला; पण पुष्कळ पैसा मागेंहि राहिला. त्याचा उपयोग आतां या वेळीं झाला. इतालींतल्या सरदारकीची नेमणूक मिळाली नसती, तर नेपोलियन इतका पुढें आला नसता; पण ती नेमणूक मिळविण्यास बारस सारख्याची मनधरणी करावी लागली होती व त्यानें लावून दिलें तिच्याशीं लग्न लावून घ्यावें लागलें होतें. यावेळींहि पुन्हां डायरेक्टरांनीं या मोहिमेंत सरदारकीवर आपली नेमणूक केली, तर ठीक, नाहीं तर काय करावें हा मोठाच प्रश्न होता व हा प्रश्न थोडासा नेहमींच येऊन पडण्यासारखा होता. डायरेक्टरांत विशेष कर्तबगारीचा

१८१६



असा कोणताहि पुरुष नव्हता. यामुळें या कर्तबगारीच्या माणसाचा त्यांना साहजिकच हेवा वाटे. तेव्हां त्याचा पारिसमधून कांटा काढून टाकावा, फ्रान्सच्या हद्दीबाहेर फार लांब मोहिमेवर त्याला दवडावा; याविषयीं कोणाहि डायरेक्टराचें मत प्रतिकूल पडलें नाहीं. मात्र कोणीं आयर्लंडच्या मार्गानें इंग्लंडवर हल्ला करावा, असें सुचविलें, तर कोणी दुसऱ्या मसलती सुचविल्या; पण कोठें तरी दूरची मसलत योजून तीजवर नेपोलियनला पाठवावें, हें मात्र सर्वांनां पाहिजे होतें. अनेक लहान मोठया कारणांमुळें नेपोलियनला देखील पारीसमध्यें राहणें जरा अपायकारक व गैर सोयीचें वाटूं लागलें होतें.मुख्य कार्यकर्त्यांपैकीं म्हणजे डायरेक्टरांपैकीं एक होण्यास, नेपोलियन बुद्धीनें व उद्योगानें फारच योग्य होता; पण तो वयानें अजून लहान होता. जेमतेम तिशीच्या अमदानींत त्याचें वय होतें व चाळीसा पेक्षां कमी उमरीचा मनुष्य मूळ घटनेंप्रमाणें या मंडळींत घेणें गैरकायदा होतें.तरी देखील 'कसेंहि करून तुम्हीं या मंत्रीमंडळींत जा व सत्ता आपल्या हातांत घ्या ' असें एकानें सुचविलें; पण तेव्हां त्यानें हळूच उत्तर दिलें कीं, ' त्याला अवधी आहे. फळ अजून पिकलें नाहीं.'

इजिप्तच्या मोहिमेचे बेत नेपोलियन फार दिवसांपासून मनांतल्या मनांत योजीत होता; पण बाहेर मात्र त्यानें कोणालाहि सुगावा लागूं दिला नाहीं. इजिप्त ही आशियाखंडाची किल्ली आहे;ती ज्याच्या हातांत असेल, त्याला आशिया सहज जिंकतां येईल असें त्याला वाटे. तो यावेळीं व पुढें नेहमीं म्हणे कीं,मीं इजिप्त सर केलें म्हणजे हिंदुस्थान हातीं आलेंच असें समजावें. इजिप्तमध्यें पुष्कळ सैन्य जमा करावें व तेथली सर्व व्यवस्था सुयंत्रित करून व मग तेथून चाल करून युफ्रेतीस नदी ओलांडावी आणि मराठ्यांच्या मदतीनें इंग्रजांस हिंदुस्थानांतून हांकलून लावावें, असा त्याचा बेत होता. सेंट हेलिना येथेंहि तो हा आपला बेत वारंवार सांगे. माझें मराठ्यांशीं सूत्र होतें; व हिंदुस्थानची खबर मला लंडनपेक्षां लवकर समजे असें तो म्हणे. नेपोलियनची व त्याच्या शिपाईगिरीची महिती मराठ्यांनां खास होती असें दिसतें. मराठी मुत्सद्यांनीं युरोपमधल्या उलाढालींच्या बातम्या चांगल्या माहितीनें मिळविल्या होत्या. होळकरांचे कारभारी

गंगाधर यशवंत चंद्रचूड वगैरेंचे दफ्तरांत नेपोलियनसंबंधीं पत्रें अजूनहि आहेत. त्यांवरून नेपोलियनचें व मराठ्यांचें त्यावेळीं कांहींतरी अंतस्थ सूत्र होतें हें नेपोलियनचें म्हणणें खरें दिसतें.

इजिप्त जिंकावा, हिंदुस्थान काबीज करावें व पूर्वेकडील गोलार्धावर आपली सत्ता स्थापन करावी, हे त्याचे मनोराज्यांतले बेत चालत असत. एकदां पूर्वेकडे साम्राज्य स्थापलें म्हणजे इंग्रजांची वाट सहज लावतां येऊन सर्व पृथ्वीचें राज्य आपल्या हातांत येईल, अशी त्याची अटकळ होती. व यासाठींच या महाकल्पनेचा प्रारंभ म्हणून त्यानें इजिप्तची मोहीम आंगावर घेण्याचें ठरविलें. यांत दुसराहि एक दुय्यम हेतु असा होता कीं, कदाचित् फ्रान्समधल्या मंत्र्यांचें व आपलें पटले नाहीं, त्यांनीं आपल्या गैरहजेरींत आपल्या विरुद्ध कट केले व आपला नाश करण्याचा बेत केला, तरी इजिप्त हातांत आल्यावर आपण तेथें नवें फ्रान्स व नवें पारीस उभें करूं. तिकडे अशी सुधारणा करूं व असें सुराज्य स्थापूं कीं, तें पाहून फ्रान्समधले आपले वैरीहि खालीं माना घालतील व त्यांनां आपला दरारा वाटेल. आणि म्हणूनच त्यानें या मोहिमेची सर्व तयारी फार मेहनतीनें व कुशलतेनें केली. पारीसमधील मंत्र्यांकडून म्हणजे डायरेक्टरांकडून निघाला तेवढा पैसा या मोहिमेसाठीं त्यानें काढलाच; पण इतालींत बरथीयेरनें जमा केलेला व आणखी खाजगी रीतीनें जमवतां आला तितका, सर्व पैसा त्यानें याच कामास लावला. तसेंच डीसे, क्लेबर, मेनान, लिन्स, दाह्व, म्यूरा, मारमां, जूनो, बेसियेर, बुरीयां, अजेन, डुराक, सावारी, बेर्त्रांड वगैरे सर्व आपल्या खात्रीचे व मायेचे असे शूर लढवय्ये त्यानें बरोबर घेतले. टालेरांलाहि इजिप्तमध्यें येण्याविषयीं नेपोलियननें आग्रह केला व टालेरांनेंहि तुमचे मागोमाग एक दोन दिवसांत मी निघतों असें वचन दिलें. मग तो गेला नाहीं, तो भाग निराळा. त्याला जाण्यापेक्षां मागें राहण्यांतच फायदा जास्त वाटला; पण नेपोलियननें त्यालाहि बरोबर घेण्याचें योजिलें होतें. टालिरांप्रमाणें जोसेफाईनहि मागेंच राहिली होती. ती प्लामबीयरचे झऱ्यांत आंगधुण्यासाठीं तेथें गेली. या झऱ्याच्या पाण्यानें कांहीं दिवस सतत स्नान केल्यानें

स्त्रिया पुत्रवंती होतात, असा या पाण्याचा लौकिक होता; पण नेपोलिननें हिच्या शिवाय इतर कांही स्त्रिया बरोबर घेतल्या होत्या. तसेंच उत्तम उत्तम शास्त्रज्ञ पंडित, उत्तम उत्तम इंजिनीयर, उत्तम कारखानदार, अनेक भाषाभिज्ञ व कलभिज्ञ लोक, चितारी वगैरे सर्व शास्त्रांतले हुशार लोक, अणि अनुभवी व हुशार असे नांवाजलेले विद्वान हेहि नेपोलियननें बरोबर घेतले होते. बरोबर शोध करण्याचीं नवीं नवीं यंत्रें व तेथें उपयोगी पडण्यासारखे जुने जुने ग्रंथहि त्यानें घेतले. बायबल तर होतेंच; पण वेद आणि कुराण हेहि धर्मग्रंथ बरोबर घेतले होते. हिंदुस्थानासंबंधानें ऐतिहासिक व इतर माहितीचे ग्रंथ, भूगोल, रस्तोरस्तींचे नकाशे व स्थलांचीं वर्णनें हे ग्रंथ नेपोलियननें मोहिमेला निघण्यापूर्वीच वाचून टाकले आणि बरोबरहि घेतले. होमर,व्हर्जील वगैरे प्राचीन व बेकन, गेटी, रुसो वगैरे अर्वाचीन विद्वानांचेहि ग्रंथ घेण्याचे त्यानें वगळले नाहींत. चरित्र ग्रंथहि बरेच होते. त्यांत प्लुटार्कचीं चरित्रें व शिकंदर बादशहाचें चरित्र; हे दोन्ही ग्रंथ होते. छापखाने व छापण्याचें सामान आणि निरनिराळ्या लिपींचे नमुनेहि करून बरोबर घेतले होते. सारांश या मोहिमेस निघतांनां नवा संसार, नवें राज्य थाटण्याची सर्व तयारी त्यानें करून घेतली होती. पूर्वेकडे नवी सृष्टि निर्माण करावी, रोम, लंडन पारीस वगैरे शहरांनांहि मागें पाडितील अशीं नवीं शहरें उभारावीं व इंग्रजांचा नायनाट करावा आणि हिंदुस्थानचें राज्य, कीं जें शिकंदर बादशाहासहि नीट साधलें नाहीं, तें संपादून सवाईशिकंदर व्हावें, या त्याच्या मनाच्या उड्या होत्या. हे त्याच्या मनोराज्यांतले उंच उंच मनोरे होते. ही त्याच्या कल्पनेची धांव होती.

ता. ३ मे रोजीं रात्रीं नेपोलियन पारिस मधून निघून टूलोन येथें गेला आणि अखेर हें मोहिमेचें सैन्य, हा मोहिमेचा काफिला ता. १९ मे १७९८ रोजीं टूलोन बंदरांतून निघाला. पूर्वी वीस हजार सैन्य बरोबर घेण्याचें जाहीर झालें होतें; पण आयतेवेळीं विसाचें बदली चाळीस हजार सैन्य जहाजांवर चढविलें. दोन हजार तोफा बरोबर घेतल्या होत्या. खेचून भरलेलीं चारशें गलबतें सामान नेण्यास लाविलीं होतीं, शिवाय

पांचपन्नास इतर जहाजें होतीं तीं निराळींच.ही स्वारी करण्याला कांहीं तरी कारण पाहिजे होतें; पण त्याचीहि अडचण पडली नाहीं. इजिप्तवर तुर्कीचा हक्क पोंचत नाहीं व मामलूक लोक इजिप्तवर फार वाईट रीतीनें सत्ता गाजवितात, इतकें कारण पुरें झालें. आम्ही फ्रेंच इजिप्तमधील लोकांना जाचांतून सोडविण्याकरितां व त्यांना सुधारण्याकरितां त्यांच्या मुलखावर स्वारी करीत आहों, ही सबब त्यांनीं पुढें केली. कदाचित मामलूक लोक जुलुम करतात ही गोष्ट खरी असेल; पण या स्वारीला ही सबब म्हणून पुढें करण्यांत विशेष अर्थ नाहीं. असो. टूलोनहून निघण्यापूर्वीं ही स्वारी कोठें होणार, हा वेत साधला तितका गुप्त ठेवला होता. ही मोहिम इंग्लडवर करायाची आहे व काफिला इंग्लडकडे जाणार आहे, अशीच बातमी बाहेर सर्वभर पसरविली होती व ती खरी वाटावी म्हणून इंग्लडच्या बाजूचे किल्ले, कोट व बंदरे तपासण्यास नेपोलियन कांहीं दिवसांपूर्वीं स्वत: तिकडे गेला होता. यावेळीं अशी खोटी बातमी पसरवून खोटीच हूल दाखविण्याचें कारण असें कीं, भूमध्यसमुद्रावर इंग्रजाची पेहरवी असे. त्या करितां इंग्रजी मुत्सद्यांना चकवणें अत्यंत अवश्य होतें आणि ते थोडेसे फसले यांत संशय नाहीं. नेल्सनचा डोळा चुकवून व तो दूर आहे, अशी पक्की खबर ठेवून नेपोलियन टूलोन बंदरांतून निघून दर्यांतली वाट चालूं लागला. भूमध्यसमुद्रांत माल्टा हें बेट अत्यंत महत्वाचें व कडेकोट बंदोबस्ताचें ठिकाण होतें. तें नेपोलियननें आंतल्या लोकांनां मोठ्या युक्तीनें वश करून घेऊन आपल्या ताब्यांत घेतलें व तेथील नीट व्यवस्था करून तारीख १९ जून रोजीं तो तेथून पुढें निघाला. नेपोलियननें माल्टा बेट घेतल्याची खबर नेल्सनला कळली, तेव्हां नेपोलियनचा कोठें जाण्याचा रोख आहे, हें बरोबर ताडून तो शूर दर्यावर्दी, एकदम तडक अलेक्झांड्रिया उर्फ शिकंदराबाद या शहराकडे गेला. आपलीं जहाजें फार जलदीनें चालवून नेल्सन ता. २८ जून रोजीं अलेक्झांड्रिया येथें जाऊन पोंचला. जातांना वाटेंत फ्रेंच काफिल्याच्या अगदीं आंगावरून म्हणजे दहा पांच मैलांवरून तो गेला; पण फ्रेंच काफिला इतका जवळ असेल, हें त्याच्या लक्षांतहि आलें नाहीं. नेलसन २८ तारखेस आलेक्झांड्रियाला पोंचल्यावर

फ्रेंच जहाजें तेथें नाहींत, असें पाहून त्यांना शोधून काढण्यासाठीं तो तें शहर सोडून पुन्हा समुद्रांत परत वळून सिरीया देशाकडे गेला. नेल्सन अलेक्झांड्रिया सोडून गेल्यावर दोनच दिवसांनीं म्हणजे ता. १ जुलै १७९८ रोजीं नपोलियन अलेक्झांड्रिया येथें येऊन पोंचला. नेपोलियन तेथें पोंचला त्या दिवशीं दर्यांत मोठें तुफान होतें व लाटा उंच उसळत होत्या. याकरितां तुफान बंद होऊन वारा पडेपर्यंत दर्यांतच राहावें असें ॲडमिरल ब्रूस यानें त्यास सुचविलें; पण "दैवानें मला अवधी फार थोडा दिला आहे. त्यांत वेळ गमावला तर सर्वस्वाचा नाश होईल." असें नेपोलियननें त्यास उत्तर दिलें व तशा तुफानांतच लोक उतरण्यास हुकूम दिला. पहांटेस एक वाजतां लोक गलबतांतून जमिनीवर उतरले. बरोबरचे लोक व सामान पुरें उतरलें न उतरलें तोंच म्हणजे तेच दिवशीं पहांटेस तीन वाजतां नेपोलियन स्वतः बरोबर दोन तीन हुशार सरदार व निवडक सैन्य घेऊन आलेक्झांड्रिया शहरावर हल्ला करण्यास गेला. महिना दीड महिन्याचा जलप्रवास करून आल्यावर पुरी तीन तासांचीहि विश्रांति त्यानें घेतली नाहीं व आलेक्झांड्रिया शहर सुमारें तीन मैल दूर होतें, तरी तो एकदम त्या शहरावर चाल करून गेला. तेथील लोकांनां बातमी पोंचून त्यांनां शत्रूस तोंड देण्याची तयारी करण्यासहि फुरसद मिळाली नाहीं, तोंच शहराच्या तटावर नेपोलियनचे शूर शिपाई चढूं लागले. लवकरच तें शहर नेपोलियनच्या हातांत आलें व तेथें नेपोलियनचा अंमल सुरू झाला. या शहरांत नेपोलियन अवघा सहाच दिवस राहिला. तेथें असतांनां त्यानें इजिप्तच्या लोकाकरितां एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यांत असें म्हटलें होतें कीं, "इजिप्तचे लोकहो ! ! मी तुमचा आणि तुमच्या धर्माचा विध्वंस करण्यासाठीं आलों आहे, असें तुम्हांस कोणी सांगतील; पण त्यावर भरंवसा ठेवूं नका. तुम्हांस मामलूक लोकांच्या जाचांतून सोडविण्यासाठीं, तुम्हांस जे छळतात त्यांस शासन करण्यासाठीं, व तुमचे नैसर्गिक हक्क तुम्हांस मिळवून देण्यासाठीं, मी आलों आहें. मामलूक लोकांपेक्षां परमेश्वर, त्याचा पैगंबर महमंद व कुराण यांच्या ठिकाणीं माझी फार पूज्यबुद्धि आहे. तुम्हीं आपल्या सर्व लोकांनां कळवा

कीं अक्कल, हुशारी व सद्गुण यांमुळेंच काय तो माणसामाणसांत फरक होऊं शकतो. नाहींपेक्षां पैगंबरासमोर सर्व माणसें सारखींच आहेत." बरोबर आणलेल्या भाषापंडितांकडून याचें भाषांतर करवून हा जाहिरनामा त्यानें बायकामुलांनांसुद्धां कळवा म्हणून त्या लोकांच्या भाषेंत सर्वभर प्रसिद्ध केला.

अलेक्झांड्रियामधून डिसे या नांवाच्या सरदाराला हाताखालीं थोडें सैन्य देऊन दमानूर शहरावर नेपोलियननें पाठविलें. व त्याचे मागोमाग तो स्वतःहि निघाला. अलेक्झांड्रिया सोडल्यावर नेपोलियनचें व त्याच्या बरोबरीच्या सैन्याचे अतिशय हाल झाले. इजिप्तमध्यें ते दिवस म्हणजे अत्यंत उन्हाळ्याचे होते; व नेहमींचा रस्ता चुकवून नेपोलियन मुद्दाम एका भलत्याच रस्त्यानें जात होता. वाळवंटांत रेती इतकी तापे कीं तिच्यावरून जातांनां लोकांची फारच हलाकी होई. वाटेंत कोसच्या कोस कोठें माणसांची वस्ती नाहीं कीं पिण्यासारखें पाणीहि नाहीं. उन्हाच्या झळ्यांनीं घोडीं व माणसें तापून जाऊन आंग टाकीत. तहानेनें शिपायांचे घसे कोरडे पडत तेव्हां त्यांनां पाणीहि मिळत नसे. कोठें लहानसें डबकें असलेंच तर त्याचें पाणी अगदीं मचूळ व कडवट असे; पण प्यास लागून व्याकूळ झाल्यामुळें जनावरें तेंहि पीत, त्यामुळें पुढें कोस अर्धा कोस गेले नाहींत तोंच त्यांचे पाय लुले पडत व तीं धाडकन् आंग टाकून प्राण सोडीत. पुष्कळ वेळां पाणी असे त्यांत शत्रूंनीं वीष कालविलेलें असे. मुक्कामावर मोठ्या प्रयासानें भिस्त्यांनीं पाणी आणलेलें असे, पण तें वाटतांनां नेहमीं भांडणें व तंटे इतके होत, कीं जणूं ती अमृताचीच वांटणी चालली आहे. केव्हां केव्हां भिस्त आपल्या पखाली दूर अंतरावरून मोठ्या प्रयासानें पाण्यानें भरून आणीत. व त्या गोटांत आणून उतरीत. परंतु भिस्त्यानां त्या सोडण्याचाहि अवकाश न देतां, उतावीळपणानें शिपाई आपल्या बागनेटानीं पखालीनां भोसकून भोकें पाडीत. व आंतून चिळकांडी उडे, तिलाच तोंड लावून पाणी पीत यामुळें पाणी फार वायां जाई. आणि टंचाई मात्र अधिक पडे. सूर्याच्या प्रखर तापानें चेहरे करपून जात व कैकांनां रातांदळें लागे. यामुळें त्यांनां रात्रींहि त्रास होई.

जिकडे तिकडे वाळूचे वाळवंट पसरलेलें; सबंध प्रदेशांत कोसचे कोस वाट चाललें तरी कोणी माणूस, किंवा जनावर किंवा हिरवें झाडहि दृष्टीस पडत नसे. म्यूरा, लेन्स यांच्यासारखे खंबीर मनाचे गडीहि धीर सोडल्यासारखे करूं लागले. पण इतक्या अडचणींत व प्रतिकूल परिस्थितींत नेपोलियनचा उत्साह आणि उद्योग लवमात्र कमी झाला नाहीं. तो त्या सर्वांनां धीर देई. व केव्हां रागानें तर केव्हां लोभानें नीट समजावून त्यांस हुशार करी. दमानूर शहर घेऊन नेपोलियन नाईल नदीचे कांठानें पुढें केरो शहराकडे जाऊं लागला. नाईल नदींतून फ्रेंचांचीं गलबतें त्याच दिशेकडे येत होतीं. या गलबतांवर तुर्कांनीं हल्ला केला, व त्यांपैकीं कांहीं हस्तगत करून त्यांतील सामान लुटून नेलें; व गलबतांवरील लोकांची निर्दयपणानें कत्तल करून त्यांचीं मुंडकीं त्यांनीं नेपोलियनकडे पाठविलीं. परंतु पुढें लवकरच नेपोलियननें जमिनीवरून जोराचा मारा करून त्या तुर्कांचा नाश केला व त्यांस पळवून लाविलें, आणि पुन्हां नेपोलियन आपल्या मार्गाला लागला.

वाटेंत एक दोन ल्हानसहान झटापटी होऊन नेपोलियन गीझ शहराजवळ येऊन पोंचला. येथें जवळच मुराद बे हा मामलूक लोकांचा पादशाहा आपणांशीं लढाई देण्याचें उद्देशानें पुष्कळ सैन्य जमवून तयार असल्याची बातमी त्याला कळली. मुराद बे यानें चांगले शूर अरब व तुर्क लोक गोळा करून आणि तोफखानाहि उभा करून लढाईची चांगली तयारी केली होती. त्याच्या सैन्याजवळ युरोपांतलीं चांगलीं नवीन शस्त्रें व हत्यारें असून कांहीं युरोपीयन अंमलदारहि त्यांत होते. त्याचे घोडे तर फारच उमदे होते. त्यावरचे स्वारहि दांडगे व हुशार असे होते. ही सेना पुढें पाहून नेपोलियननें आपले सैन्याची लढाईच्या बेतानें मांडणी केली. तो शत्रूच्या सैन्याची टेहळणी करण्याकरितां घोड्यावर स्वार होऊन अगदीं सैन्यापुढून जात असतां इतरांचे ध्यानांत आली नाहीं अशी एक गोष्ट त्याचे लक्षांत आली. मुराद बे यानें ज्या तोफा उभ्या केल्या होत्या त्यांनां गाडे नव्हते. यामुळें त्या तोफा एकदम हालवून दुसरीकडे नेऊन उपयोगांत आणतां येणार नाहींत असें त्यानें ताडलें. व या शत्रूच्या चुकीचा फायदा त्यानें

ताबडतोब करून घेतला. आपल्या सैन्यांत येऊन त्यानें त्या तोफांचा रोख चुकवून शत्रूच्या सैन्याच्या डावे बाजूकडे आपलें सैन्य गरकन् फिरवून नेलें. तेथें जवळच इजिप्तमधले फार प्राचीन व जगप्रसिद्ध मनोरे कांहीं अंतरावर दिसत होते त्या मनोऱ्यांकडे बोट दाखवून तो आपल्या लोकांस म्हणाला, " शिपाई गड्यांनों !! या दूरच्या मनोऱ्यांवरून चाळीस पिढ्यांचें डोळे आज तुमच्या पराक्रमाकडे लागले आहेत. " असें म्हणून नेपोलियननें लढाईस सुरवात केली. मुराद बे नें पुन्हां पुन्हां निकाराचे हल्ले चढविले. पण फ्रेंच सैन्याच्या शौर्यापुढें त्याचे कांहींच चाललें नाहीं. फ्रेंच सैन्यानें त्या लोकांची अगदीं कत्तल करून टाकली. फ्रेंचांच्या मारगिरीपुढें मुराद बे चा निभाव लागेनासा झाला. व त्याचे लोक सैरावैरां पळूं लागले. कैक मेले, कैक जखमी झाले व कैकांनीं आतां नाइलाज पाहून जवळच वाहत असलेल्या नाईल नदींमध्यें उड्या घेतल्या. पण यांपैकींहि पुष्कळांना फ्रेंच शिपायांनीं गळानें मासा काढावा त्याप्रमाणें आपल्या बंदुकांच्या बागनेटांनीं भोंसकून वर ओढून काढीले. त्यांचे कपडे चांचपून त्यांचेजवळ सांपडेल तितकें द्रव्य लुटून घेत. यावेळीं फेंचांच्या हातीं पुष्कळच मौल्यवान वस्तू सांपडल्या. एकंदरीला लूटतर लूटहि पुष्कळच सांपडली. नेपोलियनच्या सैन्यानें आगीचा नुसता पाऊस पाडला; तो कहरपाहून ते कडवे मुसलमान लोक तेव्हांपासून त्याला सुलतान केबीर पादशहा राजा असें म्हणूं लागले. मुराद बे चा मोड झाला, व तो लढाई सोडून तेथून पळून गेला.

या ठिकाणापासून केरो शहर कांहीं फार दूर नव्हतें. तेंहि लवकरच नेपोलियनच्या हस्तगत झालें. इजिप्तच्या किनाऱ्यावर पाय ठेवल्यापासून चोवीस दिवसांच्या आंतच नेपोलियननें इजिप्त देशाची राजधानी जें केरो शहर तें जिंकून तेथें आपला अंमल सुरू केला. केरो शहरांत पादशहाच्या एका चांगल्या राजवाड्यांत त्यांनें आपला मुक्काम ठेविला. व तेथून तो त्या शहरची आणि त्या प्रांताची व्यवस्था करण्यास लागला. मुराद बे हा रणांगणांतून पळून गेला होता. त्याच्या पाठीवर जनरल डीसे याब त्याचा नाश करण्यासाठीं पाठविलें.

असें दिसतें कीं, केरो येथें आल्याबरोबर नेपोलियननें हिंदुस्थानांतील सूत्रें चालविण्यास सुरवात केली. हिंदुस्थानांतल्या राजेरजवाड्यांस व संस्थानिकांस त्यानें अनेक पत्रें लिहून पाठविलीं. पेशवे व टिपू यांच्याशीं तर त्याचा पत्रव्यहार नीट जमला होता. केरो शहरांत येतांच व त्यानंतर त्यानें टिपू सुलतानास लिहीलेलीं पत्रें, पुढें इंग्रजांनीं श्रीरंगपट्टणचा ताबा घेतला, तेव्हां त्यांस तेथें सांपडलीं. यापैकीं कांहीं हल्लीं प्रसिद्ध आहेत. केरो येथून त्यानें टिपूस पुढील पत्र पाठविलें होतें.

स्वातंत्र्य. समान हक्क.

न्याशनल क्यानव्हेनशनचे सभासद व मुख्य सेनापती नेपोलियन यांजकडून अत्यंत तेजस्वी सुलतान व आमचे सर्वांत मोठे दोस्त टिपू साहेब यांस:—

मुक्काम केरो तारीख ७ वी प्लिवोज.

एक व अभेद्य लोकसत्ता स्थापनाशक ७.

आपणास इंग्लंडच्या लोहमय जोंकडा खालून सोडवावें, या हेतूनें असंख्य व अजिंक्य फौज बरोबर घेऊन मी तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर येऊन दाखल झाल्याची खबर तुम्हास या पूर्वीं कळविलीच आहे.

तुमची राजकीय परिस्थिति काय आहे, हें जाणण्याविषयींची माझी इच्छा तुम्हांस जाहीर करण्याची, मी आज संधी घेतों. आपण ती मला मस्कत किंवा मक्का या मार्गानें कळवावी.

माझी तर अशी मनीषा आहे कीं, आपण आपल्या पूर्ण विश्वासांतला आणि हुशार असा कोणी इसम सुवेझ किंवा केरो येथें मजकडे पाठवावा. म्हणजे त्याजबरोबर मला खलबत करण्यास सांपडेल.

परवर दिगार तुमची दौलत व सत्ता वाढवो आणि तुमच्या दुष्मनांचा नाश करो.

बोनापार्ट

केरो शहरांत असतांनां नेपोलियननें अनेक तऱ्हेचे नवे कारखाने सुरू केले. टांकसाळ व छापखाना यांची सुरुवात केली. लोकांनां सुखकर व उपयोगी अशीं राज्यव्यस्थेचीं खातीं काढलीं. नवे कायदे केले व जुन्या धंद्यांना उत्तेजन दिलें. तेथें असतांना त्यानें आपल्या सैन्यास, तेथील लोक,

त्यांच्या स्त्रिया, जनानखानें, धर्म व मशिदी यांच्याशीं नीट आदब राखून वागावें; व कोणीहि गैरवर्तन करूं नये अशी ताकीद दिली. मुराद बेची बेगम केरो शहरांत होती, तिच्याकडे आपला सावत्र मुलगा अजेन यास कांहीं उंची नजरनजराणे देऊन पाठविलें व तुम्हांस आमचेकडून कोणतेहि प्रकारें तोशीस पोंचणार नाहीं, अशी त्या बेगमची खातरजमा करून दिली. बेगमनेंहि मनांत मोठा संतोष पावून अजेनचा फार गौरव केला व एक हिऱ्याची मौल्यवान आंगठी त्यास नजर केली. केरो शहरांत नेपोलियननें एक मशीद बांधण्याचा हुकूम केला व त्या देशाच्या लोकांप्रमाणें नमाज पडण्याविषयीं आपल्या लोकांस त्यानें उत्तेजन दिलें. कोणी विद्वान् काजी येत त्यांचेजवळ तो मुसलमान धर्माविषयीं मोठ्या आदबीनें बोले व मला सर्वांत महंमद पैगंबर फार प्रिय आहे, असें सांगे. धर्मांत धर्म महंमदी धर्म मोठा श्रेष्ठ आहे, असें तो त्याजपाशीं नेहमीं म्हणे. थोडेच दिवसांत त्यानें त्या प्रांताची, त्यांतील लोकांची व त्यांच्या रीतिरिवाजांची इतकी माहिती करून घेतली कीं, जणूं काय तो त्या प्रांतांत कैक तपें राहिलेला जुना वाकुफदार होता, असें वाटावें. मामलूक शिपाई सैन्यांतून देशोधडीस लागले होते, त्यांनां व इतर मुसलमान आले, त्यांनां तेथें त्यानें आपले सैन्यांत नोकरीस ठेवून अन्नास लावलें व सर्वांचा लोभ संपादन केला. येथें असतांनां तेथील सुलतानानें नेपोलियनला आपले रास्तन आणि अब्दल्ला ऊर्फ अल्ली या नांवाचे दोन गुलाम व एक फारच पाणीदार व शुभ्र असा युफ्रेटीस नांवाचा अरबी घोडा, नजराणा-आठवण-म्हणून दिला. ते दोन्ही नोकर नेपोलियनजवळ शेवटपर्यंत होते. या दोन नोकरांपैकीं रास्तन त्याचा फार आवडता होता.

मुराद बे प्रमाणेंच इब्राहिम बे हाहि बलाढ्य व नामजाद माणूस होता. तो सिरीया प्रांतांत लढाईची तयारी करीत होता. त्याचेवर नेपोलियन स्वतः केरोहून चाल करून गेला व त्याची चांगली खोड मोडून त्याला नेपोलियननें पिटाळून लाविलें. इब्राहीमचा पाठलाग करीत नेपोलियन लांबवर गेला असतां इकडे मागें एक अकल्पित गोष्ट घडून आली. नेपोलियन उतरूत इजिप्त देशांत आल्यावर आपले मागें जहाजांची व

त्या वरील लोकांची सर्व व्यवस्था त्यानें ॲडमिरल ब्रूस याजवर सोंपविली होती. यानें एखाद्या चांगल्या जुन्या बंदरांत आपलीं जहाजें नेऊन नांगरावीं व तसें न करतां आल्यास कार्फु येथें जाऊन तेथें मजबुतीनें असावें, असा याला हुकूम देऊन ठेवला होता; पण या ॲडमिरलनें त्या हुकुमाकडे दुर्लक्ष करून तो कार्फु येथें न जातां मध्येंच अबूकीर येथें जाऊन राहिला. इकडे इंग्रजी अम्मलदार नेल्सन हा नेपोलियनचा छडा काढीत असतां त्याचीं जहाजें अबूकीरचें बंदरांत असल्याची नेल्सनला खबर लागली. त्याबरोबर त्यानें येऊन त्या जहाजांवर हल्ला केला. अबूकीर हें बंदर असावें तितकें सोईचें व मजबुतीचें नसल्यामुळें नेपोलियनचीं जहाजें श्रेष्ठ दर्जाचीं असूनहि नेल्सन याला त्यांचा सहज नाश करतां आला. या लढाईंत फ्रेंचांचा पराभव होऊन फार हानी झाली व ॲडमिरल ब्रूस हाहि याच लढाईंत मरण पावला. नेल्सननें यावेळीं फ्रेंच आरमाराचा इतका नाश केला कीं, यापुढें फ्रेंच आरमारानें पुन्हां फारसें डोकें वर काढलें नाहीं.

ही अबूकीरची कठीण हकीकत नेपोलियनला कळली, तेव्हां तोहि मनांत थोडा खचल्यासारखा झाला व परत फिरून पुन्हा केरो येथें आला. आपली इतकी सामुग्री नाश पावल्याचें ऐकून तो भेदरून न जातां, जवळच्या लोकांस म्हणाला, "आतां आपल्याला फार निकाराचे यत्न केले पाहिजेत. हे इंग्रज लोक आपणांला आपण योजिलीं होतीं, त्यापेक्षांहि फारच अचाट कृत्यें करण्यास भाग पाडीत आहेत." फ्रान्सकडे जाण्याची सामुग्री नाहींशी झाली, तरी देखील इजिप्तमध्यें उत्तम राज्य स्थापून तेथून पुढें हिंदुस्थानकडे वळावें व तेथें इंग्लडची खोड मोडून टाकावी, त्यांचा व्यापार व सत्ता रसातळास नेऊन पोंचवावी आणि सुवेझचा कालवा खणून त्या मार्गानें फ्रेंच कारखान्यांचा माल हिंदुस्थानचे बाजारांत नेऊन उतरावा व हिंदुस्थानसारख्या सुवर्णभूमींतल्या पैशाच्या नदीचा ओघ इंग्लडकडून वळवून फ्रान्समध्यें नेऊन सोडावा, हे विचार त्याच्या मनांत घोळत असत.

अबूकीरची वार्ता कानीं पडल्यावर नेपोलियन परत केरो शहरीं आला. तो कांहीं दिवस तेथेंच होता. तेथें त्यानें डिसुसी या नांवाच्या एका महापंडिताच्या अध्यक्षत्वाखालीं शास्त्र व कला यांच्या अभिवृद्धीसाठीं एक परिषद स्थापन केली व विद्याचार संपन्न राष्ट्रामध्यें आढळणाऱ्या अशा अनेक संस्था व उद्योग त्यानें तेथें सुरू केले. थोडे दिवसांनीं तुर्की पादशहाच्या फुशीनें इजिप्तमधील लोकांनीं बंड उभारण्याचा बेत केला व खुद्द केरो शहरांतच बंडाळी केली. मशीदींत बांगी ओरडून बांग पढत. तीवर फ्रेंचांची चौकशी प्रथम चांगली असे; पण पुढें हा नित्याचा एक धर्मविधि आहे, असें पाहून त्याची चौकशी मंद पडली. यामुळें बांगी लोकांनां मोठ्यानें ओरडून बंडाची फूस जाहीर करण्यास फुरसद सांपडली. व तसें करून त्यांनीं एके दिवशीं बांग पडतांनां त्यांतच मशीदीच्या घुमटा-वरून बंडाची द्वाहि सर्वभर पसरविली आणि बंडास सुरवात झाली. हें बंड नेपोलियननें फार झपाट्यानें व लवकर मोडून टाकलें. हें बंड मोडून शांतता होते न होते तोंच कांहीं अरब स्वार घोड्यावर बसून केरो शहरावर चालून येत असल्याची खबर येऊन कळली, तेव्हां त्यांच्यावर नेपोलियननें लागलाच आपला एक सरदार बरोबर कांहीं लोक देऊन पाठविला. सरदाराबरोबर पाठवलेल्या एका इसमाशिवाय त्या सरदारासुद्धां बाकी सर्व लोक त्या कडव्या अरब लोकांनीं मारून त्यांचे तुकडे तुकडे करून टाकले व ते दूर निघून गेले. ही बातमी चोहोंकडे पसरली. त्यावेळीं सर्व लोक बंडाला उत्सुक असून एका खेड्यांत आणखीं कांहीं अरबांनीं बंड मांडल्याची व कांहीं फ्रेंच लोक फार निर्दयपणानें मारल्याची पुन्हा खबर आली. तेव्हां नेपोलियननें लगेच एक सैन्याची तुकडी त्यांचेवर रवाना केली व त्यांस हुकूम दिला कीं, त्या अरबांना एकदम वेढा घालून त्यांतील हातीं लागतील तितके सर्व लोक मारावे आणि त्यांचीं डोकीं कापून तीं गोणत्यांत घालून केरो शहरांत लोकांनां दाखविण्यास पाठवून द्यावीं. दुसरेच दिवशीं त्या बंडखोरांच्या मुंडक्यांनीं भरलेले गोणते पाठीवर लादले आहेत, असा गाढवांचा तांडा केरो शहरांत येऊन दाखल झाला. आलेले गोणते शहरच्या वस्तींत चवाठ्यावर भर दिवसां रिते केले. या

कृत्याचा परिणाम असा झाला कीं, अरबांनीं दहशत खाल्ली व असले दंगेधोपे यापुढें झाले नाहींत. आणि फ्रेंचांनां निर्भयपणें इकडे तिकडे हिंडतां येऊं लागलें.

थोडे दिवसांनीं तुर्क लोक सिरीयामध्यें मोठा जमाव करीत आहेत व मोठी लढाई करण्याचा त्यांचा विचार आहे, अशी खात्रीलायक बातमी आली. नेपोलियनलाहि हेंच पाहिजे होतें. त्यानें आपल्या सैन्याचा रोंख लागलाच त्या देशाकडे फिरविला व वाटेंत दोन तीन शहरें घेऊन एलएरीश हें महत्वाचें ठिकाण सर केलें. पुढें ता. ४ मार्च रोजीं त्यानें जाफा या प्रसिद्ध शहराला वेढा दिला. वेढा घातल्यापासून दोन दिवसपर्यंत त्या शहरच्या लोकांनीं टिकाव काढला; पण ता. ६ रोजीं फ्रेंचांनीं निकराचा हल्ला केला. याच दिवशीं फ्रेंचांनीं आपला वकील हातांत तहाचें निशाण देऊन किल्याच्या अंमलदाराकडे कांहीं बोलणें करण्यास पाठविला होता. त्याचा त्या तुर्की किल्लेदारानें निर्दयपणानें प्राण घेतला. हें त्या तुर्कीचें कृत्य ऐकून फ्रेंच शिपाई फार चवताळले व ता. ७ रोजीं बतेरीचा मारा करून फ्रेंचांनीं शहराच्या तटाला खिंडार पाडलें आणि आपलें सैन्य एकदम आंत घुसवलें व शहर सर केलें. फ्रेंच शिपाई आंत घुसलें व त्यांनीं हातीं सांपडलेल्या तुर्कांची वेसुमार कत्तल केली. सुमारें तीन हजार लोक कापून काढलें व शहरांत मोठा धुमाकुळ मांडला. हें पाहून नेपोलियननें शिपायांस शांत करून दंगा वंद करण्यासठीं, अजेन व कोइसीर या आपल्या दोन सरदारांस शहरांत धाडलें. त्यांनीं जाऊन दंगा बंद केला; पण परत येतानां शत्रूचे चार हजार शिपाई कैद करून आणले. आपणास जीवदान द्यावें या अटीवर हे शिपाई स्वाधीन झाले होते. धरून आणलेल्या कैद्यांचा हा तांडा पाहून नेपोलियन रागानें म्हणाला, " या मूर्खांनीं हे इतके कैदी कशाला धरून आणले ? यांचे मी काय करूं ? यांस पोटाला देण्याला मजजवळ अन्न नाहीं. यांनां बरोबर घेण्याची कांहीं सोय नाहीं आणि यांनां देशांत धाडण्यास मजजवळ पुरेशीं गलबतेंहि नाहींत!" तेव्हां आतां या लोकांचें काय करावें, याचा त्याला मोठा विचार येऊन पडला. हे आगीचे निखारे पदरांत बांधून ठेवून परदेशांत हिंडण्याची सोय नव्हती. घरें सोडून द्यावे, तर ते बोलून

चालून शत्रू आणि ठरलेले गैरविश्वासू. तेव्हां आतां याला योजावा हें त्याला सुचेना. त्यानें दोनचार वेळां आपले बरोबरच्यं बोलावून त्यांचीहि सल्ला घेतली; पण जेथें नेपोलियनची अक्कल तेथें ती बाहुलीं बापडी काय सांगणार? अखेर तीन दिवस भवती न करून शेवटीं ता. १० मार्च रोजीं या सर्व कैद्यांस गोळ्या घालून टाकावें असा हुकुम दिला व तो लागलाच अमलांतहि आणला. के. कोणी म्हणतात कीं, यांचे बरोबर एलएरीश येथून आणलेले कैदी मारून टाकले.

बोरवानांच्या निर्दय कृत्यांत, राजक्रांतीच्या धामधुमींत किंवा इतर कोणत्याहि बंडाळींत या कृत्याला जोड सांपडणार नाहीं. हें कृत्य वर्णना पलिकडचें अमानुष होतें. सोनपतपानपतानंतर अहमदशहा अबदालीनें हातीं सांपडलेल्या मराठयांच्या दावणी करून त्यांस तरवारीनें ठार मारलें व त्यांच्या डोक्यांचे ढीग आपल्या छावणी पुढें व तंबू पुढें रचून ठेवले. याच्याचसारखें जवळजवळ, हें असूरी कृत्य झालें. शिकारीलोक सावज मारणें तरीहि तें कोंडून ठेवून मारीत नाहींत. मग कोणा मनुष्यांस निराश्रित आणि निःशस्त्र अशा मानवी प्राण्यानां–कोंडून ठेवून त्यांच्यावर गोळ्या झाडाव्या, हें केवढें नीचपण! हें पाहून देवाचें काय; पण दानवांचें आंग देखील घामानें डबडबून जाईल!

याच सुमारास फ्रेंचांच्या सैन्यांत प्लेगच्या सांथीचा उपद्रव सुरू झाला. या सांथीनें लोकहि फार मरूं लागले. सुमारें सात आठ हजार लोक प्लेगनें मरण पावले व रोज फार खराबी होऊं लागली.

ता. १८ मार्च रोजीं फ्रेंचांनीं एकर शहरास वेढा दिला. हा वेढा सुमारें दोन महिनेपर्यंत टिकाव धरून होता. हें शहर समुद्राच्या काठावर असल्यामुळें त्याला त्या बाजूनें सर्व तऱ्हेचा पुरावठा होई. फ्रेंचांच्या कैदेंतून सर सिडने स्मिथ या नांवाचा एक इंग्रज सरदार, नेपोलियन फ्रान्सांतून टूलोन बंदरांतून निघण्यापूर्वीच, एक खोटा बनावट हुकूम दाखवून पळून गेला होता. हाच सरदार या वेढयाचे सुमारास पुन्हां आरमारावर येऊन यावेळीं एकर शहराजवळ समुद्रांत आला होता. त्यानें

सर्व प्रकारें तुर्कांस साह्य केलें. तो बाहेरून दर्याचे बाजूनेंहि फ्रेंचांस सतावूं लागला. सर सिडने स्मिथजवळ फिलिपा नांवाचा एक हुशार फ्रेंच मनुष्य होता. हा पिकार्ड द फिलीपा नेपोलियनचे वेळींच त्याच लष्करी शाळेंत शिकत असून नेपोलियनपूर्वी दोनच दिवस अगोदर तो पदवी घेऊन तेथून बाहेर पडला होता. राज्यक्रांतीचे धामधुमींत याला फ्रान्समधून हद्दपार करण्यांत आलें होतें. त्यानंतर हा निघून इंग्रजांकडे राहिला होता. याला सर सिडनेनें शहरांतील तोफा मांडण्यास व सैन्याची व्यवस्था आणि देखरेख करण्यास तुर्कांचे मदतीस पाठविलें व त्यानें आपलें काम फारच चोख रितीनें बजावलें. युद्धविद्येची संथा एकाच गुरुजवळ पढलेले हे दोघे या ठिकाणीं एकमेकाविरुद्ध लढत होते. पिकार्ड द फिलिपा हा फ्रेंच मनुष्य फ्रेंचांच्या विरुद्ध इंग्लंडच्या बाजूनें लढत होता व नेपोलियन बोनापार्ट हा कार्सिकन शाळेंत फ्रेंचानां शत्रू लेखण्यास शिकलेला फ्रेंचाच्या बाजूनें लढत होता. आधींच शहरांत तोफा चांगल्या होत्या व सर सिडने यानें आणखी दिल्या. दारूगोळा व इतर सामानहि सर सिडनेनें पुरविलें. नेपोलियनजवळ चांगला तोफखाना मुळींच नव्हता. तोफा होत्या त्या आकारानें लहान होत्या. दारूगोळाहि कमीच होता. तरी देखील मोठ्या हिकमतीनें त्यानें साठ दिवसपर्यंत वेढा कायम ठेवला. या साठ दिवसांत एकंदर चाळीस वेळां फ्रेंचांनीं निकराचे हल्ले केले व जिवाची पर्वा न करतां आंत घुसण्याचा पुष्कळ यत्न केला; पण आंतून लोकांचा भडिमार व बाहेरचे बाजूनें सर सिडने स्मिथच्या जहाजांवरून तोफांचा मारा, अशा दुहेरी कैचींत सांपडल्यामुळें नेपोलियनचे सर्व उपाय हरले व त्याचे हजारों लोक तेथें मर्दुमकी करतां करतां मरण पावले. एकदां तर फ्रेंचांनीं सुरुंग लावून तटहि उडवला, शें दोनशें लोक शहरांत शिरले व क्षणभर नेपोलियनचा जय होणार असेंहि वाटलें; पण आंतील लोकांची तयारी फार असल्यामुळें विशेष कांहीं झालें नाहीं. दिवसेंदिवस रोग व महागाई यांमुळें नेपोलियनच्या सैन्याची फारच हलाखी होऊं लागली. कोठून कुमक आणण्याचीहि सवड राहिली नाहीं. अखेर दोन महिन्यानंतर म्हणजे ता. २० मे रोजीं हा एकरचा वेढा उठवून नेपोलियनला परत फिरणें भाग पडलें. आजपर्यंत

सगळ्या जन्मांत मागें पाऊल घेण्याचा प्रसंग नेपोलियनला याचवेळीं प्रथम आला व या अपयशामुळें त्याच्या पुढल्या सर्व आशा कल्पनासृष्टींतच राहिल्या. या एकरच्या वेढयाच्या अपयशाबद्दल तो शेवटपर्यंत फार हळहळे. हें अपयश न येतें, तर मीं जगाचा नकाशा बदलून टाकला असता व जगाचा इतिहास अगदीं निराळा लिहविला असता. या गांवांत मला तीन लाख सैन्याला पुरेल इतकी सामग्री व शस्त्रें मिळवतां आलीं असतीं व त्या जोरावर मी मोठें सैन्य उभें केलें असतें. सिरीयाच्या लोकांना चिथावून त्यांचेकडून बंड करविलें असतें आणि तेथील पादशहाची सत्ता संपुष्टांत आणिली असती. इतकें झाल्यावर हिंदुस्थानची वाट मला सोपी झाली असती. मी एक नवा धर्मग्रंथ लिहीला असता आणि दोन्ही गोलार्धांचें ज्ञान व अनुभव एके ठिकाणीं करून नवे नवे पसारे पसरले असते. हिंदुस्थानांतून इंग्रजांना हांकून लावलें असतें आणि मग मोठ्या डौलानें पुन्हां युरोपशीं संबंध जोडला असता. दमास्कस शहर घेतल्यावर मी हत्तीवर बसलों असतों आणि डोक्याची टोपी टाकून देऊन डोक्यावर मी पगडी घातली असती आणि आशियाचें राज्य मोठ्या थाटानें केलें असतें, असें तो म्हणे. सेंट हेलिना येथें असतां नेपोलियनच्या सर्व आयुष्यांत सर्वांत सुखाचा व आनंदाचा काळ कोणता, असा त्या मंडळींत सहज प्रश्न निघाला. त्यावर कोणीं राज्याभिषेकाचा दिवस म्हणून उत्तर दिलें, कोणीं दुसऱ्या लग्नाचा तर कोणीं पुत्र-जन्माचा, कोणीं एल्बाहून परत फिरतांनाच्या स्वारीचा, अशीं निरनिराळीं उत्तरें योजिलीं.तसेंच एकेवेळीं सर्व आयुष्यांत अत्यंत वाईट असा दिवस कोणता, असा प्रश्न निघाला. त्यावर बहुतेकांनीं एकरचा वेढा उठविला तो, असेंच उत्तर दिलें. खुद्द नेपोलियनलाहि हा एकरचाच दिवस वाटर्लूच्या लढाईच्या दिवसापेक्षांहि जास्त हानिकारक होय असेंच वाटे.

एकरचा वेढा उठवून नेपोलियन ता. २० मे रोजीं परत फिरला. वाटेंत उन्हाळा फार होता व बरोबर जखमी आणि आजारी शिपाईहि फार होते. यांपैकीं पुष्कळांना वाटेचे कष्ट सोसतना आणि त्रास फार होई. कांहींना तर नशिबावर हवाला देऊन वाटेंतच ठेवणें भाग पडे. ज्यांचे हातपाय तटले गेले आहेत असे सरदार तिरडीवर घालून

चालवले होते; पण वाटेंत तिरडीचे भोई त्यांना तिरडीवरून निर्दयपणें तापलेल्या वाळूवर उडवून देत आणि तेथें तसेच टाकीत. जखमी शिपा-यांना तर बाजूच्या शेतांत किंवा एखाद्या झुडपाचे आड नशिबावर हवाला टाकून ठेवून देणें भाग पडे. यावेळीं ते शिपाई ज्या काकुळती करीत, त्या ऐक-वत नसत. सैन्याचे हे असे पराकाष्ठेचे हाल पाहून नेपोलियन फारच रंजीस होई; पण त्या ठिकाणीं त्याचा कोणत्याहि प्रकारें इलाज चालण्यासारखा नव्हता. निजावयास तापलेली वाळू व पांघरावयास आकाशाचें पांघरूण अशी तेथें स्थिति होती.

पण या अशा आपत्तींतहि नेपोलीयनचा धीर सुटला नाहीं, किंवा त्याच्या मनाच्या उड्या कमी झाल्या नाहींत. तो स्वतः तर हुशारींत असेच; पण या कठीण फाशांतहि अनेक युक्त्या योजून आपल्या बरो-बरीच्यांस तो धीर देई व त्यांचे मनास हुशारी आणी. शिपायांस पुढील लुटीची, विद्वानांस नव्या नव्या शोधांची आणि सरदारांस मोठमोठ्या हुद्यांची लालूच तो वारंवार दाखवी. आपल्या बरोबरीचा आपला चिटणीस बुरिया यास एके वेळीं तो म्हणाला, "तुझें नांव आतां अजरामर होईल."

" यावर बुरीयानें विचारलें, तें कसें ?"

नेपोलियनः–तूं माझा चिटणवीस आहेस. माझी कीर्ती दिगंत पसरली, म्हणजे तुझें नांव अजरामर झालेंच समज.

यावर थोड्या आदबीनें बुरियानें विचारलें:–अलेक्झांडरच्या चिटणिसाचें नांव सांगा पाहूं.

या वेळेपुरता तरी डाव नेपोलियनचे आंगावर आला. हें सर्व सैन्य टेंटूरा येथें आलें, तेव्हां तर त्याची दशा पाहून नेपोलियनला अतिशय वाईट वाटलें. जखमी आणि आजारी यांची थोडीतरी सोय व्हावी म्हणून त्यानें सैन्यांत असा हुकूम काढला कीं, सर्वांनीं पायींच चालावें व घोडीं, उंटें व खेंचरें जखमी आणि आजारी असतील त्यांनां द्यावींत. ताबडतोब हा हुकूम बरथीयरकडे पाठवून त्याच घटकेपासून त्याची अंमलबजावणीहि करावी अशी ताकीद दिली. तेच दिवशीं रात्रीं नेपोलिनचा खास नोकर त्याचेजवळ गेला व त्यानें विचारलें, "सरकार, तुमचे स्वारीसाठीं उद्यां कोणता घोडा तयार ठेवावयाचा ?" हे शब्द ऐकून नेपोलियन असा

संतापला कीं, त्यानें आपल्या हातांतल्या चाबकाचा एक फटका जोरानें त्यास लगावून म्हटलें, "प्रत्येक इसमानें पायानेंच चाललें पाहिजे व मी तर प्रथम चालूं लागेन! मूर्खा, तुला माझा हा आजचा हुकूम अजून कळला नाहीं काय? जा, येथून चालता हो." स्वतः केलेला कायदा नेपोलियन दुसऱ्यास मोडूं देत नसे व स्वतः आपणहि मोडीत नसे.

टेंटूराहून जाफाच्या वाटेनें हें राहिलेलें सैन्य केरो येथें परत आलें. केरो येथें येतांना तर वाटेंत फारच कष्ट झाले. बरोबरचे लोक आणि पुष्कळ सामान टाकून द्यावें लागलें. ज्या तोफामुळें इतके दिवस सारखे यश येत असे व ज्यांच्या आवाजानें सर्व हादरून जाई, त्या जड तोफा वाटेंत वाळूंत पुरून टाकाव्या लागल्या. हें पाहून तर शिपायांना अत्यंत दुःख वाटलें. जाफा येथें मेच्या २४ तारखेपासून २८ तारखेपर्यंत चार दिवस सैन्याचा मुक्काम होता. या वेळीं तेथें उन्हाळा फारच कडक होता व शहरांत प्लेगचा आजार जोराचा चालू होता. नेपोलियनच्या सैन्यांत या वेळीं बरेच लोक प्लेगनें आजारी झाले. यांची सुश्रूषा करण्याची बिलकूल सोय नव्हती आणि ते इतके आजारी होते कीं, ते जगण्याची कांहींच आशा नव्हती. या वेळीं त्यांचे काय करावें हा मोठाच प्रश्न येऊन पडला. तेव्हां नेपोलियननें आपले वैद्य बोलावून आणून त्यांस असें सुचविलें कीं, हे लोक एवीतेवी मरणारच. तर तुम्ही त्यांस विष देऊन त्यांचा शेवट लौकरच करावा. अशानें त्यांचे हाल तरी वांचतील; पण हें कृत्य करण्यास वैद्य कबूल होईनात. ते म्हणाले, 'आम्ही वैद्य आहों. खाटिक नाहीं. देहांत प्राण आहे तोंपर्यंत जीव वांचविण्याचे होतील ते यत्न आम्ही करूं.' जाफा सोडल्यावर अशाच हाल अपेष्टा भोगीत हें सर्व सैन्य तारीख १४ जून १७९९ रोजीं केरो येथें जाऊन पोंचलें.

केरो येथें दाखविण्यासाठीं बरोबर कांहीं कैदी आणले होते. थोड्या थाटानेंच केरो शहरामध्यें नगर प्रवेश केला व आम्हीं विजय मिळवून परत आलों, अशा अर्थाचा जाहिरनामाहि प्रसिद्ध केला. कांहीं तोरणें व निशाणें समारंभानें दाखविलीं. डुराक, लेन्स, क्लेबर वगैरे मोठ मोठे सरदार जखमी झाले होते, त्यांना हळूच छपवून मागाहून शहरांत नेलें, कीं कमीपणा न

दिसावा. आलेक्झांड्रिया येथें फार दिवस मुक्काम झाला नाहीं, तोंच इंग्रजाच्या साह्यानें पंधरा वीस हजार तुर्की फौज अबूकीर येथें उतरली असून सर सिडने स्मिथ याच्या मदतीनें ती तेथून हल्ला करणार आहे, अशी खबर मारमां यानें दिली. ही बातमी ऐकून नेपोलियनला बरें वाटलें. असें कांहीं तरी होईल, इंग्रज आपल्या जहाजांतून तुर्की फौज आणून कोठें तरी उतरवतील, असें त्याला वाटतच होतें. त्याप्रमाणेंच आतां घडून आल्याची बातमीहि आली. त्याबरोबर लगेच नेपोलियनची वृत्ती एकदम पालटली. तो आपल्या तंबूंत गेला व त्यानें आपले चिटणीस आंत बोलवून सैन्याला हुकूम सांगण्यास सुरवात केली. रात्रभर तो काम करीत होता. पुढील योजना त्यानें नीट तयार केल्या व त्याच पहांटे चार वाजले नाहींत तोंच नेपोलियन आणि त्याचें सैन्य अबुकीरची वाट चालूं लागलें. तो फौजेसह आलेक्झांड्रिया येथें ता २४ रोजीं मध्यरात्रीचे सुमारास जाऊन पोंचला व लगेच पहांटे उजाडतां त्यानें लढाईला सुरवात केली. थोडेच वेळांत त्यानें शत्रूच्या सैन्याची त्रेधा उडवून दिली. तुर्की लोक म्हणजे भले धिप्पाड पुरुष, शरीरानें मजबूत व फार कांटक. तरी त्यांच्यावर नेपोलियन अशा झपाट्यानें तुटून पडला कीं, ते पळून जाऊं लागले. कांहीं थोडे जवळच अबूकीर गांवांत गेले. त्यांचाहि फ्रेंचांनीं समूळ फडशा पाडला. कांहीं दिवसांपूर्वी नेल्सननें याच अबूकीर गांवाजवळ फ्रेंचांचा पाण्यांत मोठा पराभव केला होता. त्याचें सव्याज उसनें या वेळीं नेपोलियननें त्याच गांवाजवळ जमिनीवर फेडून टाकिलें. लढाई पुरी झाल्यावर नेपोलियननें कैद्यांची सोडवणूक करण्याचें बोलणें लावण्याच्या मिषानें एक वकील तुर्कांकडे पाठविला; पण सर सिडने स्मिथ यानें त्यास तुर्कांकडे न जाऊं देतां आपले जहाजावर नेलें व सामोपचाराचीं कांहीं बोलणीं बोलून त्याबरोबर एका फ्रेंच वर्तमानपत्राची ताजी फाईल त्यानें नेपोलियनकडे पाठवून दिली. असें करण्यांत मोठी खोंच होती.

फ्रान्सशीं दळणवळण तुटल्यामुळें आपल्यामागें यूरोपांत व फ्रान्सांत काय प्रकार झाले आहेत, हें नेपोलियनला मुळींच समजलें नव्हतें. यामुळें फाईल घेऊन तो मोठ्या उत्सुकतेनें ती वाचूं लागला. वर्तमानपत्रांत

फ्रान्सचा जिकडे तिकडे पराजय झाल्याची हकीगत लिहिलेली होती व राजकारण प्रकारणींचेहि अनेक घोंटाळे त्यांत दिले होते. वर्तमानपत्रांचे ते अंक वाचल्यावर जवळ बुरीआं होता,त्यास नेपोलियन म्हणाला,"माझ्या मागें या मंत्री-मंडळानें सबंध इताली देश हातचा गमावून टाकला. इतके परिश्रम करून मीं जें मिळविलें, तें सर्व यांनीं घालविलें व फ्रेंचांचा वचक आणि नांवहि नाहींसें करण्याची यांनीं वेळ आणिली. म्हणून आतां आपणांस इजिप्तमधून गेलेंच पाहिजे." लागलाच त्यानें फ्रान्समध्यें परत जाण्याचा बेत कायम ठरविला व तो आलेक्झांड्रिया येथें आला; पण यावेळीं त्याचेजवळ कांहींच सामग्री नव्हती आणि वाटेंत इंग्रज जहाजांनां चुकवून भूमध्यसमुद्र वलांडून जाणें अवश्य होतें. तरीहि आपला बेत अगदीं गुप्त राखून बरोबर थोडें फार सैन्य घेऊन तो देशीं परत जाण्यास निघाला. आपला फ्रान्सांत जाण्याचा बेत त्यानें अखेरपर्यंत कोणास कळूं दिला नाहीं. अत्यंत अवश्य तेवढेंच सामान गलबतांवर घेतलें व सुमारें दोन महिने पुरेल इतकी सामुग्री घेतली. आपण सभोंवतालचीं बेटें पाहण्यास कांहीं दिवस जाणार आहों. असें त्यानें सर्वांस कळविलें व मागें नीट बंदोबस्त रहावा म्हणून क्लेबर यास अंमलदार नेमून शिस्तीचे नियम बांधून दिले, आणि एके दिवशीं तो आपल्या ठरलेल्या लोकांसह गलबतांकडे निघुन गेला. गलबतांत चढतांनां मंडळी ज्या घोड्यांवर बसून गलबतांकडे गेली, ते घोडे त्यांनीं खोगीरांसुद्धां तसेच परत सोडून दिले. घोडें परत रिकामे फिरले ते तटक शहरांत गेले. नेपोलियनला व बरोबरच्या मंडळीला कांहींतरी अपघात झाला असावा असेंच प्रथम सर्वांनां ते घोडेपाहून वाटलें; पण थोडे वेळानें खिजमतगार परत आले, तेव्हां त्यांचे तोंडानें नेपोलियन गलबतांत बसून गेल्याची बातमी शहरचे लोकांस कळली.

सुमारें दीड महिना नेपोलियन दर्याची वाट चालत होता. वाटेंत आपण कदाचीत इंग्रजी जहाजांच्या हातांत सांपडून धरले जाऊं, ही विवंचना त्याला सर्वकाळ होती. जरा कोठें दूर कांहीं दिसलें कीं, तो लागलाच जहाजावर वरचे बाजूला येऊन दुर्बीण घेऊन पाहूं लागे. आणि मग तासचे तास तसाच तेथें राही. त्यानें आपले जहाजावरील नाखोयास, नेहमींच

वाट टाळून जाण्यास सांगितलें होतें. कदाचीत् इंग्रजांनीं आपणांस गांठलेंच तर आपण लागलीच घाई करून जमीनीवर उतरूं व मजजवळ जे थोडे शूर शिपाई आणि तोफा आहेत, त्यांचे मदतीनें आपण इंग्रजांस तोंड देऊं व त्यांचे हातून सुटून जाऊं; असा त्याचा बेत होता. या लहानशा सफरींत त्याचें मन फार अस्वस्थ होतें. वाटेंत वादळेंहि झालीं व बरोबरींचे चार पांच सरदार आजारी पडून दिवंगत झाले. इंग्रज पकडतील ही एक भीति होतीच; पण शिवाय फ्रान्समध्यें काय परिस्थिति आहे? तेथले लोक आपणास काय म्हणतील? अपयश घेऊन परत आल्याचा परिणाम काय होईल? या गोष्टींची चिंताहि त्याचे मनाला फार वाटे. अखेर अगदीं किनाऱ्याजवळ आल्यावर एका इंग्रजी जहाजानें यांस गांठलेंच; पण त्याचे हातून निसटून जाऊन ता. ८ आक्टोबर रोजीं ही मंडळी फ्रेजूसच्या बंदरांत येऊन पोहोंचली.

प्रथम गांववाल्यांनीं या मंडळीला ओळखलें नाहीं व त्यांच्यावर गोळ्याहि झाडल्या; पण यांचे आनंदाचे हावभाव व यांच्या आरोळ्या ऐकून लवकरच लोकांनां यांची ओळख पटली व देशाच्या या संकटसमयीं आपला आधार जो नेपोलियन तो देशांत परत आला, ही गोष्ट ज्याचे त्याचे तोंडीं होऊन सर्वांनां आनंद झाला. सांगण्यालाहि वेळ लागेल इतक्या थोडया अवकाशांत त्या गांवचे लोक बंदरावर जमा झाले व त्यांनीं या परतलेल्या आपल्या देशबंधूंचें फार गौरवानें स्वागत केलें. नेपोलियन आला हें पाहून त्या गांवकऱ्यांना इतका आनंद झाला कीं, त्यांच्या झुंडीच्या झुंडी यांच्या गलबताभोंवतीं जमल्या व त्यांनीं यापैकीं पुष्कळांस मोठया प्रेमानें आपल्या खांद्यावर उचलून जमीनीवर नेऊन ठेविलें. कोणीं तितक्यांतल्या तितक्यांत फुलें आणलीं, कोणीं माळा आणल्या व कोणीं यांच्या उपहाराचीहि तयारी केली. यांच्या स्वागतासाठीं जमलेल्या मंडळींत सर्व दर्जाचे पुरुष व बायका होत्या. त्यांतच जरा एक पोक्त बायको आली होती. हिनें दुरूनच नेपोलियनकडे पाहून मोठयानें "बाळा" म्हणून हांक मारली. तिचा शब्द नेपोलियननें लागलाच ओळखला व आपल्या कार्सिकन देशच्या भाषेंत 'माडू' म्हणजे माते म्हणून तिला ओ दिली. ही बाई म्हणजे जिनें

नेपोलियनला बाळपणीं वाढविलें ती ' कामिला लारी ' नांवाची दाई होती. हिनें आपले बरोबर शिशांत भरून स्वच्छ दूध आणलें होतें.तो दुधाचा शिसा नेपोलियनच्या पुढें करून ती मोठ्या प्रेमानें म्हणाली, 'बाळा तूं अगदीं लहान होतास, तेव्हां तुला माझ्या थानांतलें दूध मीं पाजलें होतें; पण आतां तुला देण्याला तें दूध मजजवळ नाहीं. म्हणून मीं स्वतः पाळलेल्या बकरीचें दूध तुजकरितां आज आणलें आहे, तें हें घे.' हे त्या प्रेमळ दाईचे शब्द ऐकून नेपोलियनला आनंदाचें भरतें आलें व इतर सर्व मिष्ट पदार्थ बाजूला सारून तिच्या हातांतून दूध घेऊन तें तो मोठ्या हौसेनें प्याला.

फ्रेजूस येथून पारीसकडे येतांनां वाटेंतील प्रत्येक शहरच्या लोकांनीं नेपोलियनच्या गौरवाकरतां फार थाटाचे समारंभ केले. खेड्यापाड्यांतील लोकांनींहि आपआपल्या ऐपतीप्रमाणें त्याचें फार अभिनंदन केलें. मोठमोठे विजय संपादून तो परत आल्यावरहि इतके उत्साहानें समारंभ झाले नसतील; पण यावेळीं नेपोलियन फ्रान्समध्यें परत आलेला पाहून सर्वांना फार उत्साह व आनंद वाटला. ठिकठिकाणीं सभा भरवून लोकांनीं त्याचे स्वागतार्थ भाषणेंहि केलीं.

---

प्रकरण आठवें.

## डायरेक्टरीचा नाश.

इजिप्तमधून परत येतांनां नेपोलियनच्या मनांत अनेक तऱ्हेचे भीतिदायक विचार येत असत. वैरीहि चिंतणार नाहीं, तें मन चिंतितें, असें त्याचें झालें होतें. समुद्रांत गलबतें हाकारतांनां सर सिडने स्मिथ हा गोड्या पाण्याचा पुरवठा करून घेण्यासाठीं दूर गेला आहे, अशी पाळत राखून त्यानें आपलीं गलबतें हाकारलीं होतीं; पण न जाणों सर सिडनेला खबर कळून तो चटकन परतला तर काय होईल ही एक भीति होतीच. शिवाय समुद्रामध्येंच कोठें इंग्रज आरमाराच्या गस्तीच्या जहाजांपैकीं कोणाची गांठ पडली, तर केवढा प्रसंग ओढवेल, ही धास्ती त्यापेक्षांहि जास्त

होती व याकरितां तो नेहमींचा राबता रस्ता सोडून कडेकडेनेंच आपलीं गलबतें चालवीत होता. यापेक्षांहि देशांत पोंचल्यावर काय होईल हीहि हुरहुर त्याचे मनाला होती. टुलोन मधून इजिप्तकडे जातांना पांचशें जहाजें रवाना झालीं होतीं, तीं सर्व नाहींशीं होऊन आतां कायती फक्त दोन तरांडीं परत आलीं. तसेंच मोहिमेला निघतांनां ४००० चार हजारापेक्षां जास्त लोक गलबतावर चढले; त्यापैकीं आतां पुऱ्या चारशें ४०० चेहि पाय फ्रान्स देशाला लागलेले दिसत नाहींत, याचे लोकांना काय वाटेल हा विचार त्याच्या मनांत अनेक वेळां येई. फ्रान्समधले हजारों शूर शिपायी मीं इजिप्तमध्यें नेऊन गारद केले, सर्व वाळवंटभर फ्रेंचांचीं हाडें पिसरून वाळत घातलीं व म्हणण्याजोगें विशेष कांहीं न मिळवितां परत आलों, याचा माझे शत्रू फ्रेंचांनां मोठा बाऊ करून सांगतील व लोक माझी अवहेलना करून माझे सर्व अधिकार काढून घेतील कीं काय, अशी चिंता त्याला वारंवार वाटे. एक मन त्याला असेंहि सांगे कीं, न जाणो कोणी शत्रूंनीं इतक्या फ्रेंच शूरांच्या नाशास मी कारण झालों, व जे राहिले त्यांनां तेथेंच टाकून मी परतलों याचा मोठा गिल्ला केला आणि लष्करी न्यायासनासमोर चौकशीचा प्रसंग आला, तर माझी मान धडापासून खासच दूर होईल ! असे अनेक विचार त्याचे मनांत येत. पण तसा कोणताहि प्रकार न होतां लोक उलट त्याचा मोठा जयजयकार करूं लागले व अगदीं अडचणीचे वेळीं नेपोलियन आपणांमध्यें येऊन हजर झाला, हें पाहून लोक कृतज्ञतेनें त्याचे गोडवेच गाऊं लागले. हें पाहून नेपोलियनला फार समाधान वाटलें. निघण्यापूर्वी थोडेच दिवस मिळविलेल्या अबूकीर येथील विजयाची व तेथें इंग्रजांचें साह्य असतांहि तुर्कांच्या केलेल्या पूर्ण मोडाची हकीगत फ्रान्समध्यें आल्यावर नेपोलियनबरोबरचे लोक सर्वभर अभिमानानें सांगत व फ्रेंच लोकहि ती हकीगत मोठ्या कौतुकानें ऐकत. स्वतः नेपोलियनहि तुर्कांचा असा पुरा मोड केल्यानंतर मला तिकडे चांगलें राज्य स्थापन करतां आलें असतें; पण इकडील माझ्या देशावरचा हा कठीण प्रसंग व ओढवलेलें संकट मला कळल्यावर तिकडील सर्व विजय बाजूला सारून माझ्या पुढल्या सर्व आशा गुंडाळून ठेवून मी तांतडीनें निघून फ्रान्समध्यें

परत आलों, असेंच वारंवार सुचवी. यामुळें लोकांनां त्याचें फार कौतुक व उपकार वाटत. यावेळच्या एका प्रवाशानें आपल्या प्रवास वृत्तांत असें लिहून ठेवलें आहे कीं, मी ज्या ज्या खेड्यापाड्यांतून हिंडलों, त्यांतले लोक एकमेकांत बोलतांनां वारंवार म्हणत, नेपोलियन अजून कां येत नाहीं? तिकडे इजिप्तमध्यें तो काय करीत आहे ? इकडे फ्रान्स देश इतक्या संकटांत असतां, त्याच्यानें दूर कसें राहवलें ? आणि ते लोक, नेपोलियन परतल्याची खबर तुम्हांस आहे काय? असें मला नेहमीं विचारीत. यावरून एकंदर जनसमाजास नेपोलियनविषयीं काय वाटत असेल, याची उत्तम कल्पना होते.

नेपोलियन परत आल्यावर त्याचे घरांत व घराबाहेर, सर्वत्र मोठी अंदाधुंदी माजून राहिल्याचें त्याच्या नजरेस आलें. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, असा प्रकार सर्वत्र झाला होता. घरांत जोसेफाईन ही मन मानेल तसें वागूं लागली होती. आधींच तिचा स्वभाव थोडा खर्चिक होता. व नेपोलियनची घरधनीण झाल्यापासून तर तो स्वभाव जास्त वाढला. कर्ज काढून चैन करण्यालाहि ती कधीं कमी करीत नसे. नेपोलियन इजिप्तमध्यें असतांनां हिनें पुनः बारस व माडम द स्ताएल यांची संगत धरली व ती वारंवार त्यांच्याकडे जाऊन राहूं लागली. गोहीयर डायरेक्टर हा नेपोलियनचा मनापासून द्वेष करी. त्याची व जोसेफाईनचीहि मैत्री जमली. त्याचेकडे जाऊन ती नेपोलियनच्या व त्याच्या कार्सिकन कुटुंबाच्या वाटतील तशा टवाळ्या करूं लागली. बरेच दिवस झाले तरी इजिप्तमधून नेपोलियनची कांहीं खबरहि येत नाहीं, तेंव्हां कोणी कोणी तो तिकडेच खपला, असेंहि उघड उघड बोलूं लागले. तेंव्हांपासून तर ती प्रतिष्ठितपणें गोहीयर याच्या घरीं जाऊन आनंदानें राहूं लागली. गोहीयरच्या सल्यानें नेपोलियनशीं आपण घटस्फोट करून टाकावा, असेंहि तिनें योजिलें व तसें करण्याची तयारीहि केली; परंतु इतक्यांत नेपोलियन परत आल्याची खबर तिला कळली, तेंव्हां तिनें तो सर्व बेत तसाच सोडून दिला. नेपोलियन परत आपल्या घरीं आला, ते दिवशीं जोसेफाईन घरांत नव्हती. तिचे कांहीं कांहीं चाळे त्याच्या कानावर आधींच

गेले होते; पण या दिवशीं ती घरांत नाहीं हें पाहून तो फारच रागावला. पुढें दोन दिवसांनीं ती आली, तेव्हां नेपोलियननें आपल्या खोलीचें दार आंतून लावून घेतलें व तिला आंत येऊं दिलें नाहीं. मी तुम्हांस सामोरी गेलें होतें; पण तुमची व माझी चुकामुक झाली, अशी तिनें आपल्या गैरहजिरीची सबब सांगितली; पण ती त्यानें मानली नाहीं. शेवटीं स्त्री जातीचें जें मोठें हत्यार तेंहि तिनें उपसलें व रडून अनेक तऱ्हेचे कांगाव केलें; पण तेंहि व्यर्थ गेले. त्यानें म्हणून तिला आपल्या खोलींत येऊं दिलें नाहीं. अखेर अजेन व हार्टेन्स हीं आपलीं मुलें आणून तिनें तेथें रडविलीं व फार फार गयावयां केलें; तेव्हां आतां हें प्रकरण वाढलें, ही गोष्ट बाहेर पसरत जाऊन आपले शत्रू हिचा गाजावाजा करून आपली नाचक्की करतील, त्यांना आडून टवाळ्या करण्यास हें एक आयतेंच साधन होईल व हें असें होणें यावेळीं तरी अगदीं योग्य नाहीं, असा विचार करून त्यानें जोसेफाईनशीं पुन्हां पहिल्यासारखी वागणूक सुरू केली. तिनेंहि सारावेळ रडून व मोठ्यां मायावीपणानें बोलून, लवकरच नेपोलियनचे मनावर पुन्हां आपली छाप बसविली व घरांत नीट तऱ्हेनें नांदून ती पुन्हां संसार करूं लागली. सर्व चाळे कांहीं दिवस अगदीं बंद पडले.

हा घरांतला प्रकार झाला; पण घराबाहेरचा प्रकार यापेक्षां फार भयंकर व घोंटाळयाचा झाला होता. फ्रान्सचीं सर्व राज्यसूत्रें हल्लीं पांच डायरेक्टरांच्या हातांत होतीं. ते सगळेंच एकासारखे एक अकलेचे खंदक होते. त्या पांचांत हिंमतीचा पुरा व युक्तीनें कामें करून घेणारा असा कोणीहि नव्हता. फ्रान्स देशाच्या किर्तीला डाग लागण्यापेक्षां आपल्या पोषाखाला डाग लागण्याची त्यांनां ज्यास्त पर्वा वाटे. समरांगणावर जाऊन शत्रूला तोंड देण्याचें शौर्य कोणालाहि नव्हतेंच; पण घरांत बसून धूर्तपणानें पानावर पान ठेवून आपला आब राखून शत्रूशीं सख्य करून रहावें, हेंहि त्यांनां साधलें नाहीं. नेपोलियनची पाठ फिरल्यावर चोहोंबाजूंनीं शत्रू पुन्हां डोकावूं लागले व आजपर्यंत मिळविलेले प्रांत हातांतून पटापट जाऊं लागले. सभोंवतालच्या राजांवरचा वचक बहुतेक सर्व उडून गेला. इतकेंच नव्हे तर उलट त्यांचाच वचक आतां फ्रान्सला वाटण्याचीं चिन्हें दिसूं

लागलीं. बोरबान येतील कीं काय ? अशीहि धास्ती पुष्कळांना वाटूं लागली. आणि या निःसत्व पंचांच्या पंचभेळी राजकारभाराबद्दल लोकांच्या मनांत तिटकारा येऊं लागला. पंचांत आबेसाईस, रूबेल यांच्या सारखे विद्वान कायदेपंडीत होते; पण हे वकील कोर्टांत कज्जे भांडतील, म्हणून समरांगणांत शत्रूंशीं यांच्याच्यानें झगडवेल कीं काय? स्विट्झरलंड व उत्तर इताली या भागांत आर्च ड्यूक चार्लसनें फ्रान्सची बरीच गाळण उडवून दिली व त्याला रशियन सरदार सुलोराफनेंहि चांगली मदत केली. यास तोंड देण्या सारखे हिंमती सरदार आतां फ्रान्समध्यें कोणीहि नव्हते. बरीच मंडळी नेपोलियनबरोबर गेली होती. कारनो इजिप्तमध्यें गेलेला नव्हता; पण त्याला दैरेक्टरांनीं कांहीं निमित्त्यानें हद्दपार केला होता. यामुळें दुय्यम दर्जाच्या सरदारानांच आतां शत्रूचें तोंडावर धाडणें भाग पडलें; पण त्यांनांहि मागाहून पुरवठा नीट झाला नाहीं. यामुळें जार्डन, मासिना, वगैरेचा अनेक ठिकाणीं पराभवच होत गेला. इतालींतले पूर्वीं जिंकलेले प्रांत हातचे सुटून गेले व दिवसेंदिवस शत्रू जोरावत चालले. पुष्कळ सैन्य उभारण्यासाठीं अनेक उपाय केले; पण ते कांहींच जमेना. वीस ते पंचवीस पर्यंतच्या सर्व अविवाहित पुरुषांनीं एकदम सैन्यांत येऊन दाखल झालेंच पाहिजे, असा सक्तीचा कायदा केला. यामुळें पुष्कळ सैन्य जमेल असें वाटलें होतें; पण असें कांहींच झालें नाहीं. कायद्याचा अम्मल टाळण्यासाठीं लोकांनीं एकदम लग्नें लावलीं व सैन्य भरतीच्या रजिस्टरांऐवजीं लग्नाचीं रजिस्टरें भराभर भरूं लागलीं. कांहींच जम जमत नाहीं, हें पाहून दैरेक्टर आपआपसांत भांडूं लागले व जो तो दुसऱ्यावर सर्व जबाबदारी ढकलूं लागला.

देशांतल्या देशांत देखील ‘ बळी तो कान पिळी ’ असें होऊं लागलें. राज्याचे सूत्रधार नालायक असल्यामुळें इतर हलकीं पात्रें वाटतील तसें अरेरावीचे प्रकार करूं लागलीं. भर दिवसां जे अनन्वित कृत्यें व बंडाळ्या करीत, त्यांचेंहि पारिपत्य होईनासें झालें. आंगीं कर्तृत्त्व नसल्यामुळें, देशांतलीं इतर कर्तृत्त्ववान माणसें, नसती अडचण व फाजील अडगळ वाटूं लागलीं व त्यांना हद्दपारीच्या शिक्षा होऊं लागल्या. याप्रमाणें जवळ जवळ

साठ हजार माणसें हद्दपार झालीं. अर्थात देशाची इतकी शक्ति कमीं होऊन, शत्रूला जोड मिळाली. 'घरांत दुहि माजली म्हणजे शत्रूला बळ चढतें' या दादासाहेबांच्या म्हणीचा अनुभव सर्वांना येऊं लागला. सारांश फ्रान्स-मध्यें सर्वांना–म्हणजे ज्यांना आपल्या देशाबद्दल कांहींतरी कळकळ वाटत असे अशा सर्वांना–कोणीतरी धूर्त व हिंमती पुरुष हीं सूत्रें हातांत घेईल तरच नीट धडगत आहे; नाहींपेक्षां हें वाऱ्याबरोबर वाहणारें आपल्या देशाचें तारूं केव्हां खडकाळा लागून फुटेल याचा भरंवसा नाहीं, असें खास वाटूं लागलें. स्वतः डायरेक्टरांनाहि आपण या जबाबदारींतून एकदां कसे पार पडूं असें होऊन गेलें. अखेरीस पुढें काय होईल तें होवो पण आज आहे या व्यवस्थेंत व सूत्रधारांत बदल अवश्य झालाच पाहिजे असें प्रत्ये-काच्या मनानें घेतलें. कारण अजून प्रत्येकाला राजक्रांतीच्या धुमश्चक्रीची, त्यावेळच्या अंदाधुंदीची व राब्स पीएर सारख्यांच्या घाशिरामशाहीची पुरती आठवण होती व तेच प्रकार पुनरपि सुरू होतात कीं काय, अशी आतां सर्वांना भीति वाटूं लागली होती. याच सुमारास दैरेक्टरांनीं पोलि-सचे सर्व अधिकार फुशे याजकडे सोपविले. तेव्हां तर फारच कहर उडाला. त्याच्यासारख्या कारगुजार व पाषाणहृदयी माणसावर कोणी जोरदार धनी नसल्यामुळें त्याला सगळेंच रान मोकळें सांपडलें.

देशाबाहेरचे इतर राजे व देशांतून बाहेर घालवलेले बोरबॉन् राजघरा-ण्याच्या तर्फेचे लोक हे नेहमीं बंडाळ्यांना चिथावणी देत, पैसा पुरवीत व लोकांत अस्वस्थता उत्पन्न करीत. तुमच्या हातून हे अराजक राज्ययंत्र शेवटास जाणार नाहीं, फ्रान्सच्या हवेंत ही नवी टूम टिकणार नाहीं, लोकसत्तात्मक राज्यपद्धतीला फ्रान्स देश अजून लायक नाहीं, असें ते लोक जनतेच्या मनांत, होतील ते यत्न करून नेहमीं भरवीत. डायरेक्टरांपैकीं बारसला तर आपण हें लोकसत्तात्मक राज्याचें जोखीम सोडून द्यावें, बोरबॉन् राजास पुन्हां गादीवर बसवून त्यांचें, आपलें व फ्रान्सचें कायमचें बरें करून घ्यावें; असेंहि थोडें थोडें वाटूं लागलें होतें. बारसला वाटलें तेंच थोड्या फरकानें दुसऱ्या एका त्याच्या स्नेह्यासहि वाटलें व या दोघांनां वाटलें तें सर्व जोसेफाईनला साहजिकच पटलें; पण याचवेळीं फ्रान्समध्यें

जाकोबाईन नांवाचा एक पक्ष जोरावला होता. हे लोक पूर्ण जळजळीत मताचे होते. ते म्हणत, कांहीं झालें तरी पुरवलें; पण आम्हीं लोकसत्तात्मक-राज्य-पद्धतच चालवूं. याखेरीज इतर प्रकार आम्हीं आमचे देशांत चालविणार नाहीं व दुसरे कोणासहि तो चालवूं देणार नाहीं. हे ज्वलत्-जहाल लोक हाडाचे अगदीं अराजक होते. ज्यांत राजसत्तेचा कोणताहि प्रकार आहे किंवा ज्या राज्यकारभाराला राजसत्तेची नुसती छठा आहे, अशी, इतकेंच नव्हे, तर नुसती बाहेरूनहि अशासारखीच दिसणारी राज्यपद्धतीहि ते फ्रान्सांत नांदूं देण्यास तयार नव्हते. अशा लोकांपुढें वर सांगितलेले विचार सिद्धीस नेणें केवळ दुर्घट होतें व तें बारससारख्या अडणीवरच्या देवतांनां तर केवळ अशक्यच होतें. पण यालाहि कदाचित मार्ग योजतां येईल. नेपोलियनसारखा शूर शिपाई व अक्कलवान पुरुष साह्य झाला, तर हेंहि घडवून आणतां येईल, अशा दूर विचारानें केव्हां जोसेफाईनमार्फत तर केव्हां इतर मार्गानें ही गोष्ट बारसनें नेपोलियनच्या कानावर घातली होती व हा घाट जमून आल्यास आपलें व नेपोलियनचेंहि कायमचें कल्याण करून घेतां येईल, असें दुरून अप्रत्यक्ष रीतीनें त्यानें हळूच सुचविलेंहि होतें.

या स्थितींत कोणी तरी अक्कलवान्, हुशार, शूर व हीमती पुरुष फ्रान्सची स्थिति सुधारून त्या देशाचें या अंधाधुंदीपासून रक्षण करील, तर फार बरें होईल; असें सर्वसाधरण लोकांच्या मनांत येऊं लागलें आणि आतां नेपोलियन देशांत परत आलेला ऐकून तर सर्वांचे डोळे त्याचेकडे लागून राहिले. युरोपांतले आस्ट्रियासारखें अतिबलाढ्य सैन्य तोंडावर असतां त्याला न जुमानतां, त्यानें इतालीसारखा मुलुख फ्रान्सला मिळवून दिला होता. अत्यंत प्रसिद्ध व फार प्राचीन अशा रोम लोकांच्या सिंहासनाच्या बुरजावर आणि खलिपांच्या मनोऱ्यांवर त्यानें फ्रान्सचें निशाण नेऊन रोंवलें होतें. मोठ्या मोठ्या नामांकित रणशूरांच्या नांग्या त्याच्या पुढें लुल्या पडल्या होत्या. त्याचें नांव ऐकून राजेहि वचक घेत. तेव्हां अशा पुरुषापेक्षां यावेळीं फ्रान्सच्या हांकेला कोण धांवणार ? यावेळीं फ्रान्सला दुसरा कोण पाठीराखा उभा राहणार ? व इतके दिवस अनंत हालअपेष्टा

सोसून फ्रान्सनें लोकसत्तेच्या निशाणाचा जो स्तंभ रोंविला, तो यांचेवाचून कोण सांवरून धरणार ? हें प्रत्येक मनुष्याला वाटूं लागलें होतें व आपण होऊन नेपोलियनच्या दावणींत जाऊन उभे रहाण्यास थोडे फार मतानें तयार झाले होते.

देशाची घाबरलेली स्थिति, जनतेचे क्षुब्ध विचार, बाहेर शत्रूंनीं वटारलेले डोळे, डायरेक्टरांचा कमकुवतपणा व त्यांपैकीं कांहींचें मतलबी धोरण, जाकोबाईन पक्षाचीं कारस्थानें व अशाच सभोंवतालच्या इतर अनेक गोष्टी पाहून एकंदर परिस्थितीचे चित्र नेपोलियनच्या चाणाक्ष नजरेला पूर्णपणें दिसून आलें. त्याच्या मनाप्रमाणें आतां 'फळ पिकलें 'असें स्पष्ट त्याला समजलें व तो तें फळ खुडून घेण्याच्या उद्योगास प्रवृत्त झाला.

इतके दिवस नेपोलियन ज्या लढाया खेळला, त्या लढाया व आतां जी लढाई खेळण्याचें त्यानें योजिलें होतें ती लढाई, या दोहोंत जमीन अस्मानाचें अंतर होतें. इतके दिवस मी लढेन व लढाईचा खेळ खेळून तुम्हांस त्यांत सहज जिंकीन,असें शत्रूंस स्पष्ट व जाहीर बजावतां येत होतें व त्यांची तयारीहि उघडाउघड करतां येत होती; पण आतांची ही लढाई, मी लढणार नाहीं, मी लढत नाहीं व मला लढण्याची इच्छाहि नाहीं, असें म्हणून शेवटपर्यंत निवळ डावपेचानें, युक्तीनें व फार धोरणानें खेळ चालू ठेवण्याची होती. हींतला प्रत्येक पेच फार धोक्याचा होता. ही नागव्या समशेरींची कसरत करणें साधारण नाडेभोरप्याला साधण्यासारखें नव्हतें. हें काम जपून करणें फार अवश्य होतें.

नेपोलियन यावेळीं नित्यापेक्षां फार सावधगिरीनें व धोरणानें वागूं लागला. प्रथम प्रथम तर त्यानें आपल्या लष्करी पेहेरावास अगदींच रजा दिली व तो पारीसमधल्या तत्त्ववेत्त्यांच्या व साहित्य शास्त्रकारांच्या बैठकींत जाऊन बसूं लागला. त्यांच्याशीं नेहमीं संभाषण व वाद करून त्यांनें त्यांचे विचार समजावून घेतले व आपल्या बुद्धिसामर्थ्यानें त्यांच्यावर चांगली छाप बसवून त्यानें त्या पुस्तकीविद्येच्या पंडितांस आपल्या भजनीं लावून घेतलें. आधींचेंच त्याचें वाचन दांडगें होतें, प्राचीन आचार्यांच्या बहुतेक ग्रंथांशीं त्याचा चांगलाच परिचय होता. यामुळें आतां थोडक्याशा

उद्योगानें व आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळें त्याला हें सहज साधतां आलें व शिपायांच्या तरवारींच्या साह्याबरोबर या विद्वानांच्या लेखण्यांच्या साह्याची जोड त्याला मिळवितां आली. पारीसमधलीं बहुतेक वर्तमानपत्रें त्यानें हळूहळू या मार्गानें आपल्या खिशांत उतरविलीं.

थोडेच दिवसांत नेपोलियननें टालेरांला आपल्या मसलतींत घेतला. कबूल केल्याप्रमाणें आपण इजिप्तच्या मोहिमेंत जाऊन मिळालों नाहीं, या विचारानें टालेरां थोडा अवघडला होता; पण "केवळ आजारीपणामुळें व शरीर प्रकृतीमुळें तुम्हांस येतां आलें नाहीं, त्याला तुम्हीं तरी काय करणार ?" असें सांगून त्याबद्दल आपले मनांत कोणताच किंतू नाहीं, असें त्याला पटविण्याकरितां नेपोलियन स्वतः त्याच्याकडे भेटीस गेला. इकडच्या तिकडच्या पुष्कळ गोष्टी होऊन थोडेच वेळांत टालेरां त्यास पूर्णपणें अनुकूल झाला. याचवेळीं नेपोलियनचें व आपलें सख्य असावें, हें त्या दूरदर्शी आणि मतलबी मुत्सद्याला अत्यंत अगत्याचें वाटलें व टालेरांसारखें नस्तर आपल्या पिशवींत असलें तर पुष्कळ दर्दीचा निकाल सहज लावतां येईल, असें नेपोलियननें योजलें. दोघांचीहि गट्टी जमून मनें मिळून गेलीं. टालेरां हा जुन्या राजपक्षांतला नामांकित माणूस व एका मोठ्या मठाचा अधिपति असल्यामुळें त्याची सर्वभर ओळख चांगली होती आणि अनेक तऱ्हेचीं कुलंगडीं त्याचे खिशांत होतीं. यामुळें त्याच्या मार्फतीनें अनेक लोकांशीं सूत्रें बांधतां आलीं. दिवसां हे फारसे एकमेकांस भेटत नसत; पण रात्रीं या दोघांचीं खलबतें व कारस्थानें फार वेळ चालत. एके दिवशीं टालेरांच्या घरीं असें खलबत चालू असतां पहांटेचा प्रहर झाला. चोहोंकडे अगदीं सामसूम होतें व हे दोघे आपल्या कारस्थानांतील बेतांत अगदीं गढून गेले होते. इतक्यांत घराबाहेर रस्त्यावर बऱ्याच माणसांची चाहूल ऐकूं येऊं लागली व थोड्याच वेळांत पोलीस शिपायांच्या व स्वारांचे आवाजहि कानावर स्पष्ट आले. टालेरां आपल्या आत्मचरित्रांत स्वतः लिहितो कीं, 'ते आवाज ऐकून आम्हीं दोघेहि फार घाबरून गेलों. दिवे मालवून हळूच एके बाजूस ठेविले व काय प्रकार आहे, हें पाहण्याकरितां मी लपत लपत गच्चीवर गेलों. आपले बेत फुटून

पोलीस आमच्यावर धाड घालण्यास आले, असें मला वाटलें; पण पुढें होऊन पहातों तों तसा कांहीं प्रकार नसून एका मोठ्या जुगाऱ्याला त्यानें रात्रीं जिंकलेल्या पैशासुद्धां पोलीस घेऊन जात होते; तों वाटेंत आमच्या घरासमोर गाडीचे घोडे बुजून अपघात झाल्यामुळें हा गोंधळ उडाला, असें कळून आलें. थोड्याच वेळांत तो गोंधळ मोडला व पोलिसचे लोक निघून गेले. ' नेपोलियन आणि टालेरां पोट धरधरून हंसले व लवकरच दोघेहि आपल्या उद्योगास लागले.

आपल्या या वेळच्या वर्तनासंबंधें नेपोलियन मागाहून बोलतांना मादम दि रामुसरला म्हणाला कीं, " इजिप्त मधून परत आल्यावर मी फार जपून वागत असें. तो इतका कीं, साऱ्या जन्मांत मी इतका जपून कधींहि वागलों नाहीं. डायरेक्टरानां मी आलेला पाहून वाईट वाटे व मी त्यांच्या डोळ्यांत फार सलतो आहे, हें मला माहीत होतें. मी अबेसाईसची भेट घेई व त्यानें योजलेल्या नव्या घटनेसंबंधीं त्याचेजवळ चर्चाहि करी. राजपक्षीय लोक आणि जहाल पुढारी माझेकडे येत व सल्ला विचारीत. त्यांनांहि मी सल्ला देऊन युक्तीच्या चार गोष्टी सांगत असें; पण हे सर्व करीत असतां माझें धोरण मला नीट संभाळावें लागे. मी लोकांत फारसा मिसळत नसें; पण त्यांना माझेविषयीं कौतुक वाटेल असेंच मी वर्तन ठेवी. या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, माझ्या हातांत सत्ता आली; तेव्हां कोणालाहि त्याचें वैषम्य वाटलें नाहीं. उलट प्रत्येक पक्षाला बरेंच वाटलें.

यावेळीं फ्रान्समधले सर्व श्रेष्ठ अधिकारी किंवा डायरेक्टर ( १ ) बारस ( २ ) आबे साईस, ( ३ ) राजर डुकास, (४) गोहीयर व ( ५) म्युलिन असे पांच जण होते. या सर्व डायरेक्टरांपैकीं आबे साईस हा चांगला नांवाजलेला वकील होता व जरा ताठ्याचा माणूस होता. नेपोलियननें एकदां जेवणाचे वेळीं आपला थोडासा अपमान केला, अशी समजूत झाल्यामुळें तो नेपोलियनचा तिरस्कार करी. हा कालचा शिपुर्डा, राज्यांतल्या आम्हां सर्व श्रेष्ठ अधिकाऱ्यांची नीट आदबी राखीत नाहीं, असेंहि रागाच्या भरांत तो एकदां म्हणाला; पण याचें आणि नेपोलियनचें सख्य जमवून आण-

ण्याचा योग टालेरांनें घडवून आणिला. यावेळीं राष्ट्राला वांचविण्याची ताकद एकट्या नेपोलियनच्याच आंगांत आहे, जमलेल्या परकी शत्रूंना चीत करण्याचें सामर्थ्यहि त्याचेच आंगांत आहे, त्याचेवांचून राष्ट्राचा तरणोपाय नाहीं, तेव्हां त्याला आपण तोडतां कामा नये, वगैरे अनेक मुद्दे त्यानें साईसपुढें मांडिले; पण यांपैकीं एकहि मुद्दा साईसला पटला नाहीं. अखेर टालेरांनें नेपोलियनकडून चार लक्ष फ्रांक साईसला देवविण्याचें कबूल केलें व ते दिलेहि, तेव्हां या 'मुद्यानें,' साईसच्या मनाची सर्व बाजूंनीं चांगली खात्री पटली व तो नेपोलियनच्या विचारसरणीस पूर्णपणें अनुकूल झाला. राजर डुकास नांवाचा दुसरा डायरेक्टर साईसचे हातांतलाच होता. तोहि नेपोलियनच्या लगामीं सहजच लागला. बारसनें नेपोलियन-जवळ राजपक्षाला उठवून बंड करण्याची गोष्ट प्रत्यक्षच काढली होती व आपले सर्व बेत नेपोलियनला त्यानें कळविले होते. तेव्हां आतां बारस हा नेपोलियनसमोर मेल्यासारखाच झाला होता. बाकी गोहीयर व म्युलीन हे दोघे राहिले. त्यांत म्युलीनला काय चाललें आहे, हें शेवटपर्यंत दिसलेंच नाहीं. गोहीयरला मात्र थोडेसें दिसलें; पण त्यानें तें नीट डोळे उघडून पाहिलें नाहीं. याचें कारण थोडें नाजूक होतें. तो जोसेफाईनच्या पाशांत सांपडला होता. त्याचें मन तिच्यावर पक्कें बसलें होतें. त्यामुळें तो गाफील राहिला. शिवाय मी डायरेक्टर आहें,या घमेंडींत आणि अभिमानांत तो स्वस्थ होता. अगदीं आदले दिवशीं डुबाय नांवाच्या अधिकाऱ्यानें नेपोलियन, टालेरां व बारस यांचेवर राज्य-क्रांतिकारक अशा गुप्त कटांत सामील असल्याचा आरोप करून त्यांनां पकडून कैद करण्याविषयीं गोहीयर जवळ हुकूम मागितला, तेव्हां गोहीयर म्हणाला, " डुबाय! तुम्हीं म्हणतां अशी क्रांती होणें शक्य नाहीं. लोक-सत्तात्मक-राज्य-कारभाराचे शिक्के ( सीलें ) मी अधिकारी असल्यामुळें मजजवळ आणि माझें ताब्यांत आहेत. त्यांवाचून क्रांतीचे हुकूम सुटतील कसे ? " कदाचित डुबायनें आणखी थोडा आग्रह धरला असता, तर या तिघांस कैद करण्याचा हुकूम गोहीयर सोडता; पण त्याचा चिटणीस लागार्ड तथें होताच, तो इतक्यांत म्हणला कीं, " या वेळीं तुम्हीं कोणताहि हुकूम सोडलात, तरी चिटणीस या

नात्यानें त्यावर मी आपला सही-शिक्का करणार नाहीं. डायरेक्टरांच्या सभेंत आतां तुमचें बहुमत नाहीं." लागार्डचा हात दाबलेला होता, हें गोहीयरच्या लक्षांत आलें नाहीं. यानंतर देखील गोहीयरनें विशेष असें कांहीं केलें नाहीं. त्याचा धीर सुटल्यासारखा झाला.

डायरेक्टरांशिवाय दुसरीं दोन मंडळें ऊर्फ सभा राज्ययंत्राच्या चालक अशा या वेळीं फ्रान्सांत होत्या. एक एनशंट्स ऊर्फ शिष्टांची सभा व दुसरी जुनीअर्स ऊर्फ पांचशें तरुणांची सभा. यांपैकीं पाचशेंच्या सभेंत नेपोलियनचा भाऊ लुसीन बोनापार्ट याचा गेलीं तीन वर्षें शिरकाव होऊन तेथें त्याचें वजनहि चांगलें बसलें होतें. हल्लीं लुसीन बोनापार्ट हा त्या सभेचा अध्यक्ष होता. यामुळें तिकडेहि नेपोलियनचें थोडें फार चालण्यासारखें होतें. राहिली शिष्टांची सभा. यांतीलहि बरीच मंडळी टालेरां व आरमाराचा अंमलदार ब्रू यांच्या साह्यानें नेपोलियननें अनुकूल करून घेतली होती. भीति आणि लोभ या दोन उपायांनीं मनुष्य कोणतेंहि कृत्य करण्यास उद्युक्त होतो. या दोन किल्या कोणत्याहि माणसाच्या मनाचें कुलुप उघडूं शकतात, हें नेपोलियन पूर्णपणें जाणत होता. कांबेसरीस हाहि एक हुशार कायदेपंडित व चांगला विद्वान होता. न्यायसभेंत असतांनां, लुई राजाचा शिरच्छेद करावा, असें त्यानें आपलें मत दिलें होतें. त्याला नेपोलियन वारंवार सांगे कीं, 'उद्यां यदाकदाचित बोरबॉन् राजे परत गादीवर आले, तरी त्यांत माझें कांहीं नुकसान नाहीं. मी या उलथापालथींत कधींच नव्हतों; पण मित्रा, कांबेसरीस, असें झालें, तर तुझी दशा मात्र कठीण होईल, तुला ते ताबडतोब फांसावर चढवतील.' हें नेपोलियनचें म्हणणें त्या कायदेपंडितास खरें वाटलं व म्हणूनच कांहीं झालें तरी बोरबॉन् राजाचें नांव सुद्धां नको, हें त्या विद्वान् वकीलास तात्काळ पटलें व राजपक्षाच्या लोकांची संगत त्यानें सोडून दिली. बोरबोनांच्या पागेंतलें हें सुटलेलें तट्टू नेपोलियननें आपल्या तबेल्यांत आणून तेव्हांच बांधलें.

यावेळीं गांवच्या कोतवालीचा अधिकारी फूशे हा होता. गांवांत काय चाललें आहे, नेपोलियनकडे येतो कोण, जातो कोण, नेपोलियन कोणा-

कोणाकडे जातो, कोठें काय बोलणीं होतात, याची वित्तंबातमी फूशेस होती. त्या धूर्त कोतवालाच्या काकदृष्टीला सगळें दिसत होतें; पण नेपोलियननें त्याची मूठ पुरी दाबली होती. यामुळें हल्लीं बेत करण्यास व पुढें ते घडवून आणण्यास नेपोलियनला फार सोईचें पडलें.

प्रथम देशांत चोहोंकडे जाकोबाईन लोकांचा मोठा कट पसरून राहिला आहे व मोठमोठे अनर्थकारक अत्याचार करण्याची त्या ज्वलत् जहाल अराजकांची तयारी आहे, अशी भुमका सर्वभर फूशेचे मार्फत नेपोलियननें उठवली. लवकरच बातमी सर्वत्र पसरली. या प्रसंगीं डायरेक्टरांच्यानें निभाव लागणार नाहीं व आतां सर्व सत्ता आणि कारभार हीं एकटया नेपोलियनच्याच हातांत असलीं पाहिजेत, असें जो तो म्हणूं लागला.

यावेळीं नेपोलियननें एक मोठा व्यूह रचिला. एनशंट्सच्या ऊर्फ शिष्टांच्या सभेंतले बहुतेक सर्व प्रतिनिधी नेपोलियननें आपणांला पूर्णपणें अनुकूल करून घेतले होते. त्या सभेपुढें नेपोलियननें अनेक महत्त्वाचे ठराव आपल्या हस्तकांचे मार्फत मंजूर करून घेण्याचें ठरविलें होतें. त्यांचीं मुख्य धोरणें तीन होतीं. पहिलें:-त्या सभेनें हल्लीं अराजकांचा एक मोठा कट चालू असल्याचें सरकारी रीतीनें कबूल व जाहीर करावें; पण कटासंबंधीं विशेष माहिती उघड करणें गैर असल्यामुळें ती तूर्त प्रसिद्ध करूं नये. दुसरें:- एनशंट्सची ऊर्फ शिष्टांची व ज्युनीअर्स ऊर्फ पांचशें तरुणांची, या दोन्ही सभा पारीसमधून कांहीं मैल दूर अंतरावर सेंट क्लाऊड येथें दुसरें दिवशीं भरण्याचा ठराव करावा. तिसरें:-नेपोलिय बोनापार्ट यास पारीस येथील सैन्याचा मुख्य अधिकारी नेमावा व शहरची रखवालदारी त्याचेकडे सोंपवावी. याचवेळीं आणखी असेंहि ठरलें होतें कीं, दुसरे दिवशी सेंट क्लाऊड येथें सभा जमल्यावर आगाऊ ठरल्याप्रमाणें साईस यानें डायरेक्टरींतल्या आपल्या जागेचा राजिनामा द्यावा. तसाच राजर डुकास यानेंहि राजिनामा द्यावा व या दोघांचेहि राजिनामे सेंट क्लाऊडच्या बैठकींत मंजूर करावे. मग पुढें नेपोलियननें असें योजून ठेवलें कीं, हर उपायानें बारस, गोहीयर आणि म्युलिन्स यांनांहि राजिनामे देण्यास कबूल करवावें अथवा अक्कदार भाग पाडावें व असे सर्व डायरेक्टरांनीं आपल्या जागेचे राजिनामे दिले

म्हणजे तूर्त ही संस्था रद्द करून व हा प्रसंग जाणून यावेळीं बोनापार्ट, साईस व तिसरा राजर डुकास यांचें एक तात्पुरतें मंडळ नेमून घ्यावें. राज्य-घटनेची नवी रचना करण्याचे वगैरे सर्व अधिकार त्या तिघांचे हातीं द्यावे. या तिघांस 'कौन्सिल' असें म्हणावें व त्यांच्या मंडळास किंवा कमेटीस 'कौन्सिलेट' असें म्हणावें.

असा सर्व व्यूह रचून तो त्यानें कायमहि केला; पण त्याप्रमाणें सर्व घडून येण्यास अनेक तऱ्हेच्या हरकती येण्यासारख्या होत्या. तरुणांच्या सभेंत कोणी हें सर्व उघड केल्यास त्यांतील शूर, अभिमानी व सरळ मनाचे लोक काय करतील याचा भरंवसा नव्हता. त्या सभेंत मताधिक्याची सरशी होऊन हे सर्व ठराव मंजूर करून घेणें हें काम फार बिकट होतें. पास्क्वीर व मोरो सारखे लोक जनतेचीं मनें चटकन वळवूं शकतील व थोडासा जरी दंगाधोपा झाला, तरी हें काम फसेल; कदाचित् विकोपासहि जाईल व सर्वांचा समूळ नाशहि होईल, हेंहि नेपोलियनला दिसत होतें. म्हणून त्यानें मोरोला सैन्याची सरदारकी देण्याचें कबूल केलें व थोडे दिवसांपूर्वीं डायरेक्टरांनीं मोरोला दुखविला असल्यामुळें त्यानें तें अर्धवट कबूलहि केलें. इतरांनांहि कोणाचें वर्म कोठें आहे, हें ओळखून साधलें तितकें ओढून घेतलें. तरी देखील ही कसरत मोठी कठीण होती. सिंहासनाच्या पायरीवर चढतांनां पाय जरासा चुकून घसरला तर सुळाच्या पायरीवर पडण्याचा संभव फार होता.

नवंबर महिन्याच्या प्रारंभींच नेपोलियननें साईसचा राजीनामा लिहून घेतला व पुढें या मसलतींतल्या सर्व मुत्सद्यांनीं हा बेत लवकरच उरकून घेण्याचा निश्चय केला. साईसचा राजीनामा प्रत्यक्ष हातांत आला व दुसऱ्याचाहि आल्यासारखाच होता. तेव्हां गुरुवार ता० ७ नवंबर रोजीं म्हणजे त्या वेळच्या फ्रेंच लोकांच्या काल-गणनेप्रमाणें १५ ब्रुमेयर रोजीं रात्रीं सर्वांनीं एके ठिकाणीं जमून आणखी विलंब न लावतां तीन तीन दिवसांचे आंतच म्हणजे १८ ब्रुमेयरचे दिवशीं हा बेत पार पाडण्याचें ठरविलें. ता. १७ रोजीं सकाळींच एनशंट्सच्या सभेनें जमून ठरल्याप्रमाणें तीन मुख्याचे ठराव मंजूर करावे व दुसरेच दिवशीं म्हणजे

ता.१८ ब्रुमेयर रोजीं दोन्ही सभांच्या बैठकी पारीसबाहेर सेंट क्लाऊड येथें भरवून पुढील कार्यक्रम पार पाडावा असा सर्वांचा बेत ठरला.

गुरुवारपासून रात्रंदिवस सगळ्याखटपटी सारख्या चालू होत्या व यांपैकींच एके दिवशीं मागें सांगितलेली टालेरांच्या घरची हकीगत घडून आली. १७ ब्रुमेयरचे दिवशीं म्हणजे शनिवारीं सकाळीं दोन राजीनामे, एक साईसचा व दुसरा राजर डुकासचा, नेपोलियनच्या हातांत होते व तिसऱ्याची म्हणजे बारसच्या राजीनाम्याची खटपट चालू होती. ॲडमिरल ब्रू व टालेरां हे त्या खटपटींत पहांटेपासूनच होते. ते दिवशीं रात्रीं १ वाजतां नेपोलियननें आपल्या बायकोकडून अजेन यास गोहीयरकडे पाठवून, त्यास व त्याचे बायकोस सकाळीं उजाडतांच आपलेकडे चहा घेण्यास बोलविलें. आज इतक्या सकाळीं हें चहाला आग्रहाचें बोलावणें कां झालें, याचा गाहियरला उमज पडेना. बायको मात्र वेळेवर आली; पण ती एकटीच आली. गोहीयर कोठें आहे, असें विचारितां सरकारी कामामुळें आज आपल्या नवऱ्यास येण्यास फुरसद नाहीं, अशी तिनें सबब सांगितली. गोहीयर चहाला आला नाहीं, तेवढ्यानें डाव फुकट गेला. घरीं जातांच गोहीयरचे बायकोनें आपल्या डोळ्यांस तेथें काय दिसलें व आपल्या कानीं काय आलें तें सगळें आपल्या नवऱ्याला म्हणजे गोहीयरला सांगितलें. गोहीयर लगेच उठून बारसकडे गेला. प्रथम तो आंघोळीस बसला होता म्हणून भेट झाली नाहीं. नंतर घरीं जाऊन गोहीयर पुन्हा कांहीं वेळानें बारसकडे आला. मध्यंतरी टालेरां व ब्रू हे दोघे बारसकडे येऊन अगोदरच गेले होते. बारसचें मन बारसला आधींच खात होतें. यामुळें त्याचें भान थोडें ठिकाणावर नव्हतें. तशांत आपले बेत व बोरबानूकडचा आपला कल टालेरां व ब्रू या दोघांनां ठाऊक आहे, हें कळतांच तो टालेरांच्या हातांत मेणासारखा मऊ आला व थोडेच वेळांत आधीं नेपोलियननें लिहून धाडलेल्या व टालेरांच्या त्यावेळीं खिशांत असलेल्या राजीनाम्याच्या कागदावर त्यानें निमूटपणें सही केली. टालेरां व ब्रू हे दोघे परत गेल्यावर गोहीयर आला व मोठ्या मोठ्या गोष्टी बोलूं लागला. पण काय उपयोग ? वेळ निघून गेली होती. हातची सही होऊन चुकली

होती व बारसची नांगी मोडून तो निर्जीव बनला होता. बारस उलट गोहीयरलाच समजावणीच्या गोष्टी सांगू लागला व हें पाहून गोहीयरला त्याचा मोठा चमत्कार वाटला. आंतलें वर्म त्याला मुळींच ठाऊक नव्हतें. बारस आतां वळत नाहीं, असें पाहून गोहीयर तेथून निघाला तो म्यूलिन्सला बरोबर घेऊन लक्सेंबर्ग येथें आपल्या आफिसांत पुढील व्यवस्था करण्यासाठीं गेला.

त्या दिवशीं म्हणजे शनिवारीं नेपोलियननें सगळी तयारी जास्त ठेविली होती. फूशेच्या मार्फत शहरची उत्कृष्ट नाकेबंदी करून टाकली होती. आपल्या लेन्स, बरथीयर, डुराक वगैरे स्नेह्यांचे मार्फत सर्व सैन्याला पोषाख घालून सशस्त्र तयार ठेवलें होतें. वरील सरदार व इतर खात्रीचे लोक यांस सकाळींच आपले घरीं लष्करी पोषाख घालून बोलावून घेतलें होतें. स्वतः नेपोलियनहि सज्ज होऊन बसला होता. प्रत्येक क्षण त्याला वर्षासारखा भासूं लागला. ठरल्याप्रमाणें एनशंट्सच्या सभेंत ठराव मंजूर होऊन हुकुमाचा लखोटा आपल्या हातीं केव्हां पडतो, याची तो वाट पाहात होता. घरांतली सर्व मंडळी चिंतातुर झाली होती. कारण यावेळीं थोड्याशा अवकाशांत पुष्कळ महत्वाच्या गोष्टींचा निकाल लागावयाचा होता. इतक्यांत दुरून एक स्वार आलासा दिसला. सगळयांची थोडी चळवळ झाली; पण तो स्वार कोणी निराळा मनुष्य होता.

यामुळें पुन्हां पहिली स्थिति आली. नेपोलियन घराच्या आगाशीवर इकडून तिकडे हळू हळू पावलें टाकीत फिरत होता. जोसेफाईन खिडकींतून स्वार येण्याच्या वाटेवर दूरवर नजर लावून तिकडे पहात बसली होती. नेपोलियनचें घर पुरेसें मोठें नव्हतें, यामुळें आलेल्या लष्करी पाहुण्यांपैकीं ज्यांनां जागा सांपडली ते बसले, ज्यांना सांपडली नाहीं ते उभेच राहिले. व कोणी कोणीतर इकडून तिकडे नुसतेच हिंडत होते. ते दिवशीं सर्वांनां लष्करी पोषाख घालून नेपोलियननें बोलाविलें होतें व बरनेदो-शिवाय सर्वजण सांगितल्याप्रमाणें तसे लष्करी पोषाख घालूनच आले होते. बरनेदो मात्र साध्याच पोषाखानें आला होता. हें पाहून नेपोलियननें चटकन त्याला जरा एकीकडे नेलें व थोडा वेळ दोघांचें बोलणें झालें; पण

तो फारसा वळतो, असें दिसलें नाहीं, तेव्हां त्याला नेपोलियननें आला तसाच परत पाठविला. तो घरांतून दाराबाहेर पडतो तोंच खुणावून जोसेफला त्यानें सांगितलें कीं ' तूं याचे बरोबर जा.' तेथून निघून जोसेफ हा बरनेदोला आपले घरीं जेवण्यास घेऊन गेला. इतक्यांत लेफेरे तेथें आला. तो लष्करी पोषाखच घालून आला होता; पण त्याला आंतली कांहीं विशेष माहिती नसल्यामुळें सभोंवतालचा देखावा पाहून तो थोडा मनांत चमकल्यासारखा दिसला. नेपोलियननें क्षणभर त्याचा चेहरा पाहिला व चटकन त्याचेजवळ जाऊन नेपोलियन त्यास म्हणाला, " लेफेरे, तुम्हीं लोकसत्तेचे अभिमानी पुरुष असून, आपल्या देशांतली ही लोकसत्ता या बोलक्या वकिलांच्या हातानें अशी नाश पावत आहे, हें तुमच्याच्यानें पहाववतें तरी कसें ?" इतकें बोलून त्यानें त्याच्या तोंडाकडे पाहिलें व पुन्हां म्हणाला, " लेफेरे, ही पहा माझी तरवार. ही हातांत घेऊन मीं पिरामीड्सची लढाई जिंकली. ही तुमच्या विषयींच्या पूज्यबुद्धीची व तुमच्यावरील विश्वासाची खूण म्हणून मी तुम्हांस आज नजर करितों." त्या सरदारानें त्या पाणीदार हत्याराकडे व नेपोलियनकडे पाहून नेपोलियनला वाटले होतें, तसेंच उत्तर दिलें. तो म्हणाला, " त्यांची बिशाद काय ? त्या सगळ्यांनां उचलून आपण भिरकावून नदींत फेंकून देऊं."

अशीं भाषणें चाललीं आहेत, तों थोडेच वेळांत नेपोलियनला पारीसमधील सैन्याचा अधिकारी नेमल्याचा व सभेंत बोलावल्याचा हुकूम येऊन पोंचला. तिकडची कच्ची खबरहि कळली. अराजकांच्या बंडाचें उग्र स्वरूप सभेपुढें मांडून ठराव पास झाला. डायरेक्टरांचें राजीनामे पटले व डायरेक्टरीची संस्था रद्द होऊन उदईक दोन्हीं सभांच्या बैठकी सेंट क्लाऊड येथें भरण्याचें ठरलें. एनशंट्सची सभा सकाळीं नऊ वाजतां व पांचशें तरुणांची सभा दुपारीं अकरा वाजतां भरावी, असें ठरलें होतें.

हुकमाचा कागद हातीं पडल्याबरोबर नेपोलियननें आगाशीवरून सर्वांनां तो मोठ्यानें वाचून दाखविला व खालीं घोडा तयारच होता, त्यावर तो ताबडतोब स्वार झाला. माकडोनल्ड, लेफेरे, लेन्स वगैरे इतर कामगारहि आपापल्या घोड्यांवर बसले व सर्व मंडळी सभेकडे निघून

गेली. आपण आधीं ठरविल्याप्रमाणें वाटेंतील सर्व व्यवस्था नीटच्या नीट आहे, हें पाहून नेपालियनला फार समाधान झालें. सभेंत गेल्यावर त्यानें रीती प्रमाणें आपल्या अधिकाराची शपथ घेतली. त्या वेळेस तो सर्वांनां उद्देशून म्हणाला, "सभासद हो ! ! आपल्या लोकसत्तेचे तुकडे तुकडे उडण्याची वेळ येऊन पोंचली होती. तुम्हीं हें बरोबर ताडलेंत व अवश्य ती खबरदारी घेतलीत. या तुमच्या करण्यानेंच आतां आपला बचाव होईल. यावेळीं जे कोणी दंगेधोपे करण्यास उद्युक्त होतील त्या सर्वांचा बरथीयर, लेफेरे वगैरेंच्या साह्यानें मी बंदोबस्त करून त्यांनां ठीकठाक करीन. आजचे हे ठराव तुम्हीं आपल्या शहाणपणानें मंजूर केले आहेत, ते आतां आम्हीं आपल्या तरवारीच्या जोरानें अमलांत आणूं. लोकांच्या खुषीच्या व खऱ्या स्वतंत्रेच्या पायावर लोकसत्तात्मक राज्याची उभारणी व्हावी, हीच माझी इच्छा आहे व या बद्दल मीं आपणांसमक्ष शपथ घेतों." त्यावरोबर तेथें जमलेल्या इतरांनींहि अशाच शपथा घेतल्या व लगेच ते दिवशींचें काम संपून सभा बरखास्त झाली.

दुसरे दिवशींच्या सभा सेंट क्लाऊड येथेंच भराव्या असें ठरविलें होतें. सैन्याचे अधिकार आतां नेपोलियनकडे आ.ल्यामुळें पारीसचा व सेंट क्लाऊडचा सर्व बंदोबस्त त्यानें आपल्या देखरेखीखालीं व हुकमाखालीं बरोबर ठेवला आपल्या बाजूच्या सरदारांनां निरनिराळ्या ठिकाणीं बंदोबस्तासाठीं पाठवून दिलें. त्यांत मोरोला हाताखालीं तीनशें स्वार देऊन लेक्सेंबर्गचे वाड्यांत बंदोबस्तासाठीं धाडला. तेथें गोहीयर व म्युलिन हे दोघे डायरेक्टर आफीसांत बसले होते. त्यांस नेपोलियनच्या हुकमावरून मोरोनें कैद करून अटकेंत ठेविलें. याचप्रमाणें इतर ठिकाणीहि शांततेला अवश्य(?) वाटला तो बंदोबस्त संध्याकाळपर्यंत नीट करून टाकला. नंतर दुसरे दिवशींच्या म्हणजे १८ ब्रुमेयरच्या सभांची यादी व त्यांतल्या सर्व ठरावांचे मसुदे रात्रभर जागून तयार केले. प्रत्येकानें आपआपलें काम कसें बजावावें याच्या नीट तपशीलवार सूचना झाल्या. त्या दिवशींच्या सभांनां हजर राहण्याविषयीं प्रत्येकाला कायद्यान्वयें आमंत्रण चिठ्या रवाना झाल्या; पण जे सभासद अगदींच विरुद्ध जाण्यासारखे होते, त्यांना त्या वेळेवर पोंचूं नयेत,

व कोणाला तर त्या मुळींच पोचूं नयेत, अशीहि आंतून व्यवस्था करण्यांत आली होती. सगळी रात्र मेहनतींत व चिंतेंत गेल्यावर सकाळीं मंडळी सेंट क्लाऊडकडे जमा होऊं लागली. सेंट क्लाऊड येथें आठ हजार खात्रीचें सैन्य खडें तयार ठेविलें होतें. सेंट क्लाऊड येथें टालेरांनें आगाऊच घर घेतलें होतें व तेथें ते दिवशीं त्यानें जेवणाचीहि व्यवस्था केली होती. आंत जेवणाचीं ताटें मांडण्याची जशी तयारी होती, तशीच बाहेर गाडी जोडून दाराशीं उभी ठेविली होती .न जाणों केव्हां काय प्रसंग येईल म्हणून सगळ्या बाजूंनीं तयारी आसावी असें यांत धोरण होतें.

एनशंट्सच्या सभेला ठरल्यावेळीं सुरुवात झाली. थोडें कामकाज झालें व नंतर नेपोलियनला बोलण्याची वेळ आली. तो हुशार, धूर्त, चाणाक्ष व कसलेला वक्ता; पण त्यावेळीं गडबडला. भर सभेंत भलभलतेंच बोलूं लागला. सभासदांनीं ' तुम्ही सांगतां हा कट कोठें आहे ?' ' कसा आहे'? ' याला पुरावा काय' ? असे प्रश्न विचारल्यावर तर तो अगदींच गांगरून गेला व बावरल्यासारखें भलतेंसलतें बोलूं लागला. सैन्यांतल्या सरदारकीचें धैर्य निराळें व सभाधीटपणा निराळा; पण या दोहोंपेक्षांहि आपण कायद्याचें उल्लंघन केलें आहे, ही जाणीव असतांनां धडधडीत खोटें बोलून त्याची खऱ्याप्रमाणें छाप पाडणें हें अगदींच निराळें. हें शेवटलें नेपोलियननें पूर्वी कधींच केलें नव्हतें व आज प्रसंग पडला, तेव्हां तर तें त्याला मुळींच साधलें नाहीं. बारस व म्यूलिन्स या दोघां डायरेक्टरांनीं मिळून कट केला आहे, असें तो सांगूं लागला; पण तें खोटें होतें. उघड उघड खोटें होतें. कारण बारस व म्यूलिन्स यांचें विळ्याभोपळ्याएवढें वांकडें होतें, हें सर्वांना ठाऊक होतें व या दोघांनीं मिळून कट केला, असें हा सांगतो, तेव्हां तें कोणालाहि खरें वाटलें नाहीं. यापेक्षां हा आतां कांही न बोलला, तर पुरवलें, असें त्याच्या साथीदारांनां त्या वेळीं होऊन गेलें. तेथें शेजारींच बुरीआं हा होता, त्यानें खूण केली. अखेर ' हें काय बोलतां' असें त्यानें त्याच्या कानांत सांगितलें; पण नेपोलियनचें एकदां गोंधळलेलें मन पुन्हां ताळ्यावर येईना. अखेर त्याला त्याच्या स्नेह्यांनीं ओढून खालीं बसविलें.

या अशा बोलण्याला काय करावें ?' व ' याच्या हातीं सत्ता कोणत्या

आधारें द्यावी ?' असें सर्वांस झालें; पण आधींच बेत पक्का रचलेला होता. त्यामुळें कांहीं तरी साला पाला लावून तूर्त त्याच्या हातांत सर्व सत्ता देण्याचा ठराव त्यावेळीं मंजूर झाला.

पहिल्या सभेंत असा घोंटाळा उडाल्यामुळें सभेचें काम संपण्यास थोडा उशीर लागला. इकडे दुसऱ्या सभेचे कामहि चाललें होतें. प्रारंभींचे औपचारिक ठराव झाले. अध्यक्ष लुसीन बोनापार्ट हा ठरल्याप्रमाणें पहिल्या सभेचे ठराव व सूचना लवकर येतील म्हणून आतुरतेनें वाट पहात होता; पण त्याला उशीर लागला. या अवसरांत दुसऱ्या सभेंतहि थोडासा गोंधळ होऊं लागला. इतक्यांत पहिल्या सभेंतून ठराव आले. तेव्हां त्यावर भाषणें व सूचना होऊं लागल्या. एकानें विचारलें, डायरेक्टर हजर आहेत काय? त्यावर 'त्यांपैकीं चौघांनीं राजीनामे दिले आहेत' असें सांगण्यांत आलें. खोटें! राजीनामे तिघांनींच लिहून दिले होते. 'आतां नवे डायरेक्टर नेमावे व ही सभा तूर्त तहकूब करावी.' अशा सूचना येऊं लागल्या. कटाची माहिती सभासद विचारूं लागले; तेव्हां नेपोलियनच्या हस्तकांनीं कांहींतरी लंगडीं पांगळीं उत्तरें दिलीं. त्यामुळें गोंधळ जास्त जास्त वाढत चालला. नेपोलियनसंबंधानें अपशब्दांचा वर्षाव होऊं लागला. इतक्यांत बरोबर कांहीं शिपाई घेऊन नेपोलियन तेथें आला. त्याला दारांत पाहतांच 'याला ओढा, खेंचा' असे शब्द निघूं लागले. 'जा, चालता हो, याला घालवून द्या' असेंहि एकजण म्हणाला. 'तूं कायद्याचीं बंधनें तोडून टाकलींस, कायद्याच्या पवित्रतेचा उपमर्द केलास' असें लोक म्हणूं लागले. याला एकदम 'आऊट लॉ' ठरवावा म्हणजे 'आपल्या कायद्याचें याला संरक्षण नाहीं, याचें कोणी कांहीं केलें, तरी तो गुन्हा समजला जाणार नाहीं.' असा ठराव करण्याच्या सूचना येऊं लागल्या. हा रंग पाहून नेपोलियन एकदम फिका पडला. त्याच्या आंगाला दरदरून घाम आला व त्याला झीट आल्यासारखें झालें. बरोबरच्या शिपायांनीं आपल्या या सरदाराला हातावर उचलून बाहेर उघड्या हवेंत नेलें. थोड्या वेळानें तो सावध झाला व पुन्हां आपल्या घोड्यावर बसला. इतक्या अवधींत नेपोलियनला 'आऊट लॉ करण्याची सूचना सभेंत रीतसर पुढें आली.

अध्यक्षस्थानीं लुसीन बोनापार्ट हा होता. सुदैवानें यावेळीं त्याचा धीर सुटला नाहीं. तो शांतपणें अवश्य तेंच करीत होता. त्यानें या सूचनेसंबंधानें आपल्या भावाचें काय म्हणणें आहे, तें ऐकल्याशिवाय इतक्या महत्वाच्या सूचनेवर मतें घेण्याचें साफ नाकारिलें व मोठ्या आवेशाचा आविर्भाव दाखवून तो आपलें अध्यक्षस्थान सोडून बाहेर आला. आंतील प्रकाराच्या व हालचालीच्या सुगाव्यानें बाहेरची मंडळीहि थोडी बिथरत चालली होती. इतक्यांत लुसीन बाहेर आला. तो तडक सैन्याकडे गेला व सभेचा अध्यक्ष या नात्यानें तेथें जाऊन त्यानें सर्वांस मोठ्यानें सांगितलें कीं, "आंतल्या सभेंत पुष्कळ थोर लोक आहेत; पण त्यांत इंग्लंड सारख्या शत्रूनें भारून टाकलेले भाडोत्री बंडखोर व पाजी वक्तेहि आहेत. त्यांचेपुढें बाकीच्या थोर सात्वस लोकांचा इलाज चालत नाहीं. ते अगदीं भेदरून गेले आहेत." लुसीनच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच शिपायांनीं एकदम नेपोलियनच्या नांवानें जयजयकार केला. तरी पण ते लोक फारसे बदलले नाहींत व आंत गेल्यावर सांगितलेलें करतीलच अशी त्याला खात्री वाटेना. नेपोलियनच्याहि तोंडून कांहीं शब्द निघेना. इतक्यांत लुसीननें आपली तरवार हातांत घेतली व तिचें टोंक नेपोलियनच्या छातीकडे करून व आवेशानें लोकांकडे पाहून तो म्हणाला, "मी कसम खाऊन सांगतों कीं, यानें फ्रेंचांच्या स्वातंत्र्यावर कधीं हात उगारलाच, तर मी या माझ्या भावाच्या छातींत ही खुपसण्यास बिलकूल कमी करणार नाहीं." याबरोबर एकदम विजेचा संचार व्हावा तसें झालें. चोहोंकडे चळवळ दिसूं लागली. म्यूरानें हुकूम मागितला व तो सैन्य घेऊन सभेच्या दाराकडे गेला. दोघे भाऊ घोड्यावर बसून सभेकडेच गेले. शस्त्रधारी शिपायांची हालचाल पाहतांच सभेंतील सभासद घाबरून गेले व आधीं त्यांचें धैर्य पळालें व मग मागावून ते पळूं लागले. ज्याला जशी वाट सांपडली तिकडे तो निसटून गेला. कोणी झटकन् दरवाज्यानें बाहेर पडले; पण कोणास इतकेंहि अवसान राहिलें नाहीं त्यांनीं खिडक्यांचेच दरवाजे केले व थोड्याच अवधींत सभागृह रिकामें झालें.

प्रकरण नववें.

## कौन्सलेटची स्थापना.

जुनी राज्यव्यवस्था मोडून टाकण्यांत सर्व दिवस खर्च केल्यानंतर नवी राज्यव्यवस्था तयार करण्यांत रात्र खर्च करणें अवश्य झालें. लुसीननें तेच रात्रीं पुन्हां सभा जमवून तींत कौन्सिलदारांची नेमणूक करून घेतली व ज्यांनीं ज्यांनीं दिवसाच्या सभेंत 'गैरशिस्त' वर्तन केलें होतें, त्या सर्वांनां लहान मोठया शिक्षा ठरविण्यांत आल्या. अर्थात् यामुळें, नेपोलियनच्या विरुद्ध जाण्यासारखे लोक होते, ते सहजच दूर झाले व पुढील कार्यभागास त्यांची अडचण येण्यासारखी राहिली नाहीं. याच सभेंत डायरेक्टरीची संस्था अस्तित्वांत नाहीं, असा ठराव मंजूर करण्यांत आला व तूर्तातूर्त राज्याचा कारभार चालविण्यासाठीं राजर डुकास, साईस व नेपोलियन यांस कौन्सिळदार निवडण्यांत आलें. पुढील नवी राज्यघटना कशी असावी, याचा मसुदा व सूचना करण्याचें कामहि त्यांच्याचकडे सोंपवून दिलें. शेवटीं नेपोलियन बोनापार्टाचें सर्वानुमतें आभार मानण्यांत येऊन पहांटेचे सुमारास सभा विसर्जन झाली.

सर्व विश्वाचा जनक श्रीसूर्यनारायण आदले दिवशीं उगवला होता, त्यावेळीं त्यानें फ्रान्सची जी स्थिति पाहिली होती, ती सर्व पार पालटून जाऊन दुसरे दिवशीं त्या विश्वदेवतेला वर आल्याबरोबर फ्रान्समध्यें अगदीं नवीन स्थिति दिसूं लागली. फ्रेंच लोकांनीं गेलीं दहा वर्षें आपल्या हाडामांसांनीं व रक्ताच्या पाण्यानें बांधलेली इमारत एका आठ प्रहरांत ढांसळून जाऊन तेथे आतां अगदीं नवीन रचना दिसूं लागली. वरून मात्र लोकसत्तेचें कवच राहिलें, पण पाहणारे होते त्यांच्या डोळ्यांनां त्यांत राजसत्तेचा अंकूर स्पष्ट दिसूं लागला व योग्य काळ होतांच—अवश्य ते दिवस भरल्यावर—त्यांतून राजसत्ता पूर्ण स्वरुपानें निर्माण होऊन बाहेर पडेल, असें त्यांस वाटूं लागलें. हा दिवस म्हणजेच नेपोलियनच्या बादशाही अमलाचा आधानकाल असें त्या धूर्त ज्योतिषांनीं आपल्या मनाशीं ठरवून

ठेवीलें. ही सर्व उलथापालथ व हा सर्व बदल नेपोलियननें रक्तपात तर दुरच राहो; पण कोणाहि मनुष्याच्या आंगाला नुसता नखोराहि न लागूं देतां केवळ युक्तीच्या जोरावर घडवून आणला. जें घडवून आणण्याला इतरांनां मोठीं रणें माजवावीं लागलीं असतीं व ज्याला कैक काळ लोटला असता, तें त्यानें अगदीं शांततेनें व कुंभाराला आवा घडण्यालाहि जास्त वेळ लागेल, इतक्या थोडया वेळांत घडवून आणलें.

लवकरच राज्यघटनेच्या कामास सुरवात झाली. नव्या घटनेचा मसुदा साईसनें तयार केला; पण खरें म्हटलें, तर तो नेपोलियननें सुचविला व साईसनें लिहिला. नेपोलियन फर्स्ट कौन्सल झाल्यानंतर बाकीच्या दोघांकडे लेखन कामाठीचेंच काम राहिलें. या नव्या घटनेंत सर्व सत्ता लोकांकडे आहे व सर्व कारभार जनतेच्या सल्यानें व हुकमानेंच चालावा, असें कलम स्पष्ट नमूद केलेलें होतें; पण ही घटना सर्वांनां मान्य व्हावी व कोणी तिच्या विरुद्ध जाऊं नये एवढ्यापुरताच ती केवळ वरून चढविलेली बेगड होती. बाकी त्या मसुद्याचें सर्व धोरण व अंतःस्वरूप अशा योजनेचें होतें कीं, सर्व सूत्रें फर्स्ट कौन्सलच्याच हातांत रहावींत व चित्रकथ्यांच्या बाहुल्यां प्रमाणें सर्वांनां त्याला नाचवितां यावें. राज्यव्यवस्थेच्या या नवीन योजलेल्या मसुद्यानें असें ठरविलें होतें कीं, फ्रान्सच्या पन्नास लक्ष नागरिकांपैकीं प्रत्येकास मत देण्याचा अधिकार असावा. यांपैकीं दहा दहा असामींत आपणांपैकीं दर दहा जणांनीं एक असे लोक निवडून द्यावे व याप्रमाणें शेवटीं 'न्याशनल लिस्ट' या नांवाची एक नागरिकांची यादी तयार करावी व यांतून मोठमोठे अधिकारी नेमले जावेत. या नवीन राज्यघटनेंत सर्व राज्यकारभारांत चार मुख्य संस्था प्रमुख होत्या. पहिली "कौन्सिल ऑफ स्टेट,' दुसरी 'ट्रायब्यूनेट,' तिसरी 'लेजिस्लेचर' व चौथी "सिनेट". कोणत्याहि नव्या कायद्यासंबंधीं तो कायदा सुचविणें, नंतर त्यावर वादविवाद करणें, त्यावर मते घेणें व पसंत करून मंजूर किंवा नामंजूर करणें, हीं जीं चार आंगें, तीं या चार संस्थांना वाटून दिलीं होतीं. कोणताहि नवीन कायदा 'कौन्सिल ऑफ स्टेट'नें पुढें मांडावा. म्हणजे त्या कायद्याची सूचना त्या सभेनें करावी. या सभेचा



नेपोलियन ( आलेक्झांड्रियाच्या बंदरांत जहाजावर )



नेपोलियन ( तहाहयातचा कौन्सीलदार ).

अध्यक्ष 'फर्स्ट कौन्सल' हा होता. नंतर 'ट्रायब्यूनेट'नें त्या सूचनेवर वादविवाद करावा म्हणजे नुसतीं भाषणें मात्र करावीं; पण त्यासंबंधानें मतें देण्याचा अधिकार त्या सभेस नव्हता. पुढें तिसऱ्या म्हणजे 'लेजिस्लेचर'नें वादविवाद न करितां आपलीं मतें मात्र द्यावीं. अखेर तो कायदा मंजूर करणें किंवा फेंटाळून लावणें हा अधिकार शेवटल्या म्हणजे 'सिनेट' या सभेकडे होता. असे चार सभांना चार निरनिराळे अधिकार विभागून दिल्यामुळें सर्व अधिकार लोकांकडे असल्यासारखेंहि झालें, व एक तऱ्हेनें शरीराचे चार भाग करून जीभ एकीकडे, डोळे एकीकडे, पाय एकीकडे व हात एकीकडे असें केल्याप्रमाणें तें शरीर निर्जीवहि होऊन गेलें. फर्स्ट कौन्सल हा सर्व श्रेष्ठ अधिकारी असल्यानें व निरनिराळे सभासद निवडण्याची, वादविवादांवर दडपण ठेवण्याची व कायद्याची अंमलबजावणी करण्याची सर्व सत्ता त्याचे हातीं असल्यामुळें सर्व सत्तेचें केंद्रीभवन होऊन ती त्याचेच हातांत आली. प्रत्येक शहरांत व लहान सहान गांवांतहि सभांतल्या कामकाजांवर तें नीट रीतसर चालावें म्हणून नियमन करण्यासाठीं एकेक 'प्रिफेक्ट' या नांवाचा अधिकारी नेमलेला असे. हे प्रिफेक्ट नेमण्याचा अधिकार व तसेच इतर लहान मोठे कामगार नेमण्याचा अधिकार फर्स्ट कौन्सलचा असे. त्यामुळें या फर्स्ट कौन्सलचा हात प्रत्येक शहरांत, प्रत्येक गांवांत व प्रत्येक संस्थेंत सहज पोचूं शके. व जिकडे तिकडे त्याचेच हस्तक दृष्टीस पडत.

याशिवाय असेंहि ठरविण्यांत आलें होतें कीं, ज्याअर्थीं न्याशनल लिस्टांतून 'कौन्सिल ऑफ स्टेट' निवडण्याचा अधिकार फर्स्ट कौन्सलचा आहे, त्याअर्थीं कोणताहि नवा कायदा स्वतंत्रपणें मंजुरीसाठीं पुढें आणण्याचाहि अधिकार फर्स्ट कौन्सलचा असावा. तसेंच गरज पडली असतां कोणत्याहि बजावणी खात्याच्या नियमाला कायद्याचें रूप देणें व त्याची कायद्याप्रमाणें अंमलबजावणी करणें हेहि अधिकार अगदीं जरूर वाटेल त्यावेळीं बजावण्याची सत्ता फर्स्ट कौन्सलकडे म्हणजे सर कौन्सलदाराकडे ठविली होती. सारांश, प्रत्यक्ष नांवानें नाहीं, तरी सत्तेनें व अधिकारानें, सर कौन्सलदार हा केवळ राजाच होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

राज्यघटनेची-ही नवी सूचना किंवा हा नवा मसुदा एकंदर सर्व लोकांपुढें मांडण्यांत आला व त्यासंबंधानें सर्व नागरिकांचीं अनुकूल व प्रतिकूल मतें नोंदविलीं. त्यांत अवघीं एक हजार पांचशें सदुसष्ट मतें या घटनेच्या विरुद्ध पडलीं व लक्षावधी मतें अनुकूल पडून सर्व जनतेच्या मताधिक्यानें ही नवी घटना मंजूर झाली व तिला कायद्याचें रूप प्राप्त झालें. ही सर्व फ्रेंच नागरिकांचीं मतें, किंवा त्यांचें मताधिक्य हेंच नवीन लावलेल्या राजवृक्षाचा खरा आधार होय. हें लोकसत्तेचें झाड लोकमताच्या भूमींत नेपोलियननें उत्तम तऱ्हेनें लावलें व तें अशा तऱ्हेनें देशांत लहान थोर सर्वांचीं मतें घेऊन लावलें म्हणूनच तें खरें खरें लोकसत्तेचें झाड होय. परंतु एका झाडावर दुसऱ्या जातीच्या झाडाचें कलम जसा हुशार बागवान बांधतो, तसें या लोकसत्तेच्या झाडावर नेपोलियननें लौकरच राजवृक्षाचें कलम बांधून टाकलें व दुरून हें झाड जरी प्रथम लोकसत्तेचें दिसलें, तरी त्याला, या हुशार बागवानानें राजसत्तेच्या वृक्षाचींच फळें अखेर आणलीं.

याच महिन्यांत म्हणजे ता. २२ दिजंबर १७९९ रोजीं पूर्वी नेमलेल्या तीन कौन्सलदारांपैकीं फर्स्ट कौन्सल उर्फ सर कौन्सल कोणास नेमावें ही निवड झाली. जमलेल्या सभेंत प्रथम साईस यानें भाषणास सुरवात केली. राष्ट्रांतला सर्वश्रेष्ठ अधिकारी म्हणजे 'फर्स्ट कौन्सल' हा कोणीहि लष्करी पेशाचा मनुष्य नसावा, असा त्याच्या भाषणाचा मुख्य रोख होता. साईसच्या भाषणाचें धोरण चटकन् ओळखून नेपोलियननें आपल्या मित्रांस सभेंत चारी बाजूला पसरून बसण्याची सूचना दिली व मी साईसचे हातांत हात घातला कीं, लागलाच तुम्हीं माझे नांवाचा पुकारा करावा असा संकेत ठरविला. साईसचें भाषण पुरें होतांच नेपोलियन जरा पुढें झाला व साईसकडे पाहून त्याला म्हणाला, "आपला आपापसांत मतभेद असणें अगदीं गैर आहे, मी आपलें मत साईस हा फर्स्ट कौन्सल असावा, असें देतों." असें म्हणून त्यानें साईसला विचारलें, "साईस, तुमचें मत काय आहे ? तुम्हीं कोणाला निवडणार ?" त्यावर साईसनें उत्तर दिलें, "मी नेपोलियन बोनापार्टीला फर्स्ट कौन्सल नेमावा, असें सुचवितों." साईसनें असें म्हणतांच नेपोलियननें त्याचे आभार

मानण्यासाठीं हात पुढें करून त्याच्या हातांत हात घातला. त्याबरोबर सभेंत चारी बाजूंनीं नेपोलियनच्या नांवाचा जयजयकार झाला. सर्व सभासदांनीं साईसच्याच म्हणण्याला आपली अनुमति दर्शविली व नेपोलियन हाच फर्स्ट कौन्सल निवडला गेला. रणांगणावरचे डावपेंच सभागृहांतहि सफळ झाले व तरवारीची आणि लेखणीची सांगड पडून लष्करी व मुलकी दोऱ्या एकाच मनुष्याचे हातांत आल्या.

याप्रमाणें नेपोलियन हा फर्स्ट कौन्सल ऊर्फ सर कौन्सलदार झाल्यावर त्यानें अनेक तऱ्हेच्या प्रचंड घडामोडीस सुरवात केली. याच्या सर्वव्यापी बुद्धीपुढें व प्रचंड उद्योगापुढें साईस व डुकास या जोडीचें तेज अगदींच पडेनासें झालें. या महेषाच्या मूर्तीपुढलीं हीं दैवतें दोन्हीच्या दोन्ही लवकरच दूर झालीं. त्यांचे जागीं कांबेसरीस व लेब्रन या दोघांची नेमणूक झाली. कांबेसरीस हा फार नामांकित न्यायशास्त्रवेत्ता होता व लेब्रन हा विख्यात पंडित होता. हे दोघेहि नेपोलियनला मनापासून चाहात असत व त्याचेठिकाणीं त्यांची निष्ठाहि फार मोठी होती. ही जोडीच्या जोडी आपल्या विजयरथाला जुंपून नवीन तयार केलेला राज्यशटक चालवण्यास नेपोलियननें आतां सुरवात केली. माजी डायरेक्टरांचे कारकीर्दींत अनेक लोक तुरुंगांत टाकले होते, त्यांनां नेपोलियननें सोडून दिलें व अनेक लोक देशाबाहेर घालवून हद्दपार केले होते त्यांनां 'आम्हीं ही नवी व्यवस्था मान्य करूं' अशा साध्या अटीवर परत फ्रान्सांत येण्याच्या परवानग्या दिल्या. यामुळें पुष्कळ कुटुंबें सुखी होऊन नेपोलियनला मनापासून दुवा देऊं लागलीं. देशांत पैशाची फार टंचाई भासत होती व व्यापार अगदीं मंदावला होता. ही स्थिति सुधारण्याकरितां नेपोलियननें बोरबॉन् राजाच्या अमदानींतला एक हुशार हिशेबी सराफ हाताशीं धरून त्याचेकडून नवी पेढी उर्फ ब्यांक स्थापन केली व राज्यांत पैशाची देवघेव नीट चालेल अशी व्यवस्था लावून दिली. कर आकारण्याची व तें वसूल करण्याची शिस्त अशी बांधून दिली कीं, जेणेंकरून सर्वांवर कराचा बोजा योग्य प्रमाणानें पडावा. श्रीमंत सुटून जाऊं नयेत व गोरगरीब विनाकारण चेंगरून जाऊं नयेत. जुन्या अमदानींतलीं कर्तीं माणसें होतीं त्यांना

नेपोलियननें आपल्याकडे मिळवून घेतलें व जहाळांपैकीं जे सामोपचारानें वळण्यासारख होते त्यांनां वळवून घेतलें आणि अगदींच निकराचे व पक्क्या पिळाचे होते, त्यांना त्यांचेवर कायद्याचा कडक अंमल गाजवून त्यांच्या चळवळी बंद केल्या. काऊंट सेगूर हा फार योग्य व मसलती पुरुष होता; पण त्याच्यावर डायरेक्टरींत बहिष्कार पडला होता. त्याचा बहिष्कार दूर करून त्याला नेपोलियननें एक मानाची जागा दिली व त्याच्या जुन्या दर्जाला साजेल असें काम त्याजकडे सोंपविलें. या सेगूरमुळें बोरबॉन्च्या वेळचे पुष्कळ जुने नामजाद व खानदानीचे अमीर उमराव नेपोलियनकडे वळले. फुशे हा धूर्त व कावेबाज मनुष्य नेपोलियनच्या जुनाच परिचयाचा होता. बोरबॉन् राजा लुई यास सुळावर चढवावें असें आपलें मत यानें दिलें होतें. त्या जुन्या राजाला सुळावर चढविणाराळाच, त्याचा उपयोग जाणून व आपल्या नोकरीपलीकडे व मतलबापलीकडे कोणत्याहि विकाराला त्याचा आत्मा वश होण्यासारखा नाहीं हें पाहून, नेपोलियननें त्यालाच पोलिसचे सर्व अधिकार दिले. स्वराज्यांतल्या व परराज्यांतल्या गुप्त हेरांचा त्याला नाईक करून त्याचे मार्फतीनें हरतऱ्हेची बातमी काढण्याची व्यवस्था केली. बुरीआंकडे खाजगीची चिटणीशी दिली. कार्नो हा जुनाट योद्धा नवीन व्यवस्थेच्या बराच विरुद्ध होता; पण त्याला 'मी युद्धकलेंत फार निष्णात आहे, असा अभिमान होता. तो ओळखून त्या वृद्ध योद्ध्याकडे लढाईचें खातें दिलें व त्याला मिळवून घेतला. यांत कार्नोच्यानें कांहीं वांकडें होण्यासारखें नव्हतेंच, कारण त्यांतली किमया नेपोलियनच्या हातचा खेळ होती. परराज्यांतल्या वकिलीची जागा नेपोलियननें टालेरांला दिली. कारण टालेरां हा मुत्सद्दी असून मूळचा उपाध्याय होता. गोड बोलून आपला मतलब कसा साधावा, दुसऱ्याचें मन न दुखवितां त्याला वळवावा कसा, व दूरचीं धोरणें बांधावीं कशीं, हें तो पुर्तेपणीं जाणत होता. टालेरांसारख्या जुन्या अमदानींतल्या प्रतिष्ठित माणसाला परराष्ट्राची वकिली सांगणें यांत एक तऱ्हेनें परराष्ट्रांचा व त्यांच्या वकीलांचा गौरव केल्यासारखें झालें. कारण ते अजून नेपोलियनच्या नव्या शिपाईगड्यांनां व ताज्या कारभाऱ्यांनां केवळ उपटसुंभे समजत व

आपल्या बरोबरीचे मानीत नसत. जुने रिवाज, आदब व भाषणाची ढब हीं फ्रान्सांतल्या नवीन मंडळीला अगदींच अपरिचित असल्यामुळें ते दरबारी पद्धतींत अगदींच गांवढळ दिसत. टालेरां आल्यापासून नवीन मंडळींतला गांवढळपणा बदलून त्याऐवजीं जुनी दरबारी पद्धत व दरबारी भाषा योग्यपणें चालू झाली व कुरकुरीस जागा राहिली नाहीं.

ही आंतली व्यवस्था व जुळवाजुळव चालली होती, त्याचवेळीं नेपोलियननें इतर राष्ट्रांकडेहि सख्य जुळविण्याच्या यत्नास सुरवात केली. नवीन राज्याची घडी बसविणाराला राज्यांत शांतता ठेवणें व साधेल तर लढाई अगदीं बंद पाडणें पुष्कळ फायद्याचें असतें. याकरितांच देशांत अनेक तऱ्हेच्या नव्या सुधारणा घडवून आणतां याव्या व त्या जनतेच्या आंगवळणी पडाव्या म्हणून नेपोलियननें भोंवतालच्या सर्व राष्ट्रांशीं कायमचे तह करण्याचा यत्न केला. प्रथमतः त्यानें सर्व परराष्ट्रांस फ्रान्स देशानें आपणांस सर कौन्सलदार अथवा फर्स्ट कौन्सल नेमल्याचें जाहीर केलें. अर्थात त्यानें फ्रान्स देशातर्फे तहासंबंधानें व इतर राज्यकारणासंबंधानें बोलण्यास आपला अधिकार आहे, असें सर्वांस दर्शविलें. इंग्लंड, प्रशीया, स्पेन, आस्ट्रीया आणि रशीया यांजकडे तहाचीं बोलणीं लाविलीं. इंग्लंडचा राजा जार्ज याजकडे नेपोलियननें स्वतःच एक साधें पण स्पष्ट असें पत्र पाठविलें. त्यांत त्यानें ही वर्षानुवर्षें चाललेली आपल्या दोन्हीं राष्ट्रांतली लढाई बंद करून हा रक्तपात थांबवावा, अशी इंग्लंडचे राजे जार्ज यांस विनंति केली होती; पण या पत्राला प्रत्यक्ष स्वतःच्या नांवानें उत्तर न पाठवितां जार्जराजानें आपल्या प्रधानामार्फत नेपोलियनास "तुमच्यापाशीं तहाचें बोलणें बोलण्यांत कांहीं हांशील नाहीं. कायमचें व योग्यस्वरूप आपल्या राज्यव्यवस्थेस दिल्याशिवाय इंग्लंड फ्रान्सशीं तह करूं शकणार नाहीं. तुम्हीं बोरबॉन् राजवंशांतल्या हयात पुरुषाला गादीवर बसवा, मग तुमच्याशीं तह करण्यास ठीक पडेल." असें कळविलें. इंग्लंडचें हें लिहिणें फारसें धोरणाचें नव्हतें. त्यांतलें शेवटचें वाक्य तर नेपोलियनला झोंबण्यासारखें होतें; पण तें लिहिलें नसतें, तर बरें झालें असतें. कारण त्यामुळें नेपोलियनला थोडें खटक्याचें उत्तर देण्याला संधी

मिळाली. लगेच त्यानें टालेरांकडून इंग्लंडला यावर असें उत्तर लिहवविलें कीं, "तुम्हीं जुन्या पदच्युत केलेल्या स्टुअर्ट वंशांतला राजा गादीवर बसवून मग हें लिहिणें लिहिलें असतें, तर शोभलें असतें; पण इंग्लंडच्या लोकांच्या खुषीनें जसा त्यांना जो आवडला तो नवा राजा त्यांनीं केला, तसें फ्रान्सला वाटलें त्याप्रमाणें फ्रान्सनें मला नेमलें. जसें लोकांनीं नेमलें म्हणून आपण जार्ज राजे झालां, तसाच फ्रान्सनें केला म्हणून मी फर्स्ट कौन्सलदार झालों. आपल्या देशांत राजा कोण असावा हें ठरविणें, हा ज्या त्या देशाचा स्वतंत्र हक्क आहे."

हें उत्तर गेल्यावर तहाची आशा तर समूळ नष्टच झाली व लढाईचा स्पष्ट रंग दिसूं लागला. इंग्लिश पार्लमेंटमध्यें बोरबॉन् वंशांतल्या पुरुषाला गादीवर बसविण्याच्या या इंग्लंडच्या अटीसंबंधानें प्रश्न निघाला असतां, "उद्यां नेपोलियनची युद्धांत सरशी झाली आणि आपण तहाचें बोलणें लावण्यास गेलों व त्यावेळीं जर नेपोलियन 'तुम्हीं आपल्या जुन्या स्टुअर्ट वंशाच्या पुरुषास गादीवर बसवा, मग जें बोलणें तें बोलूं,' असें म्हणाला, तर आपली काय स्थिति होईल?" असें देखील एकानें विचारिलें.

इंग्लंडप्रमाणेंच प्रशियाच्या राजाकडेहि तहाचें बोलणें नेपोलियननें लाविलें. आपला विश्वासू स्नेही व सरदार डूकस यास त्यानें प्रशियाकडे पाठविला; पण त्या तरूण राजाच्या मनांत आपण कोणत्याच बाजूला न मिळतां तिऱ्हाईतपणानें दूर राहावें व फ्रान्स आणि आस्ट्रीया यांनां खुशाल लढाया करून दमूं द्यावें असें होतें. त्यानें प्रथम गोडगोड भाषणें बोलून अखेर त्याचप्रमाणें वर्तन ठेविलें.

स्पेनच्या राज्यांतली माहिती तेथील फ्रेंच वकीलामार्फत नेपोलियनला चांगलीच लागली होती. तेथला राजा अगदींच बाष्कळलेला होता. राज्याची भानगड त्याला झेपण्यासारखी नव्हती व तींत तो फारसा पडतहि नसे; पण त्याची राणी फार हुशार, तरतरीत व उद्योगी बायको होती. राज्याचा सगळा कारभार गाडाय नांवाच्या प्रधानाकडे होता व त्याच्यावर राणीची मर्जी फार प्रसन्न असे. राणीची राजापेक्षां या प्रधानाशींच विशेष प्रेमाची गट्टी होती. राणीला फ्रेंच कपड्यांचा व तेथल्या इतर अनेक

वस्तूंचा फार शोक असे. नेपोलियननें थोडेच दिवसांत फ्रान्समधून वस्त्रें वगैरेंची एक भेट गाडाय प्रधानाकडे पाठविली. राजा अगदींच भाबडा. त्यानेंहि आपणांस कांहीं जिनसा पाहिजेत अशी इच्छा दर्शविली. लगेच राजाकडेहि पेटारे रवाना झाले व मिनेटी या नांवाची एक बाई स्पेनच्या राणीकडे धाडली. जोसेफाईननें हिच्याबरोबर गाडींत स्वतः निवडून पसंत केलेल्या उत्तम जरतारी व उंची पोषाखांच्या पेट्या दिल्या आणि टालेरानें हिच्या खिशांत कांहीं राजकारणी प्रकरणांचे कागद व सूचना दिल्या. याप्रमाणें स्पेनचा या वेळेपुरता तरी ठीक बंदोबस्त झाला.

या सर्वांपेक्षां रशियाचा झार पॅाल हा कर्तबगारीनें व बलानें फार श्रेष्ठ होता; पण त्याच्या डोक्यांत मसलतीपेक्षां स्वतःच्या मानाच्या व अभिमानाच्या कल्पना विशेष प्रबळ होत्या. त्याचें व आस्ट्रीयाच्या राजाचें अलीकडे थोडें बिनसलें होतें व ज्याच्यावर त्याचा बरेच दिवसांचा डोळा होता, तें माल्टा बेट इंग्लंडनें घेऊन हल्लीं आपलेकडेच ठेवलें असल्यामुळें आणि त्यानें रशियन सैन्यास अयोग्य रीतीनें वागविल्यामुळें इंग्लंड विषयींहि त्याच्या मनांत थोडें वांकडें आलें होतें. यांतच नेपोलियननें मोठ्या युक्तीनें आणखी बीष कालवून चांगलेंच वितुष्ट पाडलें.

पूर्वी रशियानें इंग्लंडच्या सांगण्यावरून साठ हजार सैन्य इतालीवर रवाना केलें होतें व दुसरें पंधरा हजार सैन्य झार पॅालनें हालंड जिंकण्याकरितां 'ड्यूक आफ यार्क'चे हवालीं केलें होतें. इतालीवर पाठविलेल्या सैन्यापैकीं आठ हजार रशियन कैदी यावेळीं फ्रान्सजवळ होते. या कैद्यांची अदलाबदल तुमच्याजवळच्या फ्रेंच कैद्यांशीं करण्यास मी तयार आहें, असें नेपोलियननें आस्ट्रीया व इंग्लंड या दोघांसहि कळविलें. आस्ट्रीयानें जबाब पाठविला कीं, तुमचेकडे आमचे आस्ट्रीयन लोक कैदी आहेत, त्यांनां ठेवून रशियन कैद्यांशीं आम्हीं अदलाबदल करीत नाहीं. इंग्लंडनें तर 'असें करणें आमच्या प्रघाताविरुद्ध आहे' इतकेंच उलट कळविलें. यावर नेपोलियननें त्या परराष्ट्रीय मुत्सद्यांस कळविलें कीं, "हे शूर शिपाई तुमच्याकरितां लढले. या शूर शिपायांनीं लढून तुम्हांस फ्रेंच कैदी मिळवून दिले. असें असून तुम्हीं बदल फ्रेंच कैदी देऊन यांनां बंधमुक्त करीत नाहीं, याचें मला फार

आश्चर्य वाटतें. आतां मीच कोणताहि मोबदला न मागतां या शूर लढवय्यांस सोडून देतों व माझे मनांत शूर शिपायांबद्दल सदैव कसें प्रेम वाटतें, हें झार पॉलला दाखवितों." व खरोखरच त्यानें त्या सर्व रशियन कैद्यांस बंधमुक्त केलें. त्यांस चांगलें नवे पोषाख देऊन व त्यांत जे सरदार होते, त्यांचेकडून त्यांची पलटण बनवून त्यांस स्वदेशीं रवाना केलें. नेपोलियनचें हें औदार्य व शौर्याबद्दलची ही अलोट भक्ति पाहून झार पॉलला अतिशय आनंद वाटला. शिवाय नेपोलियननें झार पॉलला एक तरवार नजर म्हणून पाठविली. इतकें झाल्यावर तर झार पॉल फारच खूष झाला व लगेच त्यानें नेपोलियनशीं सख्य केलें. पुढें लवकरच या दोघांचीं आशियावर स्वारी करून तें खंड आपसांत वांटून घेण्याची खलबतेंहि सुरू झालीं. झारचे मनांत इंग्लंडबद्दल पुरी आढी पडली व त्या देशाचा नाश करण्याच्या गोष्टी तो नेपोलियनच्या तोंडून खूष मनानें ऐकूं लागला.

नेपोलियन इजिप्त देशांत गेला असतां इकडे आस्ट्रीयानें इतालींत बराच धुमाकूळ मांडला होता. इंग्लंडनें त्यास पैसा पुरवून त्याच्याकडून पुन्हां नवें सैन्य उभें करवलें होतें व नेपोलियननें पूर्वी घेतलेल्या मुलखापैकीं बहुतेक भाग आस्ट्रीयानें परत घेतला होता. इजिप्तमध्यें नेपोलियन मारला गेला, तो आतां परत येण्याचा संभव अगदींच नाहीं, अशा बातम्या त्या मतलबी मुत्सद्यांनीं युरोपभर पसरविल्या होत्या. त्यामुळें अनेक लहान लहान संस्थानेंहि फ्रान्सवर उलटूं पहात होतीं. इंग्लंड व आस्ट्रीया या दोघांनीं एकमेकांच्या मदतीनें फ्रान्सची पक्की खोड मोडण्याचें योजिलें होतें. आस्ट्रीयाला इंग्लंडनें मदत द्यावी, दर्याचे बाजूनें कुमक करावी व आस्ट्रीयानें मोठ्या सैन्यानिशीं फ्रान्सचे मुलुख जिंकून साधल्यास देशांतहि घुसावें, असा या वेळचा घाट होता. या मसलतींत स्वित्झर्लंद, डेन्मार्क, बव्हेरिया हेहि इंग्लंड व आस्ट्रीयाला मिळाले होते. ही परिस्थिति पाहून नेपोलियननें आस्ट्रीयावर स्वारी करण्याचा निश्चय केला.

---

प्रकरण दहावें.

# मारेंगो.

आस्ट्रीयावर स्वारी करण्याचा नेपोलियननें निश्चय केल्यावर त्या स्वारीचें अधिपत्य कोणाला द्यावें, हा पहिला प्रश्न होता. यावेळीं फ्रान्सजवळ नेपोलियनच्या तोडीचा किंवा त्याच्या खालोखाल दुसरा लष्करी अधिकारी मोरेयु हा होता; पण मागें पीशेग्रूनें बंड केलें होतें, त्यांत हा सामील असल्याचा सर्वांनां संशय होता. त्यामुळें याला फ्रान्सचा मुख्य सेनापती नेमण्यास पुष्कळ लोक प्रतिकूळ होते. परंतु १८ व्या ब्रूमेयरचे दिवशीं म्हणजे नेपोलियननें डायरेक्टरी मोडून टाकली ते दिवशीं मोरेयूनें चांगली कामगिरी बजाविली होती. याकरितां त्यासच सैन्याचे अधिकार सांगितले व फ्रान्स मधलें चांगलें निवडक सैन्य त्याच्या हवालीं करून त्यास र्‍हाइन नदीच्या बाजूनें जाऊन आस्ट्रीयावर हल्ला करण्यास पाठविलें. आस्ट्रीयानेंहि पुन्हा या वेळीं जवळ जवळ एक लाख सैन्य उभें केलें व त्यावर जनरल डिमेलो या नांवाचा एक हुशार व अनुभवी सेनापती नेमला होता. अनुभवी म्हणजे थोडा थोडका नव्हे, तर त्यानें या जगाचा अनुभव ऐशीं वर्षें घेतला होता. कारण त्याचें वय ऐशीं वर्षांवर होतें शिवाय लढाईची शिस्त व्हीएन्ना येथून दरबारचे हुकूम सुटतील त्या धोरणानें चालवावी असेंहि ठरलें होतें.

डिमेलोच्या प्रचंड सैन्याला व त्याच्या तयारीला तोंड देण्याचें सामर्थ्य मोरेयुमध्यें नाहीं, हें नेपोलियन जाणून होता. मोरेयूची नेमणूक दरबारी रीतीप्रमाणें मंजूर होऊन सर्वभर प्रसिद्ध झाली होती; पण नेपोलियननें अगदीं प्रसिद्धी होऊं न देतां गुप्तपणें दुसरीहि एक तयारी आरंभीली होती. त्यानें निरनिराळया दोन चार ठिकाणीं नव्या सैन्यांची भरती चालविली होती. तीवर त्याच्या फार विश्वासू आणि हुशार सेनापतींची देखरेख ठेवली होती. नेपोलियनहि नेहमीं याची स्वतः चौकशी ठेवी; पण यापैकीं एका भागाची चाललेली तयारी त्यानें दुसऱ्या भागासंसुद्धां पुष्कळ दिवसपर्यंत कळूं दिली नाहीं. इतक्या गुप्तपणानें व सावधगिरीनें हें काम चालविलें होतें.

आल्प्स पर्वतावर सेंट बरनार्ड हें एक फार उंच ठिकाण आहे. या ठिकाणीं वाट अत्यंत बिकट असल्यामुळें व येथें सदासर्वकाळ वर्फ पडत असल्यामुळें या बाजूला फारसें कोणी जात नाहीं; पण एखाद्या प्रवाशाची किंवा चुकलेल्या पांथस्थाची व्यवस्था लावण्यासाठीं तेथें एक मठ आहे. हिमालयांतील कठीण ठिकाणीं ' काळा कंबलीबाबा ' च्या मठाप्रमाणेंच येथील साधू लोकहि प्रवाशांची व वाटसरूंची आपल्या मठांत चांगली सोय करितात. या मठाधिपतीकडे एक बरीच मोठी रक्कम पाठवून त्याच्याकडून तेथें नेपोलियननें पुष्कळशी अन्नसामुग्री जमवून ठेवविली. तसेंच मार्सका नांवाच्या एका हुशार इंजीनियरकडून त्यानें आल्प्स पर्वताची, त्यांतील दऱ्याखोऱ्यांची व वाटांची चांगली पाहणी करविली व अगदीं जवळचा रस्ता ओळखण्याची त्याला आज्ञा केली. इंजीनियर मार्सका हा आपलें काम संपवून नेपोलियनला भेटला, तेव्हां त्यानें नेपोलियन यास आल्प्स पर्वतांतल्या वाटांचें, तेथील इतर भागांचें व एकंदर अडचणींचें फार सूक्ष्म वर्णन सांगितलें. मार्सकाच्या बोलण्याचें धोरण असें होतें कीं, आल्प्स पर्वत वलांडून पार जाणें हें काम फार दुर्घट आहे. तें सर्व बोलणें लक्षपूर्वक ऐकून नेपोलियननें म्हटलें, " तुम्हीं सांगतां या सगळ्या अडचणी मला कळल्या. वाट अत्यंत बिकट आहे, कबूल आहे. धोके फार आहेत हेंहि कबूल आहे; पण या आल्प्स पर्वतावरून सैन्य पलीकडे जाणें शक्य आहे कीं नाहीं ?" मार्सका म्हणाला, ' सैन्य जाणें कदाचित् शक्य होईल' त्यावर नेपोलियन एकदम म्हणाला, " शक्य होईल ना ? मग आपण तें करून दाखवूं. " आणि म्हटल्याप्रमाणें लागलीच असें साहस करण्याची तयारी नेपोलियननें सुरू केली व सेंट गार्थडच्या घाटानें इतालींत सैन्य उतरण्याचा आपल्या मनाचा निश्चय त्यानें कायम केला. यापूर्वी या वाटेनें कोणीहि सैन्य नेलें नव्हतें; पण तो अगदीं जवळचा मार्ग असल्यानें नेपोलियनच्या धाडसी मनाला तोच फार पसंत पडला.

सैन्याला अन्नपाण्याची अडचण फारशी पडूं नये, मार्ग लवकर चालून जातां यावा व सर्व सैन्य उतरल्यावर शत्रूला एकदम चकित करतां यावें अशा तीन कारणांसाठीं नेपोलियननें सैन्याचे चार भाग केले, व

चौघांनां चार निरनिराळे मार्ग आंखून देऊन आल्प्स पर्वताकडे पाठवून दिलें. त्या वेळच्या कायद्याप्रमाणें फर्स्ट कौन्सल किंवा सर कौन्सलदार यानें सेनाधिकारी होतां कामां नये असा नियम होता; पण सैन्य लढाईवर पाठवून आपण पारीसमध्यें बिनधास्तपणें खर्डे घांशींत बसावें हें नेपोलियनला आवडण्यासारखें नव्हतें. म्हणून सैन्याचे मुख्य अधिकार बरथीयरला दिले व आपण नुसताच बरोबर गेला. पारीसमधून निघतांनां आपण कोठें जाणार व आपला पुढला बेत काय आहे, हें त्यानें कोणासहि कळविलें नाहीं. मात्र आपले मागें कारभार पहाण्यास कांबेसरीस यास नेमलें व मी सैन्य तपासणीकरितां पंधरा वीस दिवस बाहेर जात आहें असें सांगून शिवाय आणखी असेंहि बजाविलें कीं, मी कोठें गेलों व कां गेलों हें तूं कोणांसहि सांगू नको, व ठरलेल्या शिस्तीप्रमाणें कारभार चालू ठेव.

नेपोलियनच्या बरोबर खास पस्तीस हजार सैन्य होतें. ह्या सैन्याबरोबर तोफहि होत्या. पर्वताच्या पायथ्याशीं त्या सोडवून त्यांचे निरनिराळे भाग केले. तोफांचे गाडे व चाकें गवतांनीं गुंडाळून मध्यें बांबू घालून उचलून नेतां येण्याजोगीं केलीं. दारूगोळ्याच्या पेट्या डोक्यावरून नेतां येतील अशा बेताच्या बनविल्या. तरी अवजड तोफांची अडचण राहिलीच; म्हणून मोठालीं झाडें तोडून त्यांचे बुंधे पोखरून त्यांत त्या तोफांचे नळे घट्ट बसवून व बाहेरून लांकडी बुंध्यांनां दोर बांधून ते ओढून किंवा उचलून नेतां येतील असे केले. बहुतेक सर्वजण वाट पायींच चालत. घोडेस्वार होते ते घोड्याची लगाम धरून बेतानें पुढें चालत व मागून आपला घोडा नेत. ठिकठिकाणीं वाटा इतक्या अरुंद होत्या कीं, रस्ता पुरीं दोन पावलेंहि रुंद नसे. त्या पहाडी वाटांच्या उंच उंच वळचणी इतक्या कठीण होत्या, कीं जरा पाऊल चुकलें तर प्राण वांचण्याची आशाच नको. असे अपघात वाटेंत कांहीं घडलेहि. सारा वेळ बर्फ पडे, त्यामुळें माणसें व जनावरें गारठून जात; पण त्यांनीं कधीं हिंमत सोडली नाहीं कीं थकवा आल्याचें दाखविलें नाहीं. या प्रदेशांत इतक्या उंचीवर सर्वत्र बर्फमयच होतें. मध्यें बर्फ, पुढें बर्फ, खालीं पाहिलें तरी दऱ्याखोऱ्यांतून गोठून दगडासारखें झालेलें बर्फच, आणि वर

पाहिलें तरी पर्वत-शिखरावर सर्वभर बर्फच. वनस्पती व श्वापद या दोघांचें अस्तित्व तेथें शून्यत्वानेंच होतें. पक्षी देखील तितक्या उंचीवर उडून आलेले दृष्टीस पडत नसत. गारठ्यानें हातपाय अगदीं मेहरून जात व वळणावर कोणीं जरा पाय चुकून घसरला तर कोलमडून एकदम खालीं जाऊन पडे. त्याच्या आरोळ्या जरा वेळ ऐकूं येत; पण लवकरच त्याहि बंद होऊन पुन्हां सर्वत्र सामसूम होई. अशा भयंकर वाटेनें नेपोलियन एवढें मोठें सैन्य घेऊन वाट चालत होता. ही वाट चालतांनां काळालाहि न भिणारा असा शूर लेन्स नेहमीं सर्वांत पुढें असे. त्याचेच बरोबर एक इंजीनियराची टोळी असे. हे लोक साधेल तेथें मागून येणाऱ्या सैन्यासाठीं वाट थोडी दुरुस्त करीत किंवा थोडीशी नवीहि पाडीत. मागाहून पायदळ व त्यांच्यामागें घोडेस्वार वाट चालत. चालतांनां नेहमीं सामान न्यावें लागे व तोफांचे बुंधे ओढावे लागत. हीं कामें ते हौशीनें करीत. श्रमपरिहारार्थ तोंडानें कधीं लढाईच्या मर्दुमकीचीं व कधीं प्रेमविलासाचीं ते गाणीं म्हणत. वाटेंत चढणीला फार वळसे असल्यामुळें क्षणांत पुढचे लोक मागच्यांनां दिसेनासे होत व मागचे लोक पुढच्यांनां अगदीं दिसेनासे होत. असें झालें म्हणजे ते शिपाई तोंडानें ललकाऱ्या देऊन एकमेकांनां इशारे देत व फिरून सपाट जागा येऊन सर्व एकत्र झाले म्हणजे आनंदानें गाणें गात. दोन टोकांमधलें अंतर केव्हां बरेंच दूर पडलें, तर ते खुणेसाठीं पडघम वाजवीत. या लष्करी वाद्यांचा आवाज आणि त्या प्रशांत पहाडांत त्यांचा उठलेला प्रतिध्वनी ऐकून शिपायांनां हुशारी वाटे व ते जोरानें पाऊल टाकून पुन्हां मूळ सैन्यास येऊन मिळत. अशा या ठिकाणीं नेपोलियन कधीं खेंचरावर बसून तर कधीं पायानें सर्वभर हिंडे. कोणी अडलेसें वाटलें कीं जवळ जाऊन त्याला इशारा देई. एका क्षणांत येथें तर दुसऱ्या क्षणांत तेथें असा तो सर्वांच्या जवळ जाई व प्रत्येकाजवळ थोडेफार कांहींतरी बोलून त्यांनां उत्तेजन देई. अनेक श्रम मोठ्या हौसेनें करून ही सर्व यात्रा अखेर सेंट बरनार्डच्या मठाजवळ आली. तेथें पोंचल्यावर त्या मठाधिपतींनीं सर्वांनां शेकशेगडी व खाण्याचे पदार्थ दिले. हें पाहून या पाहुणचाराबद्दल सर्वांनां अतिशयच आनंद झाला व ही

तरतूद अगोदरच करून ठेविली होती, हें ज्यांनां कळलें, त्यांनां तर आपल्या आवडत्या सरदाराबद्दल–नेपोलियनबद्दल–फारच प्रेम व कौतुक वाटलें. या मठांत दोन दिवस विश्रांति घेऊन हें सैन्य आल्प्स पर्वताच्या पलीकडल्या आंगास उतरूं लागलें. आपण हे गगनचुंबित उंच पर्वत ओलांडले याबद्दल प्रत्येकास मोठी हौस वाटूं लागली. चढणीपेक्षां उतरतांनां हाल झाले. संसारांत काय किंवा रानांत काय चढावापेक्षां उतरणीचा मार्ग आला म्हणजे त्रास फार होतो. घोडेस्वार पुढें लगाम धरून चालतांनां व मागून त्यांचे घोडे चालतांनां पाय जरा घसरला किंवा घोडयानें टापर खाल्ली तर त्याला व पुढल्या स्वाराला दोघांनांहि घसरून खालीं कोसळण्याची पाळी येई. तोफा तर त्यांनां फारच जपून उतराव्या लागत. गांवढयांतले बिगारी मिळाले, त्यांनां एकेक तोफ नेण्याबद्दल पांचपांचशें रुपये दिले. शंभर शंभर जणांनां जेमतेम एक तोफ खेंचे. एक दिवस तोफ चढणीवर चढवावी व एक दिवस ती उतरणीवरून उतरावी असें त्या उंचसखल वाटेला अनेक वेळां करावें लागे. इतके सायास करून सैन्य व सगळें सामान पलीकडे उतरलें, तेव्हां नेपोलियनला धन्यता वाटली. वाटेंत नेपोलियनबरोबर एक वाटाडया होता. त्याच्याशीं नेपोलियन वाट चालतां चालतां त्याच्या घरच्या व त्याच्या गांवच्या चौकशा करी व त्याच्या संबंधाच्या गोष्टी बोले. एकदां ‘ मजजवळ थोडासा पैसा असता, तर मीं पोटापुरती जमीन घेतली असती व मग या खोऱ्यांत एक छानदार पोरगी आहे तीच्याशींच लग्न केलें असतें ’ असें तो वाटाडया सहज बोलला. ते शब्द नेपोलियनच्या लक्षांत होते. वाट सरल्यावर त्यानें आपल्या सरकारास चिठ्ठी पाठवून त्याच्याकडून त्या वाटाडयाला थोडे पैसे व पोटापुरती जमीन घेऊन देवविली. तेव्हांपासून हा वाटाडया आनंदानें संसार करूं लागला. पुढें नेपोलियनचें राज्य गेलें तरी त्या वाटाडयाची जमीन व घर हीं कायम होतीं व तो चांगला म्हातारा होईपर्यंत जिवंत होता.

आस्ट्रीयन सरदार डिमेलो याला या हालचालींची मुळींच वार्ता देखील नव्हती. आपणांवर मोरेयूला सैन्य देऊन फ्रान्सनें रवाना केलें आहे,

हें मात्र त्याला कळलें होतें; पण हें मोरेयूचें सैन्य येथें येऊन काय दिवे लावणार, असें तो थट्टेनें बोलून त्याची टवाळी करी.

वरून डोंगराच्या कड्यावरून मोठी प्रचंड शिळा झपाट्यानें कोसळावी त्याप्रमाणें नेपोलियन खालीं एओस्टाच्या खोऱ्यांत एकदम उतरला. येथें सेंट बार्ड हा मजबूत किल्ला होता. आस्ट्रीयन सरदार बार्नेकाफनें तेथें बरेंच तोंड दिलें. त्यानें आपल्या जवळच्या थोड्याशा सैन्यानिशीं फ्रेंच सरदार बरथीएर यास मागें हटवून रस्ता पक्का रोखून धरला. यामुळें तोफखाना, एका लांबच्या वाटेनें नेणें भाग झालें. हा अडथळा पाहून नेपोलियन कांहींसा गोंधळून गेला. काइग्रे लिहीतो, " तो एवढा हुशार; पण त्याचीहि मति गुंग झालीशी दिसली. खिशांतली तपकीरीची डबी काढून तो चिमटींच्या चिमटी नाकांत कोंबींत स्वस्थ उभा होता. " अखेर त्यानें एक लहानशी अक्कल योजली व रात्रीच्या अंधारांत गाड्याच्या चाकांना गवत गुंडाळून आवाज न होऊं देतां सहा सात तोफा हळूच छपवून पलिकडे धाडल्या. गांवांतल्या वाटेवर घोड्यांची लीद पसरून टाकली होती. यामुळें त्या तोफा फारच निमूटपणें नेतां आल्या व दुसरे दिवशीं या तोफांनीं मारा करून सेंटबार्डचा किल्ला सर केला व मग बाकी तोफखाना त्या रस्त्यानें पुढें नेला. सेंट बार्ड हा किल्ला अशा रीतीनें हस्तगत करून तेथेंच तो थोडावेळ मुक्काम करून राहिला. सैन्यानें थोडासा विसांवा घेतल्यावर तो पुढें एकदम मीलन शहराकडे वळला व ता. २ जून रोजीं मोठ्या आनंदानें व समारंभानें त्यानें त्या शहरांत प्रवेश केला. तेथले लोक यास मनापासून चहात असत. नेपोलियन आणि त्याचें सैन्य आपल्या शहराजवळ या सालीं पुन्हां आलेलें पाहून मिलनमधल्या व एकंदर इतालींतल्या रहिवाशांना फार आनंद झाला. हे सर्व लोकसत्तेचे कैवारी, दुनियेंतल्या राजांचे शत्रू, आस्ट्रीयन राजघराण्याच्या मगरमिठींतून आपणांस सोडविण्यासाठीं धावून आले आहेत, असें त्यांस वाटलें. गेले खेपेला हेच फ्रेंच आले होते तेव्हां त्यांच्या आंगाला धड कपडा नव्हता कीं पायांत धड बूट नव्हता; पण या वेळीं उत्तम तऱ्हेचे लष्करी पोषाख ल्यालेले व सर्व युरोपभर कीर्ति मिळविलेले हे लोकसत्तेचे, धारगिर, हे

देवी स्वतंत्रतेचे सैनिक पाहून त्या इतालियनांस फार आनंद वाटला. नेपोलियन हा आपलाच देशबंधू आपल्याकडे आला, असें त्यांस वाटलें. त्यांनीं त्याला थाटानें नेऊन राजवाड्यांत उतरविलें. येथें असतांनां व्हिएन्नाचा दरबार व सरदार डिमेलो यांचेमधील पत्रव्यवहाराचे कागद नेपोलियनच्या हातीं लागले. ते वाचून त्यांचे काय डाव आहेत, त्यांचें सैन्य किती आहे व तें कसकसें पसरलेलें आहे आणि डिमेलो यानें कोठें काय तजविजी केल्या आहेत हें त्याला स्पष्ट कळून आलें.

सैन्याच्या आघाडीवर असलेल्या सरदार डिमेलोला ही नेपोलियनची धोंड पर्वतावरून आपल्या डोक्यावर कोसळते आहे, याची कल्पनाहि नव्हती. व्हिएन्नाच्या दरबाराला थोडीशी कुणकुण लागलेली असावी; पण ती बातमी साफ खोटी आहे, अशी डिमेलोनें त्याची खातरजमा करून दिली होती. पण थोडेच अवकाशांत डिमेलोचे डोळे उघडले व आपल्यापुढें काय संकट उभें आहे, याचें स्पष्ट चित्र त्याच्यापुढें उभें राहिलें. डिमेलोचे सैन्य दोन ठिकाणीं विभाग करून होतें. पैकीं एक भाग जनरल आट याच्या हाताखालीं जिनोव्हाकडे होता व दुसरा सरदार डिमेलो याचे हाताखालीं होता. नेपोलियन पहिल्याप्रमाणेंच आतांहि एकेकाशीं गांठ घालून प्रत्येकाचा नायनाट करील, अशी त्याला भीति वाटूं लागली. म्हणून त्यानें तसें न होईल अशा तजविजीचे हुकूम सोडले. या वेळीं नेपोलियन स्ट्राडेला येथें छावणी करून होता व लेन्स फ्रेंच सैन्याची एक तुकडी घेऊन मांटेबेलोकडे जात होता. वाटेंतच लेन्सची व जनरल आटच्या सैन्याची गांठ पडून आटनें लेन्सवर हल्ला केला. आटजवळ लेन्सपेक्षां पुष्कळच जास्त सैन्य होतें, तरी लेन्सनें फारच शौर्यानें लढून आटचा पराभव केला. या लढाईत आस्ट्रीयनांकडून गोळ्या इतक्या झडत होत्या कीं, स्वतः लेन्सनें त्याबद्दल मागाहून म्हटलें, "गारांच्या पावसांत आकाशकंदिलावर त्यांचा कडकडाट व्हावा, तशी माझ्या सैन्यांतल्या लोकांची हाडें कडकडत होतीं." नेपोलियननें त्या दिवशींच्या कर्तबगारीबद्दल लेन्सला 'ड्युक ऑफ मांटेबेलो' ही पदवी दिली.

याचवेळीं जनरल डीसे हा आपल्या हाताखालचे कामगार राप व सावारी यांसह सैन्यांत येऊन मिळाला. इजिप्तहून येतांनां जनरल डीसे यास तिकडेच ठेवला होता. तेथून हा परत आल्याबरोबर यानें नेपोलियनला पत्र लिहून मला कांहीं कामगिरी सांगा म्हणून विनंति केली होती. त्यावरून डीसेला ताबडतोब इतालींत बोलावून घेतलें व त्याच्याकडे एका पथकाचा अधिकार देऊन त्याला नेपोनियननें जिनोव्हाचे बाजूस डिमेलोचे आंगावर पाठविलें.

अखेर फ्रेंच व आस्ट्रीयन सैन्याची गांठ मारेंगो येथें ता १४ जून रोजीं पडली. पहांटेपासूनच लढाईस तोंड लागलें. आस्ट्रीयन सरदार डिमेलो यानें फारच लगट केली. त्यांनीं एकावर एक बंदुकीच्या फैरी अशा झाडल्या कीं तें एक अग्न्यस्त्रच आहे असें वाटलें. आघाडीवर फ्रेंचाचे बाजूला सरदार व्हीक्टर हा होता. याचा पुरा मोड होऊन तो मागें हटला. नेपोलियननें दुसरी रांग पुढें धाडली, तिचीहि तीच दशा उडाली. सर्व फ्रेंच सैन्य तळ सोडून मागें आलें. चोहोंबाजूनें आस्ट्रीयन लोकांची सरशी दिसूं लागली. फ्रेंच सैन्य सैरांवैरां धावूं लागलें. तेव्हां नेपोलियन थोडा परतून पळणाऱ्या लोकांना मारेंगो गांवाच्या मागचे बाजूला पुन्हा एके ठिकाणीं जमवूं लागला व रणावरील सैन्यासहि त्यानें तेथेंच येण्याचा हुकूम दिला.

मारेंगो गांव मध्यें घालून जरा पिछाडीला डोंगराची एक घळ होती, तींत जाऊन नेपोलियन सैन्याची नीट जमवाजमव करूं लागला. ही जागा शत्रूंच्या तोफांच्या टप्प्यांतली होती; पण येथेंच सभोंवती आपले सरदार उभे जमवून त्यांच्याबरोबर नेपोलियन पुढील योजना करवीत होता. आपलें पुढें त्यानें शूर स्वारांची एक भिंतच उभी केली व जो गोळी लागून पडेल त्याची जागा पटकन दुसऱ्यानें भरावी व या मानवी देहांच्या भिंतीस खिंडार पडूं देऊं नये, अशी सक्त योजना केली होती. नेपोलियन या शिपायांच्या मागें शांत चित्तानें, बिलकूल क्षुब्ध न होतां बसून पुढें नकाशे पसरून विचार करीत होता. इतक्यांत डीसेचा कामगार सावारी तेथें आला. त्यास नेपोलियननें खिशांतून घड्याळ काढून विचारलें, तूं डीसेला सोडून केव्हांसा निघालास ? सावारीनें उत्तर दिल्यावर त्यास नेपोलियननें

सांगितलें, तर मग डीसे येथून फार दूर नसेल, तूं एकदम डीसेकडे जा व त्याला या ठिकाणीं —नकाशावर बोटानें दाखवून—एकदम येण्यास सांग. असाच दुसरा निरोप त्यानें मागाहून केलरमनलाहि पाठविला व ठरविलेल्या ठिकाणीं आपलें सर्व सैन्य नेपोलियननें एकदम जमवून उभें केलें. इकडे आस्ट्रीयन जनरल डिमेलो यानें ही हालचाल पाहून नेपोलियन युक्तीनें माघारा जात आहे, असा अंदाज बांधला व आतां आपला पूर्ण विजय झाला, असें जाणून पुढील कामगिरी हाताखालचा सरदार झाक याजवर सोंपवून तो ऐंशी वर्षांचा वृद्ध सरदार थोडया विश्रांतीसाठीं छावणींत गेला. इतकें होतें आहे, तों दुपारचे तीन वाजून गेले होते. फ्रेंचांचा पाठलाग करून त्यांची दाणादाण करण्यासाठीं झाक थोडा पुढें सरतो, तोंच गांवापलीकडे वळणावर त्याला डीसेचे नव्या दमाचे सहा हजार लोक समोर काळासारखे उभे दिसले. आस्ट्रीयन सैन्य पुढें येतांच डीसेनें एकदम निकरानें त्यांच्यावरचाल केली व आस्ट्रीयन सैन्याची गाळण उडवून दिली. नेपोलियनच्या हातांतून निसटलेला विजय डिसेनें परत फिरवला. थोडेच वेळांत नेपोलियनहि त्या ठिकाणीं येऊन पोंचला. लढाई फारच जोराची झाली. नेपोलियन गोळ्यांच्या ऐन वर्षावांत टेहळणी करीत व हुकूम देत हिंडत होता. शत्रूकडील गोळ्यांनीं त्याच्या घोडयाच्या टापांखालची माती उसळून उडे, ती पाहून जवळचे लोक घाबरत व त्याला दूर सरण्यास सांगत; पण तो शूर वीर तेथून बिलकुल हालला नाहीं. आतां आस्ट्रीयनांचा एकसारखा नाशच होऊं लागला. कारण आपला जय झाला आहे, अशा पक्क्या समजुतीनें ते लोक गाफील व धुंद झाले होते. एका तुकडीचा नाश झाल्यावर दुसरी तुकडी आली. तिचीहि तीच वाट लागली. फ्रेंचांचा विजय झाल्याचें स्पष्ट दिसूं लागलें. हजारों आस्ट्रीयन शिपायांचीं प्रेतें तेथें पसरून पडलीं. तीं तुडवीत फ्रेंच पुढें सरले. जनरल झाकला त्याच्या हाताखालच्या सर्व कामगारांसुद्धां फ्रेंच्यांनीं कैद केलें. मागाहून शिल्की आस्ट्रियन सैन्याचाहि पाठलाग जेव्हां चालू झाला, तेव्हां ते मागें बोरमीड नदीकडे पळाले; पण तेथेंहि त्यांना गांठून फ्रेंचांनीं त्यांची कत्तल केली. नदींत प्रेतें इतकीं पडलीं कीं, त्यांच्या रक्तानें नदीचें पाणी तांबडें होऊन

गेलें. प्रेतांच्या गर्दीमुळें नदी उतरण्यास वाटहि मिळेनाशी झाली. अखेर पुष्कळ लोक शरण येऊन त्यांनीं शस्त्रें खालीं ठेविलीं. फ्रेंचांचा दुपारपर्यंत पराभव झाला होता; पण त्याचे ऐवजीं आतां त्यांचा पूर्ण जय झाला. या एकाच लढाईनें आस्ट्रीयाच्या एक तृतीयांश सैन्याचा नाश झाला, इतकी ती लढाई भयंकर झाली. या लढाईचे भर धामधुमींत कांहीं वेळ नेपोलियन हा समरांगणावर निजला होता. लढाईचे धामधुमींत सरदार डीसे हाहि समरांगणावर निजला; पण डीसे निजला तो पुन्हां उठला नाहीं. तो गोळी लागल्यामुळें मरून पडला होता. यामुळें नेपोलियनचा फार विरस झाला. नंतर त्यानें डीसेच्या हाताखालचे कामगार राप व सावारी यांस सरदारकी देऊन आपलेजवळ ठेवून घेतले. यावेळेपासून अगदीं अखेरपर्यंत सावारीनें नेपोलियनची फार एकनिष्ठपणानें सेवा चाकरी केली. अगदीं पडत्या काळांत जे लोक नेपोलियनला चिकटून राहिले होते, त्यांपैकींच सावारी हा एक होता. नेपोलियनचे संकट काळांतहि त्याची सेवा करण्यास सावारीच्या मनांतून सेंट हेलिना येथें जावयाचें होतें; पण त्याला त्याच्या बरोबर इंग्रजसरकारनें जाऊं दिलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर उलट त्याला कैद करून माल्टा येथें नेऊन ठेविलें.

त्याच रात्रीं नेपोलियननें सरदार डिमेलोला सर्व आस्ट्रीयन सैन्यासुद्धां असें गुरफटून टाकलें कीं, शरण येऊन कौल मागण्याशिवाय त्यास दुसरा मार्ग राहिला नाहीं. दुसरे दिवशीं सकाळींच डिमेलोनें तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां नेपोलियननें लिग्युरिया, पिटमांड, लांबार्डी या भागांतील सर्व किल्ले तावडतोब आमचे स्वाधीन करावेत व आस्ट्रियानें मिन्सीओपर्यंतचा इतालीचा सर्व भाग सोडून द्यावा, अशा अटी त्यास कळविल्या. या अटी ऐकून डिमेलोनें थोडें आकांडतांडव केलें व आपण या अटींस कबूल होणें शक्य नाहीं, असें कळविलें. यावर नेपोलियननें आलेल्या मनुष्याबरोबर थोडा रागाचा निरोप पाठविला की, “ मीं कांहीं लष्करी पेशा काल उचलला नाहीं. तुम्हीं कशा पेचांत सांपडले आहां, हें मी चांगलें जाणतों व काय मागावें हेंहि मला नीट समजतें. मी ज्या अटी सांगितल्या, त्याच कायम आहेत. त्यांत बदल होईल असें बिलकूल समजूं नका. यावेळीं

तुम्हीं अशा अडचणींत आहां कीं, मी जें मागेन तें आतां तुह्मांस देणें भाग आहे; पण तुमच्या सरदाराच्या वयाकडे व त्याच्या पिकलेल्या केसांकडे पाहून मी फारसें कांहींच मागत नाहीं. आजच्या स्थितीला व एकंदर लष्करी धोरणाला यावेळीं जें अत्यंत अवश्य आहे, तेवढ्याचीच मी मागणी केली आहे." अखेरीस नेपोलियननें लिहिलेलीं सर्व कलमें व सर्व मागण्या कबूल करून डिमेलोनें तह केला.

या प्रमाणें गेल्या संबंध वर्षभर आस्ट्रियानें मोठ्या परिश्रमानें मिळवलेले विजय, एका दिवसांत अगदीं फुकट होऊन गेले. यामुळें आस्ट्रियाचा फारच पाणउतारा झाला. इतकेंच नव्हे तर मारेंगोच्या विजयामुळें इंग्लंडचीहि फारच निराशा झाली आणि त्या देशानें पोसलेल्या बादशाही कैद्यांचे —लुईबोरबोनचे—पुन्हां पारिसमध्यें पाय ठेवण्याचे बेत जागच्या जागींच जिरून गेले. नेपोलियनला या विजयामुळें अगणित लाभ झाला. इजिप्तची आणि १८ व्या ब्रुमेयरची आठवण लोक पार विसरून गेले आणि आतां त्यांच्या डोळ्याला नेपोलियन हा आपला सर्वस्वी आधार दिसूं लागला. सेंट बार्डच्या किल्ल्यावरील हल्ल्यांत नेपोलियनला माघार आल्याची खोटी हूल पारिसमध्यें उठली होती. त्या बरोबर लाफेटी, साईस, फुशे, कारनो वगैरेंचीं खलबतें सुरू झालीं व नेपोलियनचा पराभव झाला, तर फर्स्ट कौन्सल कोणाला करावा या वाटाघाटी टालेरांच्या घरांत रोज होऊं लागल्या; पण या मारेंगोचे विजयानें यासर्वांच्या तोंडाला आतां कुलपें पडलीं. इतकेंच नव्हे तर हेच लोक पुन्हां नेपोलियनच्या मोठेपणाच्या गोष्टी तोंडानें बोलूं लागले व त्याच्या नगरप्रवेशाची तयारी हातानें करूं लागले.

आपल्या मार्गे पारिसमध्यें लोक आपल्या विरुद्ध बोलूं लागले आहेत, ही बातमी नेपोलियनच्या कानावर गेली होती. यामुळें तो लवकरच मीलनच्या वाटेनें पारीस येथें येण्यास निघाला. वाटेंत सर्वांनीं त्याचा फार जयजयकार केला. नेपोलियनचा परत प्रवास म्हणजे समारंभाची एक लांबचलांब मालिका होती. त्याच्या वाटेवरील प्रत्येक शहर, गांव व खेडें मोठाले समारंभ करून त्याचा गौरव करीत. लीयान्स व खुद्द पारीस या दोन शहरांत तर तेथील लोकांनीं फारच थाट उडविला होता.

शहरभर गुढ्या–तोरणें उभारलीं होतीं. शहरचे पुरुष व बायका आपापलें उंची पोशाख करून त्या दिवशीं त्यास सामोऱ्या आल्या. रस्तोरस्तीं व घरोघरीं सर्वांनीं दीपोत्सव केले होते. अगदीं गरीब कुटुंबवत्सलानेंहि आपल्या घरावर यथाशक्ति दिवे लावले होते. त्याच्या मार्गावर तरुण मुलींनीं व मुलांनीं फुलें उधळलीं होतीं. पारीसमध्यें कुस्त्यांचे आखाडे, सार्वजनिक खेळ वगैरे मुद्दाम करविले होते. यानें आपल्या देशाची अब्रू बचावली, यानें आपल्या देशाला वैभवाला चढविलें, यानें फ्रान्साला सर्व पृथ्वीवर पहिल्या दर्जाची पदवी मिळवून दिली. असें प्रत्येकाला या वेळीं वाटलें व त्या दिवशीं सर्व शहर किंबहुना सर्व फ्रान्स देश नेपोलियनच्या विजयोत्सवांत गुंग होऊन डुलत राहिला.

---

## प्रकरण अकरावें.

# तहाहयातचा कौन्सलदार.

मारेंगोहून परत येतांना नेपोलियन मोठ्या थाटानें आठ घोड्यांच्या गाडींत किंवा रथांत बसून, आणि इतर लवाजमाहि राजाप्रमाणेंच घेऊन परत देशीं आला. वाटेंत या राजरथाला त्याची कानखीळ उडून चाक पडल्यामुळें थोडा अपघात झाला; पण सुदैवानें नेपोलियनला किंवा रथाला फारशी इजा झाली नाहीं. यामुळें मध्यें अडथळा न येतां नेपोलियन हा ठरल्यावेळींच पारिस शहरांत टुलरीसच्या राजवाड्यांत येऊन पोंहोचला.

फर्स्ट कौन्सल झाल्यावेळेपासूनच नेपोलियन टुलरीसच्या राजवाड्यांत राहूं लागला होता. या राजवाड्यांतला प्रथम प्रवेश सर्व मंडळीसह त्यानें थाटानें केला. या राज्यवाड्यावर फ्रान्समधून राजसत्ता निरंतरची नष्ट केली आहे, अशीं अक्षरें कोरलीं होतीं. या वेळेपर्यंत तीं अक्षरें तशींच होतीं; पण पुढें लवकरच तीं तेथून दिसेनाशीं झालीं. इतके दिवस लुई राजाला सुळावर चढवला तो दिवस फ्रान्समध्यें सणासारखा पाळला जात असे व त्या दिवशीं लोक मोठा उत्सव करीत; पण हें रानवटासारखें

दिसणारें कृत्यहि हळूहळू बंद पाडण्यांत आलें. याचे बदली कांहीं नवीन सण व उत्सवाचे नवीन दिवस आले आणि त्या अक्षरांचे ऐवजीं पुराण-प्रसिद्ध आणि स्वतंत्रता-प्रिय अशा अनेक लोकांचे पुतळे किंवा चित्रें त्या राजवाड्यांत दिसूं लागलीं. असे अनेक लहान मोठे फेरबदल हळू हळू होऊं लागले व राजक्रांतीच्या खाणाखुणा हळूहळू पुसून टाकण्यास सुरवात झाली.

नेपोलियननें प्रथम जोसेफाईनच्या महालाची व्यवस्था लावून दिली. आणि हें करण्यांत देखील त्यानें फार दक्षता वापरून एक धोरण संभाळलें. जोसेफाईन पूर्वीच्या राजवटींत खासे मंडळींत वावरलेली असल्यामुळें तिला त्यांचे रीतीरिवाज जरी चांगले माहीत होते, तरी तिची स्थिति कांहींशी 'आधीं होता वाघ्या त्याचा झाला पाग्या' अशी झालेली होती. ती स्वभावानें थोडी भोळी व मनानें उच्छृंखल असल्यामुळें राजक्रांतीच्या धामधुमींत अनेक हलक्या माणसांची व तिचीमैत्री जमली होती. तीं सर्व आतां तिच्याकडे येऊं लागलीं. ज्यांचे चेहरे मात्र सुंदर पण कृत्यें नरकापेक्षांहि किळसवाणी, जे माणूसकींतून अगदीं उठून गेलेले, असे अनेक लोक, तसेंच सट्टयांत आणि जुगारांत सधन झालेले व्यापारी, नादारीच्या कोडतांत हेलपाटे मारणारे दिवाळखोर, सातसात आठआठ वेळां घटस्फोट केलेल्या स्त्रिया, पोकळ जहागीरदार, बारससारख्यांची प्रेमपात्रें, ही सर्व मंडळी जुन्याजुन्या ओळखी काढून तेथें डोकावूं लागत. हीं आपल्याकडे येतात येवढ्यानेंच जोसेफाईनला मोठी हौस वाटे. आपण अमक्याशीं संगत करावी आणि तमक्याशीं करूं नये, असा विधि निषेध तिच्या मनाला कांहींच नव्हता. कोणीतरी चार मंडळी यावी व मौजेनें आणि हौसेनें खेळून बागडून वेळ घालवावा, इतकेंच तिला वाटे. आणि तिला याच्या आड आजपर्यंत कोणीं कधीं आलेंहि नाहीं; पण आतां काळ बदलला होता. तिच्या तोंडांतून शब्द पडावा आणि तो नेपोलियननें झेलावा, हा काळ निघून जाऊन नेपोलियननें हुकूम करावा आणि तो तिनें मानावा, असा काळ आला होता. नेपोलियननें प्रथम तिची भेट कोणासहि घेणेतर आगाऊ वर्दी लावून परवानगी मिळवून मग घ्यावी, असें ठरविलें. परवानग्यांना प्रथम थोडा व

नंतर जास्त जास्त उशीर लागतां लागतां शेवटीं पाहून पाहून शेलक्या मंडळीलाच परवानगीचा लाभ मिळूं लागला. मादम टालिया, मादम हामेलिन वगैरे सारख्यांनांतर जवळ जवळ बंदीच झाली. या अशा मैत्रीणींनां जसजसे दरवाजे बंद होत गेले, तसतसे जुन्या बादशाहींतील संभावित व भारदस्त मंडळीला ते खुले झाले. त्यांनां जोसेफाईनकडून नेपोलियन फार आदरानें वागवी व आपल्या नवीन कारकीर्दीबद्दल त्यांच्या मनांतला राग व तिरस्कार नाहींसा व्हावा आणि त्यांनां आपला आदर वाटावा, असें वर्तन तो जोसेफाईनकडून ठेववी. जोसेफाईनमार्फत त्यांनीं केलेल्या मागण्या तो नेहमीं मान्य करी व त्यांच्या पडत्या काळांत त्यांनां हातभार लावून मदतहि करी. त्यांच्या मुलांनां, भावांनां किंवा इतर नातलगांनां तो लहान मोठ्या जागा देऊन त्यांचा गौरव करी व मुद्दाम प्रसंगाचें निमित्त करून या जुन्या राजवटींतल्या मंडळीला तो जोसेफाईनकडून अनेक नजर नजराणें पोचवी. त्याचे नवीन सरदार व अम्मलदार होते, त्यांची पैदास्स कोठें व कशी झाली होती, हें नेपोलियन जाणून होता. त्या नवीन सरदारांच्या स्त्रिया बहुशः साधारण घराण्यांतल्याच असत. त्याहि आपल्या नवऱ्याच्या धनीणीकडे वारंवार येत. तेव्हां त्यांची आणि या जुन्या मंडळीची मैत्री जमवून देऊन त्यांनाहि एकमेकांत मिसळण्याची संधी नेपोलियन वारंवार आणवी. कित्येक वेळां तर या नवीन श्रीमंतीणींनां केंस सारखे करण्यापासून, सूचना द्याव्या लागत. हळूहळू या सर्व गोष्टींत जोसेफाईन पूर्ण तरबेज झाली व टुलीरीजच्या राजमंदीराला शोभेल अशा थाटाचा आपला महाल बनवून तेथें थोर व संभावित स्त्रियांचा एक दरबारच भरवूं लागली. थोडेच दिवसांत जुन्या बादशहाच्या पद्धतीप्रमाणें आपल्या, नंतर आपल्या बायकोलाहि सरदारांनीं व परदेशच्या वकीलांनीं मुजरे करावे अशी शिस्त नेपोलियननें घालून दिली, आणि मग आपले दरबारांत विशेष समारंभाचे वेळीं आपले बायकोनें—जोसेफाईननें—उंची पोषाख करून यावें, असा रिवाज सुरू केला. स्त्रियांप्रमाणेंच टुलीरीजमध्यें येणाऱ्या पुरुष मंडळीमध्येंहि नवे नवे रिवाज घालून थाटाची शिस्त लावून दिली. आपले नवे सरदार, नवे मानकरी, नवे अम्मलदार, दरबाराला शोभेल असेंच वर्तन यांचेकडून

नेपोलियन ठेववूं लागला. हे जरा गांवढळाप्रमाणें वागत व यांचे तोंडांत हलके शब्द असत व अदब कशी राखावी, हें यांनां कळत नसे. या करतां एक स्वतंत्र कामदार नेमून त्याच्या कडून हळूहळू ही सर्व सुधारणा करण्यास सुरवात झाली. नवीन मंडळीचें वर्तन पाहून जुनी मंडळी हळूच टवाळ्या करी. टालेरां ही मंडळी जमली असतां एकदां म्हणाला, " गुळगुळीत जमीनीवरून बूट घालून चालण्याला देखील संवय लागते. सहज साधत नाहीं. " या नवीन मंडळीसंबंधानें सहज बोलतांनां नेपोलियन एक दिवस म्हणाला:—" या आमच्या नवीन सरदारानां आणि मानकऱ्यानां लोक चाहातात व मान देतात, याचें मुख्य कारण असें आहे कीं, पूर्वींच्या राजवटींतल्या सरदारकीच्या आणि मानकऱ्यांच्या जागा हल्लीं यांच्याकडे आहेत. "

लेन्सनें यावर उत्तर केलें, " ही जुनी मंडळी आमचा द्वेष कां करते हें कळत नाहीं. त्यांच्या व आमच्यांत फरक इतकाच कीं, ते पूर्वींच्या थोर व खानदानीच्या लोकांचे वंशज आहेत व आम्हीं पुढील पिढ्यांतल्या थोर व खानदानीच्या लोकांचे पूर्वज आहों. " असो.

आस्ट्रीयांतल्या मारेंगो येथील विजयामुळें नेपोलियननें स्थापलेल्या नव्या राज्यकारभारास–कौन्सलेटच्या व्यवस्थेस–मोठा दुजोरा आला. नेपोलियन विरुद्ध कोठें कोनाकोपऱ्यांत एखादे ठिकाणीं धुसफुस चाले, तीहि आतां बंद पडली. कोणी एकाद्यानें नापसंतीचा ध्वनि उच्चारला, तर प्रतिध्वनीहि उठेनासा झाला व देशांत सर्वभर त्याची स्तुतीच ऐकूं येऊं लागली. यामुळें राजपक्षाला चिकटून राहिलेले असे जे लोक होते, त्यांनां आतां आपलीं तोंडें बंद करणें अवश्य झालें; पण तोंडें बंद झालीं, तरी त्यांचे हात काम करीत होते. त्यांनां क्रांतिकारकांचेंहि साह्य थोडेंसें मिळे. दोघांचे हेतू अगदीं भिन्न होते. तरीपण त्या दोघांच्या हेतूंनां नेपोलियन हा सारखाच अडथळा होता व त्याला नाहींसा करणें दोघांनांहि प्रिय होतें.

मारेंगोहून परत आल्यावर एके दिवशीं म्हणजे ता. २४ दिसेंबर रोजीं रात्रीं आपल्या सर्व मंडळीसह नेपोलियन नाटकाचा खेळ पाहण्यास जाणार होता. आज नेपोलियन स्वतः नाटकाला येणार ही बातमी जाहीर झाली

होती. यावेळीं स्फोटक द्रव्यांच्या योगानें तें सर्व नाटकगृहच उडवून द्यावें, असा कटवाल्यांचा बेत होता; पण न जाणो असें केलें तर कदाचित त्या एवढ्या मोठ्या स्फोटांत नेपोलियन जिवंत वांचण्याचा संभव आहे, असें वाटून तो बेत त्यांनीं सोडून दिला व मग रात्रीं नेपोलियन नाटकाला कोणते रस्त्यानें जाणार ती पाळद ठेवून व किती वाजतां तो येणार त्या वेळेची नक्की बातमी राखून कांहीं लोकांनीं एका हातगाडीवर दारू व इतर स्फोटक द्रव्यें भरलेलें पिंप चढविलें. नेपोलियन ज्या रस्त्यानें जाणार त्या रस्त्यावर ती गाडी सहज वाटेंत राहावी अशी ठेवून नीट वेळ साधून रंजकहि लावली; पण ते दिवशीं नाताळचा सण असल्यामुळें नेपोलियनच्या मोतद्दारानें निशा थोडी जास्त घेतली होती. त्या अमलांत त्यानें घोडे जोरानें हांकळले व गाडी सुमारें दोन क्षण लवकर निघून गेली. नेपोलियनची गाडी कांहींशा अंतरावर दूर गेली नाहीं, तोंच मागें त्या पिंपाचा स्फोट होऊन धडाका उडाला. फार मोठा आवाज झाला व आंत भरलेल्या वस्तूंनीं आजूबाजूचे वीस लोक मरण पावले आणि ५६ जखमी झाले. आवाज ऐकून नाटकगृहांत मोठी धांदल उडाली; पण थोडेच वेळांत नेपोलियन आंत शिरला तेव्हां, सर्वांनीं मोठा आनंदाचा गजर केला. यावेळीं आपण थोडे देखील घाबरल्याचें न दाखवतां नेपोलियननें आपली वृत्ति अगदीं शांत ठेवली होती. मागाहून एकदां कोणी स्नेह्यानें त्यास म्हटलें कीं, 'तो आवाज ऐकून तुम्हीं एकदम भ्यायले असाल?' यावर नेपोलियननें उत्तर दिलें, 'मला भीति वाटली, म्हणजे ते दिवशीं या फ्रान्स देशाचें नशीब संपलें असेंच समजा.'

नाटकगृहांतून परत गेल्यावर गांवचा कोतवाल फुशे यास बोलावून आणून सर्व चौकशी झाली. याच वेळीं फुशेनें हें कृत्य राजपक्षाच्या लोकांचें आहे, असें सांगून आठ दिवसांचे आंत सर्व पुरावा हजर करण्याचें कबूल केलें व पकडापकीडीच्या धामधुमीस सुरवात झाली.

त्या रात्रींच्या धडक्यानें जे वीस लोक मरण पावले होते, त्यांचे कुटुंबांस व जे छप्पन लोक जखमी झाले होते, त्यांस लहान मोठ्या रकमा पोंचवून दिल्या. या लोकांची व रकमांची यादी फुशेच्या आत्मचरित्रांत

दिली आहे, त्यावरून पाऊण लक्षांवर फ्रांकची रक्कम नेपोलियननें त्या लोकांस मदत म्हणून वांटून दिली, असें दिसतें.

थोडे दिवसांचे आंतच दोन न्यायासनें नेमून त्यांच्यापुढें गुन्हेगा-रांच्या चौकशा झाल्या व फांशीपासून तो हद्दपारीपर्यंत प्रत्येकाच्या गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणें लहान मोठया शिक्षा फरमावण्यांत आल्या. इतकेंच नव्हे, तर यासारखे भयंकर प्रकार पुन्हां घडूं शकूं नयेत म्हणून जे विशेष चळवळे आहेत व ज्यांच्या वर्तनासंबंधीं संशय घेणारास खात्रीलायक जागा आहे, अशा इसमांसहि देशांतून बाहेर घालवून देण्याचे अधिकारहि पोलिसचे हातांत आले. या अधिकारांच्या जोरावर ज्यांचा राजपक्षाकडे ओढा आहे, किंवा हल्लींच्या राज्यव्यवस्थेविरुद्ध ज्यांचीं मतें आहेत, असे अनेक लोक यावेळीं देशाबाहेर घालवून दिले. यामुळें नेपोलियनच्या वाटेंतले कांटे पुष्कळच आपोआप दूर झाले.

मारेंगोच्या लढाईनंतर एक तात्पुरता तह आस्ट्रीयाशीं केला होता; परंतु पक्का तह पुढें व्हावयाचा होता. हा तह करण्याची आस्ट्रीया आतां थोडी दिरंगाई करूं लागला. कारण नेपोलियन परतल्यावर आपण थोडासा हात पाय हालवून पहावा, असें त्याला वाटूं लागलें; परंतु याच सुमारास नेपोलियनच्या बरोबरीचा दुसरा सरदार मोरेयु यानें अनेक लढाया जिंकल्या व शेवटीं होहेन लिंडन या ठिकाणीं पुष्कळ पराक्रम करून आस्ट्रीयाच्या त्या बाजूच्या सर्व सैन्याचा पुरा मोड केला. यामुळें जास्त वेळ न लावतां आस्ट्रीयानें तहाचे वाटाघाटी करतां आपले वकील पारीसमध्यें रवाना केले. प्रथम आस्ट्रीयाच्या बादशहानें काऊंट जुलिन या नांवाचा एक वकील धाडला. याच्या बरोबर काऊंट नियबर्ग हाहि होता. ही जोडी अगदींच अक्कलशुन्य होती. जुलिन हा थोडा भोळसर असून स्वभावानें अगदीं साधा होता. निघतांना त्याला 'तूं तहाच्या वाटाघाटीच्या भानगडींत फार पडूं नको' असें त्याच्या सरकारनें स्पष्ट बजावलें होतें; पण येथें आल्यावर तुला तह करण्याचा पूर्ण अधिकार आहे, असें त्याच्या मनांत नेपोलियननें प्रथम भरवून दिलें व मग त्याला मोठया इतमामानें वागवून तहाच्या अटी त्याच्यापुढें मांडल्या. अटी जरा कडकच होत्या. त्यावर सही

करण्यापूर्वी त्या भोळसटानें टालेरांला विचारलें, 'तुमचें काय मत आहे ? मीं यावर सही करावी किंवा नाहीं ?' टालेरांनें गंभीर मुद्रेनें त्याचेकडे पाहून उत्तर दिलें, 'तुमचे जागीं मी असतों तर मीं सही केली असती.' शिवाय टालेरांनें त्याला अशी भीति घातली कीं न जाणो, तूं सही केली नाहींस आणि नेपोलियननें लढाईस सुरवात केली, तर त्याचें सगळें खापर तुझ्या डोक्यावर फुटेल. दुसरे दिवशीं काऊंट जुलिनची सही होऊन कागद पुरा झाला. कागद पुरा झाला, याचा अर्थ तहाच्या मसुद्याचा कागद पुरा झाला. अजून त्याला आस्ट्रीयन बादशहाची मान्यता मिळून त्यावर त्या सरकार तर्फे पक्की सही व्हावयाची होती; पण इतक्या अवधीची वाट न पाहतां, नेपोलियननें तो तह सर्व प्रकारें पुरा झाला, असें मानून त्याप्रमाणें वागण्यासहि सुरवात केली. इकडे अटींचा कागद घेऊन काऊंट जुलिन परत देशांत आपल्या राजाकडे गेला, तेव्हां त्या अटी पाहून आस्ट्रीयाचा बादशहा इतका संतापला कीं, त्यानें काऊंट जुलिनची एकदम तुरुंगांत रवानगी करून दिली व या आपल्या हस्तकानें केलेल्या अटी आह्मास बिलकूल पसंत व मंजूर नाहींत, असें परत कळविलें. ही हकीगत नेपोलियनचें कानावर आली, तेव्हां तो म्हणाला, 'मला तेव्हांच वाटलें होतें कीं, या जुलिननें लिहून दिलेल्या अटी केव्हांहि आस्ट्रीयाचा राजा मान्य करणार नाहीं; पण आपल्या माणसानें कबूल केलेल्या अटी मागाहून हा राजा नाकबूल करतो, अशी त्याची सर्व युरोपभर नाचक्की व्हावी म्हणूनच त्या मीं त्या वेळीं लिहून घेतल्या.' काऊंट जुलिनची अशी वाट लागल्यावर काऊंट कार्बेटझल हा बोलणें करण्यास आला. यानें लुनेव्हेली येथें नेपोलियनचा भाऊ जोसेफ होता त्याचेजवळ तहाची वाटाघाट करावी, असें ठरलें होतें; पण याला प्रथम नेपोलियननें आपले भेटीस पारिसमध्यें बोलावलें व याचा मोठा फार्स उडवला. कार्बेटझल हा सायंकाळचे वेळीं नेपोलियनचे काम करण्याचे दालनांत भेटण्यास गेला, तेव्हां जीवर नेपोलियन बसला होता, तेवढीच एक खुर्ची तेथें होती. बाकी सर्व खुर्च्या तेथून काढून टाकल्या होत्या. यामुळें नेपोलियनसमोर कार्बेटझलला उभें राहणें भाग झालें. तसेंच त्या दालनांत दिवेहि फार ठेवले नव्हते. फक्त लहान मिणमिण करणारा एकच

दिवा तेथें मेजावर ठेविला होता. पूर्वी आस्ट्रीयाचे कसे तुकडे उडवीन हें दाखविण्यासाठीं आपले समोर एका भांड्याचे जमिनीवर हापटून उडवलेलें तुकडे कार्बेटझलच्या स्मरणांत चांगलेच होते. त्यामुळें नेपोलियननें यावेळेस जरा दरडावून दिलेलें व्याख्यान कार्बेटझलनें खालीं मान घालून शांतपणानें ऐकलें व तेथून जाण्याची परवानगी मिळाल्यावर आपण मोठेंच जिंकलें असें त्यास झालें. पुढें लवकरच काऊंट कार्बेटझल यानें वाटाघाटी करून आपल्या राजातर्फे लुनेव्हेलीचा तह पुरा केला. हा तह ता. ९ फेब्रुवारी १८०१ रोजीं झाला. या तहानें आजपर्यंत कधीं मिळाला नव्हता इतका मुलुख व इतकी सत्ता फ्रेंच राष्ट्राला किंवा याहून खरें म्हटलें, तर नेपोलियनला प्राप्त झाली. लुनेव्हेलीच्या तहांतील अटी वाचून आणि ऐकून एकंदर फ्रेंच राष्ट्राला फारच कौतुक वाटलें. आजपर्यंत आपणांला पूर्वी कधीं मिळालें नव्हतें किंवा मिळेल असें कधीं वाटलेंहि नव्हतें, इतकें वैभव नेपोलियननें आज मिळवून दिलें, हें पाहून सर्वांच्या मनांत त्याच्याविषयीं फार प्रीति उत्पन्न झाली. फ्रेंच्यांच्या वैभवाची व कर्तबगारीची नेपोलियन ही एक जिवंत प्रतिमा आहे, दृश्य अशी मूर्ति आहे, असें सर्वांस वाटूं लागलें आणि या प्रेमाच्या भरांत त्याचे लहानसहान सर्व अपराध ते पार विसरून गेले. नेपोलियनच्या जिवाला धक्का म्हणजेच फ्रान्सचे वैभवावर आघात, असें त्यांचें मन त्यांस सांगूं लागलें. गेल्या नाताळांत घडलेल्या गुन्ह्यांसंबंधीं सर्व चौकशा होऊन हे गुन्हे कसे घडतात याविषयीं आतां लोकांची खात्री झाली होती आणि त्याबद्दल लोकांनां फार संताप आला होता.

पूर्वीच्या कायद्यान्वयें सर कौन्सीलदाराच्या अधिकाराची म्हणजेच फर्स्ट कौन्सलचे अधिकाराची मुदत तीन वर्षांची ठरली होती; परंतु यावेळीं नेपोलियनच्या सुचवणीवरूनच त्याचें मन आपलेविषयीं प्रसन्न रहावें याकरतां त्यास यावेळीं फ्रेंच राष्ट्रातर्फे त्यास कांहीं बक्षीस देणें अवश्य आहे, अशी सिनेट सभेनें सूचना केली व त्याची कौन्सिलदारीची मुदत आणखी दहा वर्षें वाढवून दिली. हें ऐकून नेपोलियनास समाधान वाटलें नाहीं. त्याच्या दृष्टीला दहावर्षें म्हणजे कांहींच नव्हती;पण सभेच्या ठरावा-

नुसार ती देणगी कबूल करणें अवश्य होतें. या करतां त्यानें मोठ्या खोल हिकमतीनें असें सुचविलें कीं, "सभेच्या या इतक्या महत्वाच्या ठरावाला लोकमताचा स्पष्ट दुजोरा असला म्हणजे बरा. या करतां हा ठराव एकंदर फ्रेंच जनतेपुढें मांडून त्यावर मतें घ्यावींत." त्याप्रमाणें मतें घेण्याकरतां हा ठराव लोकांपुढें मांडला. मात्र तो लोकांपुढें मांडतांनां त्यांत थोडा बदल केला. "नेपोलियन बोनापार्ट यास तहाहयातचा कौंसिलदार नेमावा काय ?" अशा शब्दांनीं तो लोकांपुढें मांडला व मतें घेतलीं. या बाबतींत नेपोलियनचा अदमास खरा ठरून तो फ्रान्समधल्या प्रचंड लोकमतांच्या संख्येनें ठराव तसाच पास झाला व नेपोलियनकडे तहाहयातपर्यंत फर्स्ट कौन्सिलदारी कायम राहिली.

त्या सभेंत कांहीं सभासद प्रथम थोडे प्रतिकूल होते; परंतु एकंदर राष्ट्राचा कल पाहून त्या सर्व सभासदांनीं या सूचनेस आपलें अनुमोदन दिलें. शिवाय हेंहि खरें आहे कीं, मुदत सरल्यानंतर नेपोलियनचे जागीं पुन्हा नेमण्याला त्याचेशिवाय दुसरा कोण योग्य होता ? त्याचे इतका सर्व विद्यामध्यें निष्णात व सर्व कलांमध्यें विशारद असा त्याची जागा भरून काढण्याला कोण योग्य होता ? तसेंच आजच याचें मन दुखवलें तर कदाचित काय अनर्थ ओढवेल हें काय सांगावें ? असेंहि त्यांस वाटलें. अशा रीतीनें आतां सर्वांच्या म्हणजे फ्रान्समधील कार्यकारी सभांच्या व सर्व नागरिकांच्या मतानें नेपोलियन हा तहाहयातचा फर्स्ट कौन्सल झाला. कायदे करण्याचे, लढाई करण्याचे, तह करण्याचे वगैरे सर्व हक्क यालाच मिळाल्यासारखे झाले व प्रत्यक्ष नांवानें नाहीं, तरी इतर सर्व तऱ्हेनें तो फ्रान्स देशाचा राजा झाला.

यावेळीं फ्रेंचांची सत्ता फार वाढली होती व फार पॅालचें आणि नेपोलियनचेंहि चांगलें सख्य झालें होतें. इतक्या लढायानंतर आतां शांततेचे दिवस पाहण्याची सर्व फ्रेंच लोकांनां मोठी हौस वाटूं लागली होती आणि ही हौस पुरी होण्याला एका इंग्लंडशिवाय आतां कोणी आड येण्यासारखें दिसत नव्हतें. इंग्लंडमध्येंहि पिटचें प्रधानमंडळ बदलून यावेळीं नवें प्रधानमंडळ आलें होतें. या नव्या मंडळाच्या व एकंदर इंग्रजी राष्ट्राच्या मनां-

तहि आतां फ्रान्सशीं तह केल्यास बरें पडेल, असेंच येऊं लागलें होतें. 'तुम्हीं पाण्यावरचे सत्ताधीश, मी जमिनीवरचा सत्ताधीश. आपलें दोघांचें सख्य झालें म्हणजे जगांत शांतता चांगली नांदेल ' हे नेपोलियनचे शब्द सर्वांना चांगले रुचले आणि या दोन राष्ट्रांमध्यें ता. १ आक्टोबर १८०१ रोजीं तहाचा मसुदा कायम ठरला व पुढें लौकरच म्हणजे ता. २७ मार्च रोजीं हा तह दोन्ही बाजूंनीं कायम झाला. इतिहासांत हा तह एमीन्सचा तह या नांवानें प्रसिद्ध आहे.

---

प्रकरण बारावें.

## अंतर्व्यवस्था.

एमीन्सच्या तहानंतर नेपोलियनच्या पाठीमागची लढायांची काळजी दूर होऊन त्याला कांहीं दिवस शांततेचे सांपडले. हे सर्व दिवस त्यानें फ्रान्सची अंतर्व्यवस्था लावण्यांत खर्च केले.

तूर्त लढाई नव्हती तरी नेपोलियन स्वस्थ बसला नाहीं. त्यानें अनेक तऱ्हेचे उद्योग व प्रचंड घडामोडी फ्रान्समध्यें सुरू केल्या. आपल्या देशाचें आरमार जगांत पहिल्या प्रतीचें असावें म्हणून त्यानें नव्या गोद्या बांधविल्या. ज्या जंगलांत मोठमोठीं व उपयोगी लांकडें मिळण्यासारखीं होतीं तीं जंगलें मिळविलीं व कांहीं कांहीं ठिकाणीं उपयोगी झाडांची नवी लागवडहि करविली. देशांतल्या मुलांच्या विद्याभ्यासाची नवीन शिस्त बांधली. त्यासंबंधीं नवे नियम केले व चांगले चांगले शास्त्री, पंडीत यांच्या सल्यानें व मदतीनें विद्यालयें स्थापिलीं. एकंदरींत देशांतल्या मुलांच्या विद्याभ्यासाला नवें वळण लागेल व त्या कोंवळ्या मुलांचे आपल्या मनाप्रमाणें कर्ते पुरुष बनतील अशी तजवीज केली. शहरोंशहरीं सुधारणा करून व दवाखाने, रस्ते आणि कालवे काढून जेणेंकरून रयत सुखी होईल असे यत्न केले. या सर्व गोष्टी नेपोलियन खास स्वतःचे देखरेखीखालीं व पुष्कळ वेळां स्वतः करी. त्याच्या शरीराला व मनाला थकवा कधीं वाट-

लाच नाहीं. त्याच्या राहाणींत व मिजाशींत दिवसेंदिवस बदल होऊं लागला; पण उद्योगांत व कर्तबगारींत कधींहि फरक झाला नाहीं

टुलरीसमध्यें आल्यावर तो सकाळीं उठल्यावरोबर स्नान करी. स्नान करतांनांच किरकोळ कामाचीं पत्रें व वर्तमानपत्रें वाचवून ऐके. त्यांतल्या-त्यांत इंग्लंडमधील व जर्मनीमधलीं वर्तमानपत्रें मात्र जरा मन लावून ऐके. फ्रान्समधलीं कशींतरी उडतउडत मधून मधून वाचवी. बाकी फ्रान्समध्यें यावेळीं वर्तमानपत्रें फारशीं राहिलींच नव्हतीं. नेपोलियननेंच कांहींतरी सालापाला लावून पाऊणशें पैकीं तेराच वर्तमानपत्रें राहूं दिलीं होतीं. बाकीचीं बंद करवून टाकलीं व या तेरांवरहि त्याच्या हेरांची फार करडी नजर असे. यावेळीं व पुढें बादशाहींत त्याचें गुप्त पोलीसचें खातें फार चांगलें होतें. राज्यांतली बारीक सारीक बातमी देखील त्याला नेहमी कळे. टपालांतून पत्रें जात तीं तो उघडून वाचवी. निरनिराळ्या लिप्या व सांकेतिक भाषा त्या खात्याचे लोक सरावामुळें सहज उकलून वाचीत. त्याचेपुढें नम्र भाषण करणारे मुत्सद्दी व सरदार आपल्याबद्दल काय लिहित हें त्याला ठाऊक असे व ते लिहिण्याच्या उलट तोंडापुढें बोलून नम्रता दाखवितात हें त्याला नेहमीं कळे व हसूं येई; पण हें आपणांस कळल्याचें तो कधींहि दाखवीत नसे.

टुलरीसच्या राजवाड्यांत राहावयास गेल्यावर नेपोलियनच्या वागणुकींत हळूहळू फरक पडूं लागला. राजक्रांतीच्या सर्व निशाण्या पुसट होतां होतां हळूहळू त्या अगदींच दिसेनाशा झाल्या. 'लोकसत्ता' 'सिटिझन' वगैरे शब्द मात्र राहिले;पण तेथला सर्व थाट हळूहळू राजाच्या राजवाड्यासारखा बनूं लागला. मोकळेपणा जात चालला व आदब आणि शिस्त वाढूं लागली. डौल आणि थाटमाट यांचे पाऊल जास्त शिरूं लागलें. जुना साधेपणा जाऊन तेथें डाम डौल, उंची पोषाख आणि अमीरी भाषा यांचा बराच प्रघात पडत चालला. नेपोलियन म्हणे कीं, आम्हीं फ्रेंच म्हणजे स्पार्टन नाहीं. अनेक ललितकलांचा व्यासंग आम्हास केलाच पाहिजे. देशांतील कारागिरीला उत्तेजन यावें म्हणून रेशमी कपडे आणि उंची मखमली वापरण्याची तऱ्हा सुरू झाली. अनेक कारणासाठीं खास बैठकी

होऊं लागल्या. अजून या बैठकींना राजांच्या दरबाराचें पूर्ण स्वरूप आलें नव्हतें; पण लष्करच्या छावणीचें स्वरूप मात्र आतां दिसेनासें झालें होतें. त्या राजमंदिरांत सकाळीं मुजरे करण्यास व भेट घेण्यास अमीरउमराव आणि दुसऱ्या देशच्या राजांचे वकील व राजपुत्र येत. त्यांचा पोषाख फार थाटाचा असे. मुजऱ्यास आलेले सर्व थोर थोर लोक व त्यांच्या स्त्रिया येऊन बसल्यावर जोसेफाईन तेथें येत असे. त्या लोकांत शोभेल किंबहुना ते आलेले पाहुणेहि दिपून जातील असा मौल्यवान व मनोहर उंची पोषाख घातलेली व उत्तम तऱ्हेचा शृंगार केलेली ती जोसेफाईन त्या सभेंत फार मनोहर दिसे व जुन्या राजांच्या अमदानींतले रीतिरिवाज तिला माहीत असल्यामुळें तिची वागणुकहि दरबारी थाटाची असे. जोसेफाईन येऊन तिला लोक मुजरे करताहेत तोंच नेपोलियन येई. त्याचा पोषाख अगदीं साधा असे व कधीं कधीं तर लष्करांतल्या छावणींतले बूट व तसलाच कोट घालून तो तेथें येई. तेव्हां त्या सर्व नटलेल्या मंडळींत हा पुरुष आपल्या साधेपणानें विशेषच खुले. त्याचा तो साधेपणा पाहून सर्वांनां एक तऱ्हेचा आनंद व कौतुक वाटे.

आपल्यासमोर आपल्या सदरेंत येणाऱ्या सर्व स्त्रीपुरुषांनीं उंच पोषाख घालून यावें, हें त्याला मनापासून आवडे. त्यांत बायकांनीं तर साध्या पोषाखांत येणें त्याला अगदीं खपत नसे. सर्व बायकांनीं साधारणपणें नेहमींच चांगलीं वस्त्रें लेवून व सुंदर पोषाख करूनच आलें पाहिजे, अशी त्याची शिस्त असे. जमलेल्या सर्व मंडळींत जोसेफाईनचा पोशाख व वेणीफणी अगदीं फारच नीटनेटकी असली पाहिजे, अशी तो तिला ताकीद करी. नटवेपणा मात्र दिसतां कामा नये; पण आयदीपणाहि नसावा. जेणेंकरून आपण पुरुषांनां सुंदर दिसूं व आपल्याला पाहून जेणेंकरून पुरुषांस आनंद होईल, असाच पेहराव ठेवणें हें स्त्रियांचें एक कर्तव्य आहे, असें तो म्हणे. कोणा स्त्रीचें नेसणें नीट टापटिपीचें नसलें, चेहरा, हात वगैरे स्वच्छ ठेवलेले नसले, तर चार चौघांतहि तो तिला नांवें ठेवी. नुसते वेणीचे केंस जरा विखुरलेले असले, तरी तेहि त्याला खपत नसत. लगेच तो तीस ‘ हा तुमच्या केसांचा गुंडाळा आज

तुमचे डोक्यावर असा कोणी बांधला आहे?' असें उद्धटपणानें म्हणे यावरून असें दिसतें कीं पुरुषांनीं घराबाहेर अनेक श्रम, साहस व उदंड उद्योग करावे आणि घरांत स्त्रियांनीं पुरुषांचें मन रमेल व त्यांचे सर्व श्रम हरण होऊन चित्त प्रसन्न होईल, असाच पोषाख व थाट करावा, असें त्याला वाटे. स्त्रियांनीं घराबाहेर सार्वजनिक कामांत उगाच लुडबुड करून सीमेचा अतिक्रम करावा, हें त्याला ठीक वाटत नसे. घराच्या उंबऱ्याच्या आंतला प्रांत स्त्रियांचा, उंबरठ्याच्या बाहेरचा प्रांत पुरुषांचा अशी वांटणी त्याला पसंत होती. स्त्रियांच्या पोषाखांत गर्द रंग त्याला आवडत नसत.

आपल्या बायकोनें उत्तम शृंगार करावा व उंची दागिनें घालावेत अशी त्याला मनापासून हौस होती; पण स्वतः दागिने घालणें त्याला कधींच आवडत नसे. कोणत्याहि तऱ्हेचें जवाहीर तो स्वतःच्या अंगावर घालीत नसे; पण आपले हात, पाय व कपाळ चांगलें नितळ दिसावें याविषयीं तो मात्र फार जपे. त्याचे हे अवयव खरोखरच नाजुक होते. नवा बूट किंवा कोरी टोपी दुसऱ्या कोणी कांहीं दिवस वापरून ती मऊ पडल्याशिवाय तो घालीत नसे. कारण कोरेपणीं तीं त्यास लागत व त्यांपासून त्रास होई आणि इतक्याचकरितां त्याच्याच मेजाचे बूट ज्याच्या पायास ठीक होत, असा एक नोकर त्यानें जवळ बाळगिला होता. सहज चालतांनां नेहमीं पाठीवर मागें एक हात आडवा ठेवण्याची त्याला लकब असे व विचारांत मग्न असतां एके ठिकाणीं न बसतां पाठीवर मागें हात ठेवून खोलींत इकडून तिकडे व तिकडून इकडे फेऱ्या घाली. रात्रीं निजतांना त्याची अशी ताकीद असे कीं, कांहीं चांगली खबर असेल तर उगाच माझी झोंपमोड करून मला उठवूं नका. कारण अशा वेळीं कांहीं विशेष करण्याची अवश्यकता नसते; पण कांहीं वाईट बातमी असेल, तर मात्र मला ताबडतोब जागा करा, कारण अशा वेळीं एक क्षणहि फुकट जाणें फार जोखमाचें असतें.

आपल्या मंदिरांत मऊ बिछान्यावर लोळतांनां तो जसा आनंदांत असे, तसाच किंबहुना त्याहीपेक्षां जास्त आनंदांत व खुषींत तो समरांगणावर मोठ्या लढाईचे पूर्वींहि असे. त्याच्या मनाची समता कधींहि ढळली नाहीं. लढाईच्या अत्यंत कठीण घटकेसहि त्याचे मनाचे सर्व कारभार

शांतचित्तानें चालत. जणूंकाय तो लढाई करीत नसून पटावर बुद्धिबळांचे डावच खेळत आहे, असें वाटावें. लढाईचे वेळीं जय झाल्यावर पुढें काय करावयाचें याचे बेत तो फारसे करीत नसे; पण यांत अपयश आलें, तर पुढें काय करावयाचें, याचे बेत मात्र नेहमी करी व हें धोरण तो अगदीं पक्कें बांधून ठेवी. नेहमीं चालू धोरण फसल्यास व बाजू आंगावर आल्यास पुढें काय करावयाचें याचा विचार तो आगाऊ ठरवून ठेवी. व दोन्ही बाजू मनाशीं मांडून दोन्हीं धोरणें नक्की करून ठेवी. यामुळें त्याचा केंव्हांहि गोंधळ उडत नसे. मोठमोठ्या लढायांचा शेवट व मोठमोठ्या कारस्थानांचा निकाल पुष्कळ वेळां अगदीं क्षुल्लक गोष्टीवर अवलंबून असतो, अशी त्याची पक्की समजूत होती. याकरितांच प्रत्येक बारीक सारिक बाब तो स्वतः जातीनें करी व आपल्या नजरेखालीं करवी. 'जो दुसऱ्यावरी विसंबला । त्याचा कार्यभाग बुडाला,' याबद्दल त्याची पूर्ण खात्री होती व यामुळेंच तो कोणावर विसंबत नसे.

आपल्या जवळच्या नातलगांवर किंवा मित्रांवरहि तो होतां होईपर्यंत विश्वासून स्वस्थ बसत नसे. मैत्रीवर त्याचा कधींच फारसा विश्वास नव्हता. तें एक थोतांड व नुसती बोलावयाची गोष्ट आहे, असें त्याला वाटे व तेंहि खरेंच. या जगाची रहाटी जों जों अधिक पहावी, तों तों मैत्री ही एक कविकल्पना आहे, असेंच वाटूं लागतें. पुष्कळ गोष्टी पाहिल्यावर मैत्री हें एक बांडगूळ आहे व तें संपत्तीच्या आणि समृद्धीच्या वृक्षावर वाढतें, असें वाटूं लागतें. तो वृक्ष सुकला कीं त्यावरचें हें बांडगूळ आपोआप गळून पडतें. याला अपवाद आढळलाच तर अगदीं क्वचित आढळतो; पण तो इतका क्वचित कीं त्या क्वचितपणामुळें हा नियम मात्र जास्तच सत्य वाटतो.

खाजगी रीतीनें व सलगीनें बोलतांनां तो दुसऱ्याच्या आंगावर अनेकवेळां टिचक्या मारी व अगदीं खूष मर्जी असून एखाद्याचें मोठ्या प्रेमानें कौतुक करावयाचें म्हणजे तो त्याचे कान धरून पिळी. कांबेसरीस, डुराक, जूनो, कान्स्टंट वगैरे जवळच्या व फार लोभांतल्या माणसांनां तर या 'कर्णप्रसाद' चा लाभ वारंवार मिळे; पण असें झालें म्हणजे आज

नेपोलियन बादशहाची मर्जी आपल्यावर अगदीं खूष आहे, असें पाहून त्यांनां आनंद वाटे.

पाहणारावर छाप बसावी व लोक दिपून जावे म्हणून दरबारचा बेत फार खर्चाचा असे व सर्व राजकीय समारंभ अतिशय दिमाखाचे व डौलाचे असत; पण त्याचा खाजगी खर्च जरा काटकसरीनेंच चाले. कौन्सल असतांनां व पुढें बादशहा झाल्यावर देखील अनेक वेळां तो स्वत: आपल्या खाजगी खर्चाचे हिशेब तपाशी. जिनसांचे दर बरोबर आहेत कीं नाहीं; हें कळण्याकरितां तो चार दुकानांत चौकशी करवी व असेंहि म्हणतात कीं, क्वचित समयीं आणलेल्या जिनसांपैकीं थोडासा जिन्नस हळूच विकण्यासहि पाठवून किंमतीची खात्री करून घेई. या सर्वांचें मूळ कारण असें कीं, "ठिकेदार ( कंत्राटदार ) तेवढे फार लबाड, चोर!" असा एक सिद्धांत त्याचे मनानें ठरवून ठेविला होता. ठिकेदाराशीं जो जास्त घासघीस घालील व कांहींतरी सबब लावून ठिकेदाराचे पैसे जो जास्त कापील, तो नोकर हुशार असें नेपोलियन समजे. ठिकेदाराचे पैसे कापणें म्हणजे चोराच्या घरांतला चोरीचा माल परत आणणें आहे, असें तो म्हणे.

नेपोलियन सर कौन्सलदार किंवा फर्स्ट कौन्सल झाल्यावर त्याची बहीण कारोलाईन हिच्या लग्नाचा विचार निघाला. कारोलाईनचें व म्यूराचें लग्न जमवावें असें जोसेफाईनच्या मनांत होतें. कारण म्यूरा हा दिसण्यांत तेजस्वी पुरुष दिसे व त्याचा बांधा आणि आंगलटहि मर्दानी होती; पण नेपोलियनच्या आईच्या व इतर भावंडांच्या मनांत कारोलाई-नला कोणातरी थोर राजपुत्राला द्यावी किंवा एखादा पिढीजाद सरदार तिला वर योजावा असें होतें. प्रथम नेपोलियनलाहि हाच म्हणजे एखाद्या पिढीजाद सरदारची वरयोजना करण्याचा विचार पसंत होता; पण पुढें त्याच्या गणितानें व त्रैराशिकानें म्यूरा हाच वर योग्य ठरला. कारण म्यूरासारख्या शूर सरदाराला मेहुण्याचें नातें जोडून आपल्या कुटुंबांत मिळवून घ्यावा, यांतच जास्त नफा आहे, असें त्यानें ठरविलें. आपल्या मतलबाचें फार दूरचें धोरण बांधून लग्नें जमविण्याची नेपोलियनची

शिताफी कोणत्याहि गांवच्या दीक्षितापेक्षां जास्त होती. बरनेडो हा नेहमीं थोडासा उलट असे. म्हणून नेपोलियननें अगदीं मायेची मुलगी, आपल्या प्रीतीचें पहिलें पात्र जी डेसी क्लेरी हिचें व त्याचें लग्न जमवून दिलें. जोसेफाईनचें व त्याच्या कुटुंबांतल्या इतर भावंडांचें अगदींच पटत नसे. ती त्यांचा उघड उघड द्वेष करी. म्हणून नेपोलियननें आपला धाकटा भाऊ लुई याच्या अगदीं मनांत नसतां त्यानें पूर्वी ठरविलेलें लग्न मोडून त्याच्याशीं जोसेफाईनची मुलगी हारटेन्स हिचें लग्न लावून टाकलें. जनरल राप, मार्शल डाव्हू वगैरे अनेक सरदारांचीं लग्नेंहि त्यानें स्वतः मध्यस्थी करून अशींच दूर धोरणानें लावून दिलीं; पण यांत एक गोष्ट मोठ्या समाधानाची अशी कीं, याप्रमाणें मध्यस्थी करून तो ज्या जोडप्याचें लग्न जमवी, त्यांचें तो पुढेंहि नेहमीं बरें करी व त्यांच्या संसारास नेहमीं हातभार लावी. बर्नेडोला त्यानें स्वीडन देशाचें राज्य दिलें व अनेक वेळां त्याचे अनेक आपराध पोटांत घातले. याचें कारण केवळ बर्नेडोची बायको डेसी क्लेरी ही होय. फार जुन्या व थोर थोर घराण्यांतल्या मुलींचीं व विधवांचीं लग्नें आपल्या नव्या सरदारांशीं जुळवून देऊन त्यानें जुन्या व नव्या फ्रान्सचा सांधा उत्तम जोडला. खालावलेल्या जुन्या घराण्यांची दैना दूर केली व नव्या सरदारांनां एक तऱ्हेचा मान व शिष्टपणा मिळवून दिला. अजेन बोहारनेस म्हणजे जोसेफाईनच्या पहिल्या घरचा मुलगा याचें बव्हेरीच्या राजाची मुलगी अगस्टा एमीला हिच्याशीं त्यानें लग्न लावून दिलें. अजेनला त्यानें आपला इतालींतला मुतालिक नेमलें होतें. तसेंच म्यूरालाहि नेपल्स देशाचें राज्य दिलें. साधारणपणें एकदां मनुष्य आपला म्हटला म्हणजे तो त्याच्यासाठीं पुष्कळ झीज सोशी व त्याचा अभिमान बाळगी. जोसेफाईन व मरायालुइसासारख्या बायका कीं, ज्यांचे सर्व चाळे नेपोलियनला ठाऊक; पण त्यानें त्यांपैकीं एकीबद्दल देखील स्वतःच्या तोंडून एकदांहि वाईट उच्चार कधीं काढला नाहीं. जोसेफाईन ही माझी बायको. ही वाईट असणें शक्यच नाहीं. मी आपल्या तोंडानें तरी तिला कधीं वाईट म्हणणार नाहीं, असें तो म्हणे. तिला कोणी वाईट म्हणावें, यांत तो स्वतःला कमीपणा

समजे. जोसेफाईनच्या हजारों आगळीकीहि तो नेहमीं पोटांत घाली. एके रात्रीं तर तिच्या चाळ्यांचा कांहीं प्रत्यक्ष पुरावा मिळाल्यामुळें रागाच्या भरांत त्यानें तिला म्हणजे जोसेफाईनला अकरा वाजतां घराचे बाहेर घालवून दिलें. पण तिच्यातर्फें एका मित्रानें मध्यस्थी केल्यावर आपल्या बायकोची आपल्यामुळें फार छी थू होईल, असें पाहून तिला सकाळीं फिरून घरांत घेतली व कोणाला संशयासहि जागा राहूं नये म्हणून तेच दिवशीं मुद्दाम तो तिला बरोबर गाडींत घेऊन बाहेर फिरावयास गेला. इतकी स्थिति असतांहि नेपोलियननें आपल्या मृत्युपत्रांत माझें काळीज नीट जतन करून नेऊन माझी बायको मेराया लुईसा हिच्या स्वाधीन करा असें लिहून ठेविलें. म्यूरा व कारोलाईन यांचे लग्नाचे वेळींहि जोसेफाईननें आगळीक केली होती. हें लग्न जमवलें, तेव्हां नेपोलियनजवळ आपल्या बहिणीस देण्यास फारसा पैसा नव्हता. यामुळें आपल्या बायकोच्या गळ्यांतला एक हार त्यानें कारोलाईनला नजर दिला; पण हा हार दिल्यामुळें जोसेफाईनला आपला थाट जरासा कमी पडलासें वाटलें. म्हणून तिनें पारीसमधल्या एका मोठ्या जवाहिऱ्याकडे जाऊन मोत्याचें एक चांगलें पेंडें पाहिलें. या पेंड्यांतलीं मोत्यें राणी मेरी आंतुआनेत हिच्या खास भांडारांतल्या जवाहिरांत पूर्वीं होतीं. त्या मोत्यांचें पाणी फारच तेजदार होतें. तीं जोसेफाईनला आवडलीसें पाहून जवाहिऱ्यानें त्यांची किंमत अडीच लक्ष फ्रांक सांगितली. दागिना आवडला, तरी इतके पैसे आणावयाचे कोठून? शेवटीं बर्थीयरच्या मध्यस्थीनें नेपोलिनच्या नकळत सैन्यास सामान पुरविणारे ठिकेदार होते, त्यांचेकडून पैशाची तजवीज लावून टाकली व हें मोत्यांचें पाणीदार पेंडें घरीं आणून ठेविलें; पण तें घालून चारचौघांत यावें कसें? बरें न यावें तर मग तें इतकें आणल्याचा उपयोग काय? अखेर तिनें नेपोलियनला फसविण्याचा बेत केला. पेंडें गळ्यांत पाहून 'हें कोठून आणलें' म्हणून नेपोलियन विचारील हें तिला माहीतच होतें. कारण घरांतला प्रत्येक दागिना त्याच्या नजरेंत असे. तरी तिनें आपल्या कृत्यांत बुरीआंला साह्य करून घेऊन एक दिवस तें पेंडें घातलें. पेंडें घातल्यावर तिला वाटलें होतें त्याप्रमाणें

नेपोलियननें त्याची चौकशी केली. तेव्हां तोंडावरचें पाणी बिल्कुल बदलूं न देतां त्या सटवाईनें एकदम उत्तर दिलें कीं, ' हें पेंडें मजजवळ आज पुष्कळ दिवस आहे, आपण इतालींत होतों तेव्हां तेथील लोकांनीं जीं मोत्यें नजर केलीं, त्यांचें हें पेंडें. हें तुमच्या कसें नाहीं लक्षांत ? हें मीं पूर्वीं बुरीआंलाहि दाखविलें होतें, विचारा त्याला. ' असें तिनें सांगितल्यावर बुरीआं तेथें होताच. त्याचेकडे नेपोलियननें पाहिलें, तों त्यानें मीं हें पूर्वींपासूनच जोसेफाईनजवळ पाहिलें आहे, असें म्हणून तिच्या म्हणण्यास रुकार दिला. आपली बायको व आपला अगदीं लहानपणाचा शाळा-सोबती व हल्लींचा पक्या विश्वासांतला खाजगी चिटणीस हीं दोघेंहि म्हणतात, तेव्हां ही गोष्ट खरी असेल असें मानून नेपोलियन स्वस्थ राहिला. पण हीं दोन्ही माणसें गोळी घालून मारून टाकण्याच्याच योग्य आहेत, असें त्याच्या मनांतहि आलें नाहीं. पुरुष पुष्कळ वेळां गांवाशीं धट असतात तेच बायकोशीं मठ्ठ बनतात.

कौन्सलेटनंतर नवी राजवट सुरू झाली. आतां जुन्या सर्व आठवणी देखील लोकांनीं विसरून जाव्या असें तो सर्वांस बजावी. पूर्वीं फलाण्या इसमानें अमुक वाईट कृत्य केलें होतें, असें कोणीं सांगितल्यास तो म्हणे आतां पूर्वींचें कांहीं नाहीं. तें सर्व आतां मनाआड व दृष्टीआड करा. सतरावी व अठरावी ब्रुमेयर ( म्हणजे डायरेक्टरीचा नाश केला तो व कौन्सलेट स्थापन केलें तो दिवस ) या दोन दिवसांमध्यें मी अशी भक्कम पितळी भिंत घातली आहे कीं, आतां त्या भिंतीच्या–दिवसाच्या–पलीकडलें कोणाला कांहींहि दिसणार नाहीं. याचा अर्थ इतकाच कीं पूर्व कोणीं कांहीं केलें असलें, तरी तें त्याला माफ आहे. मी तें आतां मनांत आणणार नाहीं व तुम्हींहि आणूं नये. याच समजुतीवर त्यानें पूर्वींच्या अनेक शिक्षा माफ केल्या. स्वतः तुरुंगांत जाऊन त्यानें तेथील नोंदणीबुकें पाहिलीं. कैद्यांजवळ प्रत्यक्ष चौकशा केल्या व तुमच्यासारखे लोक त्या मूर्ख डायरेक्टरांनीं विनाकारण असे कां बंदींत टाकले, असें म्हणून त्यानें पुष्कळ कैद्यांस सोडून दिलें. वास्तविक पहातां गुन्हे माफ करण्याचा अधिकार त्याला कायद्यानें कोणीं दिलेला नव्हता; पण तो त्यानें खुशाल चालविला.

कारण त्याच्याआड आतां कोण येणार? तुरुंगाच्या तपासणीचे वेळीं ज्या कोठडींत सर सिडनें स्मिथला ठेविले होते, ती कोठडी त्यानें मुद्दाम पाहिली व तेथील अधिकाऱ्यास म्हटलें, तुम्हीं या सिडनें स्मिथला पळून जाऊं दिलें नसतें, तर मीं सेंट-जीनडी-एकर हें ठिकाण सहज जिंकलें असतें. तुमच्याच हलगर्जीपणामुळें तें ठिकाण गेलें व पुढें मला ती मोहीमच सोडून देणें भाग पडलें.

राजकारणाकरितां बंदिखान्यांत खिचपत पडलेले हे कैदी नेपोलियननें बंधमुक्त केल्यामुळेंच ते त्याची फार स्तुति करूं लागले व तशांत त्यांच्यापैकींच ज्यांच्या आंगांत चांगली धमक होती व डोक्यांत चांगला मेंदु होता, अशा बहुतेकांस त्यानें आपल्या निरनिराळ्या खात्यांत बऱ्याबऱ्या नोकऱ्याहि दिल्या व कोणाला इतर खाजगी कामें दिलीं. यामुळें तर ते चांगले जाळ्यांत बांधले गेले. अशानें जे वळतना त्यांचेवर व अगदींच माथ्याचे फिरलेले होते त्यांचेवर पोलिसांची नजरबंदी ठेविली. अशा रीतीनें युक्तिप्रयुक्तीनें सर्व बाजूंच्या, सर्व पक्षांच्या व सर्व मतांच्या पुष्कळ लोकांस त्यानें आपलेसें करून टाकलें. त्याच्या दिवाणांत, त्याच्या सैन्यांत, त्याच्या कचेऱ्यांत, त्याच्या एकंदर अठरा जातीच्या कारखान्यांत मवाळ व जहाल, राजपक्षीय व पूर्वीच्या राजाला फांसावर टांगण्यास मत देणारे लोकसत्तेचे अभिमानी व बोरबॉन्च्या वेळचे संभावित, हे सर्व एके ठिकाणीं काम करतांनां व याच्या या नव्या राज्ययंत्राचीं चाकें फिरवितांनां दृष्टीस पडूं लागले. जरा जड होते त्यांनां तो युक्तीनें वळवी आणि साधारण अगदींच खर्डेघासे होते त्यांची किल्ली त्याला चांगली माहीत होती. हे खर्डेघासे लेखणीबहाद्दर एकदां नोकरीवर लावले म्हणजे, आपलें काम चोख करावें, कागदाला शाईचा डाग न पडतां चांगलें अक्षर लिहावें व खोडाखोड न करितां नकला कराव्या, यांतच सर्व मोठेपणा मानतात. दिवसभर आपल्या कचेरींत काम करावें व घरीं आल्यावर आज आपले वरिष्ठ काय बोलले त्या गप्पा माराव्या व आपल्या वरीष्ठांच्या आणि आपल्या फुशारक्या सांगाव्या, हीच आपल्या जीविताची मुख्य क-

मौल्यवान् कामगिरी समजतात. तेव्हां अशांनां सुटे न ठेवतां अनेक खातीं काढून नोकऱ्या दिल्यानें सर्व चळवळी ते सहजच विसरून गेले.

यापुढें खाजगी वर्तनांत व राज्यकारणांत नेपोलियन कोणताहि भेद मानीत नसे. किंवा याहून खरें म्हटलें तर तो भेद मानतो असें बिलकुल दाखवीत नसे. यामुळें सर्व त्यास मनापासून चाहत. पूर्वी तो एका ज्वलत्-जहाल मंडळीचा सभासद होता, यामुळें तो त्यांनां आपल्यांतलाच वाटे. लोकांसाठीं तो नेहमीं सतत परीश्रम करी, यामुळें साधारण जनतेला तो केवळ लोककल्याणकारी वाटे. राजपक्षांतल्या लोकांनां देखील यानें डायरे-क्टरांच्या वेळचे कायदे रद्द केले. बोरबॉन् राजाच्या बाजूचे कैदी होते त्यांनां सोडून दिलें व लोकसत्तेच्या कारभारी मंत्र्यांनीं देशाबाहेर घालविलेले लोक परत देशांत बोलाविले. हें पाहून हा राजपक्षाला अनकूल आहे, असेंच वाटे. एकंदरीनें फ्रान्सनें घेतलेला हा कार्सिका देशाचा दत्तक मुलगा सर्वांनां दिवसेंदिवस फार आवडूं लागला. यानें हें सर्व धोरण इतकें उत्कृष्ट संभाळलें व या आपल्या सोंगाची बतावणी इतकी बेमालुम केली कीं, त्या सोंगाला बोरबॉन् राजेहि फसले. याच्या वर्तनानें व अमृतासारख्या गोड शब्दानें त्यांचेहि मनांत आशेचा अंकुर फुटला व आपली राजमनीषा याच्या मार्फतीनें पुरी होईल असें त्यांस वाटूं लागलें. यावेळीं बोरबॉन् गादीचा अधिकारी वारस अठरावा लुई यानें नेपोलियनला स्वतःच्या हातानें एक गौरवाचें पत्र लिहिलें, त्यांत ‘ मला तुम्हीं फ्रान्सच्या गादीवर बसवावें, यांत तुमची दिगंत कीर्ति होऊन शिवाय तुमचा फायदाहि होईल ’ असें त्यानें लिहिलें. थोडे दिवसांत असेंच दुसरेंहि एक पत्र लुईनें स्वदस्तुरचें लिहिलें. त्यांत ‘ तुम्हीं आमच्या मेहरबानीस व मान्यतेस पात्र आहां. तुम्हांस संशय वाटेल तर आतांच तुम्हांस काय पाहिजे तें बक्षीस स्वतः-करितां व आपल्या स्नेह्यांकरितां मागून घ्या. ही अमोल वेळ उगाच वायां दवडूं नका. आपण दोघे मिळून फ्रान्स देश वैभवास चढवूं. ‘आपण’ असें लिहिण्याचें कारण मला तुमचे मदतीची अवश्यकता आहे व तुम्हांलाहि माझे मदतीपासून फायदा होणार आहे. ’ वगैरे मजकूर लिहिला होता.

बोरबॉन् राजा लुई यानें नेपोलियनला लावलेल्या या आशेच्या गळाला जोसेफाईन, बुरीआं व इतर मंडळी चांगलीच गुंतली गेली. तुम्हीं हें मान्य करावें व बोरबॉन्ला पुन्हां गादीवर बसवून व त्याचे दरबारीं मोठी मान्यता संपादन करून स्वस्थ असावें, उगाच नसतीं जोखमें करूं नयेत, असा जोसेफाईननें व इतर कांहीं मंडळीनें त्यास फार फार आग्रह केला. कारण त्यांत त्यांच्या नजरेनें त्यांचेंहि कल्याण होण्यासारखें होतें; पण

. . . . . . .

यावर नेपोलियननें म्हटलें, " लुई बोरबॉन्ला, सर्व-त्याग करून मी संन्यास घेणार, असें वाटत असलें तर खुशाल वाटो. माझा त्याला इलाज नाहीं. मी होऊन त्याला खोटया आशेंत पाडणार नाहीं. " या पत्रांनां नेपोलियननेंहि स्वतःच्या हातानें एक स्पष्ट उत्तर लिहून पाठविलें. त्यांत म्हटलें कीं, " आपण माझा असा गौरव केला, याबद्दल मला परम संतोष वाटतो; पण तुम्हीं परत फ्रान्समध्यें येण्याचे भानगडींत पडूं नये. तसें करणें असेल तर तुम्हांस वाटेंत एक लक्ष फ्रेंच लोकांच्या मुडद्यांवरून चालत यावें लागेल. फ्रान्सचे शांततेकरितां व सुखाकरितां आतां या आपल्या लोभावर पाणी सोडा. यांतच बखरनवीस तुमची थोरवी गातील. तुमच्या कुटुंबाची व तुमच्या संतोषाची हकीगत ऐकून मला नेहमीं सुख वाटेल." यापुढें लुई-कडून असलें पत्र पुन्हां आलें नाहीं; पण नेपोलियनचा नाद सोडून दुसरीं कुटील कारस्थानें मात्र बोरबॉन् घराण्यातील पुरुष पुन्हां करूं लागले.

एका टोंकाच्या राजपक्षीय लोकांपासून दुसऱ्या टोंकाच्या ज्वलत्जहाल लोकांपर्यंत सर्व पक्षांच्यालोकांनां आपल्याकडे वळवून घेण्यापेक्षांहि आणखी एका निराळ्या मार्गानें नेपोलियननें पुष्कळ लोकांचीं मनें आपल्याकडे वळवून घेतलीं.हा मार्ग म्हणजे पोपशीं तह ठरवून दोघांचे सल्यानें 'कांकार्डेट'चा लेख करून धर्मसंस्थेचा फ्रान्स देशांत पुन्हां जीर्णोद्धार केला, हा होय. धर्मासंबंधानें व त्यांतील अनेक मतभेदासंबंधानें त्याचें मन गंगोदकाप्रमाणें स्वच्छ होतें. म्हणजे कोणत्याहि धर्मासंबंधानें व त्यांतील कोणत्याहि मतासंबंधानें त्याच्या मनांत कोणत्याच तऱ्हेचा विकार नव्हता. सर्व धर्म तो सारखेच लेखी. जी गोष्ट काल्पनिक आहे, तिच्याबद्दल इतरांशीं उगाच वितंडवाद करावे, किंवा त्या गोष्टीबद्दल आपल्यापेक्षां कांहीं निराळें वाटतें

एवढयाचवरून इतरांचा छळ करावा हें तो अयोग्य समजे. मतें व मतांतरें यांची किंमत त्याचेजवळ शून्य होती. इजिप्तमध्यें त्याचे बरोबर असलेला मेनाऊ हा मुसलमान झालेला सरदार इकडे आला होता. त्यालाहि त्यानें खुशाल पिटमांडचा सरसुभा नेमलें. धर्म व धर्मगुरू यांच्याबद्दलचा त्याचा प्रारंभींचा तिटकारा आतां कमी झाला होता. किंबहुना नाहींसाहि झाला होता. इजिप्तमध्यें असतांना त्यानें धर्मगुरूंच्या उद्योगानें लोक कसे नम्र बनतात् हें पाहिल्यामुळें धर्माचा व धर्मगुरूंचा राजांच्या राज्याला चांगला उपयोग करून घेतां येईल अशी त्यानें आपल्या मनाशीं गांठ बांधून ठेविली होती. जेथें पोलीस पोंचणार नाहीं, तेथें उपाध्याय पोंचेल व जें कायद्यानें साधणार नाहीं, तें उपाध्याय सहज उरकील असें तो समजे. मारेंगोची लढाई होतांच त्यानें रोमच्या पोपकडे धर्माचे बाबतींत तडजोड करण्याचें बोलणें सुरूं केलें. थोडेच दिवसांत पोपकडून या तडजोडीचीं कलमें ठरविण्यास एक उपाध्याय पारीसमध्यें आला. त्याची व नेपोलियनचा हल्लींचा परराष्ट्रांचा प्रधान टालेरां याची गांठ घालून दिल्यावर बोलणीं सुरूं झालीं व तडजोडहि ठरली. राजक्रांतीच्या वेळेपासून फ्रान्समध्यें कोणत्याहि प्रकारचा धर्म किंवा त्याचा अवशेषहि राहिला नव्हता. लग्नकारणांपासून तों प्रेतविधीपर्यंत सर्व गोष्टी उपाध्यांवांचून चालत. इतकेंच नव्हे तर बारा महिन्यांचीं जुनीं नांवें बदलून तीं त्यांनीं हिममास, जलमास, शीतमास अशीं ऋतुमानांवरून ठरविलीं होतीं. दिवस-गणनेंतहि देवांची व देवतेंचीं नांवें येऊं नयेत म्हणून तींहि बदलून निरनिराळ्या जनावरादिकांचीं नांवें दिलीं होतीं. धर्माच्या खुणा अशा रीतीनें आपल्या देशांतून साफ पुसून जाव्या, या करितां पूर्वी चार आठवड्यांचा महिना असे तो मोडून दहा त्रीक तीस, असा तीन दशकांचा महिना, हें कोष्टक ठरविलें होतें. असें करण्यांत रविवार उडून जावा व त्या दिवसाचें प्राधान्य सहजासजींहि कोणाला वाटूं नये, असा मुख्य हेतु होता. विश्रांतीसाठीं व सुटीसाठीं दशकाचा शेवटला दिवस ठरविला होता व त्यास 'डिक्याडी' असें म्हणत. ही सर्व पद्धत मोडून नेपोलियननें पुन्हां जुनी पद्धत सुरू केली. देवळांतल्या प्रार्थनाहि त्यानें चालू करविल्या व तेथें जाऊन लोक टवाळ्या करतील म्हणून तो स्वतः प्रार्थनेसाठीं देवळांत जाई. प्रथम

ही सुरवात केली, त्या दिवशीं कांवेसरीस; अजेन, जोसेफ बोनापार्ट वगैरेंनीं तुमचें हें करणें चालणार नाहीं, लोक तेथें टवाळ्या करतील अशी तक्रार केली. तेव्हां त्यांस 'जे लोक टवाळी करतील त्यांनां माझे शिपाई देवळांतून काढून लावतील' असें त्यांस उत्तर मिळालें. 'आणि शिपायांनींच टवाळीस सुरवात केली तर?' असें पुन्हां त्यांनीं विचारतांच नेपोलियन त्यांचेकडे वळून म्हणाला, "त्याची काळजी तुम्हांला नको. जे माझ्याबरोबर इजिप्तच्या मशिदींत येऊन निमाज पडले, ते येथें कसें वागतील याची मला खात्री आहे. मी त्यांचा नायक तेथें जाऊन कसा वागतों हें त्यांनीं पाहिलें म्हणजे तेहि तसेंच वागतील यांत शंका नको."

हा तहनामा किंवा 'कांकार्डेट' पुरे करून नेपोलियननें त्यांत काय योजिलें याची कल्पना त्यांतील कांहीं कलमांवरून येईल. त्यांत एक म्हणजे सहावें कलम असें आहे कीं, " प्रत्येक उपाध्यायानें आपल्या कामास सुरवात करण्यापूर्वी मी फर्स्ट कौन्सलशीं इमानें इतबारें वागेन अशी शपथ घेतली पाहिजे." यापुढें शपथेचा मसूदा त्यांत दिला आहे. तो असा कीं, " मी कायद्यानें स्थापन झालेली फ्रान्स देशांतील सत्ता नीट मानीन व तिला नमून वागेन असें वचन देतों व मी अशीहि शपथ घेतों कीं, जेथें अशा सत्तेचा भंग होण्यासारखा असेल अशा ठिकाणीं जाणार नाहीं, अशा लोकांशीं पत्रव्यवहार ठेवणार नाहीं किंवा कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवणार नाहीं. असें ठिकाण किंवा लोक माझ्या वृत्तीच्या हद्दींत किंवा बाहेर कोठेंहि असल्याचें मला कळलें, किंवा राजव्यवस्थेला बाधक अशी कोणतीहि गोष्ट माझे लक्षांत किंवा पाहाण्यांत आली, तर ती मीं लागलीच सरकारांत जाहीर करीन व त्या संबंधानें मला जी जी माहिती असेल, ती सर्व स्वतः होऊन ताबडतोब कळवीन इ. इ." याहून पोलिस तें आणखी अधिक काय करणार ? शिवाय धर्मोपदेश करतांनांहि राज्यव्यवस्थेच्या विरुद्ध जाणाराला मृत्यूनंतर रौरव नरकवास प्राप्त होईल असें पढविण्यांत येई. पृथ्वीपतीनें भिक्षुकांचें रक्षण करावें, त्यांच्या योगक्षेमाची सोय लावावी व भिक्षुकांनीं साधारण जनतेच्या मनांत पृथ्वीपतीबद्दल पूज्यभाव उत्पन्न करावा, हें नीटच आहे. यांत वावगें असें कांहींच नाहीं.

धर्माच्या या पुनरुज्जीवनामुळें ज्यांचा धर्माकडे अजून थोडा फार ओढा होता, त्यांच्या मनांत साहाजिकपणेंच या नव्या व्यवस्थेबद्दल कृतज्ञता उत्पन्न झाली. म्हाताऱ्या बायकांनांहि बरें वाटलें व जे शुद्ध कामकरीच होते, त्यांनांहि यापासून आनंदच झाला. कारण दहा दिवसांनीं एक दिवस सुटी मिळे, ती आतां सहा दिवसांनीं एक दिवस मिळूं लागली. कैकांना आपल्या लहानपणच्या दिवसांच्या आठवणी झाल्या व आतां या वयांत ते सुखाचे दिवस नेपोलियननें पुन्हां दाखविले म्हणून त्यांना बरें वाटलें.

नेपोलियन आतां देवळांत प्रार्थनेला जाऊं लागला व सर्व कामगारांनींहि प्रार्थनेला अवश्य गेलेंच पाहिजे अशी त्यानें शिस्त घातली. तें पाहून एक दिवस त्याची आई त्याला विनोदानें म्हणाली, "हें ठीक झालें. देवळांत प्रार्थनेला जाण्यासाठीं तुझ्या कानशिलावर मला आतां चापट देण्याचें कारण उरलें नाहीं."

---

प्रकरण तेरावें.

# जार्ज कार्डोडलचा कट.

दुसऱ्याचें बरें झालेलें पुष्कळांना मनापासून पाहवत नाहीं. तो मोठा झाला, तर आपणहि मोठें होऊन त्याची बरोबरी करावी, यापेक्षां त्याचे पाय तोडून त्यास खालीं ओढावा व सर्वांची बरोबरी करावी, हाच मार्ग पसंत वाटणारे पुष्कळ जीव आढळतात व अशांना आपला फायदा होण्यांत जें समाधान वाटतें त्यापेक्षां दुसऱ्याचें नुकसान झालेलें पाहण्यांत व ऐकण्यांत जास्त समाधान वाटतें व वेळीं आपलें नुकसान सोसूनहि ते दुसऱ्याचें नुकसान व नाश करितात. हा मनुष्य-स्वभावाचा एक विलक्षण धर्म वारंवार आढळतो. पशूंत व मनुष्यप्राण्यांत जे अनेक फरकाचे प्रकार आहेत त्यांपैकीं हा एक आहे.

नेपोलियनची चढती कमान पाहून अनेक लोक त्याचा द्वेष व हेवा करीत. या कार्सिकन शिपायानें व काल पारीस शहरांत अन्नान करून

भडकत होता त्यानें एवढा दिमाख करावा व या पदास चढावें, हें पाहून पुष्कळांच्या पोटांत दुखत असे. जुन्या राजवटींतल्या गर्भश्रीमंतांना या नवीन पुढें आलेल्या बकाल करंट्यांचा मनापासून तिरस्कार वाटे व जुन्या घरंदाज अभिजात स्त्रियांनां खाजगी मजलसींत आणि दरबारांत जोसेफाईनच्या पाठीमागें केवळ दास्यवृत्तीनें जाणें कपाळीं आल्यामुळें मनापासून वाईट वाटे. अशा लोकांपैकीं जे धूर्त व मतलबी होते, ते मूग गिळून त्यांतल्या त्यांत आपलें काम साधेल तेवढें साधून घेऊन स्वस्थ असत; परंतु यापेक्षां कमी धोरणाचे पण जास्त तडफीचे होते, ते अनेक वेळां कट करून नेपोलियनच्या जीविताचा शेवट करण्याचें योजित व नेपोलियनचे शत्रूहि अशा मंडळीला हातीं धरून व त्यांस प्रोत्साहन देऊन त्यांच्या करवीं आपला मतलब साधण्याचा प्रयत्न करीत. नेपोलियनच्या उघड उघड शत्रूंत जुने बोरबॉन् राजघराण्यांतले पुरुष व नेपोलियनकडून त्रास पावलेले इंग्लंडचे लोक हे विशेष होते. या दोघांनीं मिळून फ्रान्सांतून हद्दपार केलेले व तेथें असूनहि असंतुष्ट झालेले किंवा तसे सहज होणारे अशा लोकांकडून इ. स. १८०४ चे सुमारास एक भयंकर व्यूह रचविला. अनेक धीट व निधड्या छातीचे असे धाडसी लोक जमवून संधी साधून त्यांचेकडून नेपोलियनवर एकदम हल्ला करवावा व त्यास अचानक उचलून लांबवावा, असा हा व्यूह होता. यांना इंग्लंडमधून पैशाची पूर्ण मदत होती. पूर्वी अशा लहानसहान खटपटी केल्या होत्या; पण त्या लहान प्रमाणावर असून साधारणच होत्या. कोणी हिंमती मनुष्यानें अशी कांहीं कामगिरी केल्यास थोडेसें सोनें त्याच्या हाताला लावून त्याची बोळवण करावी. कदाचित् तो धरला गेला तर त्याचा व इतर कोणाचा कांहीं संबंध न दाखवितां त्याला प्रायश्चित भोगूं द्यावें, एवढ्यावर तें भागे. पण आतां या खेपेचा प्रकार तशांतला नसून हा खोल विचारानें, नीट धोरणानें आणि फार खर्चानें जमवून आणलेला व तितक्याच धाडसानें उरकण्याचा मोठा कट होता.

अशा मोठ्या कृत्याला योग्य असे अनेक लोक या कटाच्या सूत्रधारांनीं मिळविले होते. पिशेग्रू, मोरेयु, लाजालाय, पालिग्ना वगैरे अनेक नांवाज-

लेले व कर्तृत्ववान पुरुष या कटांत सामील होते. बोरबॉन् घराण्यांतला मुख्य काउंट आर्टोय याचें या कटांत नुसतें अंग नसून हा पुढारीपणा पतकरून सर्व गोष्टी आंगावर घेऊन चालवित होता. कटांतलें मुख्य पात्र जार्जेस काडोडल हा होता. यास धरला तेव्हां त्याचेजवळ दहा लक्ष रुपये किंमतीचीं इंग्रजी चलनीं नाणीं सांपडलीं. इ. स. १८०३ चे आगष्ट महिन्यांत कांहीं लोकांनिशीं हा इंग्लंडमधून फ्रान्समध्यें येऊन उतरला व लपत छपत आपल्या कांहीं साथीदारांसह पारीस शहरांत येऊन दाखल झाला. याच सालाचे शेवटीं दिजंबर महिन्यांत पिशेग्रू, पालिग्ना, वगैरे कटांतल्या आणखी मंडळीचीहि इंग्लंडमधून फ्रान्समध्यें रवानगी झाली व तेहि पारीस मध्यें येऊन पोंचले व त्यांनीं पुष्कळ गोष्टींची जमवाजमव केली. इ. स- १८०४ च्या जानेवारींत मोरेयूच्या व यांच्या भेटी होऊन खलबतें होऊं लागलीं. मोरेयू हा प्रथम कटांत सामील होण्यास तयार नव्हता; पण याची बायको जोसेफाईनची अगदीं जवळची नातलग होती. यामुळें तिला व तिच्या आईला म्हणजे मोरेयुच्या सासूलाहि जोसेफाईन व नेपोलियन यांच्या वैभवाचा फार हेवा वाटे. शेवटीं सासूच्या, बायकोच्या, इतर स्नेह्यांच्या व टवाळांच्या सल्यानें व वजनानें मोरेयूचें मन वळलें. धैर्यानें व बुद्धीनें सगळया फ्रान्समध्यें नेपोलियनच्या खालोखाल मोरेयु हा होता. यामुळें नेपोलियन मारला गेल्यावर फ्रान्समध्यें नेपोलियनची जागा आपणांस सहज मिळेल अशी त्याची खात्री पटल्यावरून तो या कटवाल्या लोकांच्या विशेष नादीं लागला. मोरेयुसारखा नांवाजलेला, हिंमतीचा व लोकांच्या फार मर्जीतला असा सरदार आपणांस सहज मिळाल्यावर आपलेकडे सैन्यहि चटकन् वळेल असें कटाच्या सर्व मुख्य लोकांस खात्रीनें वाटूं लागलें व त्यांनां जोर आला. काडोडलला मात्र मोरेयूचा मतलब पसंत पडला नाहीं. तो म्हणाला, 'फ्रान्सचे जुने खावंद जे बोरबॉन् राजे त्यांचेशिवाय इतर कोणी जर तेथें धनीपणा चालवील, तर त्या कामास नेपोलियनच योग्य आहे. नेपोलियनास काढून त्या ठिकाणीं मोरेयूला नेऊन बसवावें हें मला पसंत नाहीं.' पीशेग्रूचेंहि मत असेंच होतें.

पुष्कळ दिवस म्हणजे इ. स. १८०४ चे फेब्रुवारी महिन्यापर्यंत खुद्द नेपोलियनला किंवा त्याच्या अंमलदारांनां या गोष्टीची वार्ता बिलकूल नव्हती. बाहेरून बाहेरून सूचक अशा बातम्या येत; पण त्या मुद्दाम पिकविलेल्या खोटया कंडया या सदराखालीं निसटून जात. याच सुमारास एक कट उघडकीस येऊन त्यांत पांच आरोपींची चौकशी झाली होती. यांपैकीं दोन जे मुख्य गुन्हेगार होते, ते कोर्टाच्या दृष्टीनें निर्दोषी म्हणून सुटून गेले होते. बाकी तिघांनां देहांत शिक्षा सुचविण्यांत आली होती. नेपोलियन आपल्या नित्याचे रिवाजाप्रमाणें पहांटेस उठून एक दिवस निरनिराळ्या खात्यांकडून आलेल्या दिनचर्येच्या हकिगती पहात असतां या खटल्याची हकीगत व त्यांतील आरोपींचें जबाब तो वाचीत होता. हे जबाब वाचतांनां यापेक्षां कांहींतरीं मोठा कट याचे मुळाशीं असावा, असें सहज त्याच्या मनांत आलें व म्हणून तो चौकशी करवूं लागला. पुढें शिक्षा झालेल्या तीन आरोपींपैकीं एकानें मला माफी कराल तर सगळी हकीगत सांगून देईन अशी मागणी केली व त्यानें माहिती असलेली सर्व हकीगत म्यूराजवळ सांगितली. यांत फक्त जार्ज काडोडल हा सहा महिन्यांपूर्वीं फ्रान्समध्यें चोरून कसा उतरला व लांब दोर बांधून उंच उंच कडे चढून तो आंत कसा आला, इतकेंच त्याच्याकडून कळलें. एकदां थोडासा सुगावा लागल्यावर नेपोलियननें त्याचा पक्का पिच्छा पुरवला. फुशे हा यावेळीं पोलीस अंमलदार नव्हता. तरी तो फार हुशार व कारस्थानी असल्यामुळें नेपोलियननें त्यास बोलावून त्याचा सल्ला घेतला व पोलीस अंमलदारावरील विश्वासू आणि मेहनती कामगार सावारी यांचेकडून या कटाचा शोध फार बारकाईनें पण निकरानें चालविला.

हळू हळू नव्या नव्या गोष्टी कळूं लागल्या व थोडा सुगावा मिळतांच धरपकड सुरू झाली. पकडल्याबरोबर कैकांनीं आत्महत्या करून घेतली. यांतच बोव्हे म्हणून एक आरोपी पकडला गेला होता. यानेंहि रात्रीचे वेळीं गळफांस लावून घेतला; पण त्यानें आपल्या हातानें लावून घेतलेला फांस नीट बसला नाहीं. यामुळें प्राण जाईना व वेदना मात्र फार होऊं लागल्या. त्या वेदना सहन न झाल्यामुळें तो मोठयानें ओरडूं लागला, तेव्हां शिपाई

धांवून जवळ गेले. वेदनांच्या भरांत थोडा गैरसावध असतांनाच तो पिशेग्रूला हांका मारूं लागला, तेव्हां त्याचेकडून पिशेग्रूची बातमी कळली व पीशेग्रूबरोबरच मोरेयु वगैरेंचींहि नांवें कळलीं. हीं नांवें ऐकून नेपोलियनला फार आश्चर्य वाटलें. त्याच्या मनाला थोडा संशयहि उत्पन्न झाला व यांना एकदम कैद न करतां त्यांच्यावर चांगली पाळत ठेवून आणखी पुरावा गोळा करा, असा त्यानें हुकूम केला. थोडेच दिवसांत दुसरा पुष्कळ पुरावा पुढें आला व त्यांनां कैद करण्याचे हुकूम सुटले. मोरेयु, काडोडल, पीशेग्रू वगैरे अनेक लहान मोठे गुन्हेगार थोडेच दिवसांत गिरफदार झाले व या कटांतले पन्नास साठ आरोपी धरले गेले. जार्ज काडोडलनें तर पकडला गेल्याबरोबर सर्व कट व नेपोलियनला जीवें मारण्याचा आपला बेत स्पष्टपणें सांगून टाकला.

मोरेयु हा आपला जुना व शूर सरदार, इ. स. १७९६ या एकाच सालांत त्यानें पांच सहा लढायांत उत्तम तरवार गाजविली होती. इ. स. १८०० सालीं होहेनलिंडनची लढाई तर त्यानेंच शौर्यानें जिंकली. ही आठवण मनांत आणून अशा खानदानीच्या माणसाची चूक पोटांत घालावी, त्यानें देशाची बजावलेली नोकरी स्मरून त्याला गुन्हा माफ करावा व या आपल्या दौलतींतल्या मोडलेल्या खांबाला पुन्हां उभा करावा असा थोर विचार करून त्यानें मोरेयुस सांगून पाठविलें कीं, तुमचे जबाब नोंदले जाण्यापूर्वी तूं मला खुल्या दिलानें घडलेली सर्व हकीगत सांग. मी तुला आपल्या खाजगी मुलाखतीची परवानगी देतों व हें सर्व मिटवून टाकतों. पण आपल्याविरुद्ध किती पुरावा जमला आहे, याचा त्याला अंदाज नसल्यामुळें किंवा प्रसंगाची बरोबर कल्पना न झाल्यामुळें त्यानें हें कबूल केलें नाहीं व या कटांत माझा कांहीं संबंध नाहीं, एवढेंच तो धरून बसला. अखेर रीतीप्रमाणें सर्वांची न्यायासनापुढें उघड चौकशी व्हावी असे हुकूम सुटले व एकंदर चौकशी सुरू झाली.

थोडेच दिवसांत ज्यानें पिशेग्रू व इतर कांहीं कटवाल्यांस फ्रान्सच्या किनाऱ्यावर आणून उतरविलें तो कॅप्टन राईटहि धरला गेला. कटवाल्यांचे बातमीदार व हेर होते त्यांचींहि नांवें कळलीं. ते नुसत्या पैशाचे नोकर-

पेंढीचीं जनावरें तीं. त्यांनीं नेपोलियनच्या कामदारांकडून पैसे घेऊन कटांत सामील असलेल्या पुष्कळ इंग्लिश लोकांची बातमी व पत्रव्यवहार आणून दिला. कटांत अधिकाधिक लोकांचीं अंगें दिसून येऊं लागलीं. जे लोक पकडले त्यांचेजवळ जाण्यायेण्याचे परवाने, हत्यारें व पैसेहि सांपडले. या कटांत आपला जुना शिक्षक व पूर्वी हद्दपार झालेला सरदार पिशेग्रू हा आहे, तरी त्याला त्याच्यावरील गुन्ह्याची पूर्ण माफी करण्याचें व पुढें त्याचा योगक्षेम नीट चालेल अशी एक नोकरी देण्याचें नेपोलियननें ठरविलें व त्यास तसें कळविलें. पण हें विश्वासघातानें काळें झालेलें तोंड आपल्या शिष्यास कसें दाखवावें व आतां अब्रूची हानी झाल्यावर जीविताला चिकटून राहाण्यांत तरी कोणता पुरुषार्थ, असा विचार करून व शरमिंदा होऊन त्या विद्वान शिक्षकानें-पिशेग्रूनें–गळफांस लावून घेऊन आपल्या हातानें आपला शेवट केला. सेगूरनें आपल्या आत्मवृत्तांत लिहीलें आहे कीं, तो मेला त्या ठिकाणीं जवळच सिनेकाच्या ग्रंथाचें–ज्यांत केटोनें आत्महत्त्या केली, त्या प्रसंगाचें वर्णन होतें तें–पान उघडून तो जवळच पडला होता.

या काडोडलच्या खुनाचे कटांत जे मोठे म्हणविणारे लोक सांपडले, यांपैकीं पुष्कळांनीं आपला खुनाच्या कटाशीं संबंध असणें हें फार कमीपणाचें आहे,असें समजून आपण क्रांति घडवून आणण्याच्या खटपटींत होतों असें स्पष्ट कबूल केलें. याच कटांत बोरबॉन् घराण्यांतल्या राजपुरुषाचें पूर्ण अंग असल्याचें दिसून आलें. काउंट आर्टाय याचें तर अंग उघड उघड व राजरोस होतें व हा आपणांस आतां बोरबॉन्च्या गादीचा वारस समजत असे. त्याच्यावर नुसते दांत ओंठ खाण्यापलीकडे त्याचें कांहींएक करतां येण्यासारखें नव्हतें. याच बोरबॉन् राजघराण्यापैकीं ड्यूक-डी-एनगाइन नांवाच्या एका तरुण व तरतरीत पुरुषाचेंहि यांत अंग आहे असें नेपोलियनला दिसून आलें. त्याबरोबर त्यानें आपल्या कामगारास एकदम हुकूम देऊन तो राजपुरुष ऱ्हाईन नदीपार, फ्रान्सच्या सरहद्दीपलीकडे दोन मैलांवर होता तेथून धरून त्यास कैद करून आणविलें. बोरबॉन् पुरुषाला असा धरला खरा; पण हें फार धाडसाचें व जोखमाचें कृत्य होतें व इतक्यानेंच हें आटपलें नाहीं, तर ताबडतोब त्याची लष्करी कायद्यानें चौकशी करविली.

आणि लगेच पहांटेच्या प्रहरांत त्यास झालेली देहांत शिक्षा शिपायांकडून गोळ्या घालवून अमलांतहि आणली. मरणापूर्वी आपली व नेपोलियनची भेट व्हावी, अशी इच्छा या राजपुरुषानें दर्शविली होती; पण तसें घडलें नाहीं. अखेर राजपुरुषास योग्य असेंच धीर, गंभीर व उदात्त असें वर्तन ठेवून शेवटपर्यंत आपल्या राजतेजाला कोणत्याहि प्रकारें कमीपणा न येऊं देतां हा पुरुष हें जग सोडून दुसऱ्या जगांत गेला. बोरबॉन् राजपुरुषांनीं व त्यांच्याकडे ज्यांचा ओढा आहे, अशा राजपक्षाच्या लोकांनीं नेपोलियनला मारून टाकून त्याचा कांटा दूर करावा, असा निश्चय केला होता, यांविषयीं कोणासहि शंका नव्हती. नेपोलियनची तर तशी पूर्ण खात्री होती. त्या दोघांमध्यें म्हणजे ज्यांचा बोरबोनांकडे ओढा होता त्यांच्या आणि नेपोलियनच्या मध्यें सर्प-मुंगसाइतकें सूत होतें. एकाचा रेंच उतरल्याशिवाय दुसऱ्याला केव्हांहि स्वस्थपणा वाटण्यासारखा नव्हता. हे दोघेहि एकमेकांविरुद्ध फार वर्षांपासून डाव लढत होते. तोफा, बंदुका, बिडया, फांशी व सूळ हीं एकाचीं शस्त्रें होतीं; तर खंजीर, पिस्तुलें, बांबगोळे व मारेकरी, हीं दुसऱ्याचीं हत्यारें होतीं. जशी वेळ येई व जीं ज्याला पेलत तीं तो वापरी. पण यावेळीं राजपक्षानें खुनी बदमाषाचें रूप व साह्य घेण्याइतका तो खालीं उतरला होता व त्या पक्षाचें अगदीं निकरावर आलें होतें. नेपोलियनला स्वसंरक्षण हें कार्य होतें; पण तें त्याला न्यायाचा देखावा दाखवून व आपला दर्जा संभाळून आणि आपला पगडा ठेवून उरकावयाचें होतें. यासाठीं ड्यूक-डी-एनगाईन याचा इतका लवकर निकाल लावून व हा एक कसून, उंच हातानें व झटकन घाव मारून त्यानें तें उरकून घेतलें.

कसून अशाकरितां कीं, खुद्द फ्रान्समध्यें व फ्रान्सबाहेर लंडनमध्यें व इतर सर्व ठिकाणीं सगळयांनां स्पष्ट कळावें कीं, आतां ही कांहीं थट्टा उरली नाहीं, कीं हा कांहीं पोरांच्या पवित्र्याचा खेळ नाहीं. उंच हातानें अशाकरितां कीं, काउंट आर्टोयसारखे बोरबॉन् राजपुरुष किंवा मोरेयु, पिशेग्रूसारखे लोकप्रिय दुतोंडे यांनांहि पक्कें समजावें कीं, आपली पदवी किंवा दर्जा हा नेपोलियनचा हात न पोंचण्याइतका उंच खास नाहीं. नेपोलियनचा हात पाहिजे तितक्या उंचीवर पोंचून तेथेंहि ठोसा लगावूं शकतो व झट-

कन् घाव इतक्यासाठीं कीं, भित्रेपणा दिसूंच नये. तडकाफडकी काम उठावें आणि मध्यस्थीला अवसर राहूं नये. बोरबॉम् राजवंशांतला पुरुष कैद झाला असतां त्याचे नातलग व इतर देशोदेशींचे राजे मध्यें पडतील, मध्यस्थी करतील, वेळेस दटावतील, म्यानांतून तरवारीहि उपसतील, हें अगदीं उघड व संभवनीय होतें; पण कार्य उरकून गेल्यावर त्या गोष्टींतला जोर लंगडा पडतो व योजिलेला हेतु सिद्धीस जातो. याची साक्ष अशी कीं, यापुढील नेपोलियनच्या सर्व अमदानींत पुन्हां असलीं कृत्यें केव्हांहि घडलीं नाहींत. बोरबॉन् आपला दर्जा सोडून खालीं उतरले नाहींत व शवटपर्यंत फ्रेंच रहिवासी आपली पायरी सोडून असे वर चढले नाहींत.

ड्युक-डी-एनगाईनचे शिक्षेपूर्वी हा विचार बाजूस ठेवून एक वेळ फ्रेंचांकडून या राजपुरुषाचा वध करवूं नये व त्यास माफी देतां आल्यास द्यावी, असा विचार नेपोलियनचे मनांत आला होता व त्याप्रमाणे त्यानें फर्मान लिहून आपला अंमलदार रीआल याजकडे जासूदहि पाठविला होता; परंतु रीआलला वेळेवर फर्मान पोंचला नाहीं. तो पोंचला तेव्हां ड्युक-डी-एनगाईन या जगाच्या पार झाला होता. वेळ निघून गेली होती. आपला फर्मान वेळेवर पोंचला नाहीं, याचा नेपोलियनला फार राग आला. हा फर्मान पोंचून तेवढी वेळ टळती, तर कदाचित् पुढें ड्युक-डी-एनगाईन वांचला असता, असें तो म्हणे; पण या कृत्याचा दोष त्यानें कोणावरहि लादला नाहीं किंवा येऊं दिला नाहीं. लोक हा दोष टालरां, फुशे व इतर अधिकारी यांजवर लादीत; पण ते सर्व पुढील पिढ्यांच्या न्यायासनापुढें या दोषांतून पूर्णपणें मुक्त व्हावें व हा दोष असल, तर त्याचा पूर्ण भार आपल्याच शिरावर यावा, यासाठीं मरणापूर्वी दहा दिवस त्यानें आपले मृत्युपत्रांत या देहान्तशिक्षे संबंधींची हकीगत स्पष्ट करून 'हें कृत्य मींच करविलें' असें लिहून टेवलें. 'फ्रान्सची एकंदर स्थिति व बोरबॉन्ची व ड्युक-डी-एनगाईनची वर्तणूक ध्यानांत आणतां हेंच करणें अवश्य होतें व पुन्हां अशीच परिस्थिति आली असतां मी पुन्हा असेंच करीन' असें त्यानें त्या वेळीं भोंवतालच्या इसमांस सांगितलें.

ड्युक-डी-एनगाईनला मारल्याची खबर नेपोलियनला कळली, तेव्हां त्याची वृत्ति एकदम पालटून गेली. सर्व दिवसभर तो अगदीं थिजून गेला होता. शांत विचारांत मग्न होऊन तो उत्सुकतेनें कोण काय बोलतो व कोण कसा वागतो हें एकसारखें पहात होता. जोसेफाईनला नेपोलियनचें हें करणें अगदीं पसंत पडलें नाहीं. फ्रान्समधल्या जुन्या राजवंशांतल्या इतर अनेक लोकांनांहि या कृत्याची मोठी चीड आली; परंतु ती वेळ अशी चमत्कारिक होती व प्रसंग इतका भयंकर होता कीं, त्याबद्दल कोणीहि विशेष रीतीनें उघड निषेध व्यक्त केला नाहीं. ड्युक-डी-एनगाईनचा शेवट लावल्यावरहि जार्ज काडोडलच्या कटाची चौकशी चालूच होती.

त्या कटाची चौकशी चव्वेचाळीस दिवस चालली व अखेर निकाल होऊन काडोडल व इतर वीस इसम यांस फांशीच्या शिक्षा झाल्या. मोरेयु व आणखी चार इसम यांस दोषी ठरविलें; पण मेहेरनजर करून त्यांनां कैदेच्या शिक्षा दिल्या व एकवीस इसम पुरावा पुरेसा नाहीं, म्हणून सोडून दिले. नेपोलियननें मोरेयूची शिक्षा आपले अधिकारांत कमी करून त्यास अमेरिकेंत जाऊं दिलें व आपली फ्रान्समधील सर्व मिळकत विकून आले तेवढे पैसे घेऊन तो अमेरिकेंत निघून गला. फांशीच्या शिक्षा झालेल्या गुन्हेगारांपैकीं कैकांनीं मध्यस्थी घातले, कोणी कोणीतर आपलीं बायकामुलें नेपोलियनच्या पायांवर घालवून त्यांचेकडून क्षमा मागविली. त्या अनाथ मुलांचे व बायकांचे आक्रोश पाहून व हीं अगदीं उघडीं पडतात, हें जाणून त्या दयावंत नेपोलियननें या एकवीसांपैकीं आठ इसमांस माफी दिली. जार्ज काडोडललाहि माफी करावी, अशासाठीं जोसेफाईननें पुष्कळ मध्यस्थी केली; पण तें नेपोलियननें किंवा काडोडलनेंहि ऐकलें नाहीं. नेपोलियन कांहीं अटींवर मात्र काडोडललाहि क्षमा करण्यास तयार होता; पण काडोडलनें सांगितलें कीं 'सर्वांनांच क्षमा कराल, तर इतरांकरितां म्हणून मी दयेच्या याचनेनें तोंड वेंगाडीन. नाहींपेक्षां मला तुमची दया व क्षमा नको.' शेजारचा एक कैदी आक्रोश करीत असतां काडोडल त्यास म्हणाला, 'जो बंडांत शिरला त्यानें असा आक्रोश करतां कामा नये. शांतपणानें मरावें कसें, हें समजण्याइतकी अक्कल त्यास असली पाहिजे.'

डयुक-डी-एनगाईनच्या शिक्षेनें पुष्कळ लोकांच्या मनास धक्का बसला; पण काडोडलच्या कटाचा परिणाम एकंदरीनें वाईट झाला नाहीं. काळ अनुकूल असला म्हणजे आपले शत्रू आपल्या नाशासाठीं म्हणून ज्या गोष्टी करितात त्यांपासूनहि आपला फायदाच होतो. तसाच प्रकार यावेळीं झाला. एक नेपोलियन गेला म्हणजे सर्व बाजार आटोपेल व राजपद पुन्हां बोरबॉन्नां मिळेल ही कल्पना बोरबॅानच्या मनांतून साफ जावी म्हणून लोकांनीं असें योजिलें कीं, फ्रान्सचें राज्यपद नेपोलियनलाच अर्पण करावें व तें वंशपरंपरेनें त्याच्याच वंशांत चालवावें. असें केल्यानें बोरबानांच्या व त्यांच्या पक्षांतल्या लोकांच्या मनांतला आशेचा अंकूर साफ करपून जळून जाईल व ते पुन्हां कोणत्याहि भानगडी करणार नाहींत. शिवाय अशा रीतीनें फ्रान्सला राजा नेमून दिल्यावर यूरोपांतील इतर राजांनांहि फ्रान्स अराजक व अराजकांचें घर म्हणून उगाच वाद व तंटा करण्याचें कारण उरणार नाहीं व सर्वत्र चिरकाल शांतता नांदेल. तसेंच, असें केल्यानें फ्रान्सला ज्यानें अपार सुख व प्रचंड ऐश्वर्य मिळवून दिलें व ज्याच्या जीवितावर फ्रान्सच्या पुढील सर्व उडया अवलंबून आहत, त्याच्या जीविताचा धोकाहि नाहींसा होईल. सगळे पक्ष व मतें मोडून सर्व फ्रान्स एक होईल व दीर्घ शांततेचा आणि सौख्याचा अनुभव घेऊं लागेल.

कटाची चौकशीहि पुरी झाली नव्हती व न्यायाधिशांनीं आपला निकालहि सांगितला नव्हता तोंच अनेक सभांकडून व अनेक शहरांच्या लोकांकडून 'आपण राजपद धारण करावें' अशा विनंतीचीं मानपत्रें नेपोलियनकडे येऊं लागलीं. यावरून या कटाचें महत्व काय व त्याचा फ्रान्सच्या जनतेवर कसा परिणाम झाला, याचा अंदाज सहज बांधतां येतो. ता. २७ मार्च १८०४ रोजीं तर सिनेट सभेनें आपल्या खलित्यांत 'पुढील भवितव्यतेपासून फ्रान्सचें रक्षण करा व तुमच्या वैभवाप्रमाणेंच ह्मानीं घेतलेलें काम चिरकाल नांदेल अशी कांहीं तजवीज करा.' असें लिहून व्यंगार्थानें राजपद धारण करण्याविषयीं नेपोलियन यास सुचविलें होतें. "पाहूं, याचा विचार करूं." इतकाच जबाब नेपोलियननें त्या वेळीं त्या सभेस दिला. ता. १८ मे १८०४ रोजीं दुसऱ्या कान्सलनें 'साम्राज्य

जाहीर करण्याची व त्यावरील सत्ता नेपोलियनला देण्याची ' सूचना सिनेट सभेपुढें आणली. ती बहुमतानें मंजूरहि झाली.

या दिवशीं म्हणजे ता. १८ मे रोजीं सिनेट सभेंत सूचना येऊन ती तेथें मान्य मात्र झाली, तों लगेच त्या सभेचे सर्व सभासद मोठ्या आनंदानें व उत्साहानें ही बातमी नेपोलियनला जाहीर करण्यासाठीं सेंट क्लाऊडच्या राजवाड्यांत आले. येतांना त्यांच्या मागोमाग लोकांचा इतका घोळका जमला कीं, सेंट क्लाऊड राजवाड्याचें पटांगण व पायऱ्या लोकांच्या गर्दीनें भरून गेल्या. पारीस शहर आनंदानें डोलूं लागलेंसें दिसलें व थोडे वर्षांपूर्वी राजाला पदच्यूत करून सुळावर चढविणाऱ्या या फ्रेंच लोकांची वृत्ति पार पालटून, ते राजा मिळाला म्हणून मोठा हर्ष मानूं लागले. या वेळीं राजा मिळाला म्हणण्यापेक्षां त्यांनीं आपणांकरितां एक राजा नवा निर्माण केला, असेंच म्हटलें पाहिजे. कारण याबद्दल नेपोलियननें थोडेच दिवसांनीं देशांतील सर्व लोकांचीं मतें घेतलीं, त्या वेळीं २५,२४,२४५ इतकीं मतें अनुकूल पडून फ्रान्सच्या राज्यपदावर फ्रान्सच्या सेवाचाकरीबद्दल पारितोषिक म्हणून फ्रान्स देशानें त्यास तें पद वंशपरंपरेनें अर्पण केलें. ज्या हातांनीं जुना राजा मारला, त्याच हातांनीं आतां हा नवा राजा निर्माण केला. फ्रान्स देशांतील त्या सर्व लोकांनीं, त्या पांचामुखीच्या परमेश्वरांनीं, त्या जनीं असलेल्या जनार्दनांनीं, आपण होऊन या नेपोलियन बोनापार्टीला सिंहासनावर नेऊन बसविलें व या नराला त्यांनीं नरपतित्व अर्पण केलें. या ' नराचा ' त्यांनीं ' नारायण ' बनविला व असें करून राजसत्ता ही लोकांची देणगी आहे, हें त्यांनीं फिरून जगास जाहीर करून दिलें. जो आपणास पसंत नाहीं त्या राजाला, जनता मन मानेल तेव्हां सिंहासनावरून दूर लोटून देऊं शकते व जी आपल्या आवड त्यास कोना कोपऱ्यांतून आणून ती सिंहासनावर बसवूं शकते, ती सर्व सत्ता जनतेची आहे, लोकमताची आहे, असें त्यांनीं सर्व दीन दुनियेस मशहूर केलें. आपण आपणांकरतां राजा निर्माण केला, ही गोष्ट सर्व लोक उत्सवानें जाहीर करूं लागले. सैन्यांतील शिपायांच्या रांगा उभ्या करून त्यांना मोठ्या थाटानें ही गोष्ट कळवीत असतां सर्व शिपाई व त्यांवरील सरदार

आनंदाच्या भरांत मोठाल्या ललकाऱ्या देत; परंतु एका पलटणींत ही गोष्ट जाहीर करतांनां टूर्वे नांवाचा तिजवरील एक अधिकारी अगदीं स्तब्ध होता. तसाच माउटन नांवाचा एक कामगारहि स्तब्ध होता. त्यांनीं आपलें विरुद्ध मत मार्गे चोरून ठेविलें नाहीं. माउटननें तर आपल्या हाताखालचे सैन्यास गप्प बसवून कोणत्याहि तऱ्हेनें उत्साह प्रदर्शित करूं दिला नाहीं. साम्राज्यापेक्षां लोकसत्तात्मक राज्यपद्धतीकडील त्यांच्या मनाच्या या ओढ्याची बक्षिसीहि त्यांना नेपोलियनकडून लवकरच पोंचली. थोडेच दिवसांचे अवकाशांत त्या दोघांनांहि बढतीच्या जागा मिळाल्या. एक जनरल झाला व दुसरा खुद्द नेपोलियन बादशहाचा एडिक्यांप म्हणजे रक्षक झाला. दोघेहि पुरे जिंकले गेले. नेपोलियन म्हणजे मोठा मिट्ठा ठक. शत्रूचा मित्र कसा करावा व दुसऱ्याचें मन जिंकून त्याला आपल्या खिशांत कसा उतरावा; या विद्येंत तो पुरा वस्ताद होता.

प्रकरण चौदावें.

## बुलोनची छावणी.

जार्ज काडोडलच्या कटाचा व त्यासाठीं खर्च झालेल्या शक्तीचा आणि द्रव्याचा पूर्ण फायदा नेपोलियनच्या पदरांत पडला. जनतेनें नवें राजपद निर्माण करून तें त्यास अर्पण केलें; पण असें करण्यानें त्यांनीं बोरबॉन् राजघराण्याच्या सर्व आशा समूळ उपटून टाकून, पर्यायानें त्या राजवंशास अग्नी लाविला व राजपक्षाच्या लोकांचीहि पुरी खोड मोडली. आतां त्याहि पलीकडच्या, फ्रेंचांच्या दुसऱ्या एका शत्रूची खोड मोडावी, असा नेपोलियननें विचार केला. इंग्लंड देशानें आज इतकीं वर्षें नेपोलियनची पाठ पुरविली होती व अजूनहि त्यांनीं तोच क्रम चालू ठेवला होता. या कटानंतरहि फ्रेंचांचीं गलबतें सांपडतील तेथें कैद करावीं, असा त्यांनीं सपाटा लावला होता. त्या राष्ट्राचा हा सतत उद्योग, मार्गांत कितीहि अड

चणी आल्या तरी त्यांना भिऊन तो मार्ग न सोडण्याची त्याची बुद्धि, कितीहि पराभव झाले, तरी पुन्हां उठून कंबर बांधून काम करण्याची विलक्षण चिकाटी व सारखे यत्न, हें पाहून त्या राष्ट्राचें फार फार कौतुक वाटतें. इतके दिवस नेपोलियनची खोड मोडण्याकरितां इतका पैसा खर्च झाला असतां व इतके श्रम पडले असतां देखील इंग्लिशांनीं अजून आपल्या कोणत्याहि यत्नांत कमीपणा येऊं दिला नव्हता. त्यांनीं सर्व समुद्रभर नाकेबंदी केली होती. समुद्राला व समुद्राचे प्रत्येक भागाला त्यांनीं कुलपें ठोकून टाकलीं होतीं व त्यांच्या किल्या लंडनमध्यें नेऊन ठेविल्या होत्या. तेव्हां आतां त्या बेटावर व बेटांतल्या त्या शहरावर जोराचा हल्ला करून तेथून त्या किल्या आणाव्या व आपल्या गलबतांनां समुद्र खुला करून द्यावा, असा नेपोलियननें निश्चय केला व यासाठीं त्यानें फार मोठी जंगी तयारीहि चालविली. दीड लक्ष नवें सैन्य उभें केलें. अठ्ठावन मोठालीं फ्रेंच जहाजें जमविलीं. बारा बटेव्हियन गलबतेंहि आणविलीं व सुमारें अठराशें सशस्त्र वाहनें इंग्लंडवर हल्ला करण्यासाठीं सज्ज केलीं.

इंग्लंडच्यासमोर अनेक ठिकाणीं जहाजें तयार ठेवण्यांत आलीं होतीं; परंतु जहाजांच्या काफिल्याचें मुख्य ठिकाण बुलोन बंदर हें ठरविलें होतें. प्राचीनकाळीं ज्युलियस सीझरनेंहि ब्रिटनवर हल्ला करण्याकरितां हेंच बंदर फार सोईस्कर म्हणून ठरविलें होतें व सीझरनें आपली मोहीमहि येथूनच केली होती. आतां या शतकांतल्या या सीझरलाहि हेंच ठिकाण पसंत पडलें. नेपोलियन पारिसहून बुलोन येथें वारंवार येई व मुक्काम करी. आणि ही लढाऊ जहाजांची तयारी कशी काय चालली आहे, हें तो स्वतः नेहमीं फार काळजीपूर्वक पाही. नवे आरमारी सैन्य, खलाशी व अनेक दर्यावर्दी लोक तेथें चाकरीस ठेविले होते, त्यांच्या कामांच्या कवाइतीहि तो पुन्हां पुन्हां करवी. बुलोन येथें असतांना सौल्ट, जुनो, लेन्स, वगैरे सरदारांना आपल्या बरोबर घेऊन तो वारंवार दर्याकिनाऱ्यावर घोडे फिरवावयाला जाई आणि समुद्राच्या अगदीं लाटांजवळ आपले घोडे नेऊन तेथून समोरचा प्रदेश व दुरून दिसणारा इंग्लंडच्या किनाऱ्याकडचा भाग आपल्या दुर्बिणींतून तो नीट टेहळून पाही. यावेळीं त्याच्या बरोबरीचे

सरदारहि मोठ्या डौलानें समुद्राकडे पाहून एकमेकांजवळ इंग्लंड देश जिंकण्याच्या गप्पा झोंकीत. आपल्या लोकांना नीट सराव व्हावा व आयते-वेळीं घोंटाळा व धांदल होऊं नये म्हणून तो सामान व लोक, अनेक वेळां गलबतावर चढवी व त्यांच्याकडून दर्यांत निरनिराळ्या हालचाली आपल्या डोळ्यांदेखत करवी. दर्यांत तोफांचा मारा कसा व किती लांब होतो, हें पाहण्याकरितां जवळ उभा राहून नेपोलियन तोफा डागवी व निरनिराळ्या बाजूनें मारे करवी. या वेळीं प्रत्येकानें शिकस्तीची घाई करावी व बिलकूल घोंटाळा होऊं न देतां आणि विलंब न लावतां आपले हुकूम अमलांत आणावे, याविषयीं तो फार खबरदारी घेई. असें करण्याचें एक मुख्य कारण असें होतें कीं, इंग्लंडची दर्यावरील लढाईची तयारी व ताकद किती जबर-दस्त आहे, हें तो जाणून होता व आपण कशीहि तयारी केली, तरी दर्यांत इंग्लंडबरोबर युद्ध करून त्यांना नामोहरम करणें फार कठीण आहे, हें त्याला दिसत होतें. समुद्रांत इंग्लंडच्या लढाऊ जहाजांशीं आपलीं लढाऊ जहाजें झुंजवून त्यांचा पराभव करणें त्यास जड वाटत होतें. म्हणूनच तसें कर-ण्याची त्याची तयारी व तरतूदहि नव्हती. त्याचा असा बेत होता कीं, एकदम दोन चार बाजूंनीं एकाच वेळीं इंग्लंडवर हल्ला करावा किंवा तसें करण्याचा रोंख दाखवावा व अशा रीतीनें इंग्लंडचीं लढाऊ जहाजें गुंतवून ठेवून त्यांच्याशीं लढण्याकरितां व त्यांना पायबंद देण्याकरितां कांहीं जहाजें व लोक खर्चीं घालावे व त्या संधींत आपलें दीड लाख सैन्य एकदम अचा-नक इंग्लंडच्या किनाऱ्यावर नेऊन उतरवावें. हें सर्व उरकण्यास दर्यांत दाट धुकें पडलें असतां किंवा मोठें वादळ होऊन गेल्यावर इंग्लंडचीं जहाजें दूर आश्रयास गेलीं आहेत तोंच आपणांस उत्तम संधि सांपडेल, असें त्यानें ठर-विलें होतें व या थोडक्याशा अवकाशांत सर्व तयारीं करून आपलें दीड लाख सैन्य एकदम नेऊन इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरावें असा त्याचा संकल्प मोठ्या धाडसाचा व जवळ जवळ अशक्य कोटींतला दिसतो; पण केवढेंहि मोठें साहस असलें, तरी त्याला नेपोलियन कधीं कचरत नसे. किंबहुना जेवढें साहस मोठें तेवढें नेपोलियनला अधिक बळ चढे व जोराचें स्फुरण येई. इतरांनां अशक्य वाटणारी गोष्ट आपण शक्य करून दाखवावी

व शेवटास न्यावी ही तर त्याला लहानपणापासूनच मोठी हौस होती. बुलोन येथील अधिकारी मार्शल सोल्ट याला नेपोलियननें एक दिवस विचारलें, " सर्व सैन्य व सामान जहाजांवर चढविण्यास तुला किती वेळ लागेल?" यावर सोल्ट म्हणाला, " निदान तीन दिवस तरी पाहिजेत." पुन्हां नेपोलियननें सांगितलें, " मी तुला फारतर एक दिवसाचा अवधी देऊं शकेन तितक्यांत तें सर्व उरकलें पाहिजे." सोल्टनें उत्तर दिलें, "सरकार, हें अशक्य आहे." नेपोलियन जरा मागें वळून सोल्टकडे पाहून म्हणाला, " काय? अशक्य आहे!! हा शब्दच मला माहित नाहीं. आपल्या फ्रेंच भाषेंत हा शब्द नाहीं. पण तुझ्या कोशांत असला, तर तो त्यांतून खोडून टाक." पुढें थोडेच दिवसांत नेपोलियननें सर्व व्यवस्था अशी करून टाकली कीं, सर्व सामान व सैन्य चोवीस कलाकांचे आंत जहाजांवर सहज चढवितां यावें.

नेपोलियनची आपल्या नजरेसमोर चालू असलेली ही मोठी तयारी पाहून इंग्लंडनेंहि सर्वस्व खर्चून नेपोलियनला तोंड देण्याची तयारी सुरू केली. देशांत कर बसवून पैसा उभा केला. नवीं जहाजें बांधण्यास सुरवात केली. सत्रा वर्षांचे वरील व बावन वर्षांच्या आंतील प्रत्येक इसमानें या वेळीं लढाईंत सामील झालेंच पाहिजे, असा कायदा करून मोठें मनुष्यबळ तयार केलें. सरकारनें हे जे यत्न केले, त्याला लोकांनींहि चांगला दुजोरा दिला. पैसेवाल्यांनीं पैसा दिला. कारखानदारांनीं खाजगी खर्चानें जहाजें सजवून सरकारच्या स्वाधीन केलीं. वतनदार व गढ्या कोटांचे मालक थोर थोर लोक होते त्यांनींहि खाजगी पलटणें उभीं केलीं. पीट सारख्यानेंहि यावेळीं शरीरास समाधान नव्हतें तरी रोज तीन तीन हजार लोकांस कवाईत करवून स्वतः सैन्य तयार करण्याचा सपाटा लावला. या एकाच गोष्टीवरून देशावरची ही आपत्ति, लोकांनां किती भयप्रद वाटत होती व त्याकरितां त्यांचे कसे यत्न चालले होते, हें अजमावितां येईल. सुमारें दहा कोट रुपयांचे नवे रोखे काढले व नवे कर बसवून आणखी तितकीच रक्कम उभी केली. एवढी प्रचंड रक्कम अशाकरितां कीं, घरचा खर्च भागवून युरोपांतल्या इतर राजांस मदत देऊन नेपोलियनविरुद्ध उठवितां यावें व अशा रीतीनें नेपोलियनास इंग्लंडचे बाजूनें काढून दुसरीकडे गुंतवून टाकावा.

इंग्लंडच्या या तयारीची व डावाची ओळख नेपोलियनला होतीच. यामुळें त्यानेंहि आणखी सैन्य वाढविलें. सैन्यांतले शिपाई होते त्यांनांहि खलाशांचीं कामें शिकविण्यास सुरवात केली. हें करण्यांत असें योजलें कीं, एका खर्चांत दोन खातीं व दोन प्रकारचें सैन्य तयार व्हावें. आपल्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें येथेंहि नेपोलियन हा सैन्यांतल्या शिपायांनां स्वतःच्या कुटुंबांतल्या माणसांप्रमाणें जपे. त्यांचे जेवणाचे पदार्थ केव्हां केव्हां तो स्वतः चाखून पाही. दवाखान्यांत जाऊन तेथील व्यवस्था तो नेहमीं सुधारवी. आजारी असलेल्या प्रत्येक शिपायाच्या खाटेशीं स्वतः जाऊन त्याला नांवानें हांक मारून त्याची सर्व चौकशी करी व केव्हां केव्हां त्यांनां आपल्या हातानें औषधपाणी करी. जाक्वीमचा हात गलबतावर कशानें दुखावला, लेडुकच्या पायाला कोठें घाव लागला, हें त्याला ठाऊक होतें. डीलारेची जखम कोणते प्रसंगांत गोळी लागून झाली, हेंहि त्याच्या स्मरणांत स्पष्टपणें होतें. अमक्याच्या पायावरून तोफेचें चाक जाऊन हाड केव्हां दुखावलें, तमक्याच्या मांडीला वार केव्हां लागला, हें सर्व नेपोलियनच्या लक्षांत होतें. विलक्षण स्मरणशक्तीमुळें एकदां केलेली शिपायाची विचारपूस तो कधींहि विसरत नसे. त्यानें स्वतः खाटेजवळ जाऊन शिपायाला त्याचे नांवानें हांक मारून त्यास घडलेल्या गोष्टींची आठवण देऊन विचारपूस केली व दोन मायेचे शब्द उच्चारले म्हणजे त्या शिपायाला केवढी तरी धन्यता वाटे. नेपोलियनचे ते शब्द त्याला औषधाच्या काय; पण अमृताच्या जागीं होत. दवाखान्याबाहेरहि तो आपल्या शिपायांची मनांत नेहमीं काळजी वागवी व त्यांनां सुख कोणत्या प्रकारें होईल व त्यांचीं दुःखें किंवा बारीक सारीक अडचणी देखील कशा दूर होतील याची चिंता तो सदैव वाही.

एके दिवशीं नेपोलियन पारीसहून बुलोन येथें नुकताच आला होता. त्या वेळीं सैन्याच्या एका पलटणीची कवाईत चालली होती. ती पाहण्याकरितां नेपोलियन त्या कवाइतीचे ठिकाणीं गेला. कांहीं वेळ कवाईत झाल्यावर अधिकारी नेपोलियनजवळ आले व शिपाई नुसतेच उभे राहिले. नेपोलियनचें लक्ष त्या उभे असलेल्या शिपायांकडेच होतें. थोडे वेळानें नेपोलियन त्या अधिकाऱ्यांस म्हणाला, "पलटण चांगली व्हावी अशी इच्छा

असेल, तर अधिकाऱ्यांनीं शिपायांची काळजी नीट डोळे उघडून घेतली पाहिजे. तुम्हांस या शिपायांत कांहीं विशेष दिसतें कीं नाहीं?" नेपोलियनचे हे शब्द ऐकून अधिकारी चपापले; पण कोणी कांहीं बोलला नाहीं. तेव्हां उभे असलेल्या शिपायांपैकीं पुष्कळजण आपले हातानें आपली मान एकाच आंगास व एकाच ठिकाणीं चोळताहेत हें त्यानें अधिकाऱ्यांचे नजरेस आणून दिलें व "हे असें कां करितात? यांनां काय होत आहे?" याची त्यानें अधिकाऱ्यांजवळ चौकशी केली. त्यावर 'यांत लक्ष देण्यासारखें कांहीं नाहीं,' असें अधिकाऱ्यांनीं सांगितलें व ते आणखी असेंहि म्हणाले कीं, "शिपायांस कोणतेहि दुखणें किंवा दुसरें कांहींहि झालेलें नाहीं व कोणी शिपायानें एकसुद्धां तक्रार कधींहि केली नाहीं." हें ऐकून नेपोलियन चटकन वळून म्हणाला, 'माझे शिपाई कधींच तक्रार करीत नाहींत; पण शिपायांनीं तक्रार केली नाहीं, म्हणून सर्व गोष्टी बरोबर आहेत, असें मानणें चूक आहे' असें म्हणून त्यांतील कांहीं शिपायांस जवळ बोलवून त्यानें चौकशी केली. पण शिपायांनीं आपणांस कांहीं होतें असें, किंवा दुसरा कोणताहि प्रकार नेपोलियनला कळूं दिला नाहीं व तसें करणें हेंच त्यांस भूषण वाटलें. त्या वेळीं तें तितकेंच राहिलें. शिपाई सुटून घरीं गेले. नेपोलियन आपल्या छावणींत आल्यावर त्यानें त्या पलटणींतल्या शिपायाचा एक पोषाख मागविला व हा पलटणींतल्या शिपायाचा उसना मागून आणलेला पोषाख स्वतः आंगांत घालून त्यानें त्या शिपायांप्रमाणें कवाईत करून पाहिली. निरनिराळे पवित्रे करून पावलें टाकून पहात असतां त्या कोटाची गळपट्टी मानेला घांसते व रुतते असें त्याच्या लक्षांत आलें. ही कपडे पुरविणाऱ्या कंत्राटदाराची कसूर होती. खांद्यावरच्या फितीची शिवण आंतून मुरडून घेतली होती, ती मानेला घांसे. दुसरे दिवशीं नेपोलियन पुन्हां त्याच पलटणीच्या कवाइताच्या ठिकाणीं आला व आपल्या हातानें शिपायांच्या कोटांच्या गळपट्या दूर सारून त्यांच्या माना त्यानें पाहिल्या. तों त्या सर्वांच्या मानेवर एकाच ठिकाणीं फोड आल्याचें त्यास दिसून आलें. कोणाच्या नुसते फोड आले होते, कोणाच्या घट्टे पडले होते, तर कोणाच्या थोडेंरक्तहि आलें होतें. तें त्यानें स्वतः पाहिलें व अधिकाऱ्यांसहि दाखविलें.

प्रथम तो त्यांस अक्षरहि बोलला नाहीं. त्यानें नुसतें अधिकाऱ्यांकडे व त्या शिपायांच्या चट्ट्यांकडे पाहिलें. शरमेनें अधिकाऱ्यांस मेल्यापेक्षां मेल्यासारखें झालें. नंतर शेवटीं परत फिरतांनां नेपोलियन त्या अधिकाऱ्यांस म्हणाला,"फ्रान्सच्या या मुलांनां आपल्या देशाच्या वैभवासाठीं शरीरांतलें रक्त सांडण्यास सांगा; तें ते खुषीनें सांडतील; पण भिकार खोगीर लादलेल्या तट्टांप्रमाणें त्यांच्या आंगाला उगाच चट्टे पाडूं नका. भूषणाच्या व मानाच्या जखमा पोलादाच्या धारेनेंच पडतात."

केवळ पित्यालाच साजेल अशा वात्सल्यानें नेपोलियन अपल्या सैन्यांतल्या शिपायांचें पालन करी. यामुळें ते त्याला आपला जीव कीं प्राण असें मानीत व त्याच्यासाठीं वाटेल तसलें साहसाचें कृत्य करण्यास ते संतोषानें तयार असत.त्याचा शब्द व हुकूम ते वेदवाक्याप्रमाणें पाळीत.कोणी कसाहि थोर असला, तरी त्यानें आपले हुकूम बरोबर मानले पाहिजेत व त्याप्रमाणें वागलें पाहिजे याविषयीं नेपोलियनचा मोठा कटाक्ष असे. हुकुमाची अवज्ञा तो कोणालाहि करूं देत नसे. घोडा व नोकर हे हुकूमबंद नसतील, तर गाडी व राज्य कोठें बहकेल व केंव्हां नाश पावेल याचा मुळींच नेम नाहीं. यासाटीं आपले हुकूम कसेहि असले,तरी ते योग्य रीतीनें अमलांत आणण्याविषयीं तो अधिकाऱ्यांस फार निकरानें सांगे.

बुलोन येथें असतां एके दिवशीं सकाळीं घोड्यावर बसून बाहेर जात असतांना ‘आज सर्व जहाजांची पाहणी मी करीन व दर्यांतली कवाईतहि पाहीन, याकरितां अमूक वेळीं नीट तयारी ठेवा व जहाजें काढून बाहेर घ्या’ असा हुकूम नेपोलियननें आपला बुलोन येथील ॲडमिरल ब्रू यास पाठविला. हुकूम पोंचला तेंव्हां ब्रू काम करीत होता. हुकूम कळल्यावर ‘हा हुकूम आज पाळतां येणार नाहीं, कारण हवा वादळी आहे’ असें तो म्हणाला. यामुळें पुढली तयारी झाली नाहीं. जहाजें नांगरलेलीं जागचे जागींच राहिलीं. नेपोलियन फेरफटका करून परत आला, तेंव्हां ‘सर्व तयारी झाली आहे ना?’ असें त्यानें जवळच्या अधिकाऱ्यांस विचारलें. तेंव्हां अधिकाऱ्यांनीं दुसरें कांहींच उत्तर न देतां ॲडमिरल ब्रूचे शब्द जसेच्या तसे अक्षरशः नेपोलियन यास सांगितले. हाताखालच्या अंमलदाराकडून

असल्या अवज्ञेचा कधींच परिचय नाहीं, यामुळें ते शब्द पुन्हां दोन वेळां उच्चारून त्याला सांगावें लागले. ते ऐकून बादशाहानें–या वेळीं नेपोलियन तक्तारूढ झाला होता–अॅडमिरल ब्रू यास ताबडतोब बोलावूं पाठविलें. संतापानें बादशाहाचे डोळे लाल झाले होते व तो थोडा उतावीळहि झाला होता. बराकींतून ब्रू येणार तों आधींच पुढें होऊन बादशहानें त्यास अर्ध्या वाटेंत गांठलें. बादशहाबरोबर शागीर्दपेशा व कांहीं अधिकारी मंडळीहि होती. अॅडमिरल ब्रू यास पाहून बादशाह म्हणाला, "अॅडमिरल! आमचे हुकूमाप्रमाणें तुम्हीं तयारी कां केली नाहीं?"

यावर अदबीनें पण करारी अवाजानें ब्रूनें उत्तर दिलें, "सरकार, दर्यांत वादळाचा रंग फार दिसतो असें मला वाटतें, तसेंच आपणांसहि प्रत्यक्ष दिसतेंच आहे. इतक्या शूर माणसांचे जीव विनाकारण धोक्यांत घालावे, असें महाराज करणार नाहींत."

या वेळीं हवा खरोखरच फार वादळी झाली होती. दर्यांत अगदीं कोट आलें होतें व दुरून मेघांचा गडगडाटहि थोडा ऐकूं येत होता. तरी रागानें आणखी आणखी लाल होऊन बादशाहा संतापून म्हणाला, "अॅडमिरळ साहेब, माझे हुकूम फर्माविले गेले होते ना? तर मग मी पुन्हां विचारितों, हे हुकूम तुम्हीं अमान्य कां केले? हुकूमांचा परिणाम काय होईल हें पाहणें माझें काम आहे व तें मी एकटा पाहीन! जा व हुकूमाप्रमाणें तयारी करा."

ब्रू म्हणाला, "खावंद सरकार, हा हुकूम मी मानणार नाहीं."

ब्रूचे हे शब्द ऐकून बादशाहा ब्रूचे बाजूस वळला व हातांत घोड्याचा चाबूक होता तो तसाच त्यानें वर उगारला.

इतक्यांत अॅडमिरल ब्रू एक पाऊलभर मागें सरला व कमरेस तलवार लटकत होती, तिच्या मुठीस हात घालून बादशहाकडे पाहून म्हणाला, "सरकार, याद राखा."

हा प्रकार पाहून भोंवतालच्या मंडळीचें रक्त अगदीं गोठून गेलें व ते स्तब्ध उभे राहिले. अॅडमिरल ब्रू हा अगदीं उग्र पण फिका होऊन गेला, तरी तरवारीस हात घालून तो तसाच बादशहाकडे नजर लावून

तटस्थ होता. क्षण दोन क्षण बादशहाहि चाबूक उगारून ब्रूकडे रोखून पहात होता. रागानें त्याचे ओंठ कांपत होते व मुद्रा क्रूर झाली होती. भोंवतालच्या मंडळीच्या आंगावर कांटेच उभे राहिले व धास्ती पडली कीं, ह्याचा शेवट काय होतो. इतक्यांत नेपोलियननें चाबूक तसाच दूर झुगारला व अॅडमिरल ब्रूनें तरवारीच्या मुठीचा हात सोडून दूर केला. दोघांनींहि एकमेकांकडे एकदां निरखून पाहिलें. जणूं काय 'या वेळीं नीट विचार केला नाहीं, तर फार कठीण परिणाम ओढवेल' असेच शब्द त्यांच्या तोंडावाटे बाहेर पडले असें वाटलें. नंतर ते दोघेहि दूर सरले. जग जिंकून तें आपल्या ताब्यांत ठेवूं पाहणाऱ्या नेपोलियननें यावेळीं आवेश व राग जिंकून ते आपल्या ताब्यांत ठेवूं पाहणाऱ्या नेपोलियननें यावेळीं आवेश व राग जिंकून आपलें मन आपल्या ताब्यात ठेवलें. इकडे हा प्रकार चालला होता, तोंच दर्यावरील दुय्यम अधिकारी मेगान यानें सर्व तयारी पूर्ण केली व जहाजें हांकारून कवाईतीस सुरवात केली.

थोड्याच अवकाशांत वारा एकदम जोरानें वाहूं लागला व प्रचंड वादळास सुरवात झाली. विजांच्या प्रकाशानें डोळे दिपून जात व मेघाच्या गर्जनेनें ऐकणारांच्या अगदीं कानठाळ्या बसत. वारा इतका सोसाट्याचा वाहूं लागला कीं, जहाजांची रांग मोडून ती सर्व चोहोंकडे फांकली. समुद्राचें स्वरूप एकदम इतकें अक्राळविक्राळ झालें व लाटा पर्वताप्रमाणें इतक्या उंच उठूं लागल्या कीं, सर्व जहाजें एकदम समुद्राच्या पोटांत गडप होतात कीं काय असें भासूं लागलें.

नेपोलियन हें सर्व पहात, दोन्ही हात पाठीमागें धरून सचिंत मुद्रेनें किनाऱ्यावर फेऱ्या घालीत होता. तोंच दुरून आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. सुमारें वीस जहाजें उपडीं होऊन आंतले खलाशी व शिपाई लाटांवर तरंगत होते व आपला जीव बचाविण्यासाठीं मोठमोठ्यानें ओरडून मदत भाकीत होते; पण त्यांनां जाऊन वाचवावें किंवा त्या बुडल्यांनां हात द्यावा, अशी कोणाचीहि हिंमत झाली नाहीं. त्यांच्या त्या ओरोळ्या ऐकून किनाऱ्यावर जे लोक होते, तेहि आक्रोश करूं लागले व सगळा एकच गोंधळ उडाला. इतक्यांत नेपोलियननें एका होडींत पाय ठेवला व तो त्या

बरोबर घेऊन त्या देशांत मशीदींत जाऊन नमाजहि पढूं शकला, त्याला रोमच्या पोपबद्दल आदर किंवा भक्ति कशी वाटणार ? धर्माबद्दल व धर्मगुरूबद्दल नेपोलियनच्या मनांत केव्हांहि श्रद्धा होती, असें दिसत नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांबद्दल त्याला एक तऱ्हेनें तिरस्कारच वाटे.

शाळेंतील मुलें धर्मवेडीं होऊं नयेत, त्यांच्या कोंवळ्या मनांवर देवळांचा परिणाम होऊं नये म्हणून तो फार जपे. भिक्षुकांच्या हातीं मुलांचें शिक्षण देणें तर त्याला बिलकुल पसंत नव्हतेंच. तो म्हणे, या भिक्षुकांच्या शिकवणीनें मुलें वाटेल त्याच्या पुढें लोटांगणे घालूं लागतात. जें मन एके ठिकाणीं लोटांगण घालण्याइतकें हलकें बनलें, तें दुसरीकडेहि वाटेल तेव्हां व वाटेल तशीं लोटांगणे घालण्यास सहज तयार होईल. त्याला ताठा म्हणून राहणारच नाहीं. भिक्षुकांचें प्रत्यक्ष शिक्षण तर नकोच; पण मुलांच्या शिक्षण-व्यवस्थेंत भिक्षुक आणि देवळें यांचा दूरचा मागमूसहि नसावा असें त्याला वाटे. शाळेंत घंटा असत त्या काढून त्यानें तेथें पडघम योजिले. हें अशा हेतूनें कीं मुलांनां लहानपणापासून रणवाद्याची संवय लागावी आणि आवड उत्पन्न व्हावी. घंटा देवळाची आठवण सुचवितात; पडघम हे समरांगणाचें चित्र डोळ्यांपुढें उभें करतात. अशा मनोरचनेच्या मनुष्याला रोमचा पोप येऊन त्यानें अभिषेक केला असतां व आशीर्वाद दिला असतां आपल्याला कांहीं विशेष पारमार्थिक लाभ घडेल असें वाटण्याचा संभव नव्हता. पोपच्या हातानें शिंपडलेल्या पाण्याच्या शिंतोड्यानें व पोपनें उच्चारलेल्या मंत्रांच्या योगानें, अशी कांहीं अद्भुत शक्ति येईल कीं, तिच्या योगानें अरिष्ट केव्हांहि येणार नाहीं, सदां कल्याणच होईल व संमृद्धी वाढेल, असें नेपोलियनला एखादे वेळीं तरी वाटेल असें मुळीच संभवत नाहीं. या सृष्टीचा निर्माणकर्ता कोणीतरी धनी असेल व त्या धन्याबद्दल—परमेश्वराबद्दल— नेपोलियनचे मनांत प्रेम आणि अत्यंत आदरहि असेल, नव्हे होता; पण अशा या सर्वशक्तिमान धन्यानें आपलें धनीपण किंवा त्याचा कोणताहि भाग कोणाहि योनिसंभव, इंद्रियासक्त, मनुष्याच्या स्वाधीन केला असेल, किंवा कोणाहि मनुष्याची रदबदली आणि तरफदारी तो न्यायमूर्ति परमेश्वर

आपल्या दरबारांत चालू देईल असें केव्हांहि नेपोलियनला वाटण्याचा संभव नव्हता. किंवा देवाचें देवपण, कोणी कारागिरानें आपल्या कल्पनेप्रमाणें बनविलेल्या लांकडाच्या किंवा दगडांच्या मूर्तींत, किंवा रंगानें काढलेल्या तसबिरांत, लवमात्र तरी उतरेल असें मानण्याइतका मनाचा ढिला तो खास नव्हता. प्रत्यक्ष परमेश्वराचें दर्शन घडल्यास त्याच्या चरणीं लीन व्हावें, आपल्या कायेची कुरवंडी करावी हे खरोखर भूषण आहे, परंतु त्याच्या दारचा एखादा पुजारी किंवा एखादा कुतरडा भेटतांच स्वतःला धन्य मानावें आणि त्याच्या स्पर्शानें आपणांला पूनित समजावें असें मानण्यासारखा बनलेला नेपोलियन नव्हता हें अगदीं निर्विवाद आहे. पण देवाचा पुजारी आपल्या घरीं पारिसमध्यें चालून आल्यानें लोकांना आपलेविषयीं जर आदर वाटेल, त्यांच्या ठायीं आपलेबद्दल अधिक निष्ठा उत्पन्न होईल, तर त्याला अवश्य पाचारून आणावा असें जाणण्याइतका तो धूर्त व धोरणी होता. पोपनें येऊन राज्याभिषेक केल्यानें कांहीं अपाय तर खासच होणार नाहीं, झाला तर उपायच होईल हेंहि तो समजून व जाणून होता. नाहींपेक्षां 'सर्व राजसत्तेचा आदि उगम जनतेपासूनच होतो' हें ज्याच्या स्मृतिशास्त्रांतलें पाहिलें सूत्र, त्यानें आपणांला पोपच्या हातून राज्याभिषेक करवावा याची उपपत्ति नीट लागत नाहीं.

राज्यसत्ता व राज्याभिषेकाधिकार तीन तऱ्हेनीं प्राप्त होऊं शकेल; अशी सर्वसाधारण समजूत आहे. जनतेच्या सर्वमान्य संमतीनें, किंवा तरवारीच्या जोरावर मिळविलेल्या विजयाच्या हक्कानें, किंवा सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या इहलोकींच्या प्रतिनिधीनें अभिषेक केल्यानें. यांपैकीं जनतेची पूर्ण संमति त्यानें मिळविलेली होती. तसेंच त्याच्या तरवारीच्या जोराची आणि विजयाच्या हक्काबद्दलचीहि त्यानें सर्वांची खात्री केली होती व यदाकदाचित् अजून त्याबद्दल कोणास संशय असल्यास तो फेडून टाकण्याला नेपोलियन सिद्ध होता. तेव्हां आतां राहिला पोपच्या अभिषेकाचा तिसरा प्रकार. तोहि लोकांनां मान्य वाटेल असा यथासांग करावा, म्हणजे पृथ्वीवरील इतर राजांनां आणि बादशहांनां आपणांमध्यें कोणतेंहि व्यंग वाटणार नाहीं. कोणतीहि उणीव त्यांनां भासणार नाहीं. आणि आपण, आपला वंश व

आपण स्थापलेली नवी गादी, हीं पूर्वापारच्या सर्व राजांनां, सर्व लोकांनां व आतांच्या आणि पुढें होणाऱ्या सर्व मनुष्यांनां, मान्य आणि पूज्य होईल व एक तऱ्हेचें सर्वांच्या दृष्टीनें त्या गादीला महत्त्व आणि श्रेष्टत्व येऊन ती चिरस्थायी होईल. आपल्या व इतर राजघराण्यांतला भेदभाव जाईल. इतर राजे आपल्याशीं समतेनें आणि पूर्ण दिलानें सोयरिकी करतील. तह संबंध ठेवतील व एक तऱ्हेचें नातेंहि मानतील. नवा फ्रान्स म्हणजे प्राचीन राजघराण्यांचा शत्रू, जुन्या राजांस आणि जुन्या राजघराण्यांला नेस्त नावूद करण्यासाठींच या नव्या फ्रान्सचा अवतार, ही इतर राष्ट्रांची झालेली समजूत नाहींशी होईल; इंग्लंडसारख्या शत्रूला हें कारण यानंतर आपल्याविरुद्ध पुढें तरी आणतां येणार नाहीं; राजपक्षाच्या लोकांच्या मनांचें समाधान होईल, धर्मनिष्ठांनां प्रेम वाटेल व अनेक शत्रू लंगडे पडतील. याप्रमाणें पुष्कळच आपणांला अनुकूल अशा गोष्टी रोमहून पोप येऊन त्यानें राज्याभिषेक केल्यानें घडून येतील, असें नेपोलियनला वाटून त्यानें आपल्या मनाचा राज्याभिषेकाविषयींचा निश्चय कायम केला, हें उघड दिसतें.

हें नेपोलियनसंबंधीं ठीक झालें; पण पोपमहाराज आले ते कां? त्यांनीं ही उठाठेव कां केली? यांत त्यांनी काय जोडलें? त्यांनीं आपल्या पंथाला काय मिळविलें? हे प्रश्न राहतातच. पोपला असें साहजिकपणें वाटलें असावें कीं, नेपोलियन एवढा मोठा रावण, पण तो याचक होऊन आशीर्वाद मागावयाला माझे दारापाशीं आला. हा अहंकाराचा पुतळा माझ्या चरणीं लोटांगण घालूं लागला. या अशा तामसी धर्मलंडानें आपल्या मठाचा आदर केला आणि आपल्या गादीला तो शरण आला, म्हणजे आपला दर्जा साहजिकच वाढेल व आपण नेपोलियनलाहि नमविलें हा एक मोठा चमत्कारच घडवून आणला, अशी आपली ख्याती त्रिकाल सर्वभर पसरेल. ज्यानें यूरोपच्या सर्व राजांनां रंगणावर धरलें, तो आपल्याला शरण येतो हें काय थोडें झालें! बाडगा फ्रान्स देश आणि त्याची ती बंडखोर पारीस राजधानी आपल्याला आदरानें पाचारण करतात, यांत केवढें भूषण! फ्रान्स आपल्या राजाचा राज्याधिकार आपल्यापाशीं मागतो

म्हणजे फ्रान्सला राजा देण्याची सत्ता रोमच्या पोपची आहे, हें फ्रान्सला कबूल व मंजूर आहे आणि त्या देशानें हें जगापुढें आतां मान्य केलें आहे, हें उघड झालें. ज्याच्या हातांत देण्याची सत्ता आहे, त्याचेच हातांत घेण्याची सत्ता स्पष्ट ठरते. जो आज देऊं शकतो, तोच उद्यां घेऊंहि शकतो, हा सिद्धांतच आहे. शिवाय नेपोलियन मागणेंकरी होऊन आपलेकडे आला म्हणजे पुष्कळसे हक्क, सत्ता व कांहीं मुलुखहि आपल्याला रोमचें मठाकरतां सहज मिळवतां येतील, असे विचार मनांत आणून व कांहीं थोडेसे आढेवेढे घेऊन थोडया फार विनवण्या करवून घेऊन अखेर पोप पारिसमध्यें जाऊन नेपोलियन बादशहाला राज्याभिषेक करण्यास कबूल झाला.

इकडे टालेरां—हा भिक्षुकच होता--फुशे, बुरिआं, डुराक वगैरे सर्व मंडळींनीं हाच विचार कायम ठरवला व हा उत्सव घडवून आणण्याची तयारीहि केली. पोपसारखा पाहुणा दारीं येणार, तेव्हां त्याच्या आदर-आतिथ्यासाठीं नेपोलियननें फार द्रव्य खर्च करून उत्तम तयारी करविली. नव्या जागा शृंगारल्या, महाल बांधले आणि त्याला सुख आणि समाधान वाटेल अशा सर्व सिद्धता करविल्या. खास त्याला उतरण्यासाठीं आपल्या टुलिरीसच्या वाडयांत जागा तयार केली व त्याच्या भेटीसाठीं नवी सदर बनविलि. त्यांत सुंदर शिल्पकारांनीं घडलेले पुतळे, उत्तम उत्तम चित्रकारांनीं काढलेल्या उंची व फार मोठमोठ्या अशा तसबिरी आणि पोपला रोमची आठवण जेणेंकरून येईल अशा अनेक इतर जिनसा तेथें ठेवविल्या व सर्व प्रकारें जे जें उत्तम व योग्य तें सर्व केलें. सारांश त्याचा वडेजाव उत्तम थाटाचा ठेवला.

रोम नगरीहून आलेल्या पोप महाराजांचा सर्व वडेजाव नेपोलियननें फार थाटाचा ठेवला; पण असें करतांनां त्यानें आपणांकडे कमीपणा यत्किंचितहि येऊं दिला नाहीं. तो तसा येऊं नये किंवा तो नुसता आला असें दिसूंहि नये याकरतां देखील तो फार जपे. पोपची प्रथम भेट झाली असतां, त्याचेकडे मोठेपणा देऊन त्याला उत्थापनादि आदरयुक्त विधी करावे लागतील, त्याला सामोरें जावें लागेल, आपल्या प्रजाजनांच्या

डोळ्यांदेखत आपल्याकडे कमीपणा घ्यावा लागेल, हें सर्व टाळण्यासाठीं, नेपोलियननें अशी हिकमत केली कीं, पोप येण्याच्या दिवशीं तो सहज शिकारीला म्हणून, त्याचे रस्त्याचे बाजूनें दूरवर गेला व पोपची गाडी येऊं लागतांच, सहज आकस्मितपणानें गांठ पडली, असें दाखवून तो पुढें आला. नेपोलियनला पाहतांच शिष्टाचाराकरीतां गाडी थांबवून पोपला खालीं उतरून पाय उतारा होऊन चार पावलें पुढें येणें भाग पडलें. अशा रीतीनें प्रथम भेट झाल्यावर पोपनें आपल्याच गडींत नेपोलियन यास घेतलें व त्यांतील मानाची जागा नेपोलियन यास दिली व पारमार्थीक आणि ऐहिक सत्तेचे हे दोघे सत्ताधीश अशा रीतीनें पारीस शहरांत प्रथम-प्रवेश करते झाले.

राज्याभिषेक होणें तो कोणकोणत्या विधींनीं व कोणकोणत्या मंत्रांनीं व्हावा, याविषयीं फार विचार करून आपला मुद्दा न सोडतां व पोपचें मन न दुखवतां सर्व जुळणी नेपोलियननें फारच शिताफीनें व अकलेनें जुळवून आणली. शार्लमेनच्या वेळेपासून कसकसे विधी होत होते, त्यांचा इतिहास जमवून सर्व विधी ठरवून टाकले. प्रत्यक्ष राजमुगूट राजाच्या मस्तकावर कोणी ठेवावा हा एक प्रश्न त्यांत निघाला. राज्यांतल्या आठ सरदारांनीं मुकूट उपाध्यायाजवळ द्यावा व त्यानें तो राजशीर्षावर ठेवावा अशी पद्धत पूर्वीं होती; पण जन्मानें फ्रेंच नाहीं अशा कोणापासूनहि आपला मुकूट स्वीकारावा हें नेपोलियनला आवडण्यासारखें नव्हतें. पोपचे हातून मुकूटाचें दान घ्यावें, पोपनें आपल्या डोक्यावर मुकूट ठेवावा आणि मग आपण राजा व्हावें, हें त्याच्या मनाला पटेना; कारण यांत मला आपला बादशहा फ्रेंच लोकांनीं केला या म्हणण्यांतला जोर आणि अभिमान कमी होतो. पोप रोमहून निघण्यापूर्वींच ही गोष्ट निघाली होती. त्यावेळीं फ्रान्स मधल्याच आठ सरदारांनीं किंवा हें नको असेल, तर फ्रान्स मधल्या श्रेष्ठ भिक्षुकांनीं राजमुकूट उचलून नेपोलियनचे डोक्यावर ठेवावा अशी एक तोड सुचविण्यांत आली होती; पण त्यावेळीं पोपनें निक्षून सांगितलें होतें कीं, 'मी तेथें हजर असतांना दुसऱ्या कोणाच्या हातून नेपोलियननें राजमुकुट धारण करावा, हें मला मान्य होणार नाहीं. त्यांत माझा अपमान

आहे,' यामुळें ती गोष्ट त्यावेळीं तितकीच राहिली. पण आतां आयतेवेळीं दोघांच्या संमतीनें असें ठरलें कीं, पोपनें मंत्र म्हणून प्रार्थना करून पुढें ठेवलेला मुकूट पवित्र करावा व त्याचवेळीं नेपोलियननें स्वतःच आपल्या हातानें आपल्या मस्तकावर तो धारण करावा व तसाच दुसरा मुकूट जोसेफाईनहि पुढें हात जोडून गुडघे टेंकून राहील तिच्याहि मस्तकावर नेपोलियननें स्वहस्तें ठेवावा. या तोडीनें सर्व भांडण मिटलें आणि दोघांचीहि समजूत पटली. तसेंच अभिषकापूर्वी ख्रिस्तिधर्माप्रमाणें राजानें स्वमुखानें आपलीं सर्व पापें पोपपुढें निवेदन करावीं व त्यांबद्दल परमेश्वरातर्फे पोपनें क्षमा करून राजाचा देह अभिषेक करून घेण्याला आणि पवित्र तेलानें अभ्यंग करण्याला शुद्ध आणि योग्य करावा असाहि एक पूर्वापार विधी होता; पण या संबंधानेंहि नेपोलियनची थोडी हरकत होती. आपण स्वमुखानें अपराध निवेदन करून दोषी म्हणवून घ्यावें, हें एक असो; पण आपण अपराध निवेदन केल्यावर पोपनें आयते वेळीं त्यांतून मुक्त न केलें, त्यानें क्षमा न दिली, तर मग पुढें काय ? पण हीहि अडचण युक्तीच्या पोटीं नेपोलियननें निभावून नेली.

या सर्व विधींत नेपोलियननें आपल्या बरोबरच जोसेफाईनलाहि राज्याभिषेक व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली, तेव्हां सर्वांत मोठी अडचण पडली. ही अट नेपोलियननें कां धरावी व अशी इच्छा कां प्रदर्शित करावी हें सहज कळण्यासारखें नाहीं. आजपर्यंत स्त्रियांना राज्याभिषेक करावा, ही चाल फ्रान्समध्यें प्रचलित नव्हती. आस्ट्रीयाची आन राणी झाली, मेराया थेरीसा, मेरी आंतुआनेत सारख्या विख्यात राण्या होऊन गेल्या; पण त्यांच्या शीर्षावर कोणी मंत्र म्हणून अभिषेक केला नाहीं. तसें करण्याची गोष्टहि कधीं कोणी काढली नाहीं. मग जोसेफाईनबद्दलच अशी इच्छा कां ? कारण कांहीं असो, पण प्रथमपासून नेपोलियननें तिच्याकडून उंची उंची भेटी पोपला धाडवून तिचा व पोपचा पत्रव्यवहार सुरू करून दिला होता व जोसेफाईननें आपल्या लाघवीपणानें पोपचें मन बरेंच ओढून घेतलें होतें. जोसेफाईनला हें पाहिजेच होतें. कारण उद्यां नेपोलियननें टाकलें, तर आपला दर्जा कोणता हें जाणण्याइतकी ती धूर्त

व हुशार होती. अखेर टालिरां वगैरेच्या मार्फतीनें आणि मध्यस्थीनें हेंहि होण्याचें ठरलें व रोम येथील पवित्र पित्यानें तें करण्याचें मान्यहि केलें; पण जोसेफाईनचें व नेपोलियनचें लग्न धर्माच्या आज्ञेबरहुकूम यथाविधी मुळींच झालेलें नव्हतें. त्या काळच्या रूढीप्रमाणें गांवचा मेयर –कुळकर्णी–यानेंच जोसपणाचे अधिकार बजावून तें पुरें केलें होतें. कायद्याला कदाचित् इतकें पुरें असेल पण धर्मबाबतींत, पोपनें नेमलेल्या हस्तकानें ज्यांची गांठ बांधली नाहीं व ज्यांना मंत्रोक्त आशीर्वाद दिला नाहीं, तें जोडपें लग्नसंबंधाचें असें मानतां येण्यासारखें नव्हतें. आणि याकरतां ही गोष्ट तशीच गुप्त राखावी, बाहेर या वेळीं बोलूं नये असें नेपोलियननें जोसेफाईनला बजावून ठेवलें होतें; पण अखेर ती गोष्ट पोपचे कानावर गेली. हें कळल्यावर पोपनें अशा रीतीनें धर्माचा अपमान करण्याचें स्पष्टपणें नाकारलें. त्याची पुष्कळ मनधरणी करून पाहिली; पण तरीहि कांहीं जमेना. नेपोलियन मनापासून अतिशय संतापला व त्यानें पोपची अनेक तऱ्हेनें समजूत घालून पाहिली; पण पोप कांहीं केल्यानें ऐकेना. पोपचें म्हणणें असें पडलें कीं 'धर्माच्या–आणि मी धर्माचा पुरस्कर्ता म्हणून माझ्या–दृष्टीनें जोसेफाईन ही नेपोलियनची बायको असें मानतां येणार नाहीं. तिचा संबंध केवळ दासीचा अथवा बटकीचा आहे; असें धर्माच्या दृष्टीनें म्हणण्यासारखें होतें.' असें पोप म्हणूं लागला; तेव्हां तो एक मोठा गोंधळ येऊन पडला. दोन्ही बाजू थोड्या अटीस पडल्यासारख्या झाल्या. अखेर याचें काय होतें? पोप आला तसाच परत जातो कीं काय? अशीहि कांहींना शंका आली. शेवटीं पुष्कळ भवति न भवति होऊन कांहीं वळत नाहीं, असें पाहून नेपोलियन पुन्हां जोसेफाईनशीं विधीयुक्त विवाह लावण्यास कबूल झाला; पण हें असलें लग्न सर्वांसमक्ष थाटानें चवाठ्यावर होणें हें त्यास अगदींच विपरीत दिसूं लागलें. यांत सर्वांनांच फार कमीपणा वाटेल म्हणून याचा बाहेर गवगवा होऊं न देतां राजवाड्याच्या एका खाजगी भागांत हा समारंभ–रुईच्या लग्नाप्रमाणें–अगदीं गुपचुप उरकण्यांत आला. बरथीयर आणि टालेरां मात्र हजर होते, असें म्हणतात. मंत्रविधी कार्डिनल फेच यानेंच पूर्ण केले. एकदांचें हें

लग्न अशा रीतीनें उरकल्यावर–निदान तसें तें आम्ही उरकलें अशी पोपची खात्री केल्यावर–पुढील राज्याभिषेक-विधी करण्यास पोप तयार झाला. या लग्नासंबंधींच्या फारशा क्लिष्ट चौकशीच्या भानगडींत पोप फारसा पडला नाहीं आणि थोरामोठ्यांच्या बारीक भानगडींत भिक्षुकांनीं फारसें मन न घालावें हेंच बरें. हेंच सांप्रदायाला अनुसरून आहे.

या समारंभामध्यें नेपोलियननें अतोनात पैसा खर्च केला व फ्रेंच लोकांनां अगदीं झुलत ठेवलें. कैक मेजवान्या दिल्या, कैक मोठमोठ्या मिरवणुकी काढल्या, थाटामाटाच्या बैठका आणि मजलसीहि झाल्या, रोषनाई आणि आतषबाजी तर इतकी केली कीं, तिचें प्रत्येकाला आजन्म स्मरण राहिलें. अभिषेक-समारंभाला सर्व मानकऱ्यांनीं आणि अधिकाऱ्यांनीं आगाऊ ठरवून दिलेले उंचीं पोषाख घालून हजर रहावें असें फर्माविलें होतें. समारंभाचे वेळीं कोणाचीहि आपल्या जागेसंबंधें किंवा पोषाखासंबंधें चूक होऊं नये, म्हणून चिताऱ्यांकडून सर्वांचीं लहान लहान चित्रें करवून त्यांवर ठरल्याप्रमाणें पोषाख चढवून त्या चित्रांच्या सभेचा सर्व समारंभ तयार करवून ठेवला होता. म्हणजे कोणास कसला संशय आला, तरी तो तेंथें जाऊन प्रत्यक्ष पाहून त्यास दूर करून घेतां यावा व मग चुकीस जागा राहूं नये. नाटकांत नाचांच्या तालमी करतात त्याप्रमाणें या अश्रुतपूर्वसमारंभाच्या नेपोलियननें तालमीहि करविल्या. आयतेवेळेस तिऱ्हाइतांसमोर गोंधळ उडूं नये म्हणून ज्या ज्या तजविजी करण्यासारख्या होत्या त्या सर्व केल्या.

या समारंभाकरितां उत्तम उत्तम गवयांचे ताफे आणविले व त्या वेळच्या उत्कृष्ट कवींकडून या समारंभासंबंधीं पद्यें रचवून तीं त्या गवय्यांकडून गावविलीं. ज्यांची रागदारी फारच वाखाणलेली होती, अशा रूपसंपन्न नायकिणींकडूनहि समारंभाचीं गाणीं गावविलीं. त्या वेळचा अत्यंत हुषार व कल्पक असा चितारी आणि रंगारी जो डेव्हीड त्याला या समारंभाच्या निरनिराळ्या प्रसंगांचीं चार चित्रें रंगविण्यास सांगितलें. एक एक चित्र तीस फूट रुंद व एकोणीस फूट उंच एवढालें असावें असें ठरवून दिलें. प्रत्येक चित्राबद्दल लाख लाख फ्रांक निव्वळ बक्षिसी कबूल केली. शिवाय खर्च.

अभिषेकाचा विधी व समारंभ पारीसमधील नोटरडेम नांवाच्या प्रख्यात ठिकाणीं झाला. तेथें जाण्याकरतां राजाराणीची गाडी टुलिरीसच्या राजवाड्यांतून सकाळचे दहा वाजतां निघाली. गाडींत नेपोलियननें पाय ठेवतांच एकदम शंभर तोफांची सलामी झाली व तेव्हांपासून तोफांचे गडगडाट चालूच राहिले. या मिरवणुकींत पुढें कांहीं सैन्य आणि पढघमवाले होते. यांचे मागोमाग सर्वांच्या पुढें पारीस शहरचा मुख्य अधिकारी म्युरा हा आपल्या लोकांसुद्धां घोड्यावर बसून जात होता. नंतर कांहीं निवडक सैन्याचीं पथकें चांगला पोशाख करून चाललीं होतीं. त्याच्यामागें ललकारे व तुतारीवाले होते. यांच्या हातांत गरुडध्वजांकित सोन्याच्या काठ्या असून त्यांच्या डोकीच्या टोप्यांना पिसांचे लांब लांब तुरे खोंवले होते. चालतांनां वाऱ्याच्या योगानें हे तुरे हालत असत, तेव्हां तर पाहणाराला त्यांची शोभा फारच अपूर्व दिसे. यांच्या मागें सहा सहा घोड्यांच्या अशा सोन्यानें मढविलेल्या सुंदर गाड्यांची एक रांग लावली होती. यांत निरनिराळ्या खात्यांचे मुख्य कामगार होते व नंतर थोडें अंतर सुटें सोडून त्याच्यामागें खुद्द नेपोलियन बादशाहाची गाडी होती. हिला आठ घोडे जोडले होते व जरतारी झालरींचा लांब पोषाख घालून 'सिझर' हा सारथी हातीं लगामा घेऊन वर बसला होता. गाडीचें सर्वकाम या अद्वितीय समारंभाला साजेल असेंच उत्कृष्ट केलें होतें. द्रव्य आणि मेहनत यांची बिलकुल कसर केली नव्हती. गाडीला बैठकीच्या ऐवजीं सर्व काम बिलोरी केलें होतें. चार बाजूला चार चित्रें उभीं करून त्यानींच जणूं वरचें छत उचलून धरलें आहे असें दाखविलें होतें. आणि वर चार गरूडांनीं एक राजमुगुट धरल्याचें चित्र होतें. आंतून, वर, खालीं आणि बाजूला अनेक चित्रें दाखविलीं होतीं. अशी ही गाडी फार अप्रतिम आणि नयनमनोहर बनवली होती. गाडीच्या आंतील म्हणजे पुढची व मागची बैठकीची जागा इतकी एकासारखी एक केली होती कीं, बसणाराला क्षणभर भूल पडावी. नेपोलियन आणि राणी जोसेफाईन आंत चढलीं, तेव्हां बादशहा आणि राणी दोघेहि चुकून पुढलेच बाजूवर बसलीं. क्षणभरानें ही चूक राणीच्या लक्षांत आली. तेव्हां तिनें जरा हांसून ती चूक बादशहाचे

नजरेस आणली. थोडीशी मौज झाली व दोघेहि उठून नीट मागचे बैठकीचे बाजूवर फिरून बसलीं.

या गाडी मागोमाग थोड्या अंतरावर पुन्हा सहा घोड्यांच्या गाड्यांची रांग लावली होती व त्यांचे मागे जोडीच्या गाड्या तर पुष्कळच होत्या. आणि शिपाईहि फार होते. मिरवणुकीच्या वेळीं रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुतर्फा शिपायांच्या एकापुढें एक अशा, तीन रांगा उभ्या केल्या होत्या. नुसतें रस्त्यावर उभें केलेलें सैन्य जवळ जवळ एक लक्ष होतें. यावरून ही मिरवणूक केवढी असेल, याची कांहींशी कल्पना होईल. थोडे दिवसांपूर्वी राजाची शृंखला आमचे पायांत आम्हीं सहन करणार नाहीं, असें म्हणून ज्यांनीं राजवध केला होता व राजघराणें उध्वस्त करून, राजमुकुट गटा-रांत दूर भिरकावून दिला होता, तेच लोक आतां मोठ्या डौलानें आणि तोऱ्यानें मिरवणूकींत मिरवत चालले होते. राजवधाच्या रक्ताचें डागहि अजून ज्यांच्या हाताचे पुसून गेले नव्हते, तेच लोक आतां यावेळीं या नव्या राजावर त्याच हातांनीं मोर्चेलें वारीत होते. कार्सिकन देशांतल्या या शिपायानें, साधारण कुळांत जन्म पावलेल्या या नेपोलियननें, आपल्या कौशल्यानें आणि बुद्धिसामर्थ्यानें त्या राजसत्तेचा ठावहि पुसून टाकणाऱ्या फ्रेंच लोकांना आपल्यापुढें राज्याभिषेकाच्या मिरणुकींत मिरवावयाला लावलें, ही त्याच्या बुद्धीची केवढी जादू? ही त्याची करामत पाहून त्याच्या अकलेचे कौतुक करावें तेवढें थोडें आहे. गटारांत लोकांनीं झुगारून दिलेला राजमुकूट त्यानें तरवारीचे टोकानें तेथून उचलून आपले डोक्यावर ठेवला आणि या मानी व शूर फ्रेंच राष्ट्राला आपले गोडवे गात आपले भोंवतीं नाचत ठेवलें, हा त्यानें अश्रुतपूर्व चमत्कार घडवून आणला यांत संशय नाहीं. सर्व चाबूकस्वारांचा चाबूकस्वार आणि सर्व वस्तादजींचा वस्तादजी तो. या मिरवणुकींत इजिप्त देशांतल्या आपल्या मामलूक-महमदी-लोकांची पलटण नेपोलियननें पोपच्या गाडीमागें समारंभानें चालविली होती. क्रुसे-डचे युद्धसंग्रामांत ज्यांनीं देह खर्ची घातले, त्यांच्या आत्म्यांनां हा चमत्कार पाहून पुन्हां देह धारण करण्याची बुद्धि खास झाली असेल.

ही जंगी मिरवणुक टूलरीसच्या राजवाड्यांतून निघून मिरवत मिरवत नोटरडेमचे मंदिरांत आली, त्याचवेळीं पोप महाराजांचीहि

मिरवणूक वाजत गाजत तेथें येऊन पोंचली व त्या भव्य मंदिरांत जमलेल्या सहस्रावधी लोकांच्या सभेंत पोपनें सर्व फ्रेंच राष्ट्रसमोर, सर्व राष्ट्रांच्या संमतीनेंच तो नेपोलियनचा राज्यभिषेक-समारंभ यथामंत्र व यथाविधि पुरा केला. म्युरा, वरनेदो, बरथीयर, फूशे वगैरे सर्व मंडळी या समारंभाचे समयीं कौतुकानें आणि हौसेनें निरनिराळ्या कार्यावर दक्ष होती. टालेरांचा या कार्यांत पहिल्यापासून मोठा उत्साह होता. सिंहासनारूढ होते वेळीं राजाचा करंडा पुढें करण्याचें काम यानें आपलेकडे घेतलें होतें. हा यावेळीं ग्रांड चेंबरलेन या थोर इभ्रतीच्या हुद्यावर होता. राजसत्तेची शपथ नेपोलियननें घेतली, तेव्हां तेथें जमलेल्या व बाहेरच्या सहस्रावधी लोकांनीं, उंच स्वरानें व आनंदाच्या गर्जनेनें त्याला आपली संमति व मंजुरी दिली. समारंभानंतर त्याच्या सांगतेसाठीं सर्वभर मेजवान्यांचे व जलशांचे थाट झाले. नुसत्या समारंभाप्रीत्यर्थच सहा कोटींचा चुराडा उडाला. शिवाय इतर प्रसंगीं खर्च झाला तो वेगळा.

चातुर्मासपर्यंत पारीस नगरांत मुक्काम केल्यानंतर पोप पायस हे आपल्या रोम शहरांत पीठस्थानीं मोठ्या समारंभानें परत गेले व राज्याभिषेकाचे सर्व सोहाळे पुरे झाले. पोपला नेपोलियननें देणग्या पुष्कळच दिल्या; पण दिल्या देणग्या तितक्यानें त्या भिक्षुकाचें समाधान फारसें झालें नाहीं. त्याला जवळ जवळ रिक्त हस्तानेंच आपली बोळवण झाली, असें वाटलें.

नेपोलियनला फ्रान्सचा बादशहा केला व त्याचा राज्याभिषेक समारंभ सर्व राष्ट्रानें उत्तम तऱ्हेनें साजरा केला, यांत जितका त्या राष्ट्राच्या मायेचा किंवा प्रेमाचा तितकाच मतलबाचाहि भाग होता. या वेळीं कांहीं कारणानें नेपोलियन हा फ्रेंच लोकांना विशेष प्रिय झाला होता किंवा त्याच्यावर त्यांची एकनिष्ठा विशेष तऱ्हेनें याकाळीं जडली होती, अशांतला प्रकार मुळींच नव्हता. खरा प्रकार थोडासा उलटच होता. ड्यूक डी-एन्‌गाईनच्या वधामुळें पुष्कळांची नेपोलियनवरील प्रीति कमी झाली होती. या वधाची बातमी ऐकून जोसेफाइनचें धाबें अगदीं दणाणून गेलें होतें. तिनें रडून रडून मोठा आकांत केला होता व तिला तिचें जीवित

विषासारखें कडू वाटूं लागलें. फूशेला हा नेपोलियन आतां घसरूं लागला, असें वाटूं लागलें होतें. ही बातमी कळल्यावर बरनाडोला थोडें बरेंच वाटलें. तो म्हणाला, "आतां ही स्वारी जाळ्यांत ठीक गुंतेल." टालेरां यावेळीं म्हणाला, "हा वध म्हणजे नुसता गुन्हा आहे, इतकेंच नव्हे तर याहूनहि हें जास्त भयंकर आहे; ही एक मोठी चूक आहे." नेपोलियनचा भाऊ लुसीन याला हें कळलें, तेव्हां तो एकदम आपले मंदिरांत बायकोकडे गेला व तिला म्हणाला, "आलेक्झांड्राइन! आतां येथून पळून जाण्याची वेळ आली आहे. वाघाच्या जिभेला रक्ताची चट लागली." सेगूर सारख्यांनांहि या कृत्याचा मोठा तिरस्कार वाटला, पण कांहीं झालें, तरी लोकांना आतां घरांतल्या भांडणतंटयांचा अगदीं वीट आला होता. पुन्हां क्रांतीची वेळ आली, तर रक्ताच्या नद्या वाहूं लागतील हें त्यांच्या डोळ्यांनां स्पष्ट दिसत होतें. पुन्हां बोरबॉन् राजे आले, तर ते कसा सूड उगवतील आणि किती कुटुंबांनां वेदना सोसाव्या लागतील याची लोकांनां चांगली कल्पना होती. यूरोपांतल्या परकी राजांचें पाऊल आपल्या देशांत शिरविण्याची संधी त्यांस मिळाली, तर सबंध देश ते कसा धुळीस मिळवून टाकतील याचाहि त्यांनां चांगला अंदाज होता. यामुळें त्या सर्व फ्रेंच राष्ट्राला या वेळीं स्वस्थता, शांतता व सुख यांची इतकी इच्छा झाली होती कीं, त्यासाठीं नेपोलियनला बादशहा नेमण्यास ते राजी झाले. कारण हा एकच मार्ग, स्वस्थता व शांतता नांदण्याला उघड व अवश्य होता. तरी देखील तो सर्वांनां एक मतानें पसंत होता असें नाहीं. सिनेटमध्यें ही सूचना आली, ते दिवशीं साईस हा गैरहजर राहिला. 'फ्रान्सच्या कल्याणाकरतां' असें करणें हें त्याला अवश्य वाटलें. ट्रायब्यूनेटच्या सभेंत तर कारनो यानें या सूचनेच्या विरुद्ध भाषणहि केलें व त्यानें एकटयानें आपलें मत सूचनेच्या विरुद्ध दिलें. पण 'एक शिवायकरून बाकी सर्वानुमतें' ती सूचना तेथें मंजुर झाली. अगदीं शेवटीं सर्व राष्ट्रांतील मतदार लोकांचीं मतें घेतलीं, तेव्हां पस्तीस लक्ष लोकांनीं आपलें अनुमोदन दिलें; पण कांहीं हजार मतदारांनीं विरुद्ध मतें दिलीं. यांत पारीसमधील सुमारें दोनशें वकिलापैकीं फक्त तिघांनींच आपली मंजुरी दिली. बाकी

लोकांच्या मदतीसाठीं जाऊं लागला. अधिकाऱ्यांनीं त्यास अडविण्याचा प्रयत्न केला; पण त्यानें त्या सर्वांस झिडकारून म्हटलें, "नका, या वेळेस माझे आड तुम्हीं कोणीहि येऊं नका." असें म्हणून त्यानें आपली होडी एकदम समुद्रांत नेली. किनारा सोडून होडी जराशी दूर गेली नाहीं, तोंच लाटेच्या थापेनें पाणी एकदम आंत शिरलें व होडी अगदीं कलंडली. बादशहा बुडालाच असता; पण थोडक्यांत चुकलें. त्याच्या डोक्याची टोपी मात्र वाहून गेली. इतकें झालें तरीहि त्यानें होडी मागें फिरविली नाहीं. बादशहाचें हें धाडस पाहून हाताखालच्या इतर अधिकाऱ्यांस स्वस्थ कसें राहवेल ? त्यांनींहि मग मिळाल्या तितक्या होड्या घेऊन त्या समुद्रांत घातल्या व ते सर्वजण त्या खलाशांचे जीव वांचविण्याचे अनेक तऱ्हेनें यत्न करूं लागले; पण दुर्दैवानें त्यांचे यत्नास फारसें यश आलें नाहीं. दुसरे दिवशीं कैक शूरांचे मुडदे व बादशहाची. टोपी किनाऱ्यास येऊन लागली. झाल्या गोष्टीबद्दल नेपोलियन यास फार वाईट वाटलें. त्यानें मयतांच्या कुटुंबांस आपल्या खासगी रकमेंतून पुष्कळ द्रव्य देऊन अनेक तऱ्हेचें साह्य केलें.

नेपोलियननें बुलोन येथें इंग्लंडच्या स्वारीकरितां ही जंगी तयारी केली, तिच्या योगानें इंग्लंडला बरीच धडकी भरली व तिचा प्रतिकार करण्यासाठीं इंग्लंडनें अनेक तऱ्हेचे उद्योग केले. परंतु या स्वारीच्या तयारीचा शेवट नेपोलियनच्या मनाजोगा झाला नाहीं. तो नेहमीं म्हणे, 'मला सहा कलाकांची अवधी सांपडली व इतका वेळ इंग्लंड गाफील राहिलें, तर मी इंग्लंड व बाकी राहिलेलें जग सहज जिंकीन. मी व माझें दीड लाख सैन्य इतक्यांचे पाय एकदां इंग्लंडच्या किनाऱ्याला लागले म्हणजे मग इंग्लंड सहज माझे हातांत येईल.' नेपोलियनच्या आरमाराच्या व इंग्लिश आरमाराच्या दोन चार वेळां लहानसहान झटापटी झाल्या. एकदां तर नेपोलियनचीं जहाजें इंग्लंडच्या किनाऱ्याच्या अगदीं आसपासहि गेलीं होतीं; पण त्यांना तेथून तसेंच परत फिरावें लागलें. ज्या एका सरदारावर नेपोलियनची मोठी भिस्त होती, तोच मध्यंतरीं दुर्दैवानें मरून गेला. त्याच्या मागून त्याच्या जागेवर नेमलेला अधिकारी अगदींच भित्रा व नालायक असा होता. धाड-

सापेक्षां भीतीची धडकी त्याच्या मनाला चटकन घेरून टाकी. नेपोलियननें आंखून दिलेल्या नमुन्याप्रमाणें या सरदारानें आरमारी स्वारीचा एकवेळ यत्नहि केला, पण तो सपशेल फसला. हा सरदार घाबरून जाऊन वेळेवर हल्ला न करितां दर्यांत दूर आश्रय धरून राहिला. त्याचें हें वर्तन पाहून नेपोलियनला फार राग आला. आतां पुढें नेपोलियन बादशहा काय करतो इकडे बुलोन मधल्या सर्व सैन्याचे डोळे लागून राहिले असतां त्यांनां दुसरेच दिवशीं पुढील जाहिरनामे चिकटविलेले आढळले व वाचलेले ऐकूं आले. 'बुलोन येथील छावणींतल्या शूर शिपाई मर्दहो ! ! तुम्हांस इंग्लंडला जावयाचें नाहीं. इंग्लिशांनीं आस्ट्रीयाच्या बादशहास पुष्कळ सुवर्णाचा लांच दिल्यामुळें त्यानें नुकतीच फ्रान्स विरुद्ध लढाई जाहीर केली आहे. ठरलेली मर्यादरेषा ओलांडून त्याचें सैन्य बाहेर उतरलें आहे व त्यांनीं बव्हेरियावर हल्लाहि केला आहे. शिपाई गड्यांनों ! ! ऱ्हाईन नदीपलीकडे वैभवाचीं नवीं निशाणें तुमची आतां वाट पहात आहेत. पूर्वी जिंकलेल्या या शत्रूचा समूळ नायनाट करण्याची आतां आपणांस घाई केली पाहिजे.'

इतिहासकार व वृत्तलेखक सांगतात कीं, इंग्लंडची मोहीम फसली, असें ज्या दिवशीं नेपोलियनच्या लक्षांत आलें, त्याच दिवशीं त्यानें आपल्या डारू नांवाच्या अधिकाऱ्यांस बोलावून आणलें व एकदम पुढील म्हणजे आस्ट्रीयावरील मोहिमेच्या लहान बाबी, मुक्काम व सैन्याच्या हालचालीसुद्धां सर्व यादींचीं टिपणें त्यास सांगून त्याचेकडून लिहविलीं व त्याप्रमाणें एकदम सुरवात करण्यास सांगितलें. यासाठीं वीस हजार खटाऱ्यांची त्यानें आगाऊच तरतूद करून ठेवविली होती. ते आणून सर्व सैन्य त्यानें एकदम ऱ्हाइनचे कांठावर उतरविलें व पुढील सर्व मोहीम त्या ठरविलेल्या यादी बरहुकूम शेवटास नेली.

बुलोनची छावणी व नेपोलियननें इंग्लंडच्या स्वारीची केलेली तयारी, हें सर्व खरें होतें कीं हें नाटक होतें ? यूरोपांतल्या मोहिमेची तयारी करण्यासाठीं व सैन्याची नवी भरती करतां येण्यासाठीं योजलेलें केवळ मिष होतें, कीं काय, हें एक मोठें कोडेंच आहे. येवढी तयारी करण्याकरतां व जहाजें

बांधण्याकरितां नेपोलियन उगाच निरर्थक श्रम व पैसा खर्च करील हें असंभवनीय वाटतें. बांधलेलीं जहाजें दर्यांतल्या लढाईला अपुरीं होतीं व एक अधिकारी गचाळ निघाला म्हणून केवळ तेवढ्याचकरितां हातीं घेतलेली एवढी मोठी मसलत नेपोलियननें एकदम सोडून दिली, ही बाब लक्षांत घेतली असतां कदाचित् हा नुसता तमाशा असेल असेंहि वाटतें. एक मोठें सैन्य उभारतां यावें व आपल्या राज्याभिषेकाचे सुमारास फ्रेंचांचीं मनें त्यांच्या नेहमींच्या आवडीच्या विषयाचे नादानें गुंगवून ठेवावीं व यांतच साधल्यास इंग्लंडलाहि धमकावून त्याच्याशीं चांगलासा तह करण्याची संधि मिळाल्यास पहावी, असाहि त्याचा हेतु असेल. नाहीं कोणी म्हणावें ? खरें काय असेल तें असो; पण या हुलकावणीनें इंग्लंडला धडकी भरली, हें खरें आहे. या मिषानें जमविलेल्या या सैन्याच्या मदतीनें नेपोलियननें लवकरच सारें यूरोपखंड हादरून टाकलें हेंहि खरें आहे. ही स्वारीची तयारी खरी मनापासून असेल, हा डाव खरा असेल, तर इंग्लंडनें हर उपायानें ती स्वारी होऊं दिली नाहीं व सर्व भट्टी वाया घालविली, यामुळें डाव इंग्लंडनें जिंकला असें होतें; पण ही तयारी खोटी असेल, हा केवळ लटकाच डाव असेल तर यांत नेपोलियन जिंकला असें ठरतें. कारण त्यानें येथें सैन्य उभारून याच सैन्याच्या जोरावर यूरोपांतले शत्रू पादाक्रांत केले.

## प्रकरण पंधरावें.

# राज्याभिषेक.

बुलोनच्या छावणींतले सर्व प्रकार तिकडे चालू असतांनाच नेपोलियनच्या व फ्रान्सच्या आयुष्यांतील एक फार मोठ्या महत्वाची गोष्ट घडून आली. पारिसमधील राजसभेनें नेपोलियन हा सर्वश्रेष्ठ कौन्सल होता, त्याऐवजीं त्याला बादशहा नेमावा व ती गादीहि त्याचेकडे वंशपरंपरेनें चालावी असा ठराव केल्याचें मागेंच सांगितलें आहे. यानंतर सर्व राष्ट्राची संमति घेऊन त्यानें स्वतःला राज्याभिषेक करविण्याचा विचार

निश्चित केला. हा विधी पूर्वापार पद्धतीला अनुसरून व्हावा व अभिषेक स्वतः रोम येथील सर्व श्रेष्ठ धर्माधिकारी जो पोप त्याचेच हातून व्हावा, हेंहि त्यानें ठरवून त्याप्रमाणें पोपकडे खलितेहि रवाना केले. पोपनें स्वतः आपल्या मंडळासह पारीसमध्यें येऊन स्वमुखानें मंत्र म्हणून स्वहस्तानें अभ्यंग आणि सिंचन-विधी करून हा अभिषेक-विधी पार पाडावा अशी नेपोलियननें पोपला विनंति केली.

यांत असे अनेक प्रश्न उद्भवतात कीं, हें असें नेपोलियननें कां योजिलें ? यांत त्यानें स्वार्थ काय पाहिला ? त्याला परमार्थ कोणता दिसला ? त्यानें इह लोकीं काय इच्छिलें ? परलोकीं काय मिळवूं पाहिलें ? राष्ट्राचें यांत काय हित केलें ? तसेंच ख्रिस्ती धर्माचा सर्व श्रेष्ठ अधिकारी जो पोप, कीं ज्याच्या पायाच्या पायपोसाचें सर्व ख्रिस्त्यांनीं मोठ्या आदरानें चुंबन घ्यावें आणि राजापासून रंकापर्यंत ज्याच्या आशीर्वादाची लालसा सर्वांनीं धरून असावें, त्या पृथ्वीवरील परमेश्वराच्या मुतालिकानें आपलें अति प्राचीन रोमनरचें धर्मपीठ सोडून, येथें पारीसमध्यें येण्याची तसदी कां घ्यावी ? आणि ही कशाकरतां ? नेपोलियन सारख्याला पारीससारख्या भ्रष्ट शहरांत अभिषेक करण्याकरितां ? यांत पोपनें आपल्या अनुयायांकरतां काय मिळविलें ? ख्रिस्ती धर्माचें कोणतें बरें केलें ? असे अनेक प्रश्न दोन्हीं बाजूंनीं मनापुढे उभे राहतात.

नेपोलियनच्या धर्मविषयक समजुती कोणत्या प्रकारच्या होत्या, हें मशहूर होतें. थोडे दिवसांपूर्वी ‘ कानकारडट’ वर सही करून फ्रान्स देशांत धार्मिक विधी नेपोलियननें पुन्हां सुरू केले होते व तो स्वतःहि दर रविवारीं देवळांत प्रार्थनेला जाई, हें खरें; पण हे सर्व करण्यांत धर्मश्रद्धेचा थोडातरी लेष होता, असें समजणें मोठी चूक होईल. या करण्यांत कोणताहि धार्मिक हेतु नसून यांत केवळ राजकीय हेतु होता. ही धर्मश्रद्धा नसून हें शुद्ध राजकारण होतें. इतालींत मेरी आईचे मठांतलीं तिनें वापरलेलीं भांडीं व तिचें म्हणून जतन करून ठेवलेलें पांघरूण ज्यानें केवळ पोरखेळ म्हणून उडवून दिलें, त्याला आतां धर्मश्रद्धा ती कोठून येणार ? जो इजिप्तमध्यें स्वतः ला ‘ अली बोनापार्ट’ म्हणवूं लागला, व जो अनेक फ्रेंच

सर्व विरुद्ध बाजूला होते. असे फ्रान्समध्येंहि कांहीं लोक नेपोलियनच्या या करण्याला विरुद्ध होते. ते मत्सर, लोभ, सूड, मताभिमान व स्वदेशप्रीति यांपैकीं एक किंवा अनेक कारणांनीं तसे विरुद्ध झाले असतील; पण ते विरुद्ध होते व त्यांची संमति नव्हती, हें खरें आहे. ते लोक नेपोलियनच्या या राज्याभिषेक समारंभाची टवाळी करीत व करवीत. यांपैकीं कांहीं कुचेष्टेखोर लोकांनीं राज्याभिषेक समारंभाचे वेळीं पुढील जाहीरपत्रक फ्रेंच भाषेंत पारीसमध्यें एका चवाठ्याचें जागीं लाविलें.

THE IMPERIAL COMEDIANS

WILL TO-DAY PRESENT

THE FIRST REPRESENTATION

OF

THE EMPEROR IN SPITE OF ALL THE WORLD

FOLLOWED BY

**THE FORCED CONSENT.**

*THIS SPECTACLE IS PRENSENTED ON BEHALF OF AN INDIGENT FAMILY.*

स्वतःवर राज्याभिषेक करवून राजछत्र व राजदंड धारण केल्यानंतर आपल्या सार्वभौमत्वाला आणि 'बादशहा' या पदवीला शोभतील असे नवीन मानकरी व नवीन कामगार त्यानें सिद्ध केले. राज्यक्रांतीच्या वरवंट्याखालीं सर्व उच्चनीच पदव्यांचा चुराडा होऊन गेला होता व तो मोठा थोरला वाफेचा रूळ वरून फिरल्यामुळें सर्व लोक एकसारखे झाले होते. पण हळूहळू ही स्थिति पालटून पुन्हां पहिले प्रकार कौन्सलेटचे वेळेपासूनच सुरू होऊं लागले होते. आतां तर जुने रुमाल चाळून त्यांतून सर्व जुन्या पद्धती आणि जुने रीतीरिवाज हुडकून काढून त्यांप्रमाणें पुन्हां रिवाज चालू करण्याची सुरवात झाली व सेगूर, टालेरांसारखे पूर्वीच्या राजवटी-

तीले माहितगार पुरुष व माडम काम्पनसारख्या जुन्या जमान्यांतल्या माहितगार स्त्रिया यांना चालीरीतीचे व शिरस्ता आदबींचे धडे पढविण्याच्याच कामावर योजलें होतें. एकमेकाला ' सिटिझन ' किंवा ' भाऊ ' अशा शब्दानें संबोधण्याचें बंद होऊन आदबीच्या व सन्मानाच्या पदव्या प्रचारांत आल्या. नेपोलियनला, बादशहाला योग्य अशा ' सरकार ' या संबोधनानें संबोधण्याची सुरवात कांबेसरीस यानें केली. कांबेसरीस हा थोडे दिवसांपूर्वी दुसरा कौन्सल होता, तो आतां नव्या राजमंडळांत अष्टप्रधानांपैकीं मुख्य मंत्री( Arch Chancellor ) हें पद पावला. अजेन, म्यूरा वगैरेनांहि नव्या पदव्या मिळाल्या. यावेळीं ' मार्शल ऑफ फ्रान्स ' ही अत्यंत बहुमनाची पदवी निर्माण करून ती त्यानें अठरा शूर सरदारांना दिली. यांत ने, लेन्स, दाव्हू, बेसियर, म्यूरा बर्थियर, मांसे, मारतिए हे त्याच्या बरोबरीचे नवे सरदार होते. बरनेडो हा थोडा मत्सरी होता व नेपोलियननें राजछत्र धारण करावें, हें त्याला मनापासून संमत नव्हतें. तरीपण त्याला देखील ही नवी मानाची पदवी देऊन मार्शल केलें. तसेंच मासिना, लेफेरे, लाजरो, साल्ट केलरमन, सेरूरीर, परोनान, ब्रून व जारडन हे सगळे जुन्या राज्यक्रांतीच्या वेळेपासून लढत आलेले राज्यक्रांतीचे व लोकसत्तेचे मनापासन चाहते होते. फ्रेंच मनुष्य म्हणजे सगळे सारखे, त्यांच्यांत लहान मोठा हा भेदभाव नसावा, असें म्हणणाऱ्या या जुन्या शिपाईगड्यांनां यावेळीं ' मार्शल ' ही बहुमानाची नवी पदवी देऊन नव्या जुन्याची त्यानें उत्तम सळमिसळ केली, मार्शल ही लष्करी पदवी होती. पदवीप्रमाणेच त्यानें यापूर्वी ' लीजन आफ आनर' नावाचें एक पदक निर्माण केलें होतें. तेंहि या वेळीं त्यानें अनेक इसमांस दिलें. 'लीजन आफ आनर'च्या पदकांत राजसत्ता व लोकसत्ता या दोहींचें एकू तऱ्हेचें मिश्रण झालेलें दिसतें. कोणताहि मान थोर कुळांवर, किंवा उच्च जन्मावर अवलंबून असू नये. ' जात ' आणि ' वर्ग ' या दोहींचा नायनाट व्हावा, हें क्रांतीचें जें एक तत्त्व ते यांत चांगलें साधलें होतें. तसेंच हें ' लीजन आफ आनर ' चें ' पदक ' किंवा हा ' बिल्ला ' लष्करी, मुलकी वगैरे सर्वांनां मिळत असे. जो मनुष्य आपल्या धंद्यांत व आपल्या पेशांत उत्कृष्ट ठरेल, जो विशेष गुणांनीं मंडित

असेल, तो कोणीहि असो, त्याला हा अति उंची दागिना, ह्मणजे हें 'लीजन, आफ आनरचें' पदक नेपोलियनकडून मिळे. शिपायाचें शौर्य, मुत्सद्याची धूर्तता, पंडिताचें पांडित्य, नाटक्याचें नाट्यकला-कौशल्य' गवयाची उत्तम आवाजदारी, शास्त्र्याचें शास्त्रीय ज्ञान, हीं सर्व या पदकास योग्य समजलीं जात, ह्मणजे यांपैकीं कोणत्याहि तऱ्हेचें ज्ञान उच्चत्वानें कोणाहि इसमाजवळ वास करीत असलें, तर तो इसम या पदकाला योग्य समजला जाई. ह्मणजे हें पदकभूषण लेणारे लोक फ्रान्सच्या मोठेपणाचे खांब आहेत व हे सर्व एक तऱ्हेनें बांधव म्हणून बांधले गेले आहेत, असें या पदकानें दर्शविलें जात असे. नेपोलियन बोनापार्ट हा स्वतः हें पदक मोठ्या अभिमानानें आपल्या कोटावर लावी. राजछत्र धारण केल्यावर लीजन आफ आनरचीं पदकें त्यानें आपल्या स्वहस्तानें अनेक इसमांस दिलीं. पलटणीच्या मुख्य सरदाराला व अगदीं साध्या शिपाई प्यादाला त्याच्या आंगच्या गुणामुळें हें एकच पदक मिळालेलें पाहून जुना राज्यक्रांतीच्या वेळचा अभिमान व लोकसत्तेच्या समानत्वाच्या तत्वाची प्रीति त्या लोकांत साहजिकपणें जागृत होई. या पदकाच्या देणगीबरोबर जमीन किंवा द्रव्य यांचीहि देणगी मिळे: यामुळें या पदकांची देणगी भूषणाची तशीच फायद्याचीहि वाटे. आणि ही देणगी देणें केवळ नेपोलियनच्या मर्जीवरच असल्यामुळें या योगानें आपल्या स्वतःवर प्रेम करणारे व आपल्याला ऋणी असे सर्व प्रकारच्या आणि सर्व दर्जाच्या लोकांत त्यानें अनेक इसम तयार केले. आणि यायोगें तो मोठ्यांच्या तसाच लहानांच्याहि मायेचा व लोभाचा विषय झाला.

पारीसमधील मोठा समारंभ उरकल्यावर कांहीं दिवसांनीं ह्मणजे ता. २० मे १८०५ रोजीं इतालीस जाऊन आपण 'इतालीचा राजा' पद घेतल्याचें जाहीर करून जुना लामबर्डी येथील प्रसिद्ध 'पोलादी मुगुट' नेपोलियननें धारण केला. हें नवें राजपद धारण केल्यावर त्याला योग्य असें एक नवें 'राजचिन्ह' व 'राजमुद्रा' हीं तयार करविलीं. याचें चित्र

ज्या कारागिरानें प्रथम कल्पिलें त्यानें एक चित्र काढून त्यावर ( A lion resting ) 'निद्रित हरि' अशीं अक्षरें काढलीं होतीं. नेपोलियननें हें चित्र पाहून त्यावरील ' निद्रित हरि' हीं अक्षरें आपल्या लेखणीनें खोडून टाकलीं व त्यांऐवजीं ( An eagle soaring ) ' भरारी मारणारा गरुड' अशीं अक्षरें लिहिलीं. आणि हें त्याचें करणें अगदीं सार्थ होतें. कारण गजश्रेणींचीं गंडस्थलें भेदून टाकून हा केसरी गिरिकुहरांत कधींच निद्रिस्त न होतां सारा वेळ दूर दूर आणि उंच उंच प्रदेशांत एकदम छडप मारण्याचींच कृत्यें हा गरुड नेहमीं करी.

---

REFBK-0001915

# छापत असलेलीं नवीन पुस्तकें.

३६ प्रणयपंक—(तृतीय खंड) या सामाजिक कादंबरीचे दोन खंड ज्यांनीं वाचले आहेत, त्यांना ही कादंबरी किती मनोरंजक व भावपूर्ण आहे, हें निराळें सांगावयास नको.

३८–३९ कौंट टॉलस्टॉय—(पंचम व षष्ठ खंड) मराठी भाषेंत हा चरित्रग्रंथ अगदीं अपूर्व व अत्यंत उपयुक्त असून सध्यांचे सर्व प्रचलित प्रश्न या पूर्वीच टॉलस्टॉय यांनीं कसे सोपपत्तिक रीतीनें सोडविले आहेत, याचा प्रत्येक हिंदवासीयानें या वेळीं अभ्यास करावयाला पाहिजे. प्रथम, द्वितीय व तृतीय अशा तीन खंडांचा पूर्वार्ध सहा चित्रांसहित जाड मजबूत बांधणीचा तयार आहे. चवथा खंड छापला असून पांच, सहा छापत आहेत.

४१ करुणा—(उत्तरार्ध) ही गुप्तकालीन ऐतिहासिक कादंबरी अत्यंत मनोरंजक असून तिचा पूर्वार्ध छापून तयार आहे व उत्तरार्ध छापत आहे.

४३–४४ चक्रवर्ति नेपोलियन—(द्वितीय व तृतीय खंड) या रणोदात्त वीरश्रेष्ठ नरपुंगवाचें मराठी भाषेंत स्वतंत्र असें हें सचित्र चरित्र प्रथमच प्रकाशित होत असून तें उत्कृष्ट कादंबरी पेक्षांहि मनोरंजक आहे पांच चित्रांसहित प्रथम खंड छापून तयार असून दुसरा व तिसरा छापत आहेत.

भारत-गौरव-ग्रंथमाला-गिरगांव-मुंबई.